204

# गिरीवासी

# काव्य.

भाग दुसरा.

किं० १॥ रु०

श्रुतिबोध मुद्रा-मंदीर.

# गिरिवासी काव्य.

कवि

कै. बापूजी वैजनाथ पतकी

माजी नायब शिरस्तेदार कमिशनर ऑफिस, वऱ्हाड.

---

प्रकाशक

रामराव बापूजी पतकी

सन १९१५

---

कि. २ रुपये.

---

श्रुतिबोध मुद्रा-मन्दिर

४७, काळबादेवीरोड.

मुंबई.

परमपूज्य

कै. वा. तीर्थरूप बापूसाहेब पतकी

यांचें

# गिरिवासी काव्य

कै. वा. गोविंद रामराव पतकी

यानीं

अत्युत्कृष्ट उत्साहानें व ईशभक्तीनें प्रेरित होऊन प्रसिद्ध करण्याचें
काम हातीं घेतलें होतें. पण त्यांच्या अकालीं
निधनामुळें तें अपुरें राहिलें. आतां

उभयतांचें स्मारक

ह्मणून मी आज हें सम्पूर्ण काव्य

प्रसिद्ध करित आहें.

रामराव बापूजी पतकी


( सर्व हक्क प्रकाशकांनीं राखून ठेविले आहेत. )



श्री. रामराव अण्णासाहेब पतकी.



श्री· दादासाहेब खापर्डे·



कै. गोविंदराव पत्की, बी. ए.



**श्री. जयराम केशव असनारे,**

बी. ए. एल् एल्. बी. वकील उमरावती.

# पदांचा वर्णानुक्रम.

## सूची ( नं. २ )


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| **अ** | |
| अक्षत अक्षत मोत्यें वाटिति | २४५ |
| अगे बाई पाहुं चला रघुवीर | २४५ |
| अगे बाई सांगुं मी काय तुला | २२८ |
| अजब नार है छेल छबेली | १२० |
| अजब रूप है इस कामिनका | ५६ |
| अजि दिसेंत विघ्न कांहीं | ३९ |
| अतां येथें मी करूं काई | ५३ |
| अब मोहि रामचरनकी आस | २९७ |
| अब मोहि राम भजनसो काम | २९७ |
| अब मोहि राम बिना नहिं काम | २५२ |
| अब मैं कैसे करूं मेरि माई | ५५ |
| अब मैं कैसे करूं मेरि माई | १९१ |
| अब मुझे राम बिना नहि काम | २९५ |
| अतां मज भेटेल केंवि हरी | २९८ |
| अतां मज भेटेल राम कसा | २९९ |
| अम्बे, जगदम्बे, विश्वकदम्बे | ३०५ |
| अह्मां देऊनियां दोष | ७३ |
| अयि जगदम्बे, विश्वकदम्बे | २२४ |
| अयोध्या गतभा कां दिससी | २४८ |
| अवघा हरि भरला, हरि भरला | २९१ |
| अहो सांगा सुरराज | ११९ |
| **आ** | |
| आतां कैसें मी करुं काई | २०३ |
| आतां न दिसे हो गति बरवी | २१० |
| आले कपिगण पुष्कळ | २५८ |
| आतां मजला हो चालवेना | २६५ |
| आतां कोठें मी पाहूं तुजला | २६८ |
| आलों मनिं धरुनि काम | २७० |
| **इ** | |
| इच्छितां जरि अपुल्या पतिला | १५५ |
| इन्द्रसभामों इक दिन सुमती | ६० |
| इन्द्रजीतके बुरे हाल है | २२९ |
| **उ** | |
| उधोजी सांगा यदुवीरा | ३१३ |
| उतरला तरुच्या जरि खालता | २२८ |
| उद्धवा तें सगुण ब्रह्म | ३१२ |
| उभय मंडपीं पुजनमातृका | २४५ |
| उमा रमा सावित्री तीनों | १५३ |
| उमा रमा सावित्री ह्मणती | १५४ |
| उमा रमा सावित्रीलागीं | १५४ |
| **ए** | |
| एकटी, परमसंकटीं | ३०८ |
| **ऐ** | |
| ऐकुनि भीमाचे बोल | ७० |
| ऐसी सुन्दर तेरी काया | १९२ |
| **क** | |
| कडे दिसति चौंकडे | २६५ |
| कथी लक्ष्मण हेरांसि | २१७ |
| कपी बोले काय गे | २०९ |
| कनक दिधले किती भार | ११२ |
| करिन ह्मणसी मज नार | ५३ |
| कथितों तुला खरें जाण | २७१ |
| कधीं भेटेल राम आतां | १५० |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| करीती जप ध्यान, रुद्राक्ष | २३५ |
| करूं मी गति कैशी | २५१ |
| कशि त्यजिली रे दया | २५२ |
| कशी मग राम करील | २७६ |
| कसा अजि भ्रम तुजला | २०० |
| कशी वाटेना लाज गणपराया | २२४ |
| करी मैनावति नमन गुरुपायां | १९१ |
| करी सावध सकळांस | ८४ |
| कशि करुणा रे, तुला नाहीं | ६४ |
| करूं आतां मी कैसे काय | १४५ |
| करुनि हास्य वदे पार्थ | ९० |
| कसा आणिला हा दास | १४५ |
| कहत कानीफा सुनो मैनामाई | १९४ |
| कहत कौसल्या प्रेम तिहारो | २५१ |
| कहत अंजनापोत सुगलसे | २५७ |
| करि निशा, अयनसदृशा | २८१ |
| कलियुगीं, नाम हरीचें सार | २९३ |
| करि मना रामपदाची जोड | २९६ |
| कधिं भेटसि मंगलधामा रे | ३०३ |
| करुणाकर श्रीकृष्णमुरारी | ३०५ |
| कहत अर्जुन तब जाय | ७१ |
| कहत जालन्धर सुनो मेरि माई | १९१ |
| कहत धनंजय, सुनो युधिष्ठिर | ८१ |
| कां झिडकारिशि तूं मजला | १२२ |
| कांगे झालां ऐशा दंग | ११२ |
| कां देव क्षोभला तरि हो | ५५ |
| कां देव क्षोभला न कळे | २१ |
| कां रे झालासी तूं दंग | ६१ |
| कां रोष मजवरी ऐसा | ३४ |
| कां रे अर्जुना तूं दंग | ९२ |
| कां वियोग दिधला मजला | ९७ |
| कां क्षोभ ईश्वरें केला | १६४ |
| कां गे झालां ऐशा दंग | १६१ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| कांहीं कळों न दे | १७४ |
| काय तुं वेडी झालिस | २१६ |
| कां तूं करिसि आग्रह | २०८ |
| कां रे झालासी तूं दीन | २६९ |
| किशनकामिनी सबहि मिल | ११० |
| कीश नरांच्या पंक्ति बैसल्या | २१० |
| कुसुम दिलें रुक्मिणिला ह्मणुनी | ३१५ |
| कृष्णदोरा बांधिला गळां त्याच्या | १४५ |
| कृष्णा थांब थांब थांब | ३११ |
| कृष्णासि गोकुळीं एक नारि | १६० |
| कृत्यचि हें जीवाचें प्रस्तावना प्रारंभ. | |
| केलें स्वस्तीवाचन | २४४ |
| केला शोध परन्तु एक | २१८ |
| कैसा जोगी अमंगल | १९० |
| कैसो राम भिले आज | २४९ |
| कोप आला शंकरासि भारी | ३५ |
| कोप चढे तब वरकोदरको | ७१ |
| कौशल्येनें अपुल्या अंकी | २४६ |
| क्यौं रे भूल गया बोल | २५७ |
| क्षितिजापति रामा मज तारी | ३०३ |
| **ख** | |
| खिन्न झाला अंतरीं वायुतनय | २६० |
| **ग** | |
| गज रथ हय शिबिकादिक | २४२ |
| गमाई मुफत उमर सारी | १९४ |
| गर्ग भावितसे मनिं व्यर्थ जीणें | ९९ |
| गाधिज बोले ऐकाल वृत्त कानीं | १३५ |
| गाधिज मुनि कहत जात | १३५ |
| गाधिज बोले रायासी | १३६ |
| गाधिज ह्मणे बाळकासी | १४० |
| गिरिजापति शंभो त्रिपुरारी | २७४ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| गुरु वसिष्ठ ह्मणती प्रभु राघवा | २१९ |
| गोपीचंद बडा भोगी | १९४ |
| गोकुळवासी प्रभु कंसारी | ३०१ |
| गोविंदा वेगीं धांव धांव धांव | ३०६ |
| **घ** | |
| घटिका भरितांचि सकळ | २४५ |
| घातलें संकटीं धर्में | १७४ |
| घेउनि ये यदुवीर | ३१२ |
| घ्यावे रथ अति सुन्दर | २४२ |
| **च** | |
| चरण वंदुनियां वृत्त | १७२ |
| चली सेना सब साथ | ५२ |
| चला जाऊं कैकेयिविना | २५४ |
| चालिला भरतहि वन | २५३ |
| चित्तीं स्मरुनि श्रीरंग | ९२ |
| चूडामणि देउनियां सांगे | २२८ |
| **ज** | |
| जगीं सर्वही मानिती वैभवातें | २१२ |
| जगतमें मूँह किया काला | १९३ |
| जनकें दिलें आंदण जांवयासी | २४७ |
| जनक बोले हो काय कठिण | २०७ |
| जनकपुरा गेल्यावरि | २४३ |
| जनकघर चलिये तुम महाराज | २०८ |
| जनकराया वाटले चोज भारी | २११ |
| जरी झाला बहुतसा तुझां ताप | २३५ |
| जरी आला हनुमंत त्याचि ठाया | २६१ |
| जाई त्या विपिनासी रंभे | ११९ |
| जात आगे नरराज | १३९ |
| जाहलें जनका काय कसें | २०९ |
| जावें येथुन कैसे तरी | २२६ |
| **झ** | |
| झाला समारंभ बहु मोठा | २०० |
| झाली गती अशा काय | ४७ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| झालें नकुळातें काय | ८० |
| झालें चित्र जनां हें | २४६ |
| झाले साडे सुदिनीं | २४७ |
| झाल्या कोपाकुल त्या नारी | १५३ |
| **त** | |
| तबही सूध गयी मुनितनकी | १२१ |
| तमिस्राचरी गांजिती | २२७ |
| तयीं लक्ष्मण घाबरा फार | २६१ |
| तारामति आक्रोश करितसे | १४७ |
| तान्हुल्या, रडूं नको व्रजनाथा | ३१० |
| ते यादव ह्मणती सारे | १०१ |
| तों देखिले गुरुवसिष्ठ | २५५ |
| तो विलाप नळ मनि करितां | २७१ |
| त्यजिलें कांहो प्रेमपुरा | २२४ |
| त्या कृष्णकामिनी अवघ्या | ११० |
| त्राहि पाहि बा नरहरिराया | २९९ |
| **द** | |
| दंडकमंडलु वस्त्रें भगवीं | २६१ |
| दमयंति ह्मणे तुह्मीं ऐकिलें | २७३ |
| दमयंतीची वार्ता ऐकुनि | २७२ |
| दयाळा संकट हें भारी | २६९ |
| दशरथ भूप जगतकावाली | २४९ |
| दिसेना यांत अर्थ कांहीं | ११८ |
| दीनदयाळा पूर्णकृपाळा | ३०१ |
| दुःख हें सांगु अतां कवणासीं | १५४ |
| दुर्घट हें व्यसन आजि | ३०९ |
| देतां वर तरि मज हा या | ९८ |
| देखत भुल ही कशी | २९२ |
| देवा कां रुसवा केला | ८२ |
| देवा दावा पदयुगुला | ९२ |
| देवा धांव आतांरे धांव | १४१ |
| देवा पाव अतां मजला | १४६ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| द्वापर ह्मणे कलीराया | २६४ |
| **ध.** | |
| धन्वन्तरि वर दाउनि सांगे | ३१४ |
| धरि मना साधुजनांचा संग | २७७ |
| धरि मना हरि चरणीं विश्वास | २९४ |
| धर्म धाडी बोधूनि अर्जुनासी | ७१ |
| धाडा सुरगज गजग्रामीं | ४० |
| धांव रे रामराराया | ३३ |
| धांव रे दीननाथा | १४९ |
| धांव पाव दे ठाव | ३०० |
| धांवे पावे बा त्रिपुरारी | ३०३ |
| धुंडित वनासि गेला | २५४ |
| धेनु घेऊनी धांवला | २५६ |
| **न** | |
| नकुळ बोलतो धर्मासी | ८० |
| नकुळ यदुवीरा युद्ध मांडले | ७३ |
| नको होऊं ऐसा दंग | ५३ |
| नजर टेढि आँखे लाल | २६१ |
| नमन करुनि साष्टांगें | २६३ |
| नरदेहाची प्राप्ति सुदुर्मिळ | २८८ |
| नरहरि राया, दे स्फूर्ती | २७४ |
| नसे ठावें हें वृत्त मला | २५१ |
| नारद बोले कमलासना | १२० |
| नारद बोले नकुळाशीं | ७४ |
| नारद द्वारकेसि जंव पाहे | १०७ |
| नारद बोलिले भामेशीं | ४८ |
| नारद बोलिले भामेशीं | १०९ |
| नारद बोले श्रीहरिला | १०८ |
| नारद मुनि कहत जात | १५३ |
| नारद ह्मणे कालयवनासी | १०० |
| नारद सांगे मारुतिला | ४५ |
| नारदा बहु तुमची थोरी | १२२ |
| नारदा शोध पती अमुचा | १११ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| नारदा शोध करा पतिचा | १५३ |
| निघती रामचन्द्रवनवासा | २४७ |
| निजमन्त्री पाठविला | २४१ |
| निशिदिनि हरिला | २९८ |
| **प** | |
| पंक्ती वाढिल्या परिकर | २११ |
| पंचभुतात्मक देह प्राणिया | २८६ |
| पडलें संकट अजि भारी | २०२ |
| पडले संकट हें भारी | ५४ |
| पंढरीराया, करि तूर्ण | ३१७ |
| पतिसुत करिती शोक | १४२ |
| पतिसुत विरहें तारा० | १४० |
| पत्रबोधें आनंद दिग्रथाला | २४२ |
| पहा झाला किति वेळ | १४७ |
| पाचारुनी बहु सुवा० | २४४ |
| पावरे चन्द्रचूडा | ६५ |
| पाव आतां त्वरित मला | ३०४ |
| पाहिला विप्र नसे कोणी | १४३ |
| पाहे दिव्याश्रमासि राजा | १३५ |
| पुण्याश्रमपद बहुत चांगलें | २६७ |
| पुष्कर ह्मणे नळा आजी | २६४ |
| पुसती राम जनकजेसी | ३१ |
| पुसे श्रीरंग अर्जुनासी | ९३ |
| पूछत कानीफा सबको | १९२ |
| पूछत भामा नारदमुनिसे | १०९ |
| पूछत मघवा मुनिजनसे | २३ |
| पूजन गौरीचें मग | २४६ |
| प्रभो तुह्मारी सुनी | २१ |
| प्राची दिशा जाशिच | २४६ |
| प्रार्थीतसे लक्ष्मण | २६१ |
| प्राज्ञा ह्मणे गे सुंदरी | २६९ |
| प्राण्या राम भजावा | २७८ |
| प्रिये ऐशी कां तूं दंग | ३० |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| प्रीति धरी हरि | २९४ |
| **फ** | |
| फाल्गुन ह्मणे वो सुंदरी. | १७३ |
| **ब.** | |
| बडा बाग मजेदार | २२९ |
| बडी सेना ले साथ | २४३ |
| बहु शोक करी दमयन्ती | २६५ |
| बहु विलाप करिती हरिणी | ६२ |
| बहोत ढूंढा मैं गिरि | १९३ |
| बाई निग्रह कां धरिशी | १३९ |
| बाई कैसा गे जाऊं | ३३ |
| बाई कां गे झालीस दंग | २६८ |
| बाई अजवरि कां नाहीं | २६८ |
| बापा मुचुकुन्दा | १०२ |
| बा समय कठिण हा | २४९ |
| बाहुक ह्मणे ऐक राया | २७० |
| बाळा कां झाला तुज वेळ | १४७ |
| बाळा काय करूं आतां | १३८ |
| बाळा जाऊं नको विपिनीं | १४६ |
| बिमान लेकर अन्तक | ६१ |
| बेटा चम्पावति जो | १९५ |
| बोले भूपाल बाहुका | २७० |
| बोलिले वसिष्ठ भरताते | २५२ |
| बोले कौसल्या माउली | २५० |
| बोले भरतासी माता | २४८ |
| बोले नारद मुनिजना | ११८ |
| बोलति हरिणी व्याधासी | ६३ |
| बोले भूपाळ मुनिवरा | ५६ |
| बोले व्याध अंतकाला | ६२ |
| बोले हनुमंत अर्जुना | ८९ |
| बोले यदुवीर नारदा | ७५ |
| बोले अन्तक धर्मासी | ८३ |
| बोले अन्तकही ऐक | ८५ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| बोले मातेलागीं बाळ | १३८ |
| बोले वसिष्ठाप्रति | २१९ |
| बोले हनुमंत रामा | २६२ |
| ब्रह्मा ह्मणे नारदासी | १२१ |
| ब्राह्मण ह्मणती जग | २४ |
| ब्राह्मण ह्मणती मंगला | २४६ |
| **भ** | |
| भजरे भज मनुजा | २८३ |
| भजसि कां न मानवा | २९१ |
| भया जबनीसे सूत | ९९ |
| भरत गेला कानना | २५४ |
| भरत पाहे दृष्टिनें | २५४ |
| भामा पुसे नारदासी | १०९ |
| भिमें शोधाया | २७१ |
| भीमें अणिलें देव | ४० |
| भीम कहे अब सोच | ८१ |
| भीम बोले यदुवीरासी | ७० |
| भीम बोले मातेसि | ३८ |
| भेटि दे रामराया | २५३ |
| भोंवतीं गोपमुलें सारीं | ३०९ |
| भ्रमरसम हरिपद | २७८ |
| **म** | |
| मनारे कशि गति होईल | २९९ |
| मज लागली तृष्णा पाही | ८० |
| मजला हें कळलें | २९० |
| मनीं सीतेच्या रामअपण | २१६ |
| मनुजा प्रीति धरी हरीपायीं | २९५ |
| मनीं हळहळे बहू | २२७ |
| मनुजा नाम हरीचें गोड | २ ९ |
| मरण अपुलें मी काय | २२९ |
| मना क्षणिक सुखालागिं | २९५ |
| माइ पृथा कहे | २९ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| माइ भिच्छा फकीरी | १९६ |
| माई सीता कहो | २०८ |
| माझि आस पुरवि रघुराया | ३०५ |
| मांडुनी पाट रजतमय | २४७ |
| माते कांगे ऐसी दीन | १३७ |
| माते जातिस कोठें आज | १४४ |
| माता मैनावंति रोवे | १९३ |
| माधवा! कशि व्यसनिं | २६६ |
| मारुतिराया तूं बळकट | ४५ |
| मारुति ह्मणे त्याच्या | २०१ |
| मारुति ह्मणे दिसतो | ३२ |
| मास जाला संपूर्ण | २५७ |
| मिथिला पुरप्रदेशीं | २४३ |
| मुकुन्दा कशि करुणा | १२ |
| मुद्रिका दिधली हनुमन्ता | २५९ |
| मुद्रे कां त्यजिले रामा | २२८ |
| मुनिवर ह्मणे सुतनु आजी | ५२ |
| मैनावति मोहि बतलावो | १६१ |
| मोठें संकट दिसें आज | ३८ |
| मोडिला सेतु कीशानें | ९१ |
| ह्मणति व्याधा शिवदूत | ६६ |
| ह्मणे अन्तक व्याधासी | ६१ |
| ह्मणे कुन्ती आजि बहु | ३९ |
| ह्मणे पक्षिप यदुवीरासी | ४६ |
| ह्मणे मी काय करूं देवा | १६४ |
| ह्मणे नकुळ यदुवीरासी | ७२ |
| ह्मणे सुंदरा ऐका स्वामी | १६२ |
| ह्मणे लक्ष्मण कासया | २५८ |
| ह्मणे तारा भ्यावें न | २५७ |
| ह्मणे झालें कीं प्रसुत | १७१ |
| ह्मणे चम्पावति सुनो | १९४ |
| ह्मणे माता रामासि | २४४ |
| ह्मणती वसिष्ठ मुनि | २१९ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| ह्मणती वसिष्ठ भरता | २५१ |
| ह्मणसी कां मज संन्यासी | २६१ |
| ह्मणे सुभद्रा रुक्मिणि | ३१३ |
| **य** | |
| यदुकुल भूषण वारिजलोचन | २७५ |
| यदुवीर पुसतते | ४६ |
| यशोदे कृष्ण तुझा ठगडा | २८४ |
| यादव ह्मणती मुनिवर्या | ९७ |
| या कृष्णाच्या संगतिँनग | २७७ |
| यापरि लक्ष्मण वदला | २६० |
| यासाठीं तूं जाई वत्सा | २५६ |
| या हरिनें ग, ग बाई | ३११ |
| युधिष्ठिर वदे देवराया | १७३ |
| **र** | |
| रघुवर जनकपुरमें | २०८ |
| रडती पुरवासी जन | २६५ |
| रतन मुकुट है | ४८ |
| रम्भा वदे दिवस्पतिला | ११९ |
| रमानाथपदीं भाव तुझी | २९० |
| रसने नाम हरीचे गाई | २९३ |
| राघवनाम जपा | २८३ |
| राजा दशरथ सेना | २४२ |
| राजा जनकने हार | २०२ |
| राजांगना चालति | २४६ |
| राम वदती लक्ष्मणा | २१७ |
| राम लछीमन भरत | २४४ |
| राम माझा सकुमार | २५० |
| राम लक्ष्मण भरत | २४५ |
| राम ह्मणती तो हाचि | २५८ |
| राम दयाधन कांहो | २७५ |
| राम कधीं भेटेल तो | ०४ |
| राम ह्मणती आलासि | ६१ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| रामा दावा पद-युगुलीं | ३३ |
| रामा मला एक असे | २१८ |
| रामा दे अभयदान | २६३ |
| रामा मज दाखवि तूं | २७६ |
| रामा मज तारी | ३०२ |
| रामा मज तारी | ३०२ |
| रामा मज दावि तूंचि | ३०४ |
| रूप धरूनि सीतेचें | २१८ |
| रूपवती अति सुंदर | १४३ |
| **ळ** | |
| लक्ष चैाऱ्यांशी | २८७ |
| ळक्ष्मण पुढेंचि होता | २५९ |
| लक्ष्मणही बहु भ्याला | २६१ |
| लक्ष्मणही मग तेथें | २५७ |
| ले भिच्छा अपने घर | १९६ |
| **व** | |
| वदती बाळें मधुर | ६३ |
| वद वद वद मनुजा | २८१ |
| वदे धर्मराज बहु | ८१ |
| वदे यमधर्म धर्मराया | ८३ |
| वसिष्ठासि घेऊनि | २५४ |
| वद रे वद मनुजा | २९२ |
| बाजीगर हूं | १७२ |
| वातात्मज सांगे | ८९ |
| वासव निशिदिन | २२५ |
| वायूसख तूं पुत्र | २३० |
| वायुज कीशांसि ह्मणे | २५७ |
| वाहेला संसार देवासीं | २९१ |
| विठ्ठल निजनयनिं | २९८ |
| विनवी प्रधान रायासी | २४१ |
| विश्वामित्रें पत्र धाडिलें | २४१ |
| वेश्या ह्मणे आचार्यातें | ९९ |
| व्याकुळ झालें मुनिवर | २१ |
| व्याध बोले मी केंवि | ६३ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| **श** | |
| शम्भो पाव अह्मां | २२६ |
| शिव मूर्तीच्या करुनी | ६५ |
| शोधिती जडाजडें | ३१६ |
| श्रीरामाच्या मतिला | २६० |
| श्रीरामें जनक—सुतेचा | २१७ |
| श्रीरामें पवन–सुताचा | ३१ |
| श्रीरामें पालवितां | २६१ |
| श्रीहरी, द्वारकापुरीं | २८४ |
| सख्यांनो, दिसतो हा | १९५ |
| सभागार तें बहुत | १०० |
| सख्याहरी शेवट गोड | २७७ |
| सरल्या चिंध्यावस्त्रें | २२९ |
| सांगा माझा तरि | ७५ |
| सांगे सूर्यासी तीव्र | १३७ |
| सांगे वृत्तांत निज | १६२ |
| साध्वी बोले पतिराया | २२७ |
| सासुसासरे ह्मणति लागले | १६३ |
| सीता बहु विनवि रामा | २०७ |
| सीताशुद्धि करावया | २५८ |
| सिता बोले उपकार | २११ |
| सीता विचारी निज | २१५ |
| सीता पूजी गौरीहराला | २४६ |
| सुगल बोले हे उचित | २०१ |
| सुन्दर नार गोकुळीं | १६१ |
| सुनी खबर जब | ५४ |
| सुनिये विनति हमारी | २४ |
| सुनमुख पहावयाते | २०६ |
| सुदेवा सांगे ऋतुपर्णासी | २७२ |
| सुनो सुनो लछमन | २५७ |
| सुभगा न्हाणिती सीतेला | २४४ |
| सुनो वासव महाराज | २३ |
| सुनो जनक महाराज | ३१० |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| सुनो सुनो महाराज | १२१ |
| सुनो रावणकी मात | २२७ |
| सूर्यकिरणें सन्तप्त | १३९ |
| सेना घेउनि त्वरें निघाला | २४२ |
| सोच करत गोरच्छक | १९६ |
| सोचत मैनावंती मनमों | १९२ |
| सोच करे सीता मनमें | २१६ |
| सोच किया तब दिलमें | २६० |
| सोय धरुनि जनीं | २७७ |
| सौबळी सांगे कुंतीला | ३८ |
| **ह** | |
| हरि कां बरें न ये आजी | ७२ |
| हरि कां न ये लवलाही | ९१ |
| हरि गमन केंवि | ३१२ |
| हरि तो दासरूप | ३१० |
| हरि मज कांहो भेट | १०२ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| हरि मजला चालवेना | ४७ |
| हरहर पातक बहु केलें | ६४ |
| हरिला मी कोठें पाहूं | १११ |
| हरिचें नाम मुखीं गरजारे | २९४ |
| हरिचें नाम मुखीं नित गारे | २७४ |
| हरि तुझी जेवुनि सेवा गोड | २७५ |
| हरिचें पद वंदा | २७९ |
| हरि मज देइ अतां पदिं | २८० |
| हरिला कशि तरि मी | २८० |
| हरिहरविधि देव सकल | २८९ |
| हरिभजन धरुनि सुजन | २९६ |
| हा धर्मा, हा निजकर्मा | १४१ |
| हा बाळा कशि मति | १४८ |
| हारे, पंढरिनाथ पहारे | २९७ |
| होइ मना सावध ह्यासाठीं | २९५ |
| होत भिन्नन रघुनाथ | ३२ |
| होतों समदुःखी ह्मणुनी | २५६ |

# प्रस्तावना.

—:*:—

गीति.

कृत्याचि हें जीवाचें वाचेला नाम नित्य यावें गा ॥
भावें गातां ह्मणणें लागेना या दया करा वेगा १ ॥
वर्णिति बुधजन स्पष्ट प्रभुचा भावार्थ हाचि मज गावें ॥
नरतनुचें साधन हें केल्यावांचूनि व्यर्थ न जगावें ॥ २ ॥

( गिरिवासी. )



**ह्या** काव्यग्रंथास प्रस्तावना लिहिण्याचा मान मला मिळत आहे हें मी माझें मोठें भाग्यसमजतों. ज्याकवीचें काव्य प्रसिद्ध होत आहे ते कवि माझे लहानपणीं हयातींत होते. त्यांचा व माझ्या वडिलांचा स्नेह असल्यामुळें दळणवळण पुष्कळ असे व त्यामुळें मला त्यांच्या सहवासाचा लाभ अनायासेंच घडला. माझ्या स्मरणाप्रमाणें त्यांची काठी मध्यम उंचीची, बांधा साधारण, अंगाचें वळण किंचित् रोडपणाकडेस, वर्ण गौर व रहाणी अत्यंत साधी असे. त्यांचा स्वभाव फार आनंदी व मनमिळाऊ असे. त्यामुळें ते बसले ह्मणजे त्यांचेभोंवतीं मुलें जमत व हे मुलांच्या लीलांचें कौतुक करीत, व त्यांना अरुचि उत्पन्न न होतां आवडतील अशा तऱ्हेनें सदुपदेशही करीत. त्यांची त्यावेळेस कवि ह्मणून ख्याति असे. गांवांत कोणी हरदास आले तर ते त्यांची भेट घेत व त्यांनीं आख्यानें करून मागितल्यास ज्याला जसें लागेल तशीं आख्यानें करून देत. त्यावेळेस आख्यानांत श्लोक, आर्या, दिंड्या वगैरे असुन पदें कांहीं विशिष्ट चालीचींच घालण्याची पद्धत असल्यामुळें त्यांच्या आख्यानांत पदें बहुतेक एका चाली-

चींच आहेत, हें या ग्रंथांतील आख्यानें वाचून वाचकांच्या सहजच ध्यानांत येईल. वऱ्हाड व मध्यप्रांत यांत फार प्रसिद्धीस आलेले कैलासवासी बजाबा हरदास यांचा व या कवींचा फार स्नेह असे. बजाबा हे ह्या कवींचींच काव्यें ह्मणून फार रंग करीत व श्रोतेही तल्लीन होत. या कवीनें आपल्या काव्याच्या शेवटीं बहुतेक ‘ गिरिवासी ’ असें पद घातलें आहे. पण यांचीं काव्यें ह्मणणाऱ्या हरदासांनीं ज्या कडव्यांत गिरिवासी असें नांव आलें असेल तें कडवें ह्मणू नये अशी यांची इच्छा असल्यामुळें हरदास तें कडवें ह्मणत नसत व ह्मणून हरदासांनीं ह्मटलेली आर्या मोरोपंताची, श्लोक वामनपंडिताचा व कटाव तर अमृतरायजीचाच आहे असें श्रोतृवर्गास वाटत असे.

प्रस्तुत कवींचें नांव व्यंकट वैजनाथ पतकी हें होतें. व्यंकट या नांवास बापू असें उपपद सहज लागलें व तेंच पुढें बापूजी, बापूराव, बापूसाहेब, असें क्रमाक्रमानें परिणत झालें. त्यावेळची समकालीन आज जी काहीं थोडी मंडळी आहेत ते त्यांना बापुजी वैजनाथ पतकी या नांवानें ओळखतात. या काव्यांत व्यंकटेश यांचें अपर पर्याय ‘ गिरिवासी ’ हें नांव कवीनें घातलें आहे. त्यांची वंशावळ खालीं लिहिल्याप्रमाणें—

| | | |
|---|---|---|
| १ काळोपंत. | २ मल्हारपंत. | ३ विठ्ठलपंत. |
| ४ दत्तोजीपंत. | ५ शिवाजीपंत. | ६ त्रिंबकपंत |
| ७ लालाजीपंत. | ८ वैजोपंत. | ९ व्यंकटराव ऊर्फ बापुसाहेब. |

हे मूळचे जोगाईचे आंब्याचे रहाणारे होते. नौकरीनिमित्त हे पुण्यास गेले. तेथें प्रस्तुत कवीचे आजे लालाजीपंत हे पर्वतीसंस्थानचे कारभारी होते. त्यांचे मागें त्यांचे चिरंजीव वैजोपंत यांनींही तेंच काम पाहिलें. प्रस्तुतचे कवि बापुसाहेब हे त्यांचे चिरंजीव. हे ह्यावेळीं अल्पवयांतच होते. यांचा जन्म इ. स. १८१९ त जोगाईचें आंबें येथें झाला. यांचा प्रथम विवाह पुणें येथें चिक्षे नांवाच्या परळीचे रहाणाऱ्या गृहस्थाच्या कन्येशीं झाला. कुटुंबाचें नांव लक्ष्मीबाई असें होतें. ह्या लग्न झाल्यावर थोडेच दिवसांनीं वारल्या. त्यावेळेस बापूसाहेबांचें वय १५।१६ वर्षांचें होतें.

याच सुमारास बापूसाहेबांचे वडील अल्पवयांतच ह्मणजे ३१।३२ वयाचे असतांनाच परलोकवासी झाले. त्या वेळेस बापूसाहेब जरी अल्पवयाचे होते तरी ते जात्या बुद्धिवान् असून अंगांत तरतरी असल्यामुळें त्या

वेळच्या मानानें लिहिण्यावाचण्यांत हुषार होते ह्मणून त्यांना वडिलांच्या मागें त्याचें काम मिळालें. पण बापूसाहेबांनी तें काम फार दिवस केलें नाहीं. ते परत जोगाईचे आंब्यास आले व तेथेंच आपलें वतनाचें काम पहात असत. त्याच वेळेस बापूसाहेबांचें दुसरें लग्न तेरखेडचे पाटलाची कन्या गयाबाई यांच्याशीं झालें. पण ह्याही लग्न झाल्यावर ३।४ वर्षांनींच वारल्या.

बापूसाहेब यांनीं आपले वतनाचें कामही फार दिवस केलें नाहीं. त्यावेळेस जोगाईचें आंबें येथें हैद्राबाद कॅांटिजंट फौजेपैकीं रिसाला असे. त्यांत त्यांना बाजारमुत्सद्याची जागा मिळाली. तेव्हांपासून सन १८४१ पर्यंत बापूसाहेब आंबें येथेंच असत. पुढें तो रिसाला गुलबुर्गें येथें नेण्यांत आला. त्याबरोबर बापूसाहेब यांनाही गुलबुर्ग्यास जावें लागलें व तेथें ते इ. स. १८५३ पर्यंत होते. याच सुमारास त्यांचा तिसरा विवाह जोगाईचें आंबें येथील आत्मारामपंत कुळकर्णी यांचे कन्येशीं झाला. हें कुटुंब अद्यापि जिवंत आहे.

दुसरें कुटुंब वारल्यावर बापुसाहेबांचें चित्त संसारांतून उठलें व परमार्थाकडेस लागलें. गुलबुर्गा येथें असतांनाच त्यांनीं कांहीं स्फुट पदें व कांहीं आख्यानें केलीं, पण ह्या कविता त्यांनीं ज्या पुस्तकांत उतरून ठेविल्या होत्या तें पुस्तक कोणीं उतरून घेण्याकरितां मागून नेलें, पण परत आणून दिलें नाहीं. प्रभूच्या सेवेंत व नामसंकीर्तनांत आयुष्य घालविण्याचा त्यांचा संकल्प होता. तथापि मातोश्रीच्या आग्रहास्तव त्यांना तृतीय विवाह करावा लागला.

पुढें सन १८९३ मध्यें गुलबुर्गा येथील रिसाला मोडला व त्यावरील मुख्य अधिकाऱ्यास हैद्राबादेच्या रेसिडेंटाची जागा मिळाली. त्यांचेबरोबर बापूसाहेबांनाही हैदराबादेस जावें लागलें. हैदराबादेस असतांना एक गोष्ट झाली तीवरून बापूसाहेबांचा करारीपणा व दीर्घोद्योग दिसून येतो. बापूसाहेब हे मेहमीं कचेरींत बरोबर वेळेस येत असत व आपलें काम नीटपणें व व्यवस्थितपणें करीत असत. एके दिवशीं रेसीडेंट साहेब कचेरींत लौकर आले, त्यावेळीं कचेरींत बापूसाहेबांखेरीज दुसरें कोणी नव्हतें,

साहेबांस त्यावेळीं एका उर्दू शब्दाची अडचण पडली. तेव्हां त्यांनीं बापूसाहेबांस तो शब्द विचारला. बापूसाहेबांस उर्दू येत नव्हतें ह्मणून त्यांनां 'मला उर्दू येत नाहीं' असें उत्तर द्यावें लागलें. तेव्हां साहेब ह्मणाले, 'तुह्मी इतके दिवस रिसाल्यांत नौकरी करीत असून तुह्मांला उर्दू येत नाहीं हें आश्चर्य आहे.' हे शब्द बापूसाहेबांस लागले व त्यांचें वय जरी ३७।३८ वर्षांचें होतें तरी त्यांनीं फारशी भाषेचा अभ्यास सुरू केला व दोन वर्षेंपर्यंत मेहेनत करून इतकी प्रवीणता मिळविली कीं त्यांची गणना फारशी विद्वानांत होऊं लागली. पुढें फारशी भाषेची जागा रिकामी झाली तेव्हां इतक्या थोड्या वेळांत बापूसाहेबांनीं निपुणता मिळविल्याचें साहेबांस आश्चर्य वाटलें व त्यांनीं ती बढतीची जागा त्यांना दिली. त्याच सुमारास वऱ्हाडप्रांत व धाराशीव व नळदुर्ग हे जिल्हे कॉंटिंजंट फौजेच्या पगारासाठीं ह्मणून इंग्रज सरकारास पांच वर्षांसाठीं मिळाले. तेव्हां जें कमिशनरचें ऑफीस निर्माण करण्यांत आलें त्यांत बापूसाहेब यांना नायब शिरस्तेदारीची जागा मिळाली. मध्यंतरीं सन १८६३।६४ च्या सुमारास बापूसाहेब एलिचपुर येथें असतांना त्यांना सर सालरजंग यांनीं मोठ्या जागेवर हैदराबादेस बोलाविलें. हैदराबादेस असतांना जोगाईचें आंबें येथें कोणीएक गोविंदबुवा रामदासी ह्मणून सत्पुरुष होते, त्यांचे दर्शनास बापूसाहेब गेले. त्यावेळेस रामदासी बुवा ह्मणाले, 'तुह्मी हैदराबादेस जातां, तर जावें; पण तुह्मांस पुन्हां परत यावें लागेल, कारण तुमचा अन्नोदकऋणानुबंध हैदराबादेस नसून वऱ्हाडांत आहे.' बापूसाहेब बुवांची आज्ञा घेऊन हैदराबादेस जाऊन कामावर रुजू झाले पण लवकरच कांहीं जरूरीच्या कामाकरितां रजा पाहिजे असून ती मिळाली नाहीं ह्मणून ते राजीनामा देऊन पुन्हां वऱ्हाडांत आपल्या जुन्या जागेवर परत आले व तीवरच ते अखेरपर्यंत राहिले. या ऑफिसाला आंबें-जोगाई, बुलडाणा, जालना, जानेफळ, एलिचपुर वगैरे बऱ्याच ठिकाणीं फिरावें लागलें, आणि त्याच्या अंतर्व्यवस्थेंतही बरेच फेरफार झाले. शेवटीं हें ऑफिस उमरावती येथें आलें. तेथेंच कमिशनर साहेबांच्या ऑफिसांत नायब शिरस्तेदार असतांना बापूसाहेब सन १८७५ चे मे महिन्याचे १९ वे तारखेस वारले. यांना फक्त ८।९ दिवस ज्वर आला होता. तथापि

त्यांचा रामनामाचा जप चालूच होता. हा जप चालू असतांनाच कोणाच्याही मनोमानसीं नसतांना बापूसाहेबांनीं योग्यालाही दुर्लभ अशा सावधपणांत देहत्याग केला. त्यावेळेस त्यांचें वय ६० वर्षांचें होतें.

बापूसाहेब यांचेमागें त्यांचें कुटुंब व चार चिरंजीव राहिले. चिरंजिवांचीं नांवें रामराव, भुजंगराव, गणपतराव व भगवंतराव हीं होत. यांपैकीं गणपतराव खेरीजकरून आज सगळे हयात आहेत. रा. रा. रामराव यांचें वय बापूसाहेब ह्यांचे मरणसमयीं अल्पच होतें, पण त्यांनीं इंग्रजीचा अभ्यास केला, व सरकारी नौकरी पत्करिली. त्यांत त्यांच्या अंगच्या हुषारीमुळें उत्तरोत्तर बढती होऊन ते एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरचे जागेपर्यंत वाढले व त्या जागेवर असतांनाच त्यांनीं पेन्शन घेतलें व ते आज वऱ्हाडांत नांदुरा येथें सुखवस्तु रहात आहेत. दुसरे चिरंजीव रा. रा. भुजंगराव हे आज मोर्शी येथें सबरजिस्ट्रार आहेत. गणपतराव हे दिवाणीकोर्टांत असतांनाच एलिचपुर येथें वारले व भगवंतराव हे भुजंगरावाजवळ आहेत. रा. रामराव यांस गोविंदराव नांवाचा सद्गुणी व दीर्घोद्योगी मुलगा होता. तो बी. ए. होऊन सन १९१२ सालीं एल्. एल्. बी. च्या दुसऱ्या परीक्षेस अलाहाबादेस गेला असतां जगज्जननी जान्हवीनें त्यांजला आपल्या पोटांत घेतलें. रा. रामराव यांना वृद्धपणीं आपल्या सद्गुणी व सुशील व एकुलत्या एक पुत्राच्या वियोगाचा जबरदस्त धक्का बसला. पण ते विवेकाच्या बळावर प्रारब्धभोग भोगीत आहेत.

बापूसाहेब यांच्या ह्या कविता त्यांचे चिरंजीव रा. रा. रामराव यांचे जवळ लिहून ठेविल्या होत्या. बापूसाहेबांनीं कविता केल्या त्याकाळीं छापखाने या भागांत फार उपयोगांत आलेले नव्हते व पुष्कळ नवीन कवि, वामनमोरोपंतांच्या कविता वाचून ईर्षेनें आपणही कविता करून इतरत्र छापवीत असत. त्यांचे मासले तत्कालीन काव्यांतून अनेक पहावयास सांपडतात. बापूसाहेबांच्या कविता त्या कवितांपेक्षां जास्त सरस, सुलभ व उत्तम असूनही त्या छापून प्रसिद्ध करण्याचें त्यांचे मनांत येईना. हरदासांनींसुद्धां शेवटलें कडवें ह्मणूं नये अशी त्यांची इच्छा असे ह्मणून वर सांगित-

केलेंच आहे. याचें कारण त्यांनीं केलेल्या एका आर्येंतच दिसून येतें. ती आर्या अशी—

" वामन मयूर कविंच्या पाहुनि करितात अन्य कविता कीं ॥

त्याही रसभरित तशा पुरि अमृताची न ये चवी ताकीं ॥ १ ॥

यांप्रमाणें कवींनीं स्वतःच आपल्या काव्यास ताकाची व वामनमयूर कवींच्या कवितांस अमृताची उपमा दिली आहे व ह्मणूनच आपल्या कविता प्रसिद्ध व्हाव्यात अशी त्यांची इच्छा नसे. कवींचें हें मत श्रोतृवर्गास जरी मान्य नसलें तरी स्वतः कवीची तशी इच्छा, ह्मणून त्यांच्या कविता त्यांच्या हयातींत प्रसिद्ध झाल्या नाहींत. त्यांच्या मागें मात्र रा. रा. रामराव अण्णा-साहेब पतकी यांच्या मनांतून त्या प्रसिद्ध करण्याचें आलें. पण सरकारी काम करून त्यांना हें काम करण्यास सवड मिळेना; तथापि त्यांचे सद्गुणी व दीर्घोद्योगी पुत्र गोविंदराव यांनीं लहानपणापासून आज्याच्या कविता प्रसिद्ध करण्याची इच्छा धरली; व ते जेव्हां बी. ए. झाले, तेव्हां त्यांनीं हें काम हातीं घेतलें व शुद्धाशुद्ध तपासून, योग्य ठिकाणीं टिपा देऊन, त्यांनीं छापण्यास सुरवात केली. पण त्यांचाही एल्. एल्. बी चा अभ्यास जेव्हां सुरू झाला, तेव्हां त्यांनाही हें काम करण्यास सवड मिळेना. ह्मणून त्यांनीं परीक्षा होईपर्यंत हें काम तहकूब ठेविलें. पण प्रभुसंकेत निराळा असल्या-मुळें इष्ट हेतु साध्य होण्यापूर्वींच त्यांना इहलोकची यात्रा संपवावी लागली. असा दुर्योग आला नसता तर हा ग्रंथ यापूर्वींच, गुरुभक्तीनें तयार केलेला, तरुण उत्साहानें भूषित, आणि रसाळ वाणीनें पुरस्कृत, असा वाचकांपुढें आला असता. असो. गोविंदरावांचा अकालीं अंत झाल्यामुळें दुःखित झालेल्या अण्णासाहेबांच्या अंतःकरणास आपल्या पूज्य पित्याचें चिरस्थाई स्मारक व प्रिय पुत्राची दृढ इच्छा ह्या दोन्ही गोष्टी करण्याकरितां हें काव्य प्रसिद्ध करणें अत्यंत जरूर वाटूं लागलें. पण त्यांच्या कर्तृत्वशक्तीस वरील सांसारिक आपत्ति व वयोमान यांनीं क्षीण केलें असल्यामुळें त्यांच्या इच्छे-वरून ग्रंथ तपासून व टिपा मारून सुलभ करण्याचें काम माझे मित्र, व अण्णासाहेब पतकी यांचे निकट संबंधी, रा. रा. जयराम केशव आसनारे ऊर्फ

भाऊसाहेब बी. ए. बी. एल्. यांच्याकडेस आलें व बापूसाहेबांचें चरित्र व प्रस्तावना लिहिण्याचें काम मजकडेस सोंपविण्यांत आलें आहे. परिस्थितीचा विचार बाजूस ठेविला तर मजवर जी कामगिरी सोंपविली गेली आहे तिजबद्दल मला धन्यताच वाटत आहे.

बापूसाहेब यांच्या चरित्रांत विशेष अशा कांहीं गोष्टी नाहींत. तरी त्यांची गणना संतकोटींतच होते असें त्यांच्या कविता वाचून सहज दिसून येतें व त्यांच्या स्फुट पद्यांपैकीं कांहीं पदांवरून त्यांना आत्मसाक्षात्कार झाला असावा असें कांहीं तज्ज्ञ लोकांचें ह्मणणें आहे, व तें मला खरें वाटतें. इतर संतांप्रमाणें चमत्कार दाखविणाऱ्या गोष्टी जरी यांनीं केल्या नाहींत, तरी संतांचे ठिकाणीं असलेली बहुतेक गुणांची मालिका यांच्या ठिकाणीं होती. त्यांचा स्वभाव शांत असे हें मला स्वतः माहीत आहे व त्यांच्या बरोबरीचे स्नेही त्यांच्यासंबंधानें बोलत त्यावरून त्यांना भजनपूजनाचा व प्रभुस्मरणाचा व अध्यात्मज्ञानाचा फार नाद असे. सरकारी नौकरींत असतांनाही त्यांनीं कोणासही आपला अधिकार दाखविला नाहीं. इतकेंच नव्हे तर आपणांपासून दुसऱ्यास कोणत्याही प्रकारचा त्रास होऊं नये अशी ते खबरदारी घेत असत. नौकरीचें काम वेळचे वेळीं व व्यवस्थितपणें ते करीत असत. कचेरीचें काम आटोपून घरीं आल्यावर मित्रमंडळीशीं बोलत असत व रात्रीचा आणि प्रातःकाळचा वेळ प्रभुचिंतनांत व काव्य करण्यांत घालवीत असत. ज्या सत्समागमाचें त्यांनीं आपल्या काव्यामधून महत्व वर्णिलें आहे, तो सत्समागम त्यांना लाभला होता असें दिसतें. त्यांनीं जें गुरुअष्टक केलें आहे त्यावरून त्यांना 'राघव' नांवाच्या कोण्या सत्पुरुषाचा उपदेश झाला असावा व त्या उपदेशामुळेंच त्यांना ब्रह्मानुभव झाला असें दिसतें. हा सत्समागम त्यांना पूर्व वयांतच झाला असावा असें त्यांनीं अपराधनिवेदनपर ज्या आर्या केल्या आहेत त्यांतील पहिल्या आर्येवरून दिसतें. ब्रह्मप्राप्तीकरितां संसाराचा त्याग करून अरण्यांतच गेलें पाहिजे या मताचे हे कवि नाहींत असें दिसतें. त्यांनीं आपल्या एका स्फुट पदांत ("सोय धरुनि जानें" यांत) स्पष्ट सांगितलें आहे कीं, तुमची जशी सोय असेल त्याप्रमाणें लोकांत रहा अथवा अरण्यांत जा, पण भवनदीपार उतरून जाण्याकरितां हरिगुण, कीर्तन, श्रवण, मनन,

सत्संगति या नांवेचा आश्रय करा आणि खरोखर गोष्ट अशीच आहे. आणि इतकेंच नव्हे तर " जेणें केला संसार निका । तोच जाणे परमार्थसुखा " या रामदासांच्या उक्तीप्रमाणें ज्याला संसार चांगला करितां येतो तोच परमार्थसुखाचाही अधिकारी होतो आणि ज्याला परमार्थसुखाचा अधिकार प्राप्त झाला आहे, त्याला जर संसार करावयाचा प्रसंग आलाच तर तो फार उत्तम तऱ्हेनें संसार करितो ही गोष्ट प्रस्तुतचे कवींच्या चरित्रावरून स्पष्ट दिसून येते.

याप्रमाणें प्रस्तुतच्या कवीचें चरित्र व स्वभाव लेखन झालें. आतां यांच्या काव्यासंबंधानें थोडेसें विवेचन करितों.

मराठी भाषेंतील वाङ्मयाचा विचार केला असतां त्यांत फार पुरातनकालापासून आजपर्यंत जे कवि झाले आहेत त्यांचे तीन वर्ग होतात. पहिला वर्ग मुकुंदराय, ज्ञानोबा वगैरे कवींचा. त्यांनीं तत्त्वज्ञान शिकविण्यासाठींच कविता लिहिली. त्यांची कविता अप्रतिम व अत्यंत रसाळ आहे. तिच्या द्वारें तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष उपदेश करून त्यांनीं लोकांवर उपकार केला आहे. त्यांच्या कृतीला उपनिषदाची उपमा साजते. दुसरा वर्ग वामन-मोरोपंत वगैरेंचा, यांनींहि तोच उपदेश प्रत्यक्ष न करितां पुराणादिकांतील रम्य कथांच्या द्वारें केला आहे. यांचीही कविता अत्यंत मधुर, रसप्रचुर व व मनोरंजक आहे. या वर्गांतील कवींचीं कांहीं काव्यें पहिल्या वर्गांतही येण्यासारखीं आहेत. तथापि त्यांच्या कवित्वाचा ओघ पुष्कळसा कथांच्या द्वारेंच उपदेश करण्याकडे वळलेला दिसतो. श्रीमत् भागवतांतील दशमस्कंध वामनपंडित यांनीं, व एकादशस्कंध एकनाथांनीं, जसा वर्णन केला आहे तसा आजपर्यंत कोणींहि केला नाहीं. हे मराठींतील पुराणकार होत. तिसरा वर्ग, रामजोशी, आनंदफंदी वगैरेंचा. यांच्या कवितेचा ओघ बहुतेक व्यवहारिक विषयाकडेस वळलेला आहे. पुराणांतील कथांकडे यांचा ओघ कमी असून, राजेलोकांचीं युद्धें, सणांचीं वर्णनें, वगैरे विषयांकडेस बहुतेक वळलेला दिसतो. याच वर्गाच्या एका पोटभेदांत शाहीर, भाट, वगैरे मंडळी येतात. या वर्गांतील बहुतेक कवींचा अंतिम हेतु प्रभुपदप्राप्तीचा

नसून राजेलोक, सरदार व धनिक यांना तुष्ट करणें हा होय. यांना प्राकृत किंवा सांसारिक कवि ह्मटलें असतां चालेल. प्रस्तुतचे कवि बऱ्याच अंशानें दुसऱ्या वर्गांत उंचें पदवीवर बसण्यालायक आहेत. यांचें अंतिम ध्येय ह्मणजे मथाळ्यांवर दिलेल्या दोन आर्यांत सांगितल्याप्रमाणें प्रभूचें नामसंकीर्तन सतत करून नरदेहाचें सार्थक्य करावें हें होय असें मला वाटतें, व ह्मणूनच त्या दोन कविता मीं मथाळ्यावर घेतल्या आहेत.

या वर्गांतील कवींच्या कविता जरी लोकोपकाराकरितां केलेल्या असतात तरी पुष्कळ वेळां स्वतःला उपदेश करण्याचें बाह्य स्वरूप त्यांना दिलेलें असतें. आपणांस भजन घडावें, आपणांवर ईश्वरप्रसाद व्हावा व प्रभूच्या लीलांचें वर्णन करून तद्द्वारां आपल्याला नामसंकीर्तन घडावें, असा रोंख त्यांनीं दाखविलेला असतो. वस्तुतः यांना ईश्वरी साक्षात्कार पूर्वीच झालेला असतो व तो कवींच्या इच्छेविरुद्धच त्यांच्या काव्यांतून कोठें कोठें स्पष्टपणें दिसूनही येतो. पण तो प्रकट न करितां प्रभुसाक्षात्कार कसा करून घ्यावा व तो करून घेण्याकरितां ज्या अडचणी येतात, त्यांतून कसें पार पडावें हें लोकांना सांगण्याचाच त्यांचा मुख्य हेतु असतो व त्याकरितां त्यांनीं कित्येकदां स्वतःला उद्देशूनही कांहीं काव्यें केलेलीं आहेत. ह्यांपैकींच रामदासांचे मनाचे श्लोक, मोरोपंताचीं केकावलि, संशयरत्नमाला, वगैरे काव्यें होत. प्रस्तुतच्या कवींनींही अपराधनिवेदनस्तोत्र व मनाला उद्देशून कांहीं पदें केलीं आहेत.

या वर्गांतील कवींमध्यें दुसरा धर्म आढळून येतो तो असा कीं पूर्वीच्या कवींनीं ज्या आख्यानांवर काव्यें केलीं आहेत, त्याच आख्यानांवर हे कवि काव्यें करितात. नवीन आख्यानें शोधून काढण्याच्या ते भरीस पडत नाहींत. असें करण्यांत ' पूर्वीच्या कवींपेक्षां आपण चांगलीं काव्यें करीत आहोंत, ' असा अहंकार यांना लेशभरही नसतो. असा अहंकार त्यांना असता तर पूर्वकवींविषयीं आदर व आपणांकडे लघुत्व यांनीं कधींहि घेतलें नसतें. प्रस्तुत कवीनें स्वतःच्या कवितेला ताकाची उपमा दिल्याचें वर सांगितलेंच आहे. मोरोपंत, वामनपंडित वगैरे कवींनींही आपल्या पूर्वकाळीं

होऊन गेलेल्यां सर्व कवींविषयीं अत्यंत आदर दाखविला आहे. त्यावरून पूर्वीच्या कवींपेक्षां चांगल्या कविता मी करीन असा अभिमान धरून यांनीं त्याच आख्यानांवर काव्यें केलीं असें ह्मणणें मुळींच योग्य नाहीं. तर ज्या कथांच्या कीर्तनानें शुक, नारदादिक तरून गेले, त्याच कथांचें मनन व कीर्तन केल्यामुळें आपण व इतर लोकही तरून जातील, असा यांचा पूर्ण भरंवसा असतो. कथा जरी सारख्याच असतात, तरी त्यांची निरनिराळ्या कवींनीं केलेलीं वर्णनें परस्परांहून भिन्न असून त्यांतील प्रत्येक भाग मनोरंजकच असतो. मात्र त्यांतील रसास्वाद घेण्यासाठीं अंतःकरण सहृदय असलें पाहिजे. त्याशिवाय एकाच कथेच्या दोन कवींनीं केलेल्या वर्णनांतील भेद कळणें शक्य नाहीं. हा भेद ह्मणजे एक दुसऱ्यापेक्षां चांगला व दुसरा तिसऱ्यापेक्षां वाईट असा भेद नव्हे. तर प्रत्येक वर्णनांत जो कांहीं विशेष असतो तो होय. ‘ श्रीमंत सकलगुणालंकरण ’ हा कित्ता एकच पण बिवलकरी वळणानें व बंडोपंती वळणानें अशा दोन वळणांनीं तो लिहिलेला असतो. हीं दोन्ही वळणें प्रत्येकाहून निरनिराळीं आहेत, तरी दोन्ही चांगलींच आहेत. त्यांपैकीं प्रत्येक वळणांत जो कांहीं विशेष आहे, त्यावरून तो दुसऱ्या वळणावरून फक्त निराळा आहे असें दिसतें. हा विशेष ह्मणजे परस्परांतील उच्चनीचतर भाव दाखविणारा भेद नव्हे. त्याचप्रमाणें एकच कथा निरनिराळ्या कवींनीं आपआपल्या प्रतिभेनें लिहिली ह्मणजे त्यांपैकीं प्रत्येकांत असलेला विशेष हा परस्परांतील उच्चनीचतरभाव न दाखवितां केवळ स्वतःचें विशेषत्व दाखवून सरस हृदयास हलवून सोडतो. “ जें ध्याइलें तेंचि ध्याइजे । जें विवरिलें तेंचि विवरिजे ” या श्रेष्ठांच्या वचनाप्रमाणें गाइलेल्या कथेचेंच पुन्हां पुन्हां गायन केलें तर “ अधिकस्याधिकं फलं ” ह्या न्यायानें त्या कथेंतून निघणाऱ्या अमृताची धाराही वाढत जाऊन तिचें यथेच्छ पान करावयास सांपडतें.

शिवाय एकच कथा अनेक कवींनीं वर्णन केलेली वाचली ह्मणजे त्यांच्या चातुर्याकडेस लक्ष सहजच जातें. आणि प्रत्येकाचा उद्दिष्ट हेतु जरी एकच असला तरी तो साध्य करण्यांत त्यांनीं साधनें कोणतीं व कशीं

वापरलीं हें पहावयास सापडतें. यापासून मुमुक्षुला फायदा होतो तो निराळाच. पण काव्याचा अभ्यास करणारानांही मोठा उपयोग होतो. सारांश निरभिमान होऊन प्रभूची इतरांनीं वर्णन केलेलीच कथा पुन्हां वर्णन केल्यामुळें स्वतःस व वाचकांस वर सांगितल्याप्रमाणें हितावह होतें. ह्मणून या वर्गातील कवि नवीन आख्यानें शोधण्याच्या भरीस पडले नाहींत

या वर्गातील कवींत तिसरा धर्म आढळून येतो तो असा कीं, यांचे ठिकाणीं प्रेमळ भक्ति व गुरूविषयीं अत्यंत आदर दिसून येतो. त्यांच्या कवितेंत हे गुण प्रतिपदीं निदर्शनास येतात. " गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ॥ गुरुः साक्षात्परब्रह्म " अशी यांची दृष्टि असते व ही गोष्ट फार महत्वाची आहे, व विशेषतः सांप्रत आपला समाज विघाटत होण्याचे बेतांत आलेला आहे या काळांत तर ही गोष्ट प्रत्येकानें शिकणें फार जरुरीचें आहे 'मीच काय तो शहाणा, बुद्धिमान्, कर्तृत्ववान् आहे, माझ्याशिवाय इतर सर्व मूर्ख आहेत' अशी बुद्धि ठेविल्यानें पारमार्थिक तर नाहींच, पण व्यावहारिक देखील उन्नति होणें शक्य नाहीं. ह्मणून गुरूविषयीं—मग तो गुरु व्यवहारमार्गातला असो, अथवा परमार्थमार्गातला असो—अत्यंत आदर व प्रेमळ भक्ति प्रत्येकानें आपल्या ठिकाणीं आणून घेतली पाहिजे व हें "सामान्य" आणि "लोकोत्तर" या दोन गुणांचा विचार करून मनन केल्यास साध्य आहे व हीच गोष्ट या वर्गातील कवि लोकांस शिकवितात.

प्रस्तुतचे कवि या वर्गांत बऱ्याच उच्च दर्ज्याचे आहेत. तथापि कालानुक्रमानेंमात्र हे शेवटचेच दिसतात. यांच्यानंतर या वर्गांत बसण्याला योग्य कवि निर्माण झाल्याचें दिसून येत नाहीं. चार पुरुषार्थांपैकीं धर्माचा उत्तरोत्तर ऱ्हास होत चालला असून अर्थ व काम यांचा उत्कर्ष होत आहे. ही परिस्थिति बदलून प्रभुकृपेनें पुन्हां पूर्वींची सुस्थिति प्राप्त झाली ह्मणजे अशा तऱ्हेचे कवि पुन्हां निर्माण होतील. पण तोंपर्यंततरी प्रस्तुतच्या कवींना कालानुक्रमानें 'शेवटचे' असा मान मिळत आहे.

या कवींच्या काव्याचें थोडक्यांत वर्णन करावयाचें ह्मणजे—" वाक्यं रसात्मकं काव्यं " या काव्यरसाच्या लक्षणाप्रमाणें यांचें काव्य रसात्मक आहे. यांच्या काव्याचे जे तीन भाग केलेले आहेत, त्या तिन्ही भागांतून भक्ति

हा रस मुख्य असल्याचें दिसून येतें. इतर रस त्याचे अंगभूत आहेत, तथापि शृंगार, वीर व करुण यांचींही वर्णनें कवीनें चटकदार रीतीनें केललीं आहेत. मल्लारिमहाळसाकांताचे चरित्रांत वीररस; लोपामुद्रा, व रामांनीं सीतेचें रूप घेतलें तें आख्यान, यांत शृंगार; व द्रौपदीचा धांवा व इतरही बहुतेक आख्यानें यांत करुणरसाचें फार सरस वर्णन आलेलें आहे. कवीचा आदर रामकथेवर फार दिसतो. सीतास्वयंवराच्या प्रसंगांत वाचकांस वाचतांना हीच भावना उत्पन्न होते. कवि नेहेमीं "आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदां" या श्लोकाचा जप करीत असत अशी आख्याइकाही आहे. कवींनीं आर्या, श्लोक, पदें, दिंड्या, साक्या, कटाव वगैरे बहुतेक वृत्तांत कविता केलेल्या आहेत. तथापि यांचा विशेष भर आर्या व कटाव यांवर दिसतो. यांच्या पहिल्या व तिसऱ्या भागांतील कविता स्वयंस्फूर्तीनें झालेल्य आहेत, व दुसऱ्या भागांतील आख्यानेंही कीर्तनांकरितां करून दिलेलीं आहेत. तथापि पहिला भाग सर्वंध आर्यावृत्तांत आहे व दुसऱ्या भागांतही बहुतेक कथांचा सारांश प्रथमतः आर्यावृत्तांत त्यांनीं दिलेला आहे. प्रत्येक आख्यानांत निदान एकतरी कटाव आला आहे व स्फुट काव्यांतही द्रौपदीवस्त्रहरणावर कटाव केलेला आहे. यांच्या कवितेंत प्रास उत्तम व सहज साधलेले आहेत. कांहीं कांहीं ठिकाणीं तर शब्दयोजना अगदीं रेखाटल्यासारखी दिसते. भाषा सोपी असून प्रौढ आहे. फारशी भाषेचा अभ्यास चांगला असल्यामुळें कांहीं हिंदुस्थानी पदें फार सुरस साधलीं आहेत. यांच्या कवितेंत मधून मधून आर्थालंकारही आहेत. तरी त्यांच्यामुळें कविता दुर्बोध न होतां उलट जास्त सुलभ झाली आहे. क्वचित् प्रसंगीं मात्रागणांच्या चुका दिसतात, पण त्यांच्यायोगानें रसहानि होत नाहीं.

अशा तऱ्हेचें प्रासादिक काव्य आज रसिक विद्वानांपुढें ठेविण्यांत येत आहे. या स्तुत्य कामीं किंचित् हातभार लाविण्याचें श्रेय मला प्रभुकृपेनें मिळालें याबद्दल त्यांचें धन्यवाद गाऊन हा अल्प लेख पूर्ण करितों.

उमरावती.
ता. १७ सप्टेंबर १९१५ } गणेश श्रीकृष्ण खापर्डे.

# गोपीचंद राजाचें आख्यान.

## आर्या.

राजा बंगालेका सबहि पुकारे तिलोकचंद जिसे ।
कांता मैनावती कुवर[1] भया एक गोपिचंद जिसे ॥ १ ॥
दूजा मदन कहावे बारासे कामिनी विहो[2]नीथी ।
सोलासे सैलींया *चंद्रबदानिया सभी[3] सुहानी[4] थी ॥ २ ॥
उसनगरीमें जोगी जालंदरनाथ नाम रहेता था ।
बभुत चढावे कंथा डार[5] गले, गुरु अदेस कहेता था ॥ ३ ॥
सबादिन बेन[6] बजावे मृग छाला[7] कुवारि[8] हाथले तुंबा[9] ।
आसन जायँ[10] मलिनपर कर बैठे, करत लोक आंचबा ॥ ४ ॥
लकरी लाय विपिनसे[11] सिरले[12] वह[13] अधर साथ चलि आवे ।
देखे मैनावंती माते अचरज[14] तभी चली आवे ॥ ५ ॥
घेउनि आली आँली[15] आँली[16] गुरु पाद पंकजी जाली ।
घाली रुंझि निघाली पुनरपि पडली न संसृती[17]–जालीं ॥ ६ ॥
प्रार्थुनि गुरुसि ह्मणे हो बुडते भव सागरांत मज तारा ।
वारा संकट अवघें वाटे मजलागि हें भवन[18], कारा[19] ॥ ७ ॥
क्षणिकाचि वैभव सारें शाश्वत कांहींच मज दिसेना हो ।
कथिते अनुभव अपुला पाहतां पहातांचि संपलाँ[20] नाँ[21] हो ॥ ८ ॥
नाथ ह्मणे मज ठावा नाहीं उपदेश गुरु कसें करिती ।
गांठी जाउनि त्यांसाचि जे कां शिष्यासि निज करीं धरिती ॥ ९ ॥

---

१ मुलगा २ लग्नाच्या होत्यां ३ सर्वही सुंदर ५ घालून ६ वाद्यविशेष ७ चर्म कुवरी ९ भोपळा १० मळिन जागेवर ११ रानांतून १२ शिरसे अधर डोक्यावर न टेकतां १३ ते मोळी १४ आश्चर्य १५सखी १६ भ्रमरी १७ प्रपंच्याच्या जाळ्यात *चंद्राप्रमाणें आहेत मुखें ज्यांचीं अशा. १८ ढह. १९ बंदीखाना. २० मृत्यु पावला २१ नवरा.

तरि ती ह्मणे तुह्मांसचि आलें मी शरण अन्यथा नाही ।
मातेनें निज बाळक लावावें काय अन्यथानांहीं ॥ १० ॥
पाहुनि सद्भाव तिचा उपदेशामृत यथेच्छ पाजविलें ।
झाली भक्तशिरोमणि कलिच्या राज्यांत नांव गाजविलें ॥ ११ ॥
एके समयीं राजा उठोनि अंतःपुरांत जो गेला ।
पाहे स्त्रिया सकल परि माता न दिसे ह्मणूनि रागेला ॥ १२ ॥
कोणी अपमान तिचा केला हें वृत्त मज न कळवाल ।
तरि निश्चयेंचि अपुल्या सर्व सुखांलागिं आजि पळवाल ॥ १३ ॥
विनविति कर जोडुनियां स्वामी तुमच्या कुळासि डाग अधीं ।
नव्हता परि मातेनें या योगें लाविलाच हो आधीं ॥ १४ ॥
जालंदर नाथाच्या एकांतीं रगडितात पायासी ।
गुरुमंत्र हें निमित्तचि केलें अपवाद हा लपायासी ॥ १५ ॥
हें ऐकतांचि चढला रायासहि कोप, नावरे साच ।
झाला भ्रामित गमे तो कांहीं वेळांत बावरे साच[1] ॥ १६ ॥
पाचारुनि निज मंत्री सांगे जालंदरासि आणाया ।
दे आज्ञा निज भृत्या-लागी तत्काल कूप खाणाया ॥ १७ ॥
प्रार्थी प्रधान गुरुसी रायें अपणासि त्वरित आणविलें ।
व्हावें दर्शन तुमचें आहे इच्छा असेंहि जाणविलें ॥ १८ ॥
नाथ गुरू जालंदर आले त्याच्या सवें नृपापासि ॥
वरि वरि वंदन करि जरि तरि अंतरि तो न भीच पापासीं ॥ १९
आशिर्वादें राया तोषावि तरि तोषला न तो मानी ।
कथिलें हित सुजनांहीं त्यासहि विपरीत हें असें मानी ॥ २० ॥
गुरु जालंदर होता मग्न समाधींत त्यासि कूपांत ।
घाली, लीद हि त्यावरि ऐसा कोणी न अन्य भूपांत ॥ २१ ॥

---

१ वेडा होईल कीं काय.

धुंड फिरी सब नगरी जालंदर नाथ की सुधं[1] न पायी ।
रोवे मैनावंती अब मै करु कौनसी जुगंत[2] मांयी[3] ॥ २२ ॥
सोवे नीद न आवे रौन[4] करे सोंचं[5] अन कहां जाऊं ।
गुरु पग बिना मुझे नहि चैन कहां नाथजी तुम्हे पांऊं[6] ॥ २३ ॥
एके दिवसी राजा मांडुनि चौरंग अंगणा माजीं ।
बैसे, तैल सुगंधिक लाविति शिरि कितिक अंगना माजीं ॥ २४ ॥
माता मैनावति हि पाहे पुत्रासि मदन सम काया ।
नेतो सर्व जगासचि विलया नेईल मग न यम कां या ॥ २५ ॥
व्हाया देह अमर हा योजूं तरि कोणत्या उपायासीं ।
असते गुरु जालंदर करितें शत वार नमन पायासीं ॥ २६ ॥
होती अमरचि काया हा दैवा सद्गुरू कसा नेला ।
गेला कोठें नकळे कीं आहे गुप्त या स्थळीं ठेला[7] ॥ २७ ॥
या खेदें जननीच्या आलें तत्काल उदक नेत्रांसी ।
पडतां बिंदु शरीरीं वाटे आश्चर्य फार पुत्रासी ॥ २८ ॥
नसतां अभ्र कसें हे पडले बिंदू ह्मणून वर पाहे ।
तो देखे मातेतें दुःखें व्याकूळ जाहली आहे ॥ २९ ॥
पुसतां कारण सांगे दुःखाचें निज सुतासि ती माय ।
बापा सुंदर काया जाइल विलयासि तरि करूं काय ॥ ३० ॥
वाटे चिंता मजला आलें नयनासि नीर या साठीं ।
क्षणिकाचि वैभव सारें याच्या कां लागतोसि बा पाठीं ॥ ३१ ॥
सद्गुरुला शरणाचि हो होइल बापा तुझी अमर काया ।
या भव जळांत पुष्कळ मेले खाउनि अशाच गटकांया[8] ॥ ३२ ॥
भूप ह्मणे मातेला मज तो कोणी दिसे न या लोकीं ।
सारेचि मरणधर्मी[9] इतरां करितील काय अवलोकीं ॥ ३३ ॥

---

१ शोध. २ युक्ती. ३ आईग ( शोक प्रदर्शक. ) ४ रात्रीं ५ विचार. ६ कोठें भेटूं. ७ ठेवलेला. ८ गटांगळ्या. ९ मरणें हा धर्मच आहे ज्यांचा ह्म० नश्वर.

माय ह्मणे जरि असते गुरु जालंदर तुला करीं धरिते ।
करिते मुक्त भवांतुनि सोडविलें प्रभुवरें जसें करितें ॥ ३४ ॥
नाथ गुरू जालंदर आले होते तुझ्याचि सदनासीं ।
तें पासुनियां अजवर बा त्यांच्या लोकिलें[1] न वदनासी ॥ ३५ ॥
हें ऐकतांचि नृपवर अंतरि बहु खोंचला न वदला हो ।
चित्तीं ह्मणे वृथा म्यां दवडीला सद्गुरु[2] पपदलाहो ॥ ३६ ॥
माता शोक करी बहु चित्तीं अठऊनि सद्गुरू पाय ।
जाऊं कोठें पाहूं यालागीं कोणता करुं उपाय ॥ ३७ ॥
धूंडत गिरि गव्हरमों जालंदर कीं कहीं न सुध पाया ।
एक दिन वह कानीफा देखे एक आम्रवृक्षकी छाया ॥ ३८ ॥
वृक्ष तले कानीफा ले उतरा छात्र[3] सातसे[4] अपने ।
आसन धुनी लगाकर ले माला हाथमें लगे जपने ॥ ३९ ॥
इतनेमें गोरक्षक जो चेला नाथ-गुरु मछंदरका ।
आया सब चेलोंसे[5] वृक्षतले भेस[6] ले कलंदरका[7] ॥ ४० ॥
गोरक्षक कानीफा बैठ रहे गुरु अदेस कर अपना ।
पूछे गुरु बतलाये पथ गुरुका तंत्र मंत्र जो जपना ॥ ४१ ॥
गोरख कहे कानीफा भूक लगी आम्रफल उतारोगे ।
देऊं उतार सबही फिर जहांके फल तहां बिठावोगे ॥ ४२ ॥
इतना कह कानीफा विद्यासें फल सभी उतारलियो ।
खाये सबही मिलकर गोरख जहांके तहां लगाय दियो ॥ ४३ ॥
पूछत कानीफासे तीरथ अब कोन कोन कर आये ।
फिर जावोगे कहांपर है मेला[8] कौन जौ[9] ने सुनपाये[10] ॥ ४४ ॥
कानीफा जूं बोले धूंडत हूं देस गिरि गुहा बनमें ।
गुरु जालंदर न मिले अब पूरबकी अई[11] सफरमनमें ॥ ४५ ॥

---

१ पाहिले २ सद्गुरू चरणांचा लाभ. ३ शिष्य ४ सातसें. ५ शिष्यासह वर्तमान. ६ वेषघेऊन. ७ फकीरांतील एक विशिष पंथ ८ संतांचा मेळा ९ जो. १० ऐकलेला. ११ आली.

इतना सुन गोरक्षक कानीफासे विनोद कर बोले ।
गुरुकी खबर न जिसको औरनंकी काहेको खबर बोले ॥ ४६ ॥
राजा बंगालेका कहते है सबहि गोपिचंद जिसे ।
जालंदरको डाला है कूवेमें भई न खबर किसे ॥ ४७ ॥
बारा बरस हुवे उस खाईमें डार लीद है गेरा ।
जालंदरको तबसे मानो किसिनें न आज लग हेरा[3] ॥ ४८ ॥
पुछत गोरक्षकसे आये कहांसे कहाव जावो गे ।
तीरथ कौन कियेहो अब चेलोकों कहा न्हलांवोगे ॥ ४९ ॥
धुंडत हूं मै गुरुको नाथ मछंदर मिले कहीं तुमसे ।
कानीफा जूं बोले है इस्त्रीराजमें मिलो उनसे ॥ ५० ॥
इस्त्री लंपट गुरुकी कौन बढाई करे कहो हमसे ।
वोही गुरु साचा है जो चेलोंको छुडाय ले जँमसे ॥ ५१ ॥
यापरि संवादुनियां गेले तेथुनि गुरूसि धुंडाया ।
पाहुनियां जन ह्मणती आल्या कोठूनि काय झुंडा या ॥ ५२ ॥
दक्षिण दिशेसि गोरख विभूति चर्चूनि जाय अंगाला ।
गेला कानीफाही अनुलक्षुनि पूर्वदेश बंगाला ॥ ५३ ॥
शिष्यांसह कानीफा उतरे जाऊनि पुष्प-वॆटिकेंत ।
कळवी मैनावातिला आली तत्काल त्याचि घटिकेंत ॥ ५४ ॥
जाउनि भेटे आधीं गुरुचाही मग पुसे समाचार ।
होइल भेटि सुनिश्चित अवधी कर दिवस अष्ट साचार ॥ ५५ ॥
मैनावाति संतोषें आली धाऊनि आपुल्या सदना ।
पाहे क्षणभरि न्याहाळुनि निज पुत्राच्या उगीच ती वदना ॥५६॥
बोले निज पुत्रातें बापा जाईल व्यर्थ ही काया ।
पुनरपि न मिळे सहसा अवधी लागेल कल्प हुडकाया ॥ ५७ ॥

---

१ इतरांची. २ खोल. ३ पाहिलें. ४ व पर कोठें. ५ स्नानघालाल. ६ स्त्रीराज्य. ७ यमापासून. ८ मेळे ९ फुलांच्या बागेंत. १० मुदत.

कानीफा गुरु-बंधू आला शिष्या सहीत या गावीं ।
चाल तुला भेटवितें विषय-स्पृहता समूळ त्यागावी ॥ ५८ ॥
आला गोपीचंदहि निज सैन्यासह त्वरीत बागांत ।
नमन करीत यथोचित तरि तों भासे तयासि रागांत ॥ ५९ ॥
बोले कानीफा हे राया तूं नष्ट दुष्ट अति पापी ।
कष्टविलेंसि गुरुला तरि तूं येथूनि सतत नरका पी ॥ ६० ॥
घाबरला राय बहू नमुनि ह्मणे वाचवा कृपा-दानें ।
झालों लीन पदी या तुमच्या करणें न काय पादानें ॥ ६१ ॥
त्यागुनि संग सकलही होसिल योगी तरीच तरसील ।
मरसिल आन उपायें नचले, तरि यत्न काय करसील ॥ ६२ ॥
कांता कनक सुहृज्जन शक्य न तारि अन्य कोण ताराया ।
अवधी सरतां जाणें टाळिल हा नेम कोणता राया ॥ ६३ ॥
कर जा शोध गुरूचा कथिला तुजलागिं हा उपाया सुधा ।
न करी वेळ आतां तरी मरतां तुज लाधली अलभ्य सुधा ॥६४॥
आली मैनावतिहि सांगे तिजलागिं कर्म जें त्याचें ।
होईल भस्म आतां हा करितो तरि काय वृत्ति जे त्याचें ॥ ६५ ॥
घाबरली फार सति विनवी पुत्रासि वांचवायासी ।
लागे पाप क्षणांतचि वेळ बहू पुण्य सांचवायासी ॥ ६६ ॥
तेथुनि गृहासि नेउनि पूजा सत्कार बहु तिनें केला ।
सद्भावें नमन करुनि उभयांनीं गोविलाच भाकेला ॥ ६७ ॥
गुरुको निकालनेकी कर सूरत वह तुझे बचावेंगे ।
राजा कह कानीफा उस कुवेपर चलो खुदावेंगे ॥ ६८ ॥
लीद उठाये खोद देखे हैं ध्यानमें लगे हरके ।
बैठे लोक कुवेपर सबही गुरुनाथको नमन करके ॥ ६९ ॥

---

१ जाळदार गुरुचे शिष्य ह्मणून २ विषय तृष्णा ५ अमृत. ६ वचनाला. ७ ह्मणून काढूं. ८ सदाशिवाच्या

कनकार्य[1] ताम्रपीतल चार मुरत चार धातकी[2] करना ।
कुवेपर जाँ[3]–धरना डरना मत धीर बहोतसा सरना ॥ ७० ॥
मूरतले लोहेकी पुकारना गोपिचंद हूं आया ॥
करतां हूं नमन करो गुरुजी इस दासकी अमर काया ॥ ७१ ॥
जलजावे जब पहेली ले मूरत एक एक धातनँकी[4] ।
सबही जल जावेंतो फिर बचनेकी करूं फिकर तनकी ॥ ७२ ॥
राजानें बनवाया चार मुरत चार धात समतोला ।
ले मूरत लोहेकी हूं राजा गोपिचंद यों बोला ॥ ७३ ॥
जलजा पापी कहते लोहेकी खाक बनगई छँनमे[5] ।
दुसरी तिसरी चौथी जलनेसे बहोत डरगया मनमें ॥ ७४ ॥
कुवेपर फिर बोला गुरुजी मै गोपिचंद हुं आया ।
अबलग जीता है तु बेटा होजावेगी अमर काया ॥ ७५ ॥
कूपा बाहिर गुरुला अणिलें काढूनि गोपिचंदानें ।
नेउनियां निज सदनीं केला सत्कार बहु अनंदानें ॥ ७६ ॥
झाला अनुताप असा क्षणिकचि हे विषय भोग त्यागावे ।
शाश्वत-पद पावाया या गुरु वांचूनि कोणत्या गावें ॥ ७७ ॥
यावरि गुरुलाहि ह्मणे आहे जरि मी अनंत अपराधी ।
सद्भावें लीन पदीं झालों आतां असे न अपराधी ॥ ७८ ॥
नाथ ह्मणे फार कठिण योग तुला वर्म[6] काय गा ठावें ।
होइल सुख-स्पृहा[7] तरि पुनरपि सदनासि याच गांठावें ॥ ७९ ॥
भूप ह्मणे हो गुरुजी आधी मी त्रासलोंच विषयास ।
त्यांतहि दर्शन तुमचें आतां मी मानितोच विष यांस ॥ ८० ॥
विनवी मैनावतिही निज पुत्रावरि दया करा-यातें ।
झाला अनुताप खरा संरक्षात्रें दया करा, या तें ॥ ८१ ॥

---

१ कनक–सुवर्ण २ अय–लोखंड ३ जाऊन ठेव ४ धतूची ५ क्षणांत. ६ दुसरी बुद्धि. कुत्सित बुद्धि. ७ सुखाचाइच्छा

पाहुनि निश्चय त्याचा उपदेशामृत यथेच्छ पाजविलें ।
ज्ञानानळें नृपाचें जन्म-मरण-हेतु-बीज भाजविलें ॥ ८२ ॥
घेउनि निरोप आला मैनावंतिचा गुरूसवें जाया ।
केला वेळ न कांहीं गृह-धन-प्रिय-कामिनीस वरजाया ॥ ८३ ॥
जालंदर कानीफा भूपहि त्यांच्या समागमें गेला ।
द्वादश वर्ष गुरुपद सहवासें योग साध्यही केला ॥ ८४ ॥
आज्ञा घेउनि गुरुची आला तो गोपिचंद नगरासी ।
क्षणिक सुखातें विटला पाहुनि मोहेल काय नगरांसी ॥ ८५ ॥
भेटुनि मातेसि अर्धीं गेला भिक्षार्थ कामिनी सदना ।
पाहुनि रूप तयाचें ह्मणती हा लाजवीतसे मदना ॥ ८६ ॥
दिसतो योगी परि हा पति अपुला तरिच नांव नव सांगे ।
नवसा गे श्रीहरिला यत्न करुनियां अतांचि गवसा गे ॥ ८७ ॥
मोहिति कांता विषयीं परि तो सहसा न गुंतला कामीं ।
चित्तीं ह्मणे अतांही न विचारू स्वहित आपुलें कां, मीं ॥ ८८ ॥
नमन करुनि मातेला गेला गुरुराज ज्या स्थळीं होते ।
होतें सुख संसारीं त्यजिते संतहि उगेंचि कांहो तें ॥ ८९ ॥
इकडे गोरक्ष हि तो निज शिष्यांसह गुरूसि धुंडाया ।
हिंडे ह्मणे असेंही नेऊं आतां कशास झुंडा या ॥ ९० ॥
होते नाथ मछंदर प्रमिळा-राणी-प्रमूख राज्यांत ।
प्रतिबंध साधु संतां शिरवेना अन्यही नरा ज्यांत ॥ ९१ ॥
सांगे नाथ मछंदर गोरख मज न्यावयासि येतो कीं ।
झालें मोहित मानस तूझ्या ठायीं तसे प्रिये तोकीं ॥ ९२ ॥
जरि तो नेइल मजला तुज वांचुनिया प्रिये कसा राहूं ।
वाटे ग्रासाया मज येतो चंद्रासि त्या जसा राहू ॥ ९३ ॥

---

१ त्याग करण्यास. नग—डागिने अर्थात् द्रव्य त्याच्या राशी.स., ३ संसारांत जर सुख असतें तर संतलोकउ गीच कां टाकते? असामावार्थे ४ तोक.झ०मूल अर्थात् मैनीनाथा

आलें विघ्न टळाया योजूं मी कोणत्या उपायासी ।
स्थळहि दिसेना मजला त्या गोरक्षापुढें लपायासी ॥ ९४ ॥
प्रमिळा ह्मणे न भ्यावें करितें प्रतिबंध साधु-संतांस ।
येइल कोठुनि मग तो पावेना काय हो निजांतास[1] ॥ ९५ ॥
आज्ञा दे निजदासां द्वादश गांवें प्रदेश रोधाया ।
अनमान नच करावा संतमहंतादिकांसि शोधाया ॥ ९५ ॥
येइल बळेंचि कोणी आज्ञा आहे जिवेंचि माराया ।
जरि हे विपरीत तरी, न शके कोणीच हो निवाराया ॥ ९७ ॥
वधिलें संत महंतां केला अन्याय ही महा त्यानीं ।
परि न चले कवणाचें केली हळहळ बहू पहा[2] त्यांनीं ॥ ९८ ॥
मारिति संत महंतां झाला ऐसाचि फार बोभाट ।
याचक न येचि कोणी येतिल मग कासयास हो भाट ॥ ९९ ॥
या वृत्तश्रवणानें झाला गोरक्ष घाबरा हो तो ।
आलों वृथा ह्मणे मी अपुल्या ठायींच तरि बरा होतों ॥ १०० ॥
परि करणें सद्गुरुचा शोध म्हणुनियां मनीं असें भावी ।
कीं गांठू प्रमिळेतें मग जें होणार हो सुखें भावी ॥ १०१ ॥
मार्गींच भेटले त्यां जे कां अवतारचरित खेळविती ।
गीत विनोदें हास्यें मोहुनि सकळांसी वित्त मेळविती ॥ १० ॥
त्या नाटक समुदायीं जो कां होता मृदंग वाजवित ।
तो व्यापिला ज्वरानें म्हणउनि होतेच हाकं[3] गाजवित ॥ १०३ ॥
ते म्हणती वाजविल्या मृदंग नेऊं तुम्हांसि सांगा तें ।
आहे अवगत किंवा कैसें आतांचि स्पष्ट सांगातें ॥ १०४ ॥
गोरक्ष म्हणे येतों समागमें वाजवीन संगतिनें ।
प्रमिळा म्हणति कुशल तरि व्हावें एकतांचि दंग तिनें ॥ १०५ ॥
ऐसें बोलुनि गेला तो त्या संगेंचि राणिच्या गांवा ।
संगतिनें मग याच्या झाला उत्कर्ष तोहि सांगावा ॥ १०६ ॥

---

१ निज ह्म० आमलें अंत ह्म० मरण त्यास २ पाहणारानें. ३ हाकाटी करीत होते.

सांगावें काय किती ज्यात्या पौरांसि[1] नित्य हा चाळा ।
टाळा न देचि कोणी ते म्हणति एक एक घर चाळा ॥ १०७ ॥
एके समयीं झाला राणीच्या खेळ मंदिरामाजीं ॥
गोरक्ष म्हणे आतां होइल परिपूर्ण कामना माजी ॥ १०८ ॥
खेळहि अनुपम्य तयीं झाला शंसा[2] समस्त जन करिती ।
देती द्रव्य तयातें वस्त्रें[3] नग भूषणें अनेक-रिती ॥ १०९ ॥
गोरक्षें त्या समयीं वाजविलीं अक्षरें मृदगांत ।
गुरुजी चला अलों मी रतलां कां या अनंग[4]–रंगांत ॥ ११० ॥
सुनरी प्रमिळा राणी गोरख आया मुझे लिजावेगा ।
मेनीनाथ[5] बिना नही चैन उसे कौन अब खिलोवेगा ॥ ११ ॥
चलो मछंदर गोरख आया है कानमें भिनक[6] आई ।
रोवे प्रमिला राणी अब मै करु कौनसी जुगत[7], माई[8] ॥ ११२ ॥
गोरक्षक नहि माने नाथ मछंदर तुझे लिजावेगा ।
यह चिंता है मुजको तुम बिन अब कौन हट चलावेगा ॥११३॥
इतनेमें गोरक्षक आन मिला नाथ गुरु मछंदरसे ।
आई प्रमिला राणी तबही सुनले आवाज अंदरसे ॥ ११४ ॥
दिधलें क्षेम तयांनीं चित्तापासूनि दान अभयाचें ।
ह्मणती स्वस्थ असावें वंदी गोरक्ष पाय उभयांचें ॥ ११५ ॥
गुरुच्या सेवेंत सदा जरि तो गोरक्ष नित्य मग राहे ।
तरि ह्मणती जन त्यातें आले कोंठूनि विघ्न नगरा हें ॥ ११६ ॥
गेले दिवस असे किति नाथ मछंदर निमग्न विषयांत ।
गोरक्ष म्हणें कैसें नकळे भावी समग्र विष यांत ॥ ११७ ॥
एके समयीं [9]निशिथीं राणीच्या नाथ मंचकीं होते ।
मेनीलाथ म्हणे न्या होईल शौच्यासि मज असें हो तें ॥ ११८ ॥

---

१ नागरीक लोकांस. २ प्रशंसा स्तुति ३ दागिने ४ राति विलासांत ५ प्रमिळेचा मुलगा. ६ शब्द ध्वनी, ७ युक्ति ८ अगआई ९ रात्रीं

गोरक्षातें कथिती न्यावें शौच्यार्थ यास बाहेर ।
परि भय वाटेल असें नकरीं, राहूनि निकट बा हेरें[1][2] ॥ ११९ ॥
नेउन बाहेर तया बसवी शौच्यासि परि असेंच वदे ।
ताडीन मूत्र येतां ह्मणणें बाळासि हें कसें चव दे ॥ १२० ॥
शौच न करितां येउनि बाळ भयानें पुन्हा तसा निजला ।
करि मलमूत्र पलंगीं यास्तव मंचक सचैल तो भिजला ॥१२१ ॥
यावरि गोरक्षातें ह्मणती आणी धुऊनियां बाळा ।
आज्ञा प्रमाण गुरुजी देइल वचनासि कोण या टाळा ॥ १२२ ॥
ऐसें वदोनि गेला घेउनि बाळासि त्या नदीवरता ।
आपटिलाचि शिळेवरि रजकहि वस्त्रासि फार सांवरता ॥ १२३ ॥
अणिलें चर्म धुउनियां घाली उष्णांत मग सुकायास ।
नव्हते माहित कवणा ह्मणउनि ह्मणती उशीर कां यास ॥१२४ ॥
आला गोरक्ष तया पुसती बाळासि सोडिलें कोठें ।
येरु ह्मणे सुकतसें तरितें सकाळांसि वाटलें खोटें ॥ १२५ ॥
पुसतां पुनः पुन्हाही सांगे उष्णांत घातलें वाळूं ।
आहे आज्ञाधारक गुरुच्या वचनासि मीं कसा टाळूं ॥ १२६ ॥
पाहाति जाउनि तेथें चर्म असें घातलें सुकायाला ।
बाळासि मारिलें हो समयीं आली दया न कां याला ॥ १२७ ॥
प्रमिळा आक्रोश करी वधिलें बाळासि या कसाबानें ।
जन ह्मणती मायेनें[3] धीर धरावा तरी कसा बानें ॥ १२८ ॥
गाहिंवरुनि रडे प्रमिळा तीस वदे नाथें[4] तूं प्रिये न रडे ।
मेनीनाथ न येतां या दुष्टाचें चिरीन मी नरडें ॥ १२९ ॥
ह्मणती गोरक्षातें द्यावें आणून आजि बाळासी ।
हें जरि न घडेल तरी सत्यचि तुज भेटवीन काळासी ॥ १३० ॥

---

१ बा–गोरक्षा. २ महात रहा. ३ बापानें ही माये मुळें धीर कसा धरावा.
४ मत्स्येंद्रनाथ,

कळलें स्पष्ट आतां मज गुरुलाही लागलें विषय ध्यान ।
जरि मी गोरक्ष तरी या करवीं सोडवीन हें स्थान ॥ १३१ ॥
मग त्या गोरक्षानें अत्यद्भुत दाविला बहू न चमत्कार ।
त्या योगें जन त्याचा करिती तेथें सत्कार ॥ १३२ ॥
बाळें अनुरूप सकळ आणिलीं निर्मूनि एकशें आठ ।
घ्या मेनिनाथ पाहुनि करितां कां तरि उगाच बोभाट ॥ १३३ ॥
रूपें वयें समाचि कीं बाळें देखूनि जाहले दंग ।
ह्मणती देव चि केवळ रहावें याचा धरूनियां संग ॥ १३४ ॥
प्रमिळा म्हणे कळेना दे माझा मेनिनाथ बा मजला ।
दिधला एकचि आणुनि पूर्वीं होता जसा तसा सजला ॥ १३५ ॥
झाला आनंद जनां ह्मणती सामर्थ्य काय हो याचें ।
धरिला द्वेष बहू जरि आहे होणार काय हो याचें ॥ १३६ ॥
गोरक्ष म्हणे गुरुजी आतां येथें तुम्हीं नका राहूं ।
विनती मान्य करा ही द्यां सोडुनि सर्वथा नकारा हूं [3] ॥ १३७ ॥
ह्मणती नाथ मछंदर बा माझें चित्त गुंतलें कामीं ।
धामींच सौख्य वाटे सोडुं तरि केंवि दार-लेकां मी ॥ १३८ ॥
क्षणिक सुखाची इच्छा धरणें अपणासि हें नसें विहित ।
साधावें कार्य असें आहे होणार ज्यांत भावि हित ॥ १३९ ॥
नेइल गोरक्ष मला वाटे आतां कधीं न सोडिल ।
भीतों मी या साठीं कीं हा चौघांत धरुनि वोढिल ॥ १४० ॥
विरह तुझा मज दुःसह होइल तैसाचि याहि बाळाचा ।
आलें संकट मोठें कैसा हा भोग तरि कपाळाचा ॥ १४१ ॥
जाणें प्राप्तचि येथुनि देई मजला निरोप गे जाया ।
वायां आग्रह न धरि आहे क्षम [6] कोण यासि वरजाया [7] ॥ १४२ ॥

---

१ वस्त्रप्रावरणादिकांनी अलंकृत. २ सर्वथा नकार सोडूनद्या ३ हूं चला तयार व्ह
४ स्त्री. ५ मुलाला. ६ समर्थ ७ निवारण्यास.

प्रमिळा नाथासि म्हणे सौख्यानंदांत सर्वदा होते ।
कंठुं काळ कसा हो घडि घडि अठवेल कीं मना होते ॥ १४३ ॥
देतें मी सामग्री मार्गानें उभयतां तुम्हीं सेवा ।
बा गोरक्षा तूंही नित्य गुरुची करीत जा सेवा ॥ १४४ ॥
मग अणिल्या प्रमिळेनें गुप्तपणें कनकमय-विटा दोन ।
घालुनि झोळींत ह्मणें घ्या सत्वर या अतांची बांधोन ॥ १४५ ॥
नाथ मछंदर गोरख जाती तेथूनियां स्वदेशाला ।
देहाचि तापद गमला प्रमिळेला दुःख कां न दे शाला ॥ १४६ ॥
जातां जातां मार्गी अढाळलें एक वन महा घोर ।
नाथ मछंदर भ्याले म्हणती जाईल हेम हा घोर ॥ १४७ ॥
बेटा घोर विपिन है डर होवे तो हमें बतादेना ।
गोरख सोंचे मनमें क्यौं डरते है गुरु पता लेना ॥ १४८ ॥
एक दिन नाथ मछंदर धर झोलीको गये दिसा फिरनें ।
गोरखनें जो देखा दो लुंडे कनकके लगे गिरने ॥ १४९ ॥
डारदिया गोरखनें जलभारीथा जहां भरा पाया ।
दो पथ्थर झोलीमें गेरां सम तोल हेमके लाया ॥ १५० ॥
आगू निकल गये तब नाथ मछंदर पुकार यंव पूछे ।
क्या कछु डरहै बेटा गुरुजी अब डर कहां, रहा पीछे ॥ १५१ ॥
धूंडे हेम न पाये झोलीमें बहोत नाथ घबराये ।
पुछे गोरच्छकसे ले पथ्थरको तभीहि पटकाये ॥ १५२ ॥
निर्दय शिष्य तुझ्या सम दुसरा कोणी नसेचि या लोकीं ।
घोकित होतों अनुदिनिं त्या कनकावीण दीन झालों कीं ॥१५२॥
दुष्टा आली नाहीं तुजला माझी दया कशी रानीं ।
या वृत्त श्रवणानें उगली राहील ती कशी राणी ॥ १५४ ॥

---

१ सोन्याच्या. २ सुंदर गृह. ३ सोने ४ घ्यास. ५ विटा ६ सोन्याच्या. ७ गहेरा ग॰ बरोबर ८ पुढें ९ खालींटाकून दिले. ९ प्रेमला

गोरक्ष ह्मणे गुरुजी करितां कनकासि काय सांगा तें ।
स्पर्श नसावा याचा अंतीं येईल काय सांगातें १५५ ॥
जरि पाहिजे तुह्मांला देतों पुष्कळ सुवर्ण घ्यावेंच ।
मग चित्ता वाटेसा नित्य तयाचा करीत जा वेंच[1] ॥ १५६ ॥
गोरक्षें निज मूत्रें कनकाचल निर्मिला दुजा जगती ।
प्रार्थुनि गुरुसि ह्मणे घ्या यांतुनि लागेल जे त्वरित गती ॥१५७॥
नाथ मछंदर विस्मित झाले पाहूनि हा चमत्कार ।
ह्मणती क्षमा करी बा केला नेणूनियां असत्कार ॥ १५८ ॥
मग तें गुरु-शिष्य मिळुनि जाती तेथूनिया स्वदेशाला ।
सांडोनि संग सकलहि भजले सद्भक्तिनें परेशाला ॥ १५९ ॥
गोरच्छक कानीफा था राजा गोपीचंद भी आया[2] ।
उतरेथे चेलासे उसी जगे आम्र बृच्छ की छाया ॥ १६० ॥
नाथ मछंदर गोरख चेलोसे बृच्छके तले आये ।
कीये अदेश गुरुका बातोंसे एक एक के धाये[3] ॥ १६१ ॥
बृत्त सुनाये अपना अपना गोरच्छ कानिफा सबसे ।
चेले दोनों गुरुके होवे विख्यात जगतमों तबसे ॥ १६२ ॥
भगवत् भक्त शिरोमणी याच्या गातील जे प्रबंधास ।
गिरिवासी प्रभु त्यांच्या सत्वर तोडील कर्मबंधास ॥ १६३ ॥

---

## याच आख्यानाचीं पदें.

### पदे

पद-( लोक ह्मणतात ) दीपचदी

कैसा जोगी अमंगल[4]-काय हो ॥ धृ० ॥ अंतर बाह्य मलीनाचि भासे वंदिति कां जन पाय हो ॥ १ ॥ कुत्सित जागीं[5] वास

---

१ खर्च २ आया था-ह्म० आला होता ३ संतुष्ट होते झाले ४ ओंगळवाणा आहे देह ज्याचा ५ अमंगलजागीं

करी हा पूजिति जन वेडे काय हो ॥ २ ॥ आणुनि काष्ठें उदर भरीतो तळमळ याचि न जाय हो ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभुलागि न भजती हाचि गमे नवलाय हो ॥ ४ ॥

दिंडी-( मैनावति गुरुस ह्मणते )

करी मैनावति नमन गुरूपांया ॥ व्यर्थ घालविलें ह्मणे सुवय[1] वांया ॥ अतां बुडतें या भवांबुधी[2] मांजी[3] ॥ त्वरे सुटका येथूनि करा माजी ॥ १ ॥ क्षणिक वैभव हें वेळ नसे जायां ॥ तशी विलया[4] जाईल गमे काया ॥ करा अनुकंपा[5] उशिर नका लावूं ॥ अतां सोडुनि हे पाय कुठें जाऊं ॥ २ ॥

दिंडी

कहत जालंदर सुनो मेरी माई । मै क्या जानूं उपदशेकी बढाई ॥ माता मैनावंती तुं काहेकु आई । कहो किसने यह जुगत बतलाई ॥ १ ॥

साकी. ( गोपिचंद्र स्त्रियास विचारतो व त्या सांगतात )

मैनावंती मोहे बतलावो कहां गई अज मंदरसे ॥ कौन दियो है दुख माताको जबाब देव कोई अंदरसे ॥ १ ॥ हात जोर बिनती कर कांता सबही बोलत राजासे ॥ क्या कहि एक छुनही कहे सकते बात भई जो मातासे ॥ २ कीरत नाम डुबाकर सबही जालंदर गुरु कीनो है ॥ उस जादुगर जोगीनें मन उनका छीन लिनो है ॥ ३ ॥ नाता उपर गुरू चेलोंका अंदरसे कछु न्यारा है॥ सब दिन पाव दबावत मया रात गुरू वोहि प्यारा[7] है ॥ ४ ॥

पद ( मैनावंती गुरुचा शोक करिते. )

अब मै कैसे करूं मेरि माई ॥ ध्रु ॥ देशभी धुंडी, नगरभी धुंडी, गुरूकि खबर न पाई ॥ १ ॥ नाथ गुरूको, नहि मै न्हलाई

---

१ नवल २ चांगले वय ३ संसार समुद्रामध्यें ४ माझी ५ नाश होईल ६ कृपा. ७ प्रिय.

ना मै कभू खिलाई ॥ २ ॥ कीनि[1] नही कभू सेवा गुरुकी नहि पूजा बनआई ॥ ३ ॥ गिरिवासी गुरु नाथ चरनपर नहि मै सीस[2] नमाई[3] ॥ ४ ॥

साकी-( मैनावती मनांत विचार करिते )

सोचत[4] मैनावंती मनमों कहां गुरूं को पावूंगी ॥ जोहि मुझे गुरुनाथ दिखावे गुन उसके नित गाऊंगी ॥ १ ॥ नही गुरू बिन चैन मुझे अब, इसी जगे मर जावूगी ॥ नाथ गुरूकी सुध[5] मिल जावे सीस नमाकर लावूगी ॥ २ ॥ कहूं किसे मै यह दुख अपना कौन गुरू बतलावेगा ॥ घडि घडि याद गुरूकी आवे इसको कौन मिटावेगा[6] ॥ ३ ॥

पद-( मैनावती गोपीचंदास ह्मणते )

ऐसी सुंदर तेरि काया एक दिन जल जावेगी बेटा रे ॥ धृ० ॥ अतर मोतिया गुलाब अंबर काम न आवे कांता रे ॥ सेज फुलोंकी हार गलेमें येही काम है वोटा रे ॥ १ ॥ बाग बगीचे देस मुलुख सब महेल हवेली कोठा रे ॥ हाथी घोडे ऊठ पालखी सबहि पसारा झुटा रे ॥ नग नगीना भरा खजाना एक दिन आवे तोटा रे ॥ है मोतनकी झुल झालरा हाथ न आवे लोटा रे ॥ ३ ॥ लत्ता कपडा सबहि तऱ्होंका दुशाल मंदिल फेंटा रे ॥ गिरिवासीकों मत भुल जाना मिले नही लंगोटा रें ॥ ४ ॥

पद

( बेटा हुशार रहनाबे )

कानीफा जालंदराचा शोध करितो

पूछत कानीफा सबको ॥ मिले गुरु जालंदर तुमको ॥ धृ ॥ धूंडत देस गिरीगव्हरमों, प्रयाग मथुरा कासी ॥ द्वारवतीमें देखे जाहांपर जपी तपी सन्यासी ॥ १ ॥ गोकुळ वृंदावन सब आवध,

---

१ केलीं. २ शीर ३ नमलेलें, ४ विचार करीत होती ५ शोधपत्ता ६ नाहीशी करील.

धूंडलई पुरिमाया ॥ गंगासागर हरिद्वारमें, नही ठिकाना पाया ॥ ॥ २ ॥ बद्रिनाथसे अया पलटकर मारवाड बुंदेला ॥ धूंड फिरा नगरी उज्जनपर जंहा साधुका मेला ॥ ३ ॥ खानदेस मानदेस सबही, बराडकी सुध लीया ॥ नही पता जब कहीं मिला तब दख्खनमें पग दीया ॥ ४ ॥ रामेसर गोकरन महाबल सबही पुकार लीया ॥ शेषा चल पर चढे पुछना गिरिवासीसे कीया ॥ ५ ॥

दिंडी ( गोरख कानीफास ह्मणतो. )

बहोत धूंडा मै गिरी गुहा बनमें ॥ नही ताकत अब रही कछु तनमे[1] ॥ देखलीया सब पूर पटन बस्ती॥ नही कीया एक दीन जरा सुस्ती॥ १ ॥ नही पाया मै कहीं पता गुरुका ॥ कहो कानीफा कछू खोज उनका ॥ मुझे गुरुबिन नहि चैन कहां जाऊं ॥ नाथ मच्छंद्र कहां तुमे पाऊं ॥ २ ॥

अंजनी गीत.

( मैनावंती ह्मणते बापा गुरुकर. )

माता मैनावंती रोवे ॥ बेटा ऐसे दिन मत खोवे ॥ किरपा[2] सद्गुरूकी होवे ॥ कर साधन ऐसा ॥ १ ॥ धन दौलत सब रहे जावेगी ॥ कांता कोइ न संग आवेगी ॥ एक दिन काया जल जावेगी ॥ नहि अपना कोई ॥ २ ॥ मेरा कानीफा गुरु भाई ॥ आया उसकी मै सुध पाई ॥ अपने घरको भी बुलवाई ॥ करले गुरु अपना ॥ ३ ॥

पद ( बेटा हुषार रहे नावे चा० चा० )

( कानीफा रागानें गोपीचंदास बोलतो. )

जगतमें मू कीया काला ॥ गुरूको कूवेंमे डाला ॥ धृ ॥ धन दौलतसे मस्त भया है, छल साधूका कीया ॥ जलजावेगी

---

१ शरीरांत. २ कृपा.

तनू पलखमें,[1] बुरा काम करलीया ॥ १ ॥ दान धरमसे कछु नहि होगा घट[2] तूनें भरलीया ॥ पूजा पत्री कामन आवे जम मंदिर[3] घर कीया ॥ २ ॥ रावन मारागया सुना है सज्जन को दुख दीया ॥ कौन हकीकत फिर औरनकी दुर्जन[4] कोइ न जीया ॥ ३ ॥ गिरिवासीकी मेहर[5] होजावे काम न ऐसा कीया ॥ गुरु बिन काच्या रहा जगतमें मुफत[6] उमर खोदीयाँ[7] ॥ ४ ॥

दिंडी ( कानीफा मैनावंतीस ह्मणतो. )

कहत कानीफा सुनो मैनामाई ॥ किई बेटेनें साधुसे बुराई ॥ गुरू-जालंदर–नाथ-सा[8],न जोगी ॥ मुरख समझा उनको ये बडा ढोंगी ॥ १ ॥ डार दीया है गुरूको कुवेमें ॥ नहीं लाया कछु खोप[9] खतर मनमें ॥ तनू इसकी जल जावेगी पलखमें ॥ तभी बदनामी उठेगी खलकमें[10] ॥ २ ॥

( गोपिचंद जालंदर यांचा संवाद. )

( गडयानो कृष्णगडी–या० चालीवर )

गमाई मुफत उमर सारी ॥ तुह्माविण कोण आतां तारी ॥ किया मै सब पातक भारी ॥ भोगिल्या किंतिक शतें नारी ॥ नही कछु साधन बनआया ॥ टपतसे काळ तनू खाया ॥ तुह्मारे अब दरसन पाया ॥ करूं कां मग चिंता वांया ॥ डुबा हूं भवजल[11]-में सारा ॥ गुरूजी लावा परपारा[12] ॥ पैरमें हुं मुंडी[13] डारा ॥ दिसेना या वांचुनि थारा ॥ १ ॥

पद ( गोपीचंदानें ऐश्वर्याचा त्याग केला. )

( बेटाहुषार रहना बे–या० चा० )

गोपीचंद बडा भोगी ॥ पलखमे बनहि गया जोगी ॥धृ ॥ बारासो कामिनी सुहानी[14] सोलासो सैलीयाँ[15] ॥ गरम बिछोंने सेज फुलोंकी जल मंदिर तज दीया ॥ १ ॥ तऱ्हेंतऱ्हेंके महेल

---

१ पळांत. २ पापाचा घडा भरून घेतलास. ३ यमाचें घर आपल्या करितां करून ठाविलेंस. ४ दुष्टकोणी वाचला नाहीं. ५ कृपा. ६ व्यर्थ. ७ गमाविलीस ८ सारखा. ९ भय. १० दुनियेंत, जनांत. ११ संसाररूपी पाण्यांत. १२ पैलतीरास. १३ पायांत डोकें घातलें आहे ह्मणजे शरण आलों आहे. १४ सुंदर. १५ सख्या.

बगीचे जितने था बनवाया ॥ हाथी घोड ऊंठ पालखी सबाईसे हात धोया ॥ २ ॥ माल खजाना कई तऱ्हेंका अंबारे लुटवाया ॥ छन भंगुर है यही समजकर गांड लंगोटा दीया ॥ ३ ॥ ऐसा राजा नही जगत मे अजलग कोई आया ॥ गिरिबासी की मेहर हुई तब जरा नही ललचाया ॥ ४ ॥

पद. ( गोपीचंदाच्या स्त्रिया ह्मणतात. )

( गडयानो कृष्णगडी–या० चा० )

सख्यांनों दिसतो हा राजा ॥ मोहुनि मानस हॊरा[1] जा ॥ धृ० ॥ बाहुनि[2] त्वरित मांत्रिकाला ॥ गड्यांनों मोहन तरि घाला ॥ बरा हा आला सदनाला ॥ येथुनि जाउं न द्या याला ॥ लागल्या द्रव्यहि सारा[3] जा ॥१॥ सुनंदे प्रियकर तूं भारी ॥ असे ह भूप तुझ्या द्वारीं ॥ वचनें प्रेमभरित सारीं ॥ वदुनिया करि नृप संसारी[4] ॥ असूं दे समीप हा राजा ॥२॥ भोगिले कष्ट बहू बाई ॥ पतीविण सुख सहसा नाहीं ॥ देतें मन तुमचें गाही ॥ करा गे यत्न कोणि कांहीं ॥ पाहिजें दिशाहि भारा[5] जा ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी यश दाता ॥ जाहल्या पति येईल हातां ॥ त्याविण कोण दुजा त्राता ॥ सोयरा सखा तोचि भ्राता ॥ विभूती[6] मंत्रुनि चारा जा ॥ ४ ॥

साकी. ( मैनावंती गोपीचंदास ह्मणते. )

बेटा चंपावति जो अपनी बहेन उसे जा मिलना ॥ कर बातें मोहबतकी देवे राज कभू मत भुलना ॥ १ ॥ एक दिन भिछा लेकर खाना अपने गुरुका है बाना ॥ ज्यादा दस्तदरॉजि[7] न करना, बेटा गुरुके गै बाना ॥ २ ॥

---

१ हरण करा. २ बोलावून. ३ द्रव्यही सारा ह्मणजे खर्चकरा. ४ गृहस्थाश्रमी ५ मंत्रांच्या योगानें दिशा रोखून टाका. ६ भस्म. राख. ७ ज्यास्त हात पसरूं नये ह्मणजे ज्यास्त भिक्षा मागूंनये.

दिंडी-( चंपावती ह्मणते. )

ह्मणे चंपावति ऐक बंधुराया ॥ कोणि दिधला हा जोग तुला वांया ॥ गृहीं करितिल आक्रांत तुझ्या जाया ॥ जाइ आपुल्या सदनासि बा रमाया ॥ १ ॥

दिंडी-( चंपावती ह्मणते. )

कहत चंपावति सुनो गोपिचंदा ॥ तुने छोडा काहेको राज-धंदा ॥ प्रिया रोवेगी[१] दिया दुःख भारी ॥ कौन कारण हो गया बन-बिहारी[२] ॥ १ ॥

पद. ( गोपीचंद ह्मणतो. )

माई भिछा फकीरी लावना री ॥ धृ० ॥ धन दौलतकी कौन हकीकत एक[३] दिन सभी डुबावना री ॥ १ ॥ झुठी काया झुठी माया झुठा जग भुलावना री ॥ २ ॥ अलॅख-निरंजन की खुन[४] पाया फिर जगतमें काहेको अवना री ॥ ३ ॥ गिरिबासीगुरु-नाथ चरनपर सब दिन सीस नमावना री ॥ ४ ॥

साकी.

ले भिछा अपने घर, माके पग पर सीस नमाया ॥ आज्ञा लेकर गया गुरुके दर्सनसे सुख पाया ॥ १ ॥

साकी-( गोरक्षक विचार करितो. )

सोंच करत गोरछक मनमें कहां गुरू को मै पावुं ॥ साध संतका नही गुजारा कैंवकर बस्तीमे जाउं ॥ १ ॥ कौन हमारा वाली तुमबिन प्रभुजी राह दिखावो ॥ नाथ मछंदर कौन जुगुतसे आवे हात जतावो ॥ २ ॥

---

१ स्त्रिया. २ अरण्यांत फिरणारा. ३ एके दिवशीं सर्व सोडून जावें लागेल असा भावार्थ. ४ परब्रम्हाची खूण पटल्या नंतर पुनः जन्म कशाला घ्यावा.

# श्रीरामांनीं मारुतीस चुटकी वाजविण्यास सांगितलें, तें आख्यान.

## कथासारांश.

श्रीराम लंकेहून परत आल्या नंतर त्यांनां राज्याभिषेक झाला. रामांनीं सर्वांनां त्यांचे योग्यतेप्रमाणें देणगी दिली, परंतु मारुतीला मात्र कांहीं दिलें नाहीं. यामुळें तो जीव देण्याकरितां शरयू तीरीं गेला. सीतेला ही गोष्ट आवडली नाहीं. तिनें मारुतीला बोलावून आणिलें, व आपला अमूल्य हार त्याला दिला. मारुतीनें तीं रत्नें फोडून पाहिलीं, व त्यांत 'राम' नाहीं ह्मणून तीं फेकून दिलीं. नंतर कांहींतरी सेवा सांगा, अशी विनंती मारुतीनें रामास केली. रामांनीं त्यास 'मला जेव्हां जेव्हां जांभई येईल तेव्हां तेव्हां तूं चुटकी वाजीव' असें सांगितलें. राम सीतेसह अंतःपुरांत गेले तरी मारुती त्यांचे मागें गेला, वगैरे चमत्कारिक कथा या आख्यानांत आहे.

## आर्या.

राज्याभिषेक सुदिनीं विधिनें साकेतिं रघुविरा जाला ।
तो प्रभु वस्त्राभरणें देउनियां बोळवीत राजांला ॥ १ ॥
वानरसमुहीं रामें जें जें ज्या उचित अर्पिलें सारें ।
सारे ह्मणती उरला मारुति हा प्रीति-पात्र कैसा रे ॥ २ ॥
अपमान दुःख दुःसह ह्मणउनि शरयू तिरीं मरायास ।
गेला कथिती वानर सत्वर हें वृत्त राम रायास ॥ ३ ॥
राम ह्मणें बा सुगेला जा ये घेऊनि वायुतनयासि ।
तेव्हां गमलें सकळां देतिल कांहीं तरी नुतन यासी ॥ ४ ॥
बोले सुकंठ जाउनि श्रीरामें बाहिलें तुला अदरें ।
रुसणें योग्य कसें हें गमलें बापा अधीं मला वदरे ॥ ५ ॥
वायुज ह्मणे जिणें हें नलगे आतां मरेन डोहींच ।
राम कृतघ्न खरा हा वार्ता त्रिजगांतरीं उडो हीच ॥ ६ ॥
सुगलें समजाउनियां अणिलें वातात्मजासि गेहातें ।
तरि पाहिलें न रामें देणें मग उचित कायसें हातें ॥ ७ ॥

---

१ सुग्रीवा.

झाला खिन्न बहुतसा आलों तरि कासयास मी मागें ।
वदलों सुगलासि असें कीं सहसा उचित ही न मी मागें ॥ ८ ॥
परि नायकेचि आतां काय करावें अशा प्रसंगास ।
झाली अकिर्ति बहुतचि गात्रेंही पावती न भंगास ॥ ९ ॥
पुनरपि जावें परतुनि तरि होणारी दहांत मम कुत्सा ।
रहतां ह्मणतिल आला भषका[1]सम हालवीत निज पुच्छा ॥ १० ॥
कळलें सीतेसि असें कीं रामें उचित वायुतनुजाला ।
दिधलें नाहीं यास्तव तो निज चित्तांत खिन्न बहु जाला ॥ ११ ॥
महिजा ह्मणे प्रभुवरा मारुति आजि बैसला उदास कसा ।
वाटे कष्ट करुनिया अंतीं हा उतरला न दास कसा[2] ॥ १२ ॥
राम ह्मणे या जोगें आहे तरि सांग काय देया[3]सी ।
उरलें एक अतां हें देतों ह्मणसील का[4]य दे यासी ॥ १३ ॥
तेंही देऊनि यातें कांते होईन काय उतराई ।
उपकार फार याचे वाटेलचि गिरि पुढें जसी राई ॥ १४ ॥
देतें नव रत्नांचा अमोल्य काढूनि हार हो यासी ।
त्या वांचुनि मारुतिला न दिसे कारण प्रमोद होयासी ॥ १५ ॥
तत्कालचि सीतेनें कंठीं आणूनि घातिलाहार ।
पाहे रत्नें फोडुनि निघतो कीं काय नामउद्गार ॥ १६ ॥
सीता ह्मणे अहाहा होतीं रत्नें अमोल्य कीं सारीं ।
कां नाशिलीं अरे हीं ज्यापाशीं तोचि धन्य संसारीं ॥ १७ ॥
राम ह्मणे जाऊं दे अणिलीं रत्नें कशास त्वां आधीं ।
या ऐशा उचिताचा चित्तीं याच्या नसेल गे आंधीं[5] ॥ १८ ॥
रवि अस्तंगत होता झाले बहु लखलखाट दीपाचे ।
मारुतिसह सकळांहीं नमिले पदयुग दया[6]नदीपाचे ॥ १९ ॥
रामा न देववे तरि दृढतर बांधूनियां उचित ठेवा ।
हेवा न करी परि मज सांगा कांहीं तरी नुतन सेवा ॥ २० ॥

---

१ कुत्र्याप्रमाणें. २ कसोटिला. ३ देण्याला. ४ शरीर. ५ चिंता. ६ दयासागराचें, रामचंद्राचें.

राम ह्मणे मज जृंभा येइल तेव्हांचि वाजवी चुटकी ।
कथिलें कार्य तुला हें न मिळे यावरि कपर्दिका फुटकी ॥ २१ ॥
झाली निशा ह्मणुनियां गेले सर्वत्र आपुल्या गेहा ।
परि मारुती न हाले मुर्ख ह्मणावा तरी कसा गे हा ॥ २२ ॥
सीता ह्मणे बहुदिसां आला कीं समय हा[१] अनंदाचा ।
बसला राशीस कसा अमुच्या हा अनुज काय मंदाचा ॥ २३ ॥
सीता दृक्संकेतें वरचेवर रघुविरा असें कळवी ।
कीं घालवाच याला कोण तुह्माविण अरिष्ट हें पळवी ॥ २४ ॥
सीते चाल गृहांतरिं गेल्यावरि कासयास हा मागें ।
येइल, राहिल सहजचि होता गे सुज्ञ हाहि बहु मागें[२] ॥ २५ ॥
केलीगृहांत गेलीं तरि मारुति हा अहेचि बालक-सा ।
सीता शंकित झाली पाठीं अमुच्याचि सर्वकाळ कसा ॥ २६ ॥
राम ह्मणे बा वत्सा जा आतां कष्टलासि बाहेर ।
कोणी संन्निध असतां निद्रा मजला नयेचि बा हेर[३] ॥ २७ ॥
बाई उठा चला हो होतो निद्रेंत भंग रामाच्या ।
येऊं प्रातःकाळीं उठुनी समयींच नित्य नेमाच्या ॥ २८ ॥
राम ह्मणे राहूं दे सीता रगडील हात-पायांस ।
आयास फार झाले बा तूंही जाणतोसि समयास ॥ २९ ॥
रामा मी बळकट कीं सीता, निज मानसीं करा सवदा[४] ।
कारण असेल दुसरें, या गोष्टी सर्वहि परांस वदा ॥ ३० ॥
वायुज बाहिर जाउनि क्षणोक्षणीं वाजवीत चुटक्यांतें ।
आ केला रामांनीं घ्याया अवसर नयेचि घुटक्यातें[६] ॥ ३१ ॥
घाबरली बहु सीता अणिलें बाहूनि वायुतनयासी ।
करितो सेवा अपुली त्यजिल्या ह्मणतील काय जन यासी ॥३२॥

---

१ शनी, सीता यानावानें कुंभ राशी होतें. कुंभेचास्वामी मंद ह्मणजे शनी आहे. सीता ह्मणाली हा शनीचा भाउच आमच्या राशीला आला २ पूर्वी. ३ पहा. ४ निवाडा. ५ दुसऱ्याला. ६ श्वास.

राम ह्मणे राहूं दे बा सेवा पावली मला सारी ।
सेवक असेचि असतां होईना काय सौख्य संसारीं ॥ ३३ ॥
झाला विनोद या परि मग सीतेलाहि सुखविलें धामीं ।
गिरिवासी प्रभु ह्मणतो गात्या देईन स्वच्छ मेधा मी ॥ ३४ ॥

---

## याच आख्यानाचीं पदें.

कटिबंध ( देणगीचा )

झाला समारंभ बहु मोठा, वर्णिल कोण तेथिंच्या थाटा, राबे कुबेर मग कां तोटा, येइल, विप्र चोळिती पोटा, दक्षिणा वाहक नेती मोटा, उघडूनि वस्त्राभरणी कोठा, कवणा देत दुशाला फेटा, कवणा मंदिल लाल दुपेटा, अंगा किनखापी जरिबुट्टा, भूषणें करांगुळीं आंगोठया, कंठीं बहुत जनांच्या कंठ्या, शोभति कडे चौकडे पेटच्या, हळदी कुंकुम वसन नग[3] दाही, सीता देत बायकांलाही, नाहीं न्यून ह्मणाया कांहीं, पात्रें नाचाति ठायीं ठायीं, तेव्हां गमली एकचि घाई, ज्यात्याँ[4] ह्मणती येतों बाई, बोलायाची सोयचि नाहीं, रात्रीं होती बहुत जागली, हो हो ह्मणतां नाहिं भागली, निद्रा त्यांतचि येउं लागली, वांजत्र्यांनीं झोड लाविली, बहुतांनीं हरिसभा भाविली[6], वानरसमुहीं याच रीतिनें, वस्त्रें नग भूषणें प्रीतिनें, दिधलीं रामें तसी सतीनें, जरि हें झालें यथा-गतीनें[7], परि अजवरि वागला भीतिनें, उचित तया गिरिवासी प्रभुनें सहसा नच देवविलें ॥ मारुतिविण सकळ जनांला श्रीरामें बहु मोदविलें ॥ १ ॥

पद—सुग्रीव मारुतीला म्हणतो.

( गडय‍ानो कृष्णगडी अपुला )

कसा अजि भ्रम तुजला झाला ॥ ह्मणसी कृतघ्न रामाला ॥ धृ० ॥ विसर कां पडला ये काळीं ॥ मारिला मद बंधू वाळी ॥

---

१ गाणारांला. २ बुद्धि ३ दाहा प्रकारचे अलंकार. ४ जाणाऱ्या. ५ इंद्रसभा. ६ मानिली. ७ व्यवस्थितपणें ८ आनंदित केलें.

येतां विघ्नें तो टाळी ॥ राम निच भक्तां प्रतिपाळी ॥ अहिल्या दिली गौतमाला ॥ १ ॥ वधिलें राक्षसकुळ रामें ॥ सुखविलें देव दयाधामें ॥ केली अघटित बहु कामें ॥ उद्धरी जनांसि निज नामें ॥ बिभीषण लंकापति केला ॥२ ॥ निंदिसी भक्तामरतरुतें[1] ॥ इच्छिलें फळ जो दे त्यातें ॥ जिंकिलें सकल वदान्यांतें[2] ॥ नसतां कां तरि जन गाते ॥ दिधलें निजपद शबरीला ॥ ३ ॥ असे हें विदित तुला सारें ॥ जाणत मूढ तूं कसा रे ॥ बोहिलें[3] अतांचि तुज बा रे ॥ करिसी वेळ तरी कां रे ॥ शरण हो गिरिवासी प्रभुला ॥ ४ ॥

झुलना. ( मारुती ह्मणतो. )

अंजनीगीत.

मारुति ह्मणे त्याच्या मनीं ॥ असतें देता तेचि क्षणीं ॥ आतां गेल्या होइल जनीं ॥ उपहास पाही ॥ १ ॥ मजवरि त्याचा प्रेमा जरी ॥ तोही कामा पुरता, वरी ॥ आतां बसला राज्यावरी ॥ उपेक्षा सहज ॥ २ ॥ चित्तापासुनी कष्टलों ॥ अती उचीता भ्रष्टलों ॥ आतां तेथूनि निष्टलों[4] ॥ अपकीर्तीसाठीं ॥ ३ ॥ कां तूं आग्रह करिसी मला ॥ अपमानानळ[5] बहु चेतला ॥ आतां देहांताचि भला ॥ गमतो मजलागीं ॥ ४ ॥ केला निश्चय हाची बरा ॥ आतां येइना मी घरा ॥ जरी[6] तो गिरिवासी खरा ॥ पाहील त्यासी ॥५॥

दिंडी. ( सुग्रीव ह्मणतो. )

सुगल बोले हें उचित काय तुजला । कसा नाहीं चित्तांत शोध केला । स्त्रिया त्यजिती प्राणासि जगां ठावें । मरण शूराचें शूरपणें

---

१ भक्तांनां जो कल्पद्रुम त्याला. २ स्तुत्यांनां उदारांनां. ३ बोलाविलें. ४ निसटलों, निघालों. ५ अपमानरूपी अनळ ह्मणेज अग्नी. ६ प्रभु व्यंकटेश जर खरा असेल तर रामाला त्याच्या या कृत्याबद्दल पाहून घेइल असा भावार्थ.

व्हावें ॥ १ ॥ व्यर्थ अपकीर्ती करुनि घेसि कां ही । कशी वाटेना लाज तुला कांहीं । अशा दुर्मरणें गती कुळां नाहीं । अधोगतिला होशील पात्र तूं ही ॥ २ ॥ चाल सत्वर येथूनि ऊठ आतां । श्रवण करितां कोपेल तुझी माता । ज्यांत नाहीं भुंक्ती[1] न मुक्ति[2] कांहीं । अशा साहसें ह्मणतील मुर्ख पाही ॥ ३ ॥

पद ( मारुती खेद करितो. )

जोगी-( मजला वरिलसुभद्रा काय )

पडलें संकट अजि भारी, करूं मी काय अतां ॥ धृ० ॥ जाहला जगांत या अपमान ॥ सरलें कष्टांचें महिमान ॥ गळला सहजचि मग अभिमान ॥ राहिलें मान शौर्याचें ॥ १ ॥ करविलें सख्य सुग्रिवाचें ॥ वदुं मी काय अतां वाचें ॥ रक्षिलें प्राण राघवाचे ॥ फळ त्याचें हें झालें ॥ २ ॥ सीता-शुद्धि करुनि आलों ॥ यशस्वी सर्वांमधिं झालों ॥ अतां या अकीर्तिनें न्हालों ॥ आंचवलों सर्वस्वा ॥ ३ ॥ सांगा गिरिवासी प्रभुराय ॥ केला असा काय अन्याय ॥ शेवटीं हाच निवडिला न्याय ॥ स्मरलों पाय कीं तुमचे ॥ ४ ॥

( सीता रत्नहार मारुतिला देऊं इच्छिते )

-साकी-

राजा जनकनें हार रतनका अमोल सीतामाईको ॥ दिया ब्याहा[3]में बहोत प्रेमसे पूछ पाछले भाईको ॥ १ ॥ वही हार ले आई सीता झट जा अपनें मंदरसे । कहो नाथ अब देऊं पूछत प्रसन्न कर दिल अंदरसे ॥ २ ॥ कहत राम तुम जानों अपना नहीं हमारा कछु हीला[4] ॥ वोह लेवेगा तुम देवोंगे कौन करेगा फिर गीला ॥ ३ ॥

---

१ भोग २ मोक्ष. ज्यांत स्वार्थ ना परमार्थ असें. ३ लग्नांत. ४ हरकत, तकरार.

पद. ( सीता मारुतीच्या चुटक्यांनीं रामाचें तोंड एकसारखें उघडलेलें पाहून घाबरून ह्मणते । )

—जलद त्रिताल—

आतां कैसें मी करूं काई ॥ धृ ॥ काय झालें एकाएकीं ॥ तोंड मिळेंनाचि कां कीं ॥ सीता उष्ण श्वास टाकी ॥ झाकीं पदरानें करुनि घाई ॥ १ ॥ रात्र झाली दिसे फार ॥ कोणा कळवूं समाचार ॥ कोण सांगेल विचार ॥ फार व्याकुळ होती गाई ॥ २ ॥ रामें खुणाविलें तिसी ॥ येथें आणि मारुतिसी ॥ कांगे व्यर्थ घाबरसी ॥ कशि मूढ तूं त्वरें जाई ॥ ३ ॥ येतां संकेतिलें त्याला ॥ बंदकेलें चुटकीला ॥ गिरिवासी संतोषला ॥ नाहीं लांगला वेळ कांहीं ॥ ४ ॥

# श्री रामास जनकानें बोलावून मेजवानी केलीं तें आख्यान.

## कथा-सारांश.

एकदां सर्व वानरसेनेसह श्रीरामचंद्रास जनकराजानें मेजवानीस बोलाविलें, जनकाचा फारच आग्रह पडल्यामुळें श्रीराम सर्व मंडळीसह मिथिलेस गेले. जनकानें त्यांची व्यवस्था उत्तम ठेविली. मेजवानीचे दिवशीं काढलेल्या पदार्थांत लोणचें होतें त्यांत भोंकरें होतीं. एका वानरानें भोंकरांत काय आहे तें पाहण्याकरितां एक भोकर दाबलें. त्यांतून भोकराची आठोळी उडाली ती उडाल्याबरोबर तो वानर-ही उडालाहि असें पाहून सर्व आपआपल्या शक्ति प्रमाणें उड्डाण करूं लागले अशी तेथे मोठी धांदल उडाली. अशी कथा ह्या आख्यानांत आहे.

---

## आर्या.

राज्याभिषेक सुदिनीं विधिनें साकेतिं रघुविरा जाला ।
तो प्रभु वस्त्राभरणें देउनिया बोळवीत राजाला ॥ १
प्रार्थी जनक तशांतचि रामप्रभुलागिं न्यावया धामीं ।
घ्यावे सुगल-बिभीषण होइन संतुष्ट यांत बहुधा मी ॥ ५ ॥
नाहीं मज ह्मणवेना तरि मी आहेचि संकटामाजीं ।
या साठीं प्रभुवर्यें मान्य करावीच विनवणी माजी ॥ ३
शंका असेल पोटीं सोडावें इतर वानरां काय ।
तरि नेणें सकळातें ह्मणणें कीशासिं वानरा काय
राम ह्मणे सत्यचि हें परि न दिसे यांत अर्थ हो कांहीं ।
मर्कट अविचारी बहु करितिल भलतेंचि कर्म हो कांहीं ॥ ५
मग संकट सकळांसाचि होइल दाटूनि कां असें करितां ।
धरितां आग्रह तरि कां सुगलमुखाचेंहि कान कां भरितां ॥ ६
जनक ह्मणे रामा या आपण तरि सर्वकाळ वागवितां ।
सोसना काय अह्मा यांना दिनमात्र एक भागवितां ॥ ७ ॥

---

१ विधिपूर्वक. २ सुग्रीव.

काय कठिण अपणासहि आहे पुष्पक विमान बैसाया ।
अवधी पुरे दिनत्रय मार्गीं नलगेचि एक पैसा या ॥ ८ ॥
प्रभुचा रुकार जाणुनि जनकहि तेथूनि जाय नगरासी ।
साहित्य मेळवी बहु वस्त्राभरणें अनेक नग-राशी ॥ ९ ॥
पाचारणासि येतां गेले बैसूनि पुष्पका-माजीं ।
जनक ह्मणे हो झाली आतां परिपूर्ण कामना माजी ॥ १० ॥
शिबिरें बहु उतराया दिधलीं सर्वांसी सारखीं धामें ।
दासी दास यथोचित करिती संपूर्ण लागलीं कामें ॥ ११ ॥
मंडपही बहु दिधले स्थित व्हाया वानरासि जनकानें ।
न पडो न्यून कदापी ऐकुनि ह्मणतील काय जन कानें ॥ १२ ॥
स्नानें करूनि बसले होते सारूनि नित्यनेमातें ।
सेवक कथिती जाउनि पाचारण वृत्त शीघ्र रामातें ॥ १३ ॥
सेवक जनकाचे ही प्रार्थिति येऊनि जानकीशातें ।
ह्मणती त्वरें चलावें घेऊनि सुगलादि सर्व कीशांतें ॥ १४ ॥
होउनि सिद्ध निघाले शिबिराहुनि राजमंदिरा जाया ।
वाद्येंहि लागलीं बहु जनक निदेशेंकरूनि वाजाया ॥ १५ ॥
पाहति जन त्या रामा ध्याय जयातें अखंड मदनारी ।
वानरवृंदीं निरखुनि मानिति आश्चर्य फार नरनारी ॥ १६ ॥
ग्रामद्वारापासुनि जे जे पथ मंदिराकडे होते ।
मृगमर्द-चंदन-केशर-मिश्र करुनि घातिले सडे हो ते ॥ १७ ॥
तरुणाम्रपल्लवें बहु मंडप विस्तीर्ण साधिले बरवे ।
सफलितरंभातरुचे खांबहि त्यांतूनि शोभती हिरवे ॥ १८ ॥
बहु-वर्ण रंगमाळा स्थळोंस्थळीं घातिल्या अती रुचिर ।
प्रेक्षक जन त्या भंवतें दृष्टी देऊनि पाहती सुचिर ॥ १९ ॥

---

१ दागिन्यांचें. २ गंज, समुदाय. ३ घरें ४ इच्छित. ५ सुग्रीवादीकरून. ६ वानरांतें. ७ आज्ञेनें. ८ मदनाचा शत्रु ह्म० महादेव. ९ जनकराजाचा वाडा. १० कस्तूरी. ११ आंब्याची कोंवळीं पानें. १२ फळां सहित केळीचें.

पुष्पें सुगंधिक बहू अणवुनि त्यांचे हि गुंफिले हार ।
द्रव्यें इतर तशीं निजगंधें करिती श्रमासि परिहार ॥ २० ॥
आले रघुनाथ निकट जाणविती वृत्त हेर जनकास ।
हडबड[1] महानसीं[2] बहु घालिति संपूर्ण सूदजन[3] कासें[4] ॥ २१ ॥
पंक्ती बहुत नरांच्या तैशा बहु बानरांचिया हारी ।
बैसाविल्या एकसरें करिती भोजन यथेच्छ नर हारी[5] ॥ २२ ॥
सीता–तारादि सकळ ज्या कां नर-वानर–स्त्रिया होत्या ।
त्यांच्याहि पंक्ति जनकें बैसविल्या करुनि वेगळ्या हो त्या ॥२३॥
वानरसमुही मोठा झाला तो कलकलाट जन कानें ।
ऐकुनि ह्मणती अणिलें प्रार्थुनि सदनासि विघ्न जनकानें ॥ २४ ॥
आहे काय पहाया पाठविले दूत शीघ्र राजानें ।
परि तें वर्म कळेना झाला उत्पन्न हा कलह ज्यानें ॥ २५ ॥
आयकिलें मग ऐसें सिंधुज[6]शाखेंत भोंकरें होतीं ।
निरखुनि एका कपिनें फोडुनिया पाहिलीं करें हो तीं ॥ २६ ॥
तेव्हां एकाएकीं आंठोळी ह्या फळा मधुनि वरती ।
उडतां कपिहि उडाला गेली त्याची उडीहि त्या वरती ॥ २७
दुसरा संनिध होता तोहि उडाला तसाचि तिसरा हो ।
या परि पुष्कळ उडती ह्मणती अन्याचिया गातिस राहो ॥ २८
रामासहि कळलें कीं वन्यांनीं जातिधर्म हा केला ॥
गेला ताळचि यांचा जनकाच्या मानिती न हाकेला ॥ २९
रामनिदेशें वानर बसले येऊनि स्वस्थळावर ते ।
करिती भोजनही परि बहुतांचें लक्ष त्या उडीवरतें ॥ ३०
भोजन झाल्यावरि मग दिधले तांबूल हार बहु गजरे ।
द्रव्यें तसीं सुगधिक वस्त्रें नग भूषणें बहू गर्जरें ॥ ३१

---

१ गडबड २ स्वयंपाक घरांत. ३ स्वयंपाकी. ४ कास घालिती. धोंतरें पचांग मारून नेसले. ५वानरें. ६ सिंधुज लोण सिंधुजशाख लोणशाख, लोणचें. ७वनांत राहणारीं–वानरें त्यांनीं. ८ मोठ्या थाटानें.

सीता तारादि सत्या वस्त्राभरणें करूनि तोषविल्या ।
सुमनांच्या माळा बहु परिमळ द्रव्यें तशाचि लोभविल्या ॥ ३२ ॥
गिरिवासीरामाचा केला सत्कार फार जनकानें ।
या चरित-श्रवणानें झालें होतिल पवित्र जन-कानें ॥ ३३ ॥

---

## याच आख्यानाचीं पदें.

### पद

दिंडी ( जनक ह्मणतो )

जनक बोले हो काय कठिण याचें । सतत वागवितां वृंद वानरांचे । वदो वदतिल तें सहन करूं साचें । नसे कारण हें सबळ निग्रहाचें ॥ १ ॥

पद. ( सीता रामचंद्रास विनविते. )

( मजला वरिल सुभद्रा काय ) जोगी.

सीता बहु विनवी रामा, द्या हो रुकार जनकासी ॥ धृ० ॥ भूषण यांत असें माझें ॥ पहातिल वैभव हें राजे ॥ पडले श्रम जरि या काजें ॥ येउं सांजें परतुनियां ॥ १ ॥ प्रार्थना व्यर्थचि जनकाची ॥ होइल अपकीर्ती साची ॥ प्रभो मम हेंचि मनीं जाची ॥ करा याची तोड बरी ॥ २ ॥ कठिण तरि यांत काय बोला ॥ मानितीं नरवानर बोला ॥ देतां व्यर्थचि कां झोला ॥ कोण तोला जनकाच्या ॥ ३ ॥ सुग्रिव अंगद हे सारे ॥ बिभीषण कशास येणारे ॥ सरमा तारा परभारें ॥ निजभारें जातिल कीं ॥ ४ ॥ सुचवितें गिरिवासी रामा ॥ योजा पुष्पक या कामा ॥ अपुल्या खर्च नसे दामा ॥ कां धामा नव जावें ॥ ५ ॥

---

१ समुदाय. २ निःश्चयाचें. ३ आक्षेप. ४ टाळा. ५ बरोबरीला. ६ बिभिषणाची स्त्री. ७ वाळीची नंतर सुग्रिवाची स्त्री. ८ सैन्यासह. ९ पैशाला.

झुलनी ( राम सीतेस ह्मणतात. )

( जलद घनाक्षरी )

कां तूं करिसि आग्रह फार ॥ काय न कळे तुज विचार ॥ मर्कट अपुलें अनिवार ॥ करितिल कांहिं चेष्टा, वदतिल भलतें श्रेष्टा ॥ केला अह्मिच अंगिकार ॥ १ ॥ कोण सोशिल वेढे चार ॥ अणतिल संकट वारंवार ॥ भीतों याजसाठिं नाहिं, दुसरी अंटी, कळवी याचा काय प्रकार ॥ २ ॥

पद ( सीता पुन्हा ह्मणते )

( नाथ कैसे गजसे फंद छुडाये या० चा० )

जनकघर चलिये तुम महाराज ॥ धृ० ॥ देस देसके भूपति आये फिर कहां ऐसे समाज ॥ १ ॥ सुगल बिभीखन माई सरमा ज्यावेंगे पलटहि आज ॥ २ ॥ एक दिन जावे[१] एक दिन आवे पुष्पक है इस काज ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु बिनती मानो भूपनके सरताज ॥ ४ ॥

साकी ( सुग्रीव सीतेस ह्मणतो )

माई सीता कहो रघुवरसे जनक धाम बतलावो ॥ इच्छा पूरन करो हमारी बारबार जतलावो ॥ १ ॥ एक दिन जावे एक दिन आवे एक दिन नगर दिखावें ॥ पुष्पक यान[३] बिभीखन माई सरमा साथ लिजावें ॥ २ ॥

कटिबंद ( रामाचें मिथिलेस स्वागत )

रघुबर जनकपूरमे आये ॥ गुढिया सौधं[४]सौधंपर पाये, तोरन हर मंदिर लटकाये, राहमे मंडप है डलवाये, पल्लव अम्र बृच्छके छाये, बाजू कदलीखंब गडाये, तापे मौजे गुच्छ लटकाये, शोभा सुमन हारकी भारी, चंदन मिश्र मुष्कं[६]तर तारी, खुषवो अगरबत्तिकी जारी, आवे महँक अबिरकी सारी, आरती हाथ

---

१ हरकत,अट. २ राजांचें डोक्या वरील मुकुट, ह्मणजे राजाधिराज. ३ वाहन. ४ सज्जे जिनें. ५ कळीचेघड. ६ कस्तूरी. ७ सुवास.

सुहागन नारी, लाँजा कुसुम हेममय झारी, लेले दवरी गौरिहारकी, तऱ्हा दिखाई, देखत रामरूप भुलआई, सबही देह गेह बिसराई, गोदमें बैठी सीता माई, सेना बंदरकी चलि आई, हांसत लोक करत नवेलाई, भई भीड तब खडी फौज हो रही राहपर बडी घूम, छडि-दार पुकारत, राह चलो अजराहत फांवत, बाह पकरकर राह दिखावत, आये निकट राज मंदरके, दवरे लोक सबहि अंदरके, ठाडे भये जनक दरवाजे, सुनाये तऱ्हे तऱ्हेके बाजे, सब राजे देस देसके आये, रघुनाथ जनक घर पोहोचे, सब नारीनर सुख पाये ॥ १ ॥

पद (अन जनकास ह्मणतात.)

(गर्ज्यानों कृष्णमंडी अपुला)

जाहलें जनकां काय कसें ॥ मानितो नर वानर सरिसे ॥ धृ० ॥ न मिळे पाला ज्यांस वनीं ॥ सदन्नें विविध तयां सदनीं ॥ घालितां नये ग्रास वदनीं ॥ प्रशंसा त्यांचीं बहुत जनीं ॥ करणें उचिताचि काय असें ॥ १ ॥ हिंडती नग्न वनामाजीं ॥ पितांबर कितिकांच्या मांजीं ॥ केशरी गंध उटी ताजी ॥ सुगंधिक वस्तु त्या समाजीं ॥ जनीं हें विपरित कां न दिसें ॥ २ ॥ नव्हतें दृष्ट श्रुतहि जनीं ॥ पाहतों अम्हीच तें नयनीं ॥ बसाया पाट रजतं—वर्णी ॥ कनकमय ताट तळीं अ णी ॥ प्रभू गिरिवासी कां न हसे ॥ ३ ॥

दिंडी (कपी मोकराचे आंठाळीस ह्मणतो)

कपी बोले काय गे किती उडसी ॥ उडी मारित तंव तूंचि मनीं कुडसी ॥ काय विक्रम दाविसी अम्हांलागीं ॥ पहा, उडवों मीं होय अतां जागी ॥ १ ॥

---

१ सुवासिनी, सौभाग्यवती. २ लाह्या. ३ कुंभें. ४ सोन्याच्या. ५ नवल, आश्चर्य. ६ धावले. ७ सद्+अन्नें. पक्कान्नें. उत्तमअन्न. ८ पितांबराच्या. प्रहारांनीं. ९ घरीं. १० कपरेस ११ सोन्याच्या रंगाचें. १२ सोन्याचें.

कटिबंध. ( भोजनाचे वेळचा थाट )

कीश नरांच्या पंक्ति बैसल्या, रांगोळ्या त्यां मधुनि घातिल्या, पाट बसाया ताट कांचनी, वाट्या दिधल्या, चटण्या कोशिंबिरी वाढिल्या, मग तिं रायतीं स्वादआयती, देती सर्षप नाकीं भरती ॥ सेवन केल्या रुची कायती, वर्णिल ज्याचा तोचि कायती, पालेभाजी बहु त्यामाजीं, घोळ चमकुरा मेथी ताजी, चरारीत फोडणि ही माजीं, पात्रस्थातें ह्मणती खा जी, वटक साजिरे बोंड गोजिरे, पंचामृत कढि तक्र आमटी, फुरके घेतां लागे गोमटी, पक्वान्नें बहु रुचिर वाढिलीं, मोतिचूर दळ जिलबि चांगली, पात्रीं ओदन-मूद घातली, वरान्नाची शोभा दिसली, पायस घृत शर्करा वोपिली, सांगाया मी मधीं विसरलों, शाखा बहु उपशाखा पाहुनि शाखांमृग चाखाया पाहती, राखाया धिर सन्मति कैचीं, एकानें भोकरें फोडिलीं, आंठोळी त्यांमधुनि उडाली, त्यानें जंव ती उडी मारिली, दुसऱ्याची मग त्यावर गेली, ऐसी केली होतां होतां लांब लांबली, मुख्य यूथपांमाजीं शिरली, रामाज्ञेनें कपी बैसले, जेवण झाल्या त्वरित पातले ॥ श्रीरामें निज आगमनें, जनकासीं बहु तोषवील ॥ १ ॥

झुलना. ( जन जनकास ह्मणतात ).

घनाक्षरी.

सुनो जनक महाराज ॥ भली बात नही आज ॥ इसी वानर के काज ॥ करे इलाज कोनसो ॥ १ ॥ करत सबही भुभुःकार ॥ कुदन लागे अनिवार ॥ कही बैठनको थार, नहि अधार बच रहे ॥ २ ॥ कहो कौन इन समान॥ कुदी मारे असमान ॥ रहे काहेको मकान फिर ठिकाण कहांसे ॥ ३ ॥

पद ( जनकाचा येथील बायका बोलतात. )

जलदत्रिताला

अतां न दिसे हो गती बरवी ॥ धृ० ॥ होत ताटीं बैसविलें ॥ नाहीं अझुनी जेविले ॥ नकळे कोणीं काय केलें ॥ गेले

---

१ वानर

कैसे कोण फिरवी ॥ १ कैसे बैसतील ताटीं ॥ कोण लागे यांच्या पाठीं ॥ काय मानिती हे हंठी ॥ तठिं पडले कोण विरवी ॥ २ ॥ सारे मोडितिल घरें ॥ वाटे पाडिती गोपुरें ॥ कोण म्हणे यासि पुरें ॥ उरे कैसी जनकपदवी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु धांव ॥ करि यांचा तूं उपाव ॥ अह्मां दिसेनाचि ठाव ॥ नांव रक्षुनी हेतें पुरवी ॥ ४ ॥

( जनकाच्या घरच्या बायका सीतेस ह्मणतात. )

अंजनीगीत.

पंक्ती वाढिल्या परिकर ॥ जेवीताती नारी नर ॥ कां हे उडाले वानर ॥ नकळे आह्मांसीं ॥ १ ॥ बाई तुमच्या घरची रीत ॥ ठावी नव्हती हो किंचित ॥ आज आली ही प्रचीत ॥ शोभतें तुह्मां ॥२॥ कैसे सांभाळितां यांसीं ॥ हे तरि असती बहु गुणराशी ॥ युक्ती तुमची तुह्मांपाशीं ॥ दंगचि आह्मि झालों ॥३॥

दिंडी. ( सीता ह्मणते. )

सीता बोले उपकार फार यांचे ॥ पति न दुखवीती कधीं यांस वाचें ॥ काय विक्रम ते सांगु मी तुह्मांसीं ॥ मला सोडविलें वधुनि राक्षसांसीं ॥ १ ॥ सुगल अंगद मारुती प्राण, नाथा ॥ म्हणुनि आवडती बहु प्राणनाथा ॥ अशीं विघ्नें सर्वहीं दूर केलीं ॥ काय नवलचि सोशिल्या अशा केली ॥ २ ॥ कोण शकती हें कर्म जन कराया ॥ इतर भेटविते काय जनकराया ॥ स्वामि आज्ञेनें क्षणें शांत होतीं ॥ पहा, अवलंबा तुह्मींशांति हो ती ॥३॥

दिंडी

जनकराया वाटलें चोज भारी ॥ वधुनि आले रावणा रावणारी ॥ साह्य केलें वानरीं युद्ध—कामा ॥ वनीं झाले वश

---

१ हट्टी. २ कट केला. ३ मोडील. ४ वेशी. ५ हेतू, इच्छा. ६ गोल, व्यवस्थित रीतीच्या ७ गुणी. ( ही व्याजोक्ति आहे. ) ८ वाणीनें, शब्दानें. ९ पराक्रम. १० स्वामीचे. ११ रामचंद्राला. १२ लीला.

कोपे त्वरित रामा ॥ १ ॥ मनुज, वानर, पाहतां भक्ष साचे ॥ कसे झाले त्या काळ राक्षसांचे ॥ बरें वधिलें ते धेनु विप्रतापी ॥ नसे रामासम जगीं या प्रतापी ॥ २ ॥

श्लोक.

जगीं सर्वही मानिती वैभवातें ॥ विपरीत कांता पुसेना धवातें ॥ सखे सोयरे आप्त सारे धनाचे ॥ पथीं लागती सर्वदा शोधनाचे ॥ १ ॥

---

१ गाई व ब्राह्मण यांना ताप देणारे. २ पत्नीका, मनभाका. ३ हुडकण्याचे.

# श्री रामचंद्रांनीं सीतेचें रूप घेतलें तें आख्यान.

## कथा–सारांश.

श्रीरामचंद्र व सीता अंतःपुरांत असतां रामाचें रूप घेऊन क्रीडा करावी असें सीतेचे मनांत आलें. तिनें आपली इच्छा श्रीरामास कळविली. त्यांनीं असें करणें चांगलें नाहीं वगैरे पुष्कळ सांगितलें. परंतु सीता ऐकेना. तेव्हां श्रीरामांनीं सीतेचें व सीतेनें रामाचें रूप घेऊन क्रीडा केली. प्रातःकाळीं हीं उभयतां निजलीं असतां वसिष्ठांनीं श्रीरामाचें ध्यान केलें, तेव्हां त्यांनां स्त्रीरूप दिसलें. नंतर ते हा काय प्रकार आहे म्हणून श्रीरामाचे दर्शना करितां आले. श्रीराम व सीता हे दोघेही फार लाजीत झालें अशी कथा या आख्यानांत आहे.

---

## आर्या.

असतां प्रभु साकेतीं सीतेसह केलिमंदिरामाजीं !
प्रार्थुनि पतिस म्हणें हो पुरवा इतुकीच वासना माजी ॥ १ ॥
प्रभुजी मद्रूप तुम्ही अवलंबुनि रामरूप मज द्या हो !
होईल अतिक्रम तरि अनुकंप्या मी, अवश्य मज द्या हो ॥ २ ॥
एकांतचि नसल्यावरि कैसें मज बोलवेल हो तेजें !
यामद्वयाचि पुरें, मग घ्यावें अन्योन्यरूप होतें जें ॥ ३ ॥
राम म्हणे आजि तुला झाला भ्रम काय गे प्रिये कळवी !
केवळ अनुचित कैसें वदसी जें सतत सद्यशा मळवी ॥ ४ ॥
गुरुजी वसिष्ट आधीं श्रवण करुनि क्षोभतील पावकसे !
जन निंदावाग्बाणें पडलें तर सोससील घाव कसे ॥ ५ ॥
हा छंद काय बरवा सीते सोडूनि दे अतांच कसी !
निंदास्पद झाल्यावरि चित्तीं अपुल्याचि तूं पहा चर्कसी ॥ ६ ॥

---

१ अयोध्येंत २ क्रीडा मंदिरांत ३ दया करण्यास योग्य ४ उद्धार. ५ तुमच्या तेजामुळें. ६ दोन प्रहर. ७ रामावतीक. ८ अमीचारकें. ९ फसीत होशील, फसशील.

सीता वदे 'प्रभुवरा आहे तरि कोण हो अशा जागीं !
पूर्ण न केल्या सहजाचि राहिल ही सर्वदा अशा जागी ' ॥ ७ ॥
' आग्रह भलता हि तरी वाटेना मोडणें मना नाट !
या साठीं सांग प्रिय अंतरिं होऊनिया बरी धीट' ॥ ८ ॥
' अन्योन्य-रूप घेउनि क्रीडावें अन्य कामना नाहीं !
आहे निवांत हें स्थळ प्रभुच्या येणार कां मनां नाहीं' ॥ ९ ॥
झाले सीता आपण दिधलें तिजलाहि रामरूप तसें !
क्रीडाति यथेच्छ बहुपरि नाकीं नथ प्रभुजिच्या हि रूपेतें ॥ १० ॥
सीतेसि हर्षभारी घेउनिया रामरूप जंव रमली !
गमली निशा पळ तसी [3]सार्द्धद्वययाम जरि असे क्रमली ॥ १ ॥
नाकीं नथ बहु साजे भाळीं कुंकुम शिरींहि [4]धंम्मिल तो !
मंदील जरिदुपेटा जोडा अनुरूप कां न संमिळतो ॥ १२ ॥
होउनि श्रांत उभयतां निजलीं एकाच मंचकावरती !
नयनीं निद्रा भरली होती आधींच काय सावरती ॥ १३ ॥
अरुणोदयींच गुरुजी साधुनि अजपाजपासि रामाचें !
करिती ध्यान तरी ये चित्तीं स्त्रीरूप जें न कामाचें ॥ १४ ॥
भांबावले गुरुहि मग ह्मणती ' विपरीत कां असें घडलें !
स्त्रीरूपचि ये ध्यानीं, अंतर तरि कोणतें असें पडलें' ॥ १५ ॥
यावरि कळलें गुरुला सीतेचें रूप रामचंद्रांनीं !
धरिलें, कोणींहि असें पूर्वी न कधींच इंद्र चंद्रांनीं ॥ १६ ॥
सुर्योदयीं प्रभुजिचें आले जंव पाहण्यासि वदन मुनी !
असती क्रीडास्थानीं कथिती सेवक विशंक पद नमुनी ॥ १७ ॥
' आले वसिष्ठ गुरुजी पाचारिति आपणासि रामा तें ॥
ह्मणती निद्रा कां बहु झाला वृत्तांत श्रुतकरा मातें' ॥ १८ ॥

---

१ अशा अतृप्त राहिल्यामुळें नेहमीं जागृत राहील. २ खुर लागली. ३ अडीच प्रहर. ४ वेणी. ५ जरीचा दुपट्टा. ६ शोभतो. ७ वसिष्ठ. ८ भावार्थ इंद्र चंद्र इत्यादि स्त्री लंपट आहेत तरी त्यांनींहि पूर्वी कधीं असें केलें नाहीं.

गडबडले राम बहू ह्मणती ' आतां कसें करावें गे ।
कथिलें परि नायकिलें नमन करायासि तूंचि जा वेगें ॥ १९ ॥
सुटला कंप शरीरीं प्रभुला नव्हतीच गोष्ट ही रुचली ।
' आणिला समय कठिण हा बुद्धी कोठूनि मज असी सुचली' ॥२०
' करिसी खेद वृथा कां वस्त्रें नग भूषणें हि घाल कसी ।
दृष्टी पडल्या स्पष्टचि ह्मणतिल नियमा विरुद्ध चाल कसी ' ॥२१॥
घेती अन्योन्य वचन तों गुरु आलेचि मंदिर–द्वारीं ।
वारि कोण तयातें दिसले प्रभु साजनेत्र तद्द्वारीं ॥ २२ ॥
' रामा चित्र गमें मज नयनीं अंजनीं किमर्थ हें कळवा ।
मळवाल सद्यशा कां शुद्ध तुह्मी संशयासि या पळवा' ॥ २३ ॥
ऐकुनि स्तब्धचि झाले कीं हे सर्वज्ञ सर्वशा साचे ।
तरि कळलेंचि असावें गुरुला हें वृत्त सव दासाचें ॥ २४ ॥
' रामा काय बरें हें अकीर्तिकर कोण हो तुह्मां शिकवी ।
लघुनरआचरणें या वर्णिल तरि कोण हो तुम्हासी कवी ॥ २५ ॥
गुरुजी ऐसे वदतां रामासहि तो सुबोधसा गमला ।
' पुरली स्पृहा सकळ कीं उरली सीते विशंक सांग मला' ॥२६॥
सीता लज्जित होउनि गेली सदनीं पुन्हा न ये मागें ।
ह्मणती राम यथास्थित झालें शासन पुन्हा नये मागें ॥ २६ ॥
यावरि सीतेसी बहु मृदुतर वचनें अंनद मय-केली ।
गिरिवासी प्रभुच्या या वर्णाव्या किति अनंद–मय केली ॥ २८ ॥

---

## याच आख्यानाचीं पदें.

श्लोक–सीता आपले मनांत विचार करिते.

सीताविचारी निजमानसांत ॥ केलें कधीं कोणि न माणसांत ॥
जरी असें हें अघटीत काप ॥ करीन, माझ्या वचनांत राम ॥ १ ॥

---

१ चालणारी २ डोळ्यांत काजळ घातलेले ( बायकांसारखे ) ३ लज्जा.

याऊपरी होइन राम साच ॥ स्त्री-वेष हाही प्रभुला द्यावा ॥ देईन, ऐसें स्वमनांत भावी ॥ परि कळेना अपमान भावी ॥ २ ॥

दिंडी.

मनीं सीतेच्या राम अपण व्हावें ॥ रामचंद्रांनीं मदिय रूप घ्यावें ॥ असें क्रीडावें अर्ध-निशा माजीं ॥ कधीं होइल ही पूर्ण आशा माझी ॥ १ ॥

-साकी-

सोच करे सीता मनमें अब राम रूप बन जाऊं ॥ आपहि राम बनेंगे सीता इसी तर्‍हें समजाऊं ॥ १ ॥

पद-( सीता रामचंद्रास ह्मणते. )

गड्यानो कृष्णगडी अपुला-या चालीवर

सीता विनवी रघुवीरा ॥लालसा माझी पूर्ण करा ॥ ध्रु० ॥ ऋतु हा कुसुमाकर आहे ॥ फुलल्या पुष्प-लता पाहे ॥ सुखकर मलयानिल वाहे ॥ चंद्रिका अतिशर धवलां हे ॥ समय हा वाटे सुखद बरा ॥ १ ॥ शोभा सदनाची भारी ॥ त्यांत या रत्न-दीप-हारी ॥ द्रव्यें सुगंधमय सारीं ॥ देती मोद मना सारी ॥ नसो या कामीं अळस जरा ॥ २ ॥ शय्या किति तरि मृदुला ही ॥ गुंफिल्या माळा कुसुमांहीं ॥ न दिसे इतर येथें कांहीं ॥ रमावें यथेच्छ या ठायीं । दासी दास नको तिसरा ॥ ३ ॥ व्हावें मज सम तुम्हि रामा ॥ द्यावें निजरुप मज रामा ॥ पुरउनि यामद्वय कामा ॥ सेवूं अपअपल्या नामा ॥ प्रभु गिरिवासी द्या असरा ॥ ४ ॥

( राम उत्तर देतात )

जलद घनाक्षरी

काय तुं वेडी झालिस आज ॥ कशि वाटेना तुला लाज ॥ नव्हे उचित असें काज ॥ कां गे हटावे धरिशी, कथिलें नायकसी

---

१ वसंत २ मलयपर्वतावरून येणारावारा. ३ चांदणें ४ शुभ्र, ५पलंग। ६चितां ७ही

असासि कोणाचि तूं भाज ॥ १ ॥ जन ह्मणतिल आला माज ॥ मनीं विटतिल गुरुराज ॥ कोणी कथिली बुद्धी, कशि गेली शुद्धी, अह्मां हसतिल जनकराज ॥ १ ॥

कटिबंध. ( पुन्हा सीता म्हणते )

श्रीरामें जनक–सुतेचा अति प्रेमें हेत पुरविला ॥ धृ० ॥ ऋतु कुसुमार प्रियकर भासे, चंद्र चंद्रिका धवल प्रकाशे, सुखदानिल मंजुळ वाहतसे, पुष्पलता तरु फुलले खासे, मोदविती बहुवार सुवासें, गुलाब चंपक बकुल मालती, गुलछवो गुलबहार शेंवती, अन्य लताही बहुविध असती, गुच्छ गुच्छ किति अच्छ शोभती, प्रतिक्षणीं बहु उत्सव देती, इंद्रोद्याना तुच्छ दाविती, फळ–भारें तरु नम्र जाहले, आम्र फणस दाळींब आवळे, नारिकेळ पोफळी जांभळे, मातुलिंग अंजीर चांगले, द्राक्षाचे बहु घोंस लोंबले, सरोवरीं अति दिव्य सारसें, जलमंदिर त्यांमधीं आरसे, रत्न दीप दिसताति फारसे, पाहतां लोचन होति गारसे, मृदुल सेज मंचकीं फुलांचीं, सुगंध द्रव्यें बहु मोलाचीं, निजगंधें तोषविती साची, चित्तीं माझ्या काम उदेला, तो प्रभुंनीं पाहिजे पुरविला, राम-रूप मज अगत्य द्यावें, स्वामींनीं मद्रूप धरावें, यामद्वय–पर्यंत रमावें, त्या नंतर मग निज–रूप ध्यावें, प्रभुनीं आग्रह जाणुनि सतिचा बोल अंगिकारिला, श्रीरामें जनक सुतेचा, ॥ १ ॥

दिंडी. ( राम लक्ष्मणास ह्मणतात. )

राम वदती लक्ष्मणा बैस द्वारीं ॥ असो कोणीही त्यांसि तूं निवारी ॥ नको सोडूं कवणासि गृहामाजीं ॥ असी तुजला, वागवी, शपथ माजी ॥ १ ॥

दिंडी ( लक्ष्मण हेरांस सांगतो )

कथी लक्ष्मण हेरांसि तुह्मी जागा ॥ अल्या कोणी प्रथमता

मला सांगा ॥ असा सावध या स्थळीं सर्व आतां ॥ करिन शिक्षा तिळमात्र उणें होतां ॥ १ ॥

लावणी ( दाघांनीं वेषांतर केल्याचें वर्णन )

रुप धरुनि सीतेचें रमले रामराय मंदिरीं ॥ वाटतें नवल बहू अंतरीं ॥ धृ० ॥ आग्रह बहु सीतेचा जाणुनि स्त्री-रुप अवलंबिलें ॥ निढळीं कुंकुम हि रेखिलें ॥ नाकीं नथ बहु साजे कंठीं रत्नहार शोभले ॥ मस्तकीं नग सुंदर गुंफिले ॥ बाजुबंद जडिताचें कंकण हतिं हतसर चांगले ॥ पांयीं पैजण ही घातले ॥ भरगच्ची पैठणी नारळी पदर रंग अंजिरी ॥ १ ॥ रामरूप शोभलें सतीनें शिरीं मंदिल बांधिला ॥ अंगरखा किनखापी घातिला ॥ लाल दुपेटा जरि बुट्यांच्या अंगावरते भला ॥ पितांबर कासेसहि चांगला ॥ कानिं चौघडा द्विजमोत्यांचा अति सुंदर वाटला ॥ कंठिनें कंठ बहू शोभला ॥ करिं मुद्रा मणगटीं हिऱ्याची पोंची अति साजिरी ॥ २ ॥ परस्परें क्रीडती दंपती नुपजें नवल कायसें ॥ केलें प्रथमचि त्यांनीं तसें ॥ शंका येथें ह्मणाल कळलें एकांतीचें कसें ॥ करीचें कंकण नयनीं दिसे ॥ पूर्ण मनोरथ होता सीता अनंद मानीतसे ॥ प्रभूचा विनोदही करितसे ॥ गिरिवासी प्रभु क्रीडा सरल्या निजले पलंगावरी ॥ ३ ॥

श्लोक– वसिष्ठ रामास ह्मणतात.

रामा मला एक असे अपेक्षा ॥ त्यावांचुनी सर्व जगीं उपेक्षा ॥ आयुष्य एक क्षण दे मला हो ॥ मिळेल कोठें तरि फार लाहो १॥

श्लोक-

केला शोध परंतु एक लवही आयुष्य कोणी न दे ॥ होता एक गलीत-कुष्टशरीरीं तो रामचंद्रा वदे ॥ देतो आयु यथार्थ

---

१ हातचें कंकण डोळ्यांनींच दिसते. त्याला पाहावयास आरसा नको.

आजि तुजला ही दिव्य काया करी ॥ झालें दिव्य शरीर, त्यावरि बहु तो जीविताशा धरी ॥ १ ॥

श्लोक—राम वसिष्ठास म्हणतात.

बोले वसिष्ठा-प्रति हेंचि जाण ॥ कोणी न दे आयु लव-प्रमाण ॥ झालें मला शासन आजि देवा ॥ करीन आतां तव पाद-सेवा ॥ १ ॥

पद—वसिष्ठ रामास ह्मणतात.

जोगी,

ह्मणती वसिष्ठ मुनि रामा, करणें अविहित कीं ॥ ध्रु० ॥ शिकवितां नयेचि कीं आतां ॥ तुह्मा-सम कोण दुजा ज्ञाता ॥ जगाच्या स्थिति रितिला पाहतां ॥ कां त्यजितां सन्मतिला ॥१॥ असती वडील पुसायासि ॥ कळल्या गति होइल कैसी ॥ वाटली ही चिंता मजासि ॥ आलों तुह्मासि कळवाया ॥ २ ॥ जरी हें नच वदलों रामा ॥ होइल प्रबलचि कीं रामा ॥ अंतर सहज इतर कामा ॥ ह्याचि आह्मां खेद बहू ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी मौन धरी ॥ ह्मणें ही वदतां गोष्ट खरी ॥ सहसा पुन्हा असें न करी ॥ ह्मणुनि धरी चरणातें ॥ ४ ॥

श्लोक— वसिष्ठ रामास म्हणतात.

गुरु वसिष्ठ ह्मणती प्रभु राघवा ॥ कर्म हें अखिल देइल लाघवा ॥ कवण तो शिकवी तुजला गती ॥ गतिवरार्थ तुझ्या पदिं लागती ॥ १ ॥ बापा तुला हें हित कां कळेना ॥ विचारही बुद्धिस आकळेना ॥ गेलें आयू येइल काय रामा ॥ देणार ऐसी तुज काय रामा ॥ २ ॥

---

१ स्त्री. २ लघुत्व, हलकेपणा. ३ श्रेष्ठगती प्राप्त व्हावी म्हणून.

# हनुमंत सीता शुद्धीस गेला तें आख्यान.

## आर्या.

सोडुनि महेंद्र गिरिला गेला हनुमंत सायकासारा[1] ।
थारा न घेचि कोठें त्याचा वृत्तांत आयका सारा ॥ १ ॥
लंका-पुर-प्रदेशीं भेटे मैराळ[2] गणपती देवी ।
ठेवी बोल ह्मणे कां सेवा अवलंबिली तुह्मी देवीं ॥ २ ॥
ते ह्मणती तुज ठावें देवां सकळांसि घातलें बंदीं ।
वंदी सुरनाथ सदा कीं तो रावण असे महाद्वंद्वी ॥ ३ ॥
सरला उपाय यास्तव आह्मीं सर्वत्र जाहलों दास ।
चुकतां कृत्य समर्पित[3] घेतो निर्दय करीं प्रतोदास[4] ॥ ४ ॥
बुडतों क्लेश—समुद्रीं दीना तारावयासि नौका हो ।
सीताहि दुःखिता बहु ह्मणते अझुनी नयेचि धव[5] कां हो ॥ ५ ॥
शिरला लंकेंत कपी[6] वेळ न करितांचि वात—रूपानें ।
नयनीं धुळ जनांच्या पाडी हलवूनि बहु तरू पानें ॥ ६ ॥
वेदाध्ययन घरोघरीं ऐके परि ते महा अदय पापी ।
निंदक हिंसक यास्तव वायुज त्यांतें मरा असें शापी ॥ ७ ॥
राक्षस सुरापि[7] सारे राक्षिति सदनींच अग्निहोत्रास ।
चित्तीं ह्मणे तुह्माला कां देईनाचि अग्नि हो त्रास ॥ ८ ॥
चर्चा वेदांताच्या, मारिति शोधूनि धेनु विप्रांसीं ।
माशिति[8] रक्तें घटघट भोती पाहूनि धेनु विप्रासी ॥ ९ ॥
ह्मणविति ब्रह्मज्ञानी आपण, जार स्त्रिया सकल असती[9] ।
बसती परसद्मीं त्या कीं त्यांच्या अंतरि सदा असती ॥ १० ॥
जाती नरयानीं[10] जन त्यांतें ढकलूनि वाहकां मारी ।
ह्मणती समय कठिण अजि संपवितो काय देह कौमारी ॥ ११ ॥

---

१ बाणासारखा २ मल्हार. ३ नेमलेलें ४ चाबुकास. ५ नवरा—राम. ६ हनुमंत. ७ दारूपिणारे. ८ दुष्ट. ९ आस—आशा, पर भोगाची. १० मनुष्यानीं वाहून नेण्याचीं वाहनें ह्म० पालखी, मेणा इ० येथुन मारुतीच्या कृत्याचें वर्णन सुरू झालें. ११ स्कंधावर घेणारास १२ रुद्र.

घेउनि पूर्णघट शिरीं जाती बहु अंगना स्वगेहास ।
पायीं लांगुलें[1] घालुनि पाडी तैं होय बहु जना हास ॥ १२ ॥
बाळें देत झुगारुनि गगनीं तरि कोण हो तया वारीं ।
पुरवासी लोकांतें गमला कल्पांत तो तया वारीं ॥ १३ ॥
गज रथ तुरंगमावरि जाती बैसूनि जे स्वगेहातें ।
त्यांतें अपटुनि मारी मुकती तत्काल कितिक देहातें ॥ १५ ॥
निजलीं दंपत्यें जीं एकांतीं नेसलीं न वसनांहीं ।
आणी देवद्वारीं कीं फेडा फेडिला नवस नाहीं ॥ १५ ॥
रत्नें भांडारींचीं पडतीं येऊनि राज-गैल्लीला ।
ह्मणती नगळेचि अम्हा कवणाची ही पिशाचवल्लीला ॥ १६ ॥
वस्त्रें हि फाडिलीं बहु दशाननाचीं क्षणांत कीं शंबरें ।
न कळे कां कवणासीं पीडितसे हें पिशाच कीं शव रें ॥ १७ ॥
बैसे श्मश्रु कराया नापितें भलतीं कडेचि क्षुरें फिरवी ।
फिरवी नयन तयावरि रोषें तन्मानसांत भय शिरवी ॥ १८ ॥
दाढी अर्ध मिशांसह नाहीं ऐसें दशादनीं पाहे ।
वाहे चिंतेसि बहू अंबरें शरिरीं न एक धड राहे ॥ १९ ॥
बाहूं तरि कवणा मी सांगू वृत्तांत काय हानीचा ।
बाणीचा मी असतां गमतो अजि समय काय हा नीचा ॥ २० ॥
रावण निज भृत्यांतें मारी हनुमंत रावणाला ही ।
गुप्तपणें बहुमर्दी रडवी तैशाही रावणालाही ॥ २१ ॥
यांतुप निज सदनातें गेला हनुमंतहि तया मागें ।
सांगे मंदोदरिला वृत्त असें वर्त्तलें न या मागें ॥ २२ ॥

---

१ स्त्रिया. २ शेपूट. ३ दिवशीं. ४ राजरस्ता. ५ पिशाचवत् ह्म० पिशाचाप्रमाणें लीला ह्म० खेळ. ६ वानरांचा स्वामी मारुति. ७ प्रेत. ८ हजामत. ९ हजाम. १० वस्तरा. ११ वस्त्र. १२ बोलावूं १३ हलका-अपमान कारक. १४ मर्दन ह्म० ताडन करितां झाला. १५ राक्षसांचास्वामी रावण.

चित्तीं ह्मणें मरुत्सुत जरिही सीता असेल तरि कां मी ।
आणूं व्यर्थ रघुविरा येथें आतां वधीन हा कामी ॥ २३ ॥
साध्वी पतिस ह्मणें हो द्यावी सीता नमूनि रामातें ।
यांतचि कल्याण पहा नसतां पावेल कुळ विरामातें[2] ॥ १४ ॥
दुःस्वप्न-दर्शनानें आहे चिंतेंत आजि बहुधा मी ।
दिसतें चिन्ह तसें मज होइल कल्पांत आजि बहु धामीं ॥ २५ ॥
क्षणदांचरी[3] बहुतशा धाडी सीतेसि वश करायातें ।
वधिल्या त्या हनुमंतें चित्तीं मानूनि मशकें रायांते ॥ २६ ॥
उरल्या दोघी सत्वर कथिती जाऊनि वृत्त हें राया ।
वानर एकचि परि त्या नाहीं कोणी समर्थ हेरा[6]या ॥ २७ ॥
मुद्रा दे; मग सांगे क्षेमसमाचार रामरायाचा ।
वधितों रिपुसि अतां मीं परि तो प्रभुच्या करीं मरायाचा ॥२८॥
माते दे खुण जातों अर्पिन प्रभुच्या करींच वळखाया ।
परि लागली क्षुधा बहु दे कांहीं कंद मूळ फळ खाया ॥ २९ ॥
सीता ह्मणें अरे बा जीं पडलीं तींच घे फळें रानीं ।
विध्वंसिलें सकल वन कथिलें रायासि वृत्त हेरांनीं[10] ॥ ३० ॥
चवदासहस्र राक्षस रक्षक होते वनासि जे राया ।
वधिले एका कपिनें धजलें कोणी न त्यास घेराया ॥ ३१ ॥
मेले रक्षक अवघे जंबूमाळीहि त्यात सांपडला ।
वधिला पादाघातें[12] भुमीवरता गिरि[13] तसा पडला ॥ ३२ ॥
ऐंशीसहस्र राक्षस वधिले जें कां आले धरायासी ।
अक्षयें त्यांत निमाला[15] वेळ न बहु लागला मरायासी ॥ ३३ ॥
पुच्छें बद्ध करुनियां अविलंबितें[16] अर्पि[17] तो समुद्रास ।
तिळहि उणा मज न गमें राया कल्पांत-काळ रुद्रास ॥ ३४ ॥

---

१ मारुति. २ नाश. ३ राक्षसस्त्रिया ४ माशी प्रमाणें क्षुल्लक. ५ राजा रावणाला. ६ पाहण्याला. ७ श्रीरामचंद्रानें ओळखण्याकरितां खुणे दाखल दिलेली आंगठी. ८ उपवन-बगीचा. ९ राजारावणास. १० दूतांनीं. ११ या नांवाचा राक्षस. १२ लत्ताप्रहारानें. १३ पर्वत. १४ अक्षय ( अखया ) नांवाचा. १५ मारला गेला. १६ सत्वर. १७ अर्पण करिता झाली.

इन्द्रजितांसहि जर्जर केलें त्या वानरें क्षणांमाजीं ।
पाहिल कोण तयातें राया वळलीच बोबडी माजी ॥ ३५ ॥
ऐसें कळतां रावण प्रार्थी जाऊनि ब्रह्मदेवास ।
दिधलें वरदान कसें ठायीं अपुल्या आह्मासि दे वास ॥ ३६ ॥
सांगे मरुत्सुतातें होई क्षणमात्र बद्ध बा पाशीं ।
आहेसि वज्रदेही याच्या भीणार तूं न बापासी ॥ ३७ ॥
नेला बांधुनि कपि तो तत्कालाचि रावणाचिया निकट ।
टपती मारायातें केला होता अधीं जयांनिं[2] कट[3] ॥ ३८ ॥
मारिति शस्त्रें वहुविध परि तीं सहसा न लागतीं हरिला[4] ।
थकले राक्षस अवघे ह्मणती येईल हा कसा हरिलां ॥ ३९ ॥
बोले लंकेश अरे आहे त्वन्मृत्यु वानरा कोठें ।
चित्तीं ह्मणें मरुत्सुत वस्त्राचे रिक्त[6] करवितों कोठे[7] ॥ ४० ॥
स्नेहें[8] स्निग्ध[9] करुनिया वस्त्रें वेष्टाल लांगुलीं[10] माज्या ।
दीप्तानलेंचि[11] मृत्यू होइल रात्रिंचराचिया[12] राजा ॥ ४१ ॥
सरलीं वस्त्रें अवघीं तरि लांगुल राहिलें असेच रितें[13] ।
अणवा चीरं[14] सितेचें ह्मणतां तत्काल आवरी हरि[15] तें ॥ ४२ ॥
पुच्छ न पेटे ह्मणउनि स्वमुखें लंकेश फुंकिता जाला ।
झाला श्मश्रुविहिन[16] तो उठतां पुच्छाग्निच्या महा·ज्वाला ॥ ४
लंकातृतीयभागा दग्ध करूनि वानरेश गेला हो ।
पुच्छानल[17] सिंधु[18]–जळीं विझवुनि प्रभुदर्शनेंहि[19] घे लाहो ॥ ४४ ।
गिरिवासी रामाच्या पदपद्मीं मारुति भ्रमर जाला ।
होतिल कृतार्थ जनही घडतें तच्चरित हें श्रवण ज्याला ॥ ४५ ॥

---

१ रावणाचा पुत्र इंद्रजीत. २ ज्यानीं. ३ एकमत. ४ वानराला. ५ पराभव. ६ रिकामें. ७ भांडारें. ८ तेलानें. ९ भिजवलेलें. १० शेंपटांस. ११ प्रदीप्त अग्नीनें पेटविल्यानें. १२ राक्षसांच्या १३ शिलक १४ वस्त्र. १५ वानर. १६ दाढ्या मिशा विरहित, कारण त्या जळून गेल्या. १७ शेंपटास लागलेला अग्नि. १८ समुद्राच्या उदकांत. १९ श्रीरामाच्यादर्शनानें.

## याच आख्यानाचीं पदें.

पद ( हनुमंत मल्लारीस ह्मणतो. )

गडयानो कृष्णगडी अपुला-या चालीवर

त्यजिलें कां हो प्रेमपुरा[1] ॥ हिंडतां घेउनि कां मुकुरा[2] ॥धृ०॥ ह्मणावें तुह्मासि काय कसें ॥ भीतां कां हो क्षुल्लकसे ॥ होइल जनांत फार हसें ॥ करितो रावण काय असें ॥ जिरवा याचा गर्व जरा ॥ १ ॥ वधिले दैत्य प्रबळ मोठे ॥ गेला विक्रम तो कोठें ॥ सदनीं वस्त्रांचे कोठे ॥ शिरीं कां मळकट पागोटें ॥ आहे तरि विचार काय खरा ॥ २ ॥ तुमची लहान काय कोटी[3] ॥ असती भृत्य सप्तकोटी ॥ वाटती हळहळ ही मोठी ॥ मिळेना काय भरितें[4] रोठी ॥ कांहि तरि ईर्षा जीविं धरा ॥ ३ ॥ तुमचा धाक जनांवरतां ॥ असें कां घरोघरीं फिरतां ॥ धोकटी[5] किमर्थ वागवितां ॥ कशास्तव मनीं अपुल्या झुरतां ॥ अतां तरि जा अपुल्या नगरा ॥ ४ ॥ ऐकिलें तुवां सकल कानें ॥ पुससी विनोद-भावानें ॥ रावण मस्त दुर्मदानें ॥ रडती सुरवर नांवानें ॥ करि गिरिवासी प्रभुसि त्वरा ॥ ५ ॥

दिंडी. ( गणपतीस ह्मणतो )

कशी वाटेना लाज गणराया ॥ त्यजुनि वैभव रक्षितां कां खरा[5] या ॥ असें संकट तरि काय तुह्मां मोठें ॥ विघ्ननाशन बुडविलें नांव कोठें ॥ १ ॥

साकी-( मारुति देवीस ह्मणतो )

अइ जगदंबे विश्वकदंबे सेवा रुचली कां याची ॥ वधिले दैत्य तुवां बहु मोठे भीसी कां मग वायाची ॥ १ ॥

---

१ मैलार. २ आरसा. ३ शौर्य, सामर्थ्य. ४ वांग्याचेंभरित खंडोबाला प्रिय असतें त्याला उद्देशून हें आहे: ५ न्हाण्याची धोपटी. खंडोबा रावणाचे घरी न्हावी होते. ५ गाढवाला. रावणानें गणपतीला गाढवें राखण्याचें काम दिलें होतें.

कटिबंध–( देवी मारुतीला देवांची स्थिती सांगते. )

बासव निशिदिन हार बनावे ॥ ब्रह्मा ले पंचांग सुनावे ॥ पावक[२] नित उठ बसन धो लावे ॥ जाय प्रभंजन[३] अजिर[४] झडावे ॥ बरुण समार्जन, जल भर लावे ॥ सुरज निशामें दीप जलावे ॥ शशांक शिरपर छत्र धरावे ॥ गनेस रासभ[६]समुह चरावे ॥ मल्लारी नित सिस मुंडावे ॥ मुकुर[७] दिखावे ॥ नारद तुंबरु गान करे ॥ नित बासर वाक्पति[८] मौन धरे ॥ सब देव उसीको देख डरे ॥ कुबेर संपत होगइ चंपत[९], कंपत नाहि दिल, दंपतमें नित भेद करे ॥ सब लोकपाल हात जोर खरे ॥ मस्त भया, कभु अस्त नहीं, नित दस्त[१०] दराजी, तीन लोकमें गस्त करे, सब बस्त[११] मानकर खस्त[१२] किया है, नहि कोई वाली ॥ खाली त्रास देत है भारी ॥ सारी रैन[१३] करूं रखवाली ॥ काली[१४] होकर पांव परत हुं ॥ रामचंद्रसे कहो जाय कर, छुडाव, हमको सबको जेर किया इसखातर ॥ कातर[१५] होकर बैठ रहे दुख भारी ॥ जब लावो रघुनंदनको होवेगी छूट[१६] हमारी ॥ १ ॥

दिंडी—( मारुती बोलतो. )

जरी झाला बहुतसा तुह्मां ताप ॥ पहा रामाचा तयावरि प्रताप ॥ सकल लंकेची करिन आज होळी ॥ अतां देतों अक्षता अग्नि भाळी ॥१॥ इतर कृत्यें ही पहा करिन कैसीं ॥ कधीं दृष्ट[१७]-श्रुत जनांमधिं न ऐसीं ॥ सकल मोडिन अजि माज रावणाचा ॥ तरिच माना हा पोर्त[१८] अंजनीचा ॥ २ ॥

श्लोक–( राक्षसांची स्थिति )

करीती जप ध्यान, रुद्राक्ष माळा ॥ गळा घालिती, लाविती भस्म भाळा । वरी मैंद[१९]से बोलती आर्द्र[२०]वाचा ॥ परी अंतरीं लेश नाहीं

---

१ इंद्र २ अग्नि. ३ वायू ४ अंगण ५ वरुण ६ गाढवें. ७ आरसा. ८ बृहस्पति. ९ नाहींशी. १० हात पसरणें ११बोकड समजून. १२ कत्तल. १३ रात्र १४ काली-होकर+देवीअसून. १५ भित्रे. १६ सुटका. १७ पाहिलें ऐकिलें. १८ पुत्र. १९ दांभि-कासारखे. २० भक्तीच्या जिव्हाळ्यानें युक्त अशी.

द्रवाचा ॥ १ ॥ पहा लिप्त नाहींच आत्मा कशाला ॥ कसे बाधती इंद्रिय स्पर्श त्याला । असी मुक्तता आपुली दाखवीती ॥ परी नित्यशा पातकें लाख वीती ॥ २ ॥

पद–( पुरवासी लोक ह्मणतात. )

जोगी.

शंभो पाव अह्मा दीना, श्रमलों आजि बहू ॥ धृ० ॥ सरलें अयुष्य अमुचें काय ॥ घडला काय असा अन्याय ॥ वंदितो नित्य अह्मीं तव पाय ॥ दावि उपाय तूंचि अतां ॥ १ ॥ जाहला पुरींत हलकल्लोळ ॥ उठती दुःखाचे कल्लोळ ॥ वाटे बुडेल पृथ्वीगोळ ॥ सरेल घोळ हा केव्हां ॥२॥ कळेना कवणासचि कांहीं ॥ नयनां गोचर ही नाहीं ॥ गमतो कल्पांतचि पाही ॥ त्राहि पाही बा सदया ॥ ३ ॥ प्रभो गिरिवासी शंभो धांव ॥ लपाया नाहींच कोठें ठाव ॥ साधिला न कळे कोणी डाव ॥ आहे भाव तव चरणीं ॥ ४ ॥

( मारुतीनें त्रेधा उडविल्यामुळें दंपत्यें बोलतात )

अंजनीगीत.

जावें येथुनि कैसें तरी ॥ बद्धाचि केलें पलंगावरी ॥ नसुचे युक्ती आह्मां बरी ॥ संकट बहु मोठें ॥१॥ निजलों होतों अपुल्या घरीं॥ आलों येथें कवण्यापरी ॥ होइल कैशी गति यावरी ॥ नकळे आह्मांसी ॥ २ ॥ पाहातां आम्हीं दिगंबर ॥ शरीरीं नाहींच कीं अंबर ॥ कैसे कोसळलें अंबर ॥ धांव विभो सांबा ॥ ३ ॥ जाती येती जन हे किती ॥ लज्जा वाटे आह्मांप्रती ॥ यास्तव झाली कुंठित मती ॥ सुचेचिना कांहीं ॥ ४ ॥ आतां काय करावें याला ॥ गृहकृत्यांला उशीर झाला ॥ येथें विनवावें कवणाला ॥ सोडवितो कोण ॥ ५ ॥

---

१ उत्पन्न करितात. २ डोळ्याला दिसतही नाहीं. ३ नग्न. ४ वस्त्र. ५ आकाश.

झुलना

सुनों रावनकी मात ॥ करे चिंता दिनरात ॥ रिपू आवे नहि हात ॥ मारे लात भृत्यंको ॥ १ ॥

पद मंदोदरी ह्मणते.

( यज्यानो कृष्णगडी अपुला. )

साध्वी बोले पतिराया ॥ आणिलें सीतेसी वांया ॥ धृ ॥ आजिचा दिवस मात्र क्रमला ॥ पडलें दुर्घट स्वप्न मला ॥ वानरें कल्पांतचि केला ॥ जाळिलें समग्र लंकेला ॥ निमाला सुत अपुला अखया ॥ १ ॥ जाइल कुळ ही विलयांसी ॥ होतिल दुःखाच्या राशी ॥ गमतें हेंचि उचित मजसी॥ द्यावी सीता रामासी ॥ वंदुनि सद्भावें पायां ॥ २ ॥ कारितां वेळ आतां कां जी ॥ विनवणी ऐका ही माझी ॥ प्रभुची दयालुता ताजी ॥ होईल यांतति तो राजी ॥ करिल तो सहज अमर काया ॥ ३ ॥ आमुचे नरवानरखाणें ॥ त्याचें किति गाशिल गाणें ॥ माझें वर्म मीच जाणें ॥ मुकतिल क्षणांत प्राणानें ॥ करिल गिरिवासी सांब दया ॥ ४ ॥

श्लोक.

तमिस्रांचरी गांजिती जानकीतें । नसे वैभवा या तुला जाण की तें ॥ धरीतो मनोहार रूपें सदा गे । स्त्रिया सुंदरा मोहती कार्म-दागें ॥ १ ॥ तुझें हीत तूंतें कसें आकळेना । वृथा प्राण जातील हें कां कळेना। भजे भीति सोडूनि लंकापतीला । अशा शब्दबाणें सुटे कांप तीला ॥ २ ॥

पृथ्वी छंद ( मारुति ह्मणतो )

मनीं हळहळे बहू कठिण वेळ त्या वाटली । ह्मणे वधिन यातुपा प्रबळंता नसे आटली ॥ परंतु चुकलों बहू रिपुवधार्थ आज्ञा नसे । कळूनि घडलें पहा सकळ कर्म अज्ञानसें ॥ १ ॥

---

१ सेवकाला. २ मेळ. ३ लयाला शेवटाला. ४ राशी, ढीग. ५ खुण. ६ राक्षसी. ७ ओढी. ८ मदनव्यथेनें. ९ राक्षसांना १० बळ. ११ अज्ञानाप्रारखें.

पद-( सीता सांगते. ) दिपचंदी

अगे बाइ सांगु मि काय तुला ॥ धृ ॥ कांचनमय मृग पाहुनि भुललें, वाटे सत्य मला ॥ १ ॥ देवर लक्ष्मण निष्ठुर वचनें, अंतारिं दुखवीला ॥ २ ॥ रावण मेला कपटें आला, घेउनिया मजला ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभू राम दयाघन, सहजचि अंतरला ॥ ४ ॥

पद ( सीता मुद्रेस ह्मणते. )

जोगी

मुद्रे कां त्यजिलें रामा, उचित हें काय तुला ॥ धृ ॥ असें कीं सुखी राम राजा ॥ देवर लक्ष्मणही माझा ॥ येथें अलिस कोण काजा ॥ हें वोजा मज कळवी ॥ १ ॥ अणिला निरोप सखये काय ॥ कथिलें रामांनीं तुज काय ॥ अठवितें नित्य मीं त्याचे पाय ॥ स्मरतो काय राम मला ॥ २ ॥ सांग तें मुद्रे अवधारी ॥ जाहले कष्ट मला भारी ॥ प्रभुविण कोण दुजा वारी[2] ॥ काधिं मारील या रिपुला[3] ॥ ३ ॥ काढी चित्तांतील अनमान[4] ॥ होती व्याकुळ माझे प्राण ॥ प्रभु गिरिवासीकथामृतपान[5] ॥ करवी[6] त्राण मज आतां ॥ ४ ॥

श्लोक

उतरला तरुच्या जरि खालता । तरि न वाजवि पाउल चालतां ॥ करुनि वंदन जानकिला हरी[7] । सकल संशय तो मनिंचा हरी[8] ॥ १ ॥

साकी

चूडामणि देउनिया सांगे सत्वर आणी रघुनाथा । रावण मारुनि न्यावें मजला झाली अजवर बहुत व्यथा ॥ १ ॥

---

१ ऐक. २ निवारण करील ३ शत्रुला. ४ शंका. ५ कथा+अमृत. ६ सेवन करीव ७ वानर. ८ दूरकरी. ९ कंकण

वन मोडले ह्मणून भृत्य रावणास सांगतात

घनाक्षरी

वडा बाग मजेदार ॥ ज्यामें फूलोंके बहार ॥ किया लंगुरनें पार ॥ नही थार बैठनें ॥ १ ॥ सबहि मेवेके झार ॥ बडे अंगुर खुबिदार ॥ किया लंगुरनें पार ॥ नाहि अधार छूपने ॥ २ ॥ डुबा मंदरका खोज ॥ किये सबही जमींदोज ॥ आप बैठे उस रोज ॥ नहीं खोज हौजका ॥ ३ ॥

साकी

इंद्रजीतके बुरे हाल है नहि बानर वह, काल दुजा । क्या कहे महाराजा ऐसा नहि है कोई बज्रभुजा ॥ १ ॥

ब्रह्मदेव मारुतीला ह्मणतात.

श्लोक-

भीतोसि कां तुं वद यांतुपांसी । हो बद्ध याच्या क्षणमात्र पाशीं ॥ साधूनि घे तूं निजकार्य बा रे । तों बैस येथें धरुनी दबारे ॥ १ ॥

मारुति मनांत विचार करतो,

दिंडी.

मरण अपुलें मी काय सांगु यांसी । सत्य बोलावें सत्यवादि यांसी ॥ नसे कल्पांता विना मृत्यु पाही । अनृत वदतां पापियां दोष नाहीं ॥ १ ॥

अंजनीगीत

( ग्रामवासी जन बोलतात )

सरल्या चिंध्या वस्त्रें जीर्ण ॥ नुतन गुंडाळिलीं तूर्ण ॥ तरि होईना लांगुल पूर्ण ॥ वाटे नवलाव ॥१॥ अटलीं वस्त्रें नूतन जुनी ॥

---

१ वानर २ पत्ता, मागमूसां ३ जमीनदोस्त ४ हौदांचा- ५ वज्राप्रमाणें ज्याचे बाहू आहेत असा- ६ राक्षस. ७ तोंपर्यंत, ८ खोटें बोलले असतां ९ लवकर.

अणिली ग्रामांतील धुंडुनी ॥ तींही पाहीलीं गुंडुनी ॥ तरि बाल रीतें ॥२॥ वसनें वेटाळिलीं पुच्छा॥ तरि नच पवतीं लांगुलगुच्छा॥ करिती रावणाची कुत्सा[2] ॥ पुरवासी लोक॥३॥ ह्मणती अमुचें अंतर भग्न[3] ॥ केले आह्मां सकळां नग्न ॥ लागो याच्या पुरिला अग्न ॥ श्रमवीलें भारी ॥ ५ ॥

मारुती अग्नीला ह्मणतो,

साकी.

वायू[4]—सख तूं पुत्र तुझा हा रक्षी यातें या काळीं । लंकेमाजीं शिरतां यानें दिधली अक्षत तंव भाळीं ॥ १ ॥

---

१वीतिभर २ निंदा ३ विदारण. ४ वाऱ्याचा मित्र अग्नि

# भीष्मांनीं निःपांडवी पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा केली तें प्रकरण.

## आर्या.

कुरुप[1] ह्मणे गांगेया[2] झालें नव दिवस आजि समरा हो ॥
हें मी प्रथमचि वदलों इकडे तिकडेंहि चित्त सम राहो ॥ १ ॥
शमले मद्बंधु बहू एकहि माद्रीपृथासुत न शमला ॥
गमला संशय यास्तव अजवरि जय प्राप्तिचा न लेश मला ॥ २ ॥
सेनापतित्व दिधलें समरीं रक्षाल सर्वदा मातें ॥
द्रव्यहि समर्पिलें बहु कीं वश होतात सर्व दामांतें[3] ॥ ३ ॥
राया आजिंक्य पांडव वर्म तुला हें अधीं च म्यां कथिलें ॥
समता होईल कैशी केली रजतासवें[4] जरी कथिलें ॥ ४ ॥
परि नायकिलेंचि तुवां आतां बोलूनि अर्थही नाहीं ॥
जय पाक्षिक ह्मणसीतरि मिळवावा कोंवि[5] दैवही नाहीं ॥ ५ ॥
कथितों हेचि अतां मी करीन निःपांडवी उद्यां धरणी ॥
अथवा मरेन समरीं लक्षित असतां समस्त योध रणीं ॥ ६ ॥
हेरमुखें आयकिली करीन निःपांडवी अशी वाणी ॥
बंधूसह धर्मातें कृष्णास हि लागली असी-वाणी[6] ॥ ७ ॥
देव ह्मणे बहु आतां वेळ नको पांडवा मरायासी ॥
तरुणाहुनि बळकट कीं कोण सुधी जन ह्मणे जरा[7] यासी ॥ ८ ॥
दिसतें संकट मोठें योजावें कोणत्या उपायासी ॥
अंगी शूरत्व कसें होतील हे योग्य तरि लपायासी ॥ ९ ॥
देवव्रतें[8] प्रतिज्ञा केली होईल काय हो लटकी ॥
आहे कोण असा क्षम टाळाया पिंडवाचिया कटकीं[9] ॥ १० ॥

---

१ दुर्योधन २ भीष्मा ३ पैशाला. ४ चांदी ५ योद्ध. ६ तरवारीप्रमाणें तीक्ष्ण. ७ म्हातारपण. ८ भीष्मानें, ९ सैन्य ांत.

भीष्मादिकही जेव्हां सिद्धचि झाले तुम्हासि माराया ॥
तरि मग येथुनि आतां झाली युद्धाचि या सिमा राया ॥ ११ ॥
पांडव ह्मणती देवा या शरिराचें रणांत हो कांहीं ॥
परि द्रौपदिचा पुरला नाहीं अद्यापि हेत हो कांहीं ॥ १२ ॥
यदुप[1] म्हणे स्वस्थ असा सुचली युक्ती करूनिया पाहूं ॥
द्रौपदीला भीष्माच्या चरणीं नेऊनि एकदां वाहूं ॥ १३ ॥
भीष्में अभय दिल्यावरि होइल कल्याण हें मला कळतें ॥
सर्वा साधूचें मन परिसुनि धर्मा श्रमासि कळकळतें ॥ १४ ॥
ऐसें वदोन हरि तो झाला तत्काल भृत्यसाच[2] गडी ॥
स्कंधीं वाहूनि तिला गेला बांधूनि फाटकी पगडी ॥ १५ ॥
उतरी शिबिर-द्वारीं निशिथीं[3] नेऊनि द्रौपदी सतिला ॥
पाहुनि रक्षक ह्मणती नाहीं प्रतिबंध यास्थळीं सतिला ॥ १६ ॥
परि हा सेवक ह्मणती नाहीं आज्ञा नसेचि त्या जा या ॥
बाई[4] वेळ नका करुं नमन कराया तुह्मीच हो जया ॥ १७ ॥
द्वारीं स्थापुनि हरिला गेली भिष्माकडे नमायास ॥
पार्थी मृदुतर वचनें कोप तयाचा मनीं शमायास ॥ १८ ॥
द्यावें पतिदान मला यावांचुनि अन्य कामना[5] नाहीं ॥
हितकर साधुजनातें तुमच्या येणार कां मना नाहीं ॥ १९ ॥
बाई एकाकी तूं कैशी आलीस सत्य सांग मला ॥
हरिविण गति कवणातें नाहीं, संशय अशामुळें गमला ॥ २० ॥
कथितां सत्य हरीच्या होइन क्षोभासि पात्र बहुधा मी ॥
भीतें याच्याहि तशी झालें लोभासि पात्र बहु धामीं ॥ २१ ॥
रोष हरीचाचि बरा नबरा यांचा असें मला कळतें ॥
साधो कार्य कसें तरि कळतां कारितील घात हो खळ ते ॥२२ ॥
वदली विनीतवचनें यदुवीरें आणिलें निशंक मला ॥
आहे द्वारींच उभा ध्वांतीं[6] मजकारणें बहू श्रमला ॥ २३ ॥

---

१ कृष्ण २ नौकरासारखा ३ मध्यरात्रीं ४ बायकांना ५ इच्छा ६ अंधारांत

श्रवणीं पडतांचि असें आले दोघे तसेचि बाहेर ॥
बाई दावी कोठं निजभक्तांचें अखंड माहेर ॥ २४ ॥
ध्वांतीं न दिसे यास्तव धुंडिति तरि त्या हरी न तो गवसे ॥
नवसेंहि सांपडेना पांडवसदनीं दयानंदीन वसे ॥ २५ ॥
पाहिल अंत कसा हो सद्भक्तचि ते, हरीहिं सांपडला ॥
पडला गळांचि मग तो, होता क्षणमात्र मात्र जो दडला ॥ २६ ॥
कृष्णेनें बळवीला होता, हरिनेंहि हेतु कळवीला ॥
पळवीला शोक तिचा शुभ वर-दानें अनर्थ टळवीला ॥ २७ ॥
चालक विश्वासि हरी तरि निजदासासि देतसे मान ॥
तो तुज अनुकूल सदा विन्मुख नाहींच गे असें मान ॥ २८ ॥
कथिलें धर्मासि जसें त्यानेंही त्यासमान वागावें ॥
रक्षक हरीच आहे याहुनि तुज अभय काय सांगावें ॥ २९ ॥
नाहीं भय मजपासुनि चित्तीं आणूं नकोचि भीतिला ॥
कां हरि उपेक्षिल तुह्मां त्यजिलें नाहीं कधींच नीतीला ॥ ३० ॥
यापरि अभय दिल्यावरि आली तत्काल अपुल्या शिबिरा ॥
गिरिवासी प्रभु रक्षक आहे विश्वास आपुल्यासि बरा ॥ ३१ ॥

---

१ अंधारांत २ दयासागर ३ समज.

# गोपींच्या गाऱ्हाणीं

## आर्या.

श्रीहरि गोप मुलांसह घालितसे नित्य गोरसा घाला ।
यास्तव गोपी साऱ्या ह्मणती बांधूनि चोरसा, घाला ॥ १ ॥
परि सांपडे न ही तो गाऱ्हाणें सांगती यशोमतिला[३] ।
"बाई थकलों आम्हीं वळवी तूं निजसुताचिया मतिला" ॥ २ ॥
सरसावली[४] कथाया गाऱ्हाणें गोपि सर्व आयकती ।
सांगूं काय यशोदे कृत्यें सारींच नवल-दायक तीं ॥ ३ ॥
करितो कर्म असें हा निजलीं बाळें धरूनि उठवीतो ।
आपण गोरस भक्षुनि गोपमुलांच्या करींहि लुटवीतो ॥ ४ ॥
पाट रचुनि पाटांवरि तिवई त्यावरि गड्यासि चढवीतो ।
आपण खाय, मुलांतें "स्वस्थपणें खा" असेंहि पढवीतो ॥ ५ ॥
वाहक[६] श्रीकृष्णाचा गोरस न मिळे ह्मणूनि वर पाहे ।
दहिं दुध पुष्कळसें दे सांगे इतरां ' तुह्मीहि वरपा हें ॥ ६ ॥
पुसतो गर्भवतीला ' कां झालें उदर सांग गे मोठें' ।
तथ्यहि कथिलें तरि हा लाउनि बघतो उरस्थळीं बोटें ॥ ७ ॥
'ह्मणती गर्भ कशाला' 'कृष्णा उदरांत या असे बाळ' ।
'गेलें कवण्या द्वारें, दावी मज' ह्मणुनि घेतसे आळ ॥ ८ ॥
झिडकारितां न राहे काय करावें अशा अगुणपात्रा ।
चालेल काय बाई इतरांची सांग या पुढें मात्रा ॥ ९ ॥

---

१ डाका, लूट, चोरी. २ चोरासारखा बांधून टाका. ३ यशोदेला. ४ एक गोपी गाऱ्हाणें सांगण्यांस पुढें आली. ५ आश्चर्यकारक. ६ श्रीकृष्णाचा शिक्याला हात पुरावा ह्मणुन त्याला खांद्यावर घेणारा. ७ सेवन करा. ८ हट्ट. ९ दुर्गुणी मुलास

ह्मणतो वयस्क [1]मुलिला ' हृदयावरि हें गलांडयुग दिसतें ।
भे[2]षज कां न करिसि तूं सांग मला कितिक जाहले दिस[3]ते?॥१०॥
किंवा व्यथा न करिती कळवी यांतील वर्म तें काय' ।
उत्तर काय वदावें सां[4]गें दया करुनि वंदितें पाय ॥ ११ ॥
शिरला गोपीच्या गृहिं वत्सें सोडूनि काननां लावी ॥
गोरस मट मट भक्षुनि जाय सुनेच्याहि आननां[5] लावी ॥ १२ ॥
कळवी सासूस तिच्या आहे भक्षीत गोरसा सून ॥
जा सत्वर सदनातें निजहित लक्षील कोण सासू न ॥ १३ ॥
रागें भरे ह्मणे तूं नष्टे खातेस नित्य नवनीता[6] ॥
आह्मीं ह्मणतों कृष्णाचि खातो येऊनि नित्य, न वनीतां ॥ १४ ॥
तिहि वदे मामीसे कृष्णें नवनीत माझिया वदनीं ॥
सारविलें सत्यचि हें नव्हतें कोणीच अन्य या सदनीं ॥ १५॥
मग ती कृष्णासि ह्मणे खाउनि ह्मणतोसि गोरसा नाहीं ॥
काय तुझे गुण लपले बापा माहीत थोरं, सानां ही ॥ १६ ॥
यावरि विचार करि बहु वत्से येतील केविं सदनासी ॥
बाहूं तरि कवणासी पसरूं जाऊनि आजि वदनासि ॥ १७ ॥
व[10]त्से वळावया जरि धाडूं जाईल काननां सून ॥
मी तरि अशक्त बहुताचि गोरस जाईल कां न नासून ॥ १८ ॥
लागेल वेळ बहु तरि कोण करिल पाक हेंहि संकट कीं ॥
दृष्टी मंद दिसेना त्यांताहि सदनांत मीच एक ठकीं ॥ १९ ॥
बहु त्रासल्या यशोदे गोपी तुजलागें काय सांगावें ॥
येतो क्रोध असा कीं या कृष्णाला तरूसि टांगावें ॥ २० ॥

---

१ बेंडें अथवा टेंगळें. २ औषधोपचार. ३ दिवस. ४ हे यशोदे सांग. ५ तोंडास. ६ लोणी. ७ स्त्री. ८ मामी–ह्म० सासूस ह्मणतात. ९ मोठ्यांस व लहानांस ह्म० सर्वांस. ( येथें गोपीनें काय चमत्कारीकपणें स्तुति केली आहे. बापा– सर्व चराचराचा पिता–पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः । भ० गी० ) परमेश्वर कोणास माहीत नाहीं ? व त्याचे गुण ह्म० त्रिगुण–सत्व, रज, तम–अथवा सगुणरूपाची कीर्ति हीं स्पष्टच आहेत. १० गाईचीं वासरें.

एके गोपीस पुसे वत्सें अजि कां न कानना गेलीं ॥
होती चिंतेंत बहू मंथनसमयीं मनांत रागेली ॥ २१ ॥
पुनरपि पुसे तरी ती गोपी नाहींच बोलली हरिसी ॥
यास्तव सोडुनि दिधलीं वत्सें पाहूं ह्मणे कसीं धरिसी ॥ २२ ॥
गेलीं वत्सें पुच्छें बाहुनि गोपीहि धांवली मागें ॥
लागे करीं न एकहि ह्मणउनि अन्यासि धर धरूंमागे ॥ २३ ॥
इकडे गोरस भक्षुनि वसरीवरताहि बहु सडा केला ॥
गेला पात्रें फोडुनि नाहीं बाई मनांत धाकेला ॥ २४ ॥
पाहे गोपी सदनीं केला हरिनेंचि गोरसा नास ॥
विदित असो हें सकळां ह्मणउनि दावीत थोर सानास ॥ २५ ॥
एक्या सदनीं हरिनें गोरस संपूर्ण नाहिंसा केला ॥
शिंकीं शेजीच्या गृहिं नकळे बांधूनि तो कसा गेला ॥ २६ ॥
गेली वन्हि अणाया प्रातःकाळींच शेजिच्या गेहा ॥
आणिलीं शिंकीं कशिं हीं तुमचा शेजार तरि बरा गे हा ॥ २७ ॥
आह्मीं कृष्णावर त्या घालित आलों उगाचि गे आळ ॥
बाळ यशोमतिचें त्या पडला अजि काय नवानिता काळ ॥ २८ ॥
दोघींत झोटेंधरणी होता झाले समस्त जन गोळा ॥
भोळा कृष्ण तुझा हा पाहत होता करूनि वर डोळा ॥ २९ ॥
सासू नसतां सदनीं तीची परसांत एकटी सून ॥
होती नाहत नग्नचि पाहे तें कृत्य आड बैसून ॥ ३० ॥
युवती निःशंक मनें बसली न्हायासि केश घासून ॥
गेला एकाएकीं बाई ठग हा मनांत हांसून ॥ ३१ ॥
झाली बहु लाज्जित परि नव्हतें कोणीच वसन ढाकाया ॥
काया उघडी यास्तव शंके अबला उभीहि ठाकाया ॥ ३२ ॥
चेंडू हुडकित आलों दावी धरिलेंसि पोटसीं काय ॥
कां उठवेना तुजला कळवी आहेसि पोटेंसी काय ॥ ३३ ॥

---

१ शेजारणीच्या. २ भांडण. एकमेकीच्या झींज्या झ० केंस धरून. ३ पोटाशीं. ४ गार्भिणी.

वाहे शपथ ह्मणे मजपासीं कंदूक[1] सर्वथा नाहीं ॥
तरि वोढीत कर तिचा स्वकरें लाऊनि अन्य थानांही॥ ३४ ॥
आली सासू सदनीं धावें कृष्णासि ती धरा यातें ॥
पातें लवतां गेला सांगे अन्यासि मग धरायातें ॥ ३५ ॥
रक्षी गोरस गोपी नित्य वदे मी न येउं दे हरिला ।
घरिला हटही पुष्कळ तरि मी येणार कायगे हरिला[2] ॥ ३६ ॥
वंचुनि श्रीहरिलागीं गोपी नवनीत सांचवी धामीं ।
चित्तीं ह्मणें विकुनि हें विशंक आणीन द्रव्य बहू धामीं ॥ ३७ ॥
होता हट[4] मथुरेचा यास्तव निशिंथीं भरूनि कावडिला ।
ठेवी दृढतर बांधुनि न सुटे कृष्णाचिया ह्मणे वडिलां[6] ॥ ३८ ॥
बाई कृष्ण तुझा हा तत्कालाचि युवतिच्या गृहा गेला ॥
भक्षी नवनित मटमट चित्तीं होता अधींच रागेला ॥ ३९ ॥
नवनित भक्षुनि अवघीं[7] या हरिनें भार्जनें रितीं केलीं ।
नवलाचि गमतें बाई वर्णूं याच्या अशा किती केली[10] ॥ ४० ॥
त्या पात्रीं मग भरिलें हरिनें वृश्चीक[11] उरग[12] बहु-सोल[13] ।
वाटे मज इतरांतें मिळवाया लागतील बहू सोल[14] ॥ ४ ॥
पाली सरड तसे ते भरिले मंडूक कावडीमाजीं ।
देऊनि खुण गांठ ह्मणे पुरली बहुतेक आवडी माजीं ।
प्रातःकाळीं गोपी गेली घेऊनि कावडी गांवा ।
मथुरेच्या बाजारीं झाला वृत्तांत तोहि सांगावा ॥ ४३ ॥
सांगे चोहटीं बैसुनि अणिलें नववीत म्या बहू ताजें ।
द्रव्य अणा जा देतें मोजूनि पडणार मान्य बहुतां जें ॥ ४४ ॥
पाहूं नवनीत कसें आहे सोडूनि दाखवी बरवें ।
दृष्टीं पडल्यावांचुनि इतरासी मोल तरि कसें करवें ॥ ४५ ॥

---

१ चेंडू २ हार जाईन काय. ३ श्रीकृष्णाच्या चोरून. ४ बाजार. ५ रात्रीं ६ बापाला. ७ सर्व. ८ भांडीं. ९ रिकामीं. १० क्रीडा-लीला. ११ विंचू १२ सर्प. १३ पुष्कळ. १४ वर्षे. १५ चवाठयावर

सोडी बहु रागानें या नवनीतासि पाहतां काय ।
पाहुनि सर्प ह्मणति जन सटका येथूनि पाहतां काय ॥ ४६ ॥
पाली सरड तसे बहु बेडुक वृश्चीक धांवती वाटें ।
फाटे धैर्य जनांचें केवळ कल्पांतसा तयां वाटे ॥ ४७ ॥
हिंडति सर्प बिदोंबिदिं परि गवसेनाचि एक माराया ।
कोणी ह्मणती सत्वर आणावें मांत्रिकासि भाराया ॥ ४८ ॥
वृश्चिक दंश करिति बहु यासाठीं मारिती अशा हाका ।
कैंची गवळिण कोठुनि आली मारा धरा पिटा हाका ॥ ४९ ॥
घाबरली फार मनीं गोपी अरडे रडे पडे वाटें ।
सुटका होईल कैशी ऐसें तिजला प्रतिक्षणीं वाटे ॥ ५० ॥
हरिसी विन्मुख झाल्यां येती विघ्नें अशीं घरा नसतीं ।
भजती अनन्य भावें गोपी तरि कासयास हो फसती ॥५१॥
सांगे भ्रतार सदनीं ठेउनि अनसूट दुग्ध देवाचें ।
नवनीत सांचवित जा या विषयीं वचन मात्र दे वाचें ॥ ५२ ॥
कांता ह्मणे बहु बरें धरितें अनसूट आजपासून ।
तिळमात्र न दे कवणा जाइल जावो विशंक नासून ॥ ५३ ॥
नवनीत सांचलें जें अर्ध तयांतूनि शेजिंच्या गेहीं ।
ठेवि ह्मणें असो दे घागर नेईन लागल्या गे ही ॥ ५४ ॥
करुनि महोत्सव पतिनें केला परिपूर्ण नवस देवाचा ।
'आहे अपराधी मी पूर्ण करुनि घे' असी वदे वाचा ॥ ५५ ॥
कळलें श्रीरंगातें घृत तें अद्यापि शेजच्या धामीं ।
आहे तरि पुरवूं द्या नवस 'उपेक्षा करूं ह्मणें कां मी' ॥ ५६॥
गोपमुलासह जाउनि घृतघट तितुकाचि सारिला हरिनें ।
हरिनेंचि इतर घटही होते तरि त्या न सर्वथा हरि ने ॥ ५७ ॥

---

१ निसटा. २ रस्तों रस्ती. ३ मत्रसामर्थ्यानें अडवून टाकण्या करितां. ४ हें कवीचें ह्मणणें ५ देवास नैवेद्य समर्पण केल्यावांचून कोणास देतां येत नाहीं तें. ६ शेजारच्या. ७ श्रीकृष्णास. ८ तुपाची घागर. ९ जो नवसाचा अनसूट ठेवलेला होता तेवढाच. १० इतर घागरी ही ओळीनेंच ठेवल्या होत्या पण त्या श्रीकृष्णानें घेतल्या नाहीं.

ती गोपी अन्यदिनीं जाउनि शेजारणीस घट मागे ।
झालें निवांत बाई दे आतां राहिलें न झट मागें ॥ ५८ ॥
पाहे घरांत गोपी अपुलीं संपूर्ण भाजनें भरलीं ।
न दिसे घट सेजीचा नकळे कां मन्मती ह्मणे हरली ॥ ५९ ॥
कळला वृत्तांत तिला सांगे मिळवूनि बायका चवघीं ।
कां नाहीं घट माझा हीचीं आहेत भाजनें अवघीं ॥ ६० ॥
त्याही ह्मणती साऱ्या बाई विपरीत कां असें वदसी ।
कळतें अबालवृद्धा नेल्या वांचुनि हलेल काय दसीं ॥ ६१ ॥
नेला हरिनें ह्मणतां मागहि कोठें दिसेचिना वहिला ।
गोपी सूज्ञ सुशीलहि ठेवावें कां उगोचि नांवं हिला ॥ ६२ ॥
गेलें नवनीत जिचें भ्याली पतिला कळेल यासाठीं ।
झालें कृष्णार्पण तें मिळतिल मज घागरी अशा सोठी ॥ ६३ ॥
रक्षी गोरस गोपी कांत तिचाही तसाचि सांभाळी ॥
देव ह्मणे कां करितां श्रम तुमच्या सर्वथा नसे भाळीं ॥ ६४ ॥
नवनीत सांचवा बहु मीही येऊनि घालितों घाला ॥
तिळमात्र उरों नेदीं आणिलें तुमचें तुह्मींच ओघाला ॥ ६५ ॥
एके समयीं निशिथीं निजली गोपी विशंक गेहांत ॥
देव ह्मणे दाखवितों भक्षुनि नवनीत आज गे हांत ॥ ६६ ॥
ऐसें वदोनि हरि तो गेला घेऊनि मुंगसास करीं ॥
सोडी गृहांत उकरीं धान्याचा बहु तसाचि नास करी ॥ ६७ ॥
देवांतीं न दिसे कवणा उकरी मुंगुस घरांत फिराफिरुनि ॥
आले धांवत बाहिर भीरूं बसतील केविं धिरें धरुनि ॥ ६८ ॥
आहे भूत विशंकचि बसलें येऊनिया शिरावर तें ॥
आधीं तळीं पहा जा नसतां तैसेचि मग शिरीं वरतें ॥ ६९ ॥

---

१ नाहींशी होईल. २ वस्त्राचे शेवटीं दशा असतात त्या. ३ धरलेला रस्ता. रस्त्याची खूण. ४ दोष. ५ साठ ह्म० अनेक. ६ या धराला तुह्मींच आणलें. ७ निःशंक-निर्भय. ८ चमत्कार दाखवितो. ९ अंधारांत. १० भित्रे. ११ धैर्य १२ प्रवेश करा. १३ वरच्या माडींत.

तरि कोणीहि न धजती भीती जायासि गोप ते अवघे ॥
ह्मणती सुखांत असतां कोण विषाची कशास हो चव घे ॥ ७० ॥
तोंवरि नवनीत हरी भक्षुनि झालाचि सिद्ध जायासी ।
परि क्षण राहे पाहे धजती तरि कोण गे धरा यासी ॥ ७१ ॥
आणले पंचाक्षरि जन विभूति मंत्रूनि टाकिती गेहीं ।
अघटित कर्में हरिचीं सांगावीं काय तरि किती गे हीं ॥ ७२ ॥
जें कां धीट यशोदे गेले घेऊनि कांकडे हातीं ।
पाहति घरांत शोधुनि कोणी द्वारांत ही उभे रहती ॥ ७३ ॥
दिसलें नकुळ जनांला ह्मणती सारेचि हरिंविना नाहीं ।
वर्णावीं काय कितीं कृत्यें त्याचीं अशींच नाना, हीं ॥ ७४ ॥

---

२ धैर्य करितात. ३ गे यशोदे. ३ धरण्यास. ४ मांत्रिकलोक. ५ सर्वकांहीं हरी-वांचून पडलें नाहीं, हरी वांचून कांहींच नाहीं.

# सीतास्वयंवर.

## कथासारांश.

श्रीरामचंद्रांनीं शिवधनुष्याचा भंग केल्यानंतर जनकानें आपल्या प्रधानासमागमें पत्र देऊन त्यास अयोध्येस राजा दशरथास बोलावूं पाठविलें. दशरथ राजा सर्व मित्र मंडळांसह मिथिलेस गेला. तेथें श्रीरामचंद्र, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांचीं मोठ्या थाटानें लग्नें झालीं. तो प्रकार या आख्यानांत वर्णन केला आहे.

### आर्या.

निज मंत्री पाठविला–आणाया दशरथासि जनकानें ।
पत्रश्रवणानें बहु–झाले संतुष्ट सर्व जन कानें ॥ १ ॥

पद–( गड्यांनो कृष्ण गडी आपुला. )

विनवी प्रधान रायासी ॥ चलावें मिथिला[1] नगरासी ॥धृ०॥ देउनि पत्र दशरथातें ॥ ह्मणे मी आलों न्यायातें ॥ करावें विश्रुत सकळातें ॥ सर्वे घ्या निजपरिवारातें ॥ दिधली सीता रामासी ॥ १ ॥ सिद्धता सर्व तया ठायीं ॥ न्यूनता अणुमात्रहि नाहीं ॥ घ्यावी समस्त सेना ही ॥ सोयरे आप्त पिशुन[2] तेही ॥ राहों नये दासदासी ॥ २ ॥ राजे त्वरा करिति जाया ॥ जातिल अप-अपुल्या ठायां ॥ प्रार्थितों यासाठीं पायां ॥ करणें वेळ अतां वायां ॥ आज्ञा द्या निज भृत्यांसी[3] ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी–रामाला ॥ निजमनहर्षित[4] पिता झाला ॥ बाहुनि त्वरित सुमंताला ॥ कथियलें वृत्त सकळ त्याला ॥ निघावें निज दल-भारेसीं ॥ ४ ॥

साकी

विश्वामित्रें पत्र धाडिलें–राजा दशरथ जो ह्यातें । वरिली सीता श्रीरामानें भव–धनु[5] भंगुनि निजहातें ॥ १ ॥ यावें पुत्रासह

---

१ जनक राजाची राजधानी. २ निंदक. ३ सेवकांला. ४ आनंदीत. ५ शिवाचें धनुष्य.

परिवारें सेना घेउनि जनक पुरा । होइल लग्न यथाविधि मंगल झालें ऐसें कधिं न पुरा[1] ॥ २ ॥

दिंडी.

पत्रबोधें आनंद दिग्रथाला,[2] ॥ प्रेम दाटे, नावरे असा झाला ॥
ह्मणें भीती संपूर्ण नाग[3] ज्याला । त्वरें घाला पाखरा[4] त्या गजाला २

आर्या.

द्यावे रथ अति सुंदर अश्वहि तैसेचि वीर पायाचे[5] ।
[6]यामद्वयांत सत्वर जे कां मिथिला पुरासि न्यायाचे ॥ १ ॥
सांगुनि निज प्रधाना दिधली अक्षत समस्त नगरासी ।
साहित्य घेतलें बहु वस्त्राभरणें अनेक नगरांसी[7] ॥ २ ॥

साकी

सेना घेउनि त्वरें निघाला राजा नगरा बाहेरीं ।
वाद्यें वाजति नानाविध, तो नाद दिशा अंबर[8] घेरी ॥ १ ॥

आर्या.

गज रथ हय शिबिकादिक[9] यानीं[10] बैसूनि अंगना[11] जाती ।
गाती यश रामाचें ह्मणती पाहूं चला जनकजा, ती ॥ १ ॥

कटिबंध.

राजा दशरथ सेनासमिंदर, ले निकला डर मानत इंदर, अवाज पहुंची सब गिरिकंदर, सबही हाथी मिसल गजंदर, मोती जिनके दांतों अंदर, झूल रेसमी बडी धुरंधर, है मोतनकी झाला सुंदर, गले साज[12] सोनेके लंगर, बडी अमारी है एक मंदर,[13] सुफेद घोडे बडे बिलंदर,[14] देख छुपे अंबरमें[15] चंदर, सुरंग मुषकी कुमेद गरे,

१ मार्गे, पूर्वी. २ दिग्+रथ=दशरथ. दिशा दहा असल्यामुळें दशशब्द कवीनें दिग्वाचक धरला आहे. ३ हत्ती. ४ पांघरूण, पडदा. ५ पायदळ ६ दोन प्रहरात. ७ अलंकाराच्या राशी. ८ आकाश. ९ शिबिका=पालखी. १० वाहनांत. ११ स्त्रिया. १२ अलंकार. १३ अंबारी जशी कांहीं एक घरच [illegible]. १४ खंद. १५ घोडे इतके शुभ्र होते कीं त्यांना पाहून चंद्र आकाशांत लप[illegible] [illegible]हिला.

कूरे नीले,अरंबी,गरबी ताजे बहोत आंगमें चरबी,कितने घोडे मोतल कोतल[2], जोत लिये है रथ को धवतल[3], जीन सुनेरी सब के ऊपर, घुटनेमें है पैंजन नूपर, अवाज निकलत चलने ऊपर, साज सुनेरी ऊपर डाला, सवार जिनके हाथमें भाला, सरमंदिल सरपेंच बाला, गले रतनकी सोभत माला, सुरज किरनसें पडत उजाला, कैक अवरतें हाथी ऊपर, कितनी बैठीं रथमें जाकर, कपडे एक एकसे बेहतर, जडावके है भूखन[4] अंगपर, बहोत पालकी और नालकी[5], जिनके आगू सिंग हालकी[6]. नौबत बाजा झुमर सांजकी, जात देखने जनक जानकी, सबहीको बडि आस मानकी[7], आ पहुंचे सिम[8] मिथिला नगरकी, ले सेना दसरथ आया बडि धूम[9] भम लागनकी ॥ १ ॥

आर्या

जनकपुरा गेल्यावरी आला सह सैन्य जनक सामोरा ।
झाला हर्ष बहु तया होतो घनदर्शनें जसा मोरा ॥ १ ॥

झुलना

बडी सेना ले साथ ॥ आया दसरथ नृपनाथ ॥ आई कानमें यह बात ॥ जनक जात सामने ॥१॥ चली फौज बेसुमार ॥ अंगुनंकिब[10] चोबदार ॥ पडी शहरमें पुकार । आये पौर[11] देखने ॥ ३ ॥ कहत जनक महाराज । भये दर्शन जो आज ॥ हुवे सुफल सबही काज ॥ राखी लाज हमारी ॥ ३ ॥

आर्या

मिथिला पुर प्रदेशीं दिधलीं शिबिरें[12] अनेक उतराया ।
तरि नच पुरलीं ह्मणती या हो या मंदिरांत उतरा, या ॥ १॥

---

१ घोड्यांच्या जाति. २ ज्यांच्यावर स्वार बसले नाहींत असे. ३ उत्तम. मिसल=सारखे.गजंदर=ऐरावत. ४ भूषणें, अलंकार. ५ वाहनविशेष. ६ हीं वाद्यांचीं नांवें आहेत. ७ मानाची. ८ शींव. ९ मेघ. १० भालदार. ११ पुरवासी लोक १२ तंबू, शामियानें वगैरे.

सानुज भरत विलोकुनि सानुग हे रामसे गमे राया ।
विश्वामित्र ह्मणें हो कैकेयीचे सुपुत्र हेरा या ॥ २ ॥

दिंडी.

ह्मणे माता रामासि अरे बाळा ॥ कशी वरिली भंगूनि धनू बाळा[1] ॥ मला गमतें बहु नवल हेंचि पाही ॥ जगीं कोमल तूं एक, दुजा नाहीं ॥ १ ॥ किती दुर्धर हें चाप कठिण बारे ॥ जया पहातां भूपाल चकित सारे ॥ असें करणें सामान्य काय केली ॥ कशीं शकलें[2] हीं सांग तुवां केलीं ॥ ३ ॥

साकी.

राम लछीमन भरत शत्रुघन च्यारों भाई है सारिसे[3] ।
कन्या च्यारों इन च्यारोंको देऊं मनमें है तबसे ॥ १ ॥
रामचंद्रको सिता, उर्मिळा लछमनजीकी है नारी ।
भरत मांडवी, शत्रुघनको श्रुतकीर्ता सोहे[4] भारी ॥ २ ॥

श्लोक.

पाचारुनी बहु सुवासिनि बायकांतें ॥ राजांगना कथितसे तुह्मि आयका तें ॥ मांडूनिया कलशकुंकमयुक्त सूत्रें ॥ न्हाणा मुलीस करिं घेउनि हेमपात्रें ॥ १ ॥

पद.

सुभगा न्हाणिती सीतेला ॥ धृ० ॥ हेम कलश अति सुंदर ज्यांच्या न्यून न समतेला ॥ १ ॥ परिमळद्रव्यें उटणें लाविंत सुगंधमय तेला ॥ २ ॥ वाद्यें वाजति नानाविध तें आनंद मातेला ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम निरंतर करील ममतेला ॥ ४ ॥

आर्या.

केलें स्वस्तीवाचन गोभू रत्नें सुवर्ण धन दानें ।
दिधलीं विप्रांसि बहू अजवरि ऐसी कधीं न धनेदानें[5] ॥ १ ॥

---

१ कांडा, २ तुकडे. ३ एकसारखे, समरूप. ४ शोभते. ५ कुबेरानें.

वाटे नवल मुनिजना, येतां उच्छिष्ट हळद रामासी ।
ह्मणती ब्रह्म सगुण हें, गाती याच्या समस्त नामासीं ॥ २ ॥

साकी

उभय मंडपीं पुजन मातृका देवकस्थापनही झालें । नांदि-श्राद्धें करुनि दक्षिणा देतां विप्र सकळ धाले ॥ १ ॥ आलि सु-मेधा राणी रुखवत घेउनि संगे बहु सुभंगा । वाजत गाजत मिर-वत अणिल्या वस्त्रें सुंदर युक्त नगा ॥ २ ॥

आर्या

घटिका भरतांचि सकळ कथिती येऊनि विप्र जनकास ।
आणा वरासि ह्मणतां गेले घालूनि बहु सुजन कास ॥ १ ॥

पद.

अगे बाइ पाहुं चला रघुवीर ॥ धृ० ॥ कोमल कांती अति शरिराची परि मोठा रणधीर ॥ १ ॥ भवधनु भंगुनि शकलें केलीं कोण असा खंबीर ॥ २ ॥ भार्गवरामें छळिलें तरि तो अंतरिं बहु गंभीर ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु वरुनि सीतेतें केली चिंता दूर ॥ ४ ॥

पद.

राम लक्षुमण भरत शत्रुघन आले जनकाच्या धामीं ॥ धृ० ॥
शिरिं मांदिल भरजरी दुशाला अंगा किनखापी नामी ॥
कासे पीतांबर बहु शोभे हार पाचुचा हृद्पद्मीं ॥ १ ॥
राजमंडपीं दाटि जनांची झाली यास्तव बहु गरमी ॥
३व्यंजना-निल वरि घालिति परि ते कितिक दाटले जन घर्मी ॥२॥
गिरिवासी प्रभु राम पातले आनंद सकळा नृपसद्मीं ॥
भाविक जन ते सहज विलोकिति दुःसाध्याचि जे नच छद्मी ॥३॥

आर्या

अक्षत अक्षत मोत्यें वांटिति सकळांस भृत्य रायाचे ।
वाद्याचे नाद बहु स्थळोंस्थळीं थाट नृत्य गायाचे ॥ १ ॥

---

१ स्त्रिया. २ पचांग मारून. ३ व्यजन=पंखा, अनिल=वारा. ४ उकाडा
५ कपटी.

मंगलतर अति मंगल रामयशोंकित प्रबंध बहु गाती ।
कल्याणप्रद ऐसीं पदें अमितही जयांत बहु गातीं ॥ २ ॥

साकी

ब्राह्मण ह्मणती मंगलाष्टकें शुभतर वेळा त्या काळीं । हर्षयुक्त शेवटीं जनांनीं वाजविली एकची टाळी ॥ १ ॥ ॐपुण्याहं वाचन होता बसले वधुवर स्वस्थानीं । वानिति बहुजन नृपभाग्यातें कितिक सितेच्या ध्यानीं ॥ २ ॥

आर्या

झालें चित्र जनां हें विधिहरें ह्मणती पदा नमो त्यांच्या ।
त्यांच्या शिरीं वधुकरीं घालविती अक्षता सुमोत्यांच्या ॥ १ ॥

श्लोक

प्राची दिशा जसिच सन्मुख नोवऱ्यातें ॥ तैसी अशा वरुन सन्मुख नोवऱ्यातें । येणें रिती वधुवरें बसवूनि स्थानीं ॥ सूत्रत्रयें वलय बांधियलीं द्विजांनीं ॥ १ ॥

आर्या

पूजन गौरीचें मग पाणिग्रहणादि विधिहि तो केला ।
दशरथ निजपुत्रांसह तेथुनि तत्काल स्वस्थळा गेला ॥ १ ॥
संसारदुःख कैचें, विसरवि पहांताचि सर्व पायघडी ।
ह्मणती स्त्रिया सकल त्या येइल ऐसी पुन्हांहि काय घडी ॥ २ ॥

पद.

सीता पूजी गौरि हराला ॥ धृ ॥ गंध पुष्प धुप दीप अक्षता, अर्पी बेल शिवाला ॥ १ ॥ कुंकुम हळदी खांद्य समर्पुनि, वंदी पदयुगुलांला ॥ २ ॥ मंगल अरती करुनि यथोचित, मागें हेंचि तयाला ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु रामची पती दे प्रतिभवीं वराला ॥ ४ ॥

श्लोक

राजांगना चालति मध्यभागीं । पौरांगना त्या भंवत्या विभागीं । येती अशा त्या जनकगृहासी । धावे सुमेधा पदधावनासी ॥ १ ॥ दारू नळे तुबक आणिक चंद्र ज्योती । झाडें अनेकविध

१ गीत, गाणें. २ विधि=ब्रह्मदेव, हर=शिव. ३ पूर्व. ४ तीन. ५ कडे.

रंग दिसोन येती । नक्षत्रपुंज जन त्यांताचि ते पहाती। गोळे फुटू-
नि जंव शब्द महा करीती ॥ २ ॥

आर्या

सुनमुख पहावयातें कौसल्येनें मुलींस आणविलें।
हें वृत्त सुमित्रेला कैकयीला समक्ष जाणविलें ॥ १ ॥

ओंवी

कौसल्येनें अपुल्या अंकीं । उचलुनि घेतली जानकी। घालुनि शर्करा-
ही मुखीं । कुरवाळी प्रेमें ॥ १ ॥ रत्नांचे बहु अलंकार । सीता
ल्याली हो सत्वर। भासे रतिहुनि अति सुदंर । रूप जिचें
नयनीं ॥ २ ॥

आर्या

मांडुनि पाट रजतमय दिधलीं ताटें समस्त कनकाचीं ।
अणिकाची काय कथा वाढी जेथें प्रियाहि जनकाची ॥ १ ॥
नित्यानित्य बहु द्रिज जेविति त्यांची कळेचि ना गणती ।
ह्मणती यथेच्छ जेवा प्रार्थिति शतदां करूनिया प्रणती ॥ २ ॥

श्लोक

जनकें दिले आंदण जावयांसीं ॥ ते प्रार्थिती स्वसदना-
प्रति जावयासी । राजा बहू विनित होउनि मार्ग दावी । तें प्रेम
काय सुरिती कितिहो वदावी ॥ २ ॥

आर्या

झाले साडे सुदिनीं गेले घेउनि वरात नगराशी ।
वाटी नृपवर सकळां वस्त्राभरणें तशाच नगराशी ॥ १ ॥

## भरतभाव

कटिबंध

निघती रामचंद्र वनवासा, सोडुनि सत्वर सुखद निवासा,
करीत होते निर्जर[१] नवसा, आला प्रसंग तो बहु दिवसां, चित्तीं
त्यांच्या अनंद बहुसा, यास्तव धरिला वेश नवासा, मानुनि
राज्याहुनि बहु खासा, टाकुनि मंदिल जरी दुपेटा, वेटाळुनि शिरि
जटा बांधिल्या, लपटाया वरि नाहिंच फेटा, भंवताल्या किति
जटा मोकळया, छटा नील घन घटा परिस, अंग नग चांगला,

१ नम्र.

मुदी नसे कारिं कैची, पौची रत्नहार तट तटां तोडिले,वसन कटीचें तेंहि सोडिलें, बाण धनू कारिं कैचा लोटा, जना वाटला समयाचि खोटा, वनासि जाती अवलुनि पोटा, झाला नगरींतहि बोभाटा, रोधिल्या बहुत जनांनीं वाटा, झाला तइं कलकलाट मोठा, तटा-वरुनि तळवटा उतरल्या, स्त्रिया सीतेला पाहुनि रडल्या, चित्तीं अपुल्या बहु गडबडल्या, किति मार्गांतचि अडव्या पडल्या, कैकयी-वर बहु कडकडल्या, चित्ता येइल तें बडबडल्या, किती मनांतचि त्या कुडकुडल्या, लक्ष्मणही त्यासवें चालिला, साकेतपुरीं अकांत झाला, सिताकांत रघुनाथ निघाला, बंधूसह वल्कलें नेसला, दुःख नावरे, रडती सारे, पुरवासी जन पाठिं धांवले, गिरिवासी रामाच्या पदपद्मीं, लोळुं लागले ॥ श्रीराम वना जंव गेला पुरवासी बहु हळहळले ॥ १ ॥

पद ( भरत आपुले आगीं विचार करितो )

( माझा भरत देखिला काय )

अयोध्या गतंभा कां दिसती, न कळे हं मजला ॥ धृ ॥ देखिले बहुतांतें सदनीं ॥ तयांच्या कांति नसे वदनीं ॥ वाटतें अपूर्व हेंचि मनीं ॥ असोनी धनी कां ऐसे ॥ १ ॥ देखिल्या गतप्रभा नारी। होत्या जरी कुंकुमधारी ॥ चहोटा लोकहि बाजारी ॥ प्रजा सारी प्रेतवत ॥ २ ॥ असती गज हय पशु सारे । पाहिल तरि चित्तीं घोरे ॥ पडती दिवसा कां तारे ॥ अभ्रवारें भय सुचवी ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासि कसा रुसला ॥ उगवला दिवस तरी कसला ॥ मजला कां दचका बसला ॥ सुचला विचार नच कांहीं ॥ ४ ॥

पद ( कैकयी भरतास म्हणते )

( गड्यानो कृष्णगडी आपुला )

बोले भरतासी माता—करी तूं राज्य सुखें अतां ॥ धृ ॥ वचनीं गोवुनि रायाला ॥ धाडिलें वनासि रामाला ॥ लक्ष्मण तोहि सवें गेला ॥ नेलें त्यांनिंच सीतेला ॥ अलें हें राज्य सकळ हातां ॥ १ ॥ जाता वनासि लवलाही ॥ घेतलीं वसनें म्यां पाहीं ॥ राहिला रिपूच तुज नाहीं ॥ बारे स्वस्थपणें राही ॥

होईल अभिसिंचन[1] माथा ॥ २ ॥ ऐकुनि जननीचे हे बाळ ॥ सोडि मर्यादेचा[2] तोल ॥ वदे वचनें बहु अनमोल[3] ॥ ज्यांचा अर्थ बहुत खोल ॥ मारिला सकळांचा भर्ता ॥ ३ ॥ गेला राम वनामाजीं[4] ॥ वल्कलें वेष्टुनिया मांजी ॥ कामना हीच काय माझी ॥ गेली सीता ही मांजी ॥ जी कां अधार या जगता ॥ ४ ॥ प्रभु गिरिवासि प्राण माझा ॥ करिल हें काय कुणप[7]काजा ॥ ह्मणतो माय रामराजा । रक्षिलें यासाठीं[8] बोजा ॥ करितो कधींच तव घाता ॥ ५ ॥

साकी. ( भरत ह्मणतो )

दसरथ भूप जगतका वाली, मारलियो एक छनमें ।
रंडा होकर बैठी घरमें कौन भलाई इस जगमें ॥ १ ॥
मैं हुं पूत तिहारो पापी नहीं कालनें इस खाया ।
बडो दुःख अज भयो मुझे कब राम करे सीतल छाया ॥ २ ॥

घनाक्षरी.

कैसो राम मिले आज । बडी लागत मोह लाज । सबो बिघडगयो काज । करुं इलाज कौनसो ॥ १ ॥ गयो बिपिन रामराज । भइ कठन बात आज । कहूं किनसे यह काज । करुं इलाज कौनसो ॥ २ ॥

पद. ( कौसल्या ह्मणते. )

बा समय कठिण हा मोठा, कोणतें, पाप बडबडलें ॥ धृ० ॥ बासरा काय तुज सांगूं, पहा झाला घात कसारे ॥ ही करणी तव मायेची, तें बोलचि घातक सारे ॥ नृप गेला पुत्र वियोगें, सोडुनि हे मोह पसारे ॥ १ ॥ चाल ॥ भोंवलें अह्मां सकळांला ॥

---

१ राज्याभिषेक. २ सीमा. ३ अमूल्य. ४ अरण्यामध्यें. ५ कंबरेस. ६ माझी. ७ प्रेत. ( राम माझा प्राण, तो गेला आतां हें प्रेतवत शरीर काय करील असा भावार्थ ) ८ भावार्थ—राम तुला आई ह्मणतो ह्मणून तुला सोडलें; नाहींतर तुला केव्हांच मारलें असतें.

वृत्तांत जनासि कळला ॥ लाविला डाग स्वकुळाला ॥ पू. चाल ॥ बाळासि धाडिलें विपिनीं, कोणतें यश मिळवीलें ॥ २ ॥

### अंजनीगीत.

बोले कौसल्या माउली ॥ होती सकळांसचि साउली ॥ गेली नेत्रांतिल भाउली ॥ रघुराज माझा ॥ १ ॥ ज्याची लीला अति पावनी[1] ॥ पाहुनि संतृप्त आवनी[2] ॥ कोठें बसला नकळें वनीं ॥ रघुराज माझा ॥ २ ॥ मिळेल कोठें काय अशना[3] ॥ मागेल कवणा जलप्राशना ॥ करील कोठें क्षुत्नाशना[4] ॥ रघुराज माझा ॥ ३ ॥ सीता सुंदर अति कोमला[5] ॥ जरि वदनेंदु अति कोमला[6] ॥ ह्मणेल कैसी हें नको मला ॥ श्रम झाले भारी ॥ ४ ॥ नकळें जाइल काय चुकून ॥ अथवा राहे जरि थकून ॥ वेणीफणी करिल कोण ॥ ही चिंता मजसी ॥ ५ ॥

### दिंडी.

राम माझा सकुमार फार बापा । वनीं सोशिल केंवि तो प्रखर तापा । जनक कन्या कोमला अती धन्या । कशी विपिनीं[7] राहील जगन्मान्या[8] ॥ १ ॥

### पद. जलदत्रिताला.

कधीं भेटल राम आतां ॥ धृ० ॥ बाळ माझा सुकुमार ॥ कसा करिल संचार ॥ वनिं श्वापदांचे भार ॥ फार लागली मज चिंता ॥ १ ॥ नाहिं जेविलाचि घरीं ॥ नसे दामे[9] त्याच्या करीं ॥ काय मिळे वनांतरीं ॥ बरि न दिसे गती पाहतां ॥ २ ॥ चीर[10] भूषणें ठाकिलीं ॥ कटिं वल्कलें वेष्टिलीं ॥ अंगिं विभूती चर्चिली ॥ गेलि संगें जनक दुहिता[11] ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम ॥ अंगिं

---

१ पावन करणारी. २ पृथ्वी. ३ खाण्याला. ४ क्षुधा हरण करण्यास. ५ नाजुक, सकुमार. ६ सुकला, म्लान झाला. ७ अरण्यांत. ८ जगत्+मान्या. जगताला मान्य अशी. ९ पैसा. १० वस्त्रें. ११ कन्या.

येइल त्याच्या धाम ॥ कोठें घेइल विश्राम ॥ झाले कष्ट हे तुझ्या करितां ॥ ४ ॥

पद.

करुं मी गति कैशि, रे बा ॥ गेला राम सखा विपिनासी ॥ ध्रु० ॥ कोण तया सांभाळी ॥ लिहिलें-कसें विधीनें भाळीं ॥१॥ सीतातप धन-वारीं ॥ नकळे वनीं कसें निवारी ॥ २ ॥ चैन पडेना कांहीं ॥ पाहिन मूर्ति कधीं नयनांहीं ॥ ३ ॥ पळपळ युग सम जातें ॥ लोटुं दिवस मग कैसे हातें ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु कां रे ॥ केलें विपरीत हें तूं सारें ॥ ५ ॥

दिंडी. ( भरत बोलतो. )

नसें ठावें हें वृत्त मला कांहीं ॥ असा दुर्बुद्धी कुटिल मीन पाही ॥ जरी वाटे ना सत्य तुला माते ॥ भस्म करितिल हे पाय तुझे मातें ॥ १ ॥ शपथ गुरुची वाहतों अशा साठीं ॥ ब्रह्महत्या मजलागीं तशा सांठीं ॥ घडो जरि हें मज कृत्य असें ठावें ॥ अजुनि तुजला कां सत्य न वाटावें ॥ २ ॥

साकी. ( कौसल्या भरताला ह्मणते )

कहत कौसल्या प्रेम तिहारो रामचरनपर है बैठा ।
क्या करुं मोहे दुःख बडो यह, नहीं रामके सिर फेटा ॥ १ ॥
नहीं तुझे कछु काम किसीसे, राम बिना सबही फींको ।
कीरत माकी तोह बतलाई मानत यह सबही नींको ॥ २ ॥

आर्या.

ह्मणती वसिष्ट भरता राज्य करावें तुवां बरें दिसतें ।
गेले सुखांत जरि तरि मानावे कां न बा बरें दिस, ते ॥ १ ॥

---

१ ब्रह्मदेवानें. २ थंडी, ऊन, पाऊस. ३ दुष्ट. ४ मला. ५ साठ. ६ फिकें. ७ चांगलें.

पद. ( वसिष्ठ भरतास ह्मणतात. )

( गळ्यांनों कृष्णगडी आपुला )

बोलिले वसिष्ठ भरतातें ॥ वोपिलें राज्य तुला तातें ॥धृ०॥ बा तूं सुखवी मातेला ॥ टाकुनि आज्य कसा तेला ॥ घेसी, न-कळें हें, मजला ॥ असा कां भ्रम झाला तुजला ॥ गेला रामहि विपिनातें ॥ १ ॥ सूज्ञें निज हित साधावें ॥ पदरीं असुख न बांधावें ॥ घेई राज्यासन, धांवे ॥ भोगुनि सौख्य न कां घ्यावें ॥ दवडिसी व्यर्थ कसा हातें ॥ २ ॥ बोलिला वंदुनि गुरुसें असें ॥ वदावें जाणुनि काय असें ॥ सोडुनि राम पदासि कसें ॥ राहावें सहसा उचित नसें ॥ वाटल्या या मज सांगातें ॥ ३ ॥ धरुनि गिरिवासी प्रभुचा वेष ॥ जाइन यावरि मी निःशेष ॥ आला मज राहण्याचा बहु त्वेषं ॥ वंदिन स्वशिरीं राम निदेश ॥ कोणतें हित मज कळवा तें ॥ ४ ॥

पद. ( भरत बोळतो. )

अब मोहे राम बिना नहिं काम ॥ धृ० ॥ राम बिना सब लागत फीको, कब देखुं घनशाम ॥ १ ॥ धन दौलत मोहे कछु नींहे होना, कांता सुंदर धाम ॥ २ ॥ सोहि गुरु मोहे, राम दि-खावे, नमन करूं अटजाम ॥ ३॥ गिरिवासी प्रभु, राम ले आऊं, तबही पूरन काम ॥ ४ ॥

पद. ( भरत ह्मणतो. )

कशी त्यजिलि रे दया सदया ॥ धृ० ॥ काय होतो बहु दुरी ॥ कांहिं समाचार तरी ॥ कां रे केलि अशी परी ॥ दुरि टा-किलें कसें बा या ॥ १ ॥ ह्मणासि माय कैकयीसी ॥ नाहीं दया तुझी तिसी ॥ करिल घात एका दिशीं ॥ पिशि केवीं ती कठिण हृदया ॥ २ ॥ आहे त्रासलों मी फार ॥ करि एवढा उपकार ॥

---

१ दिसें. २ तूप. ३ दुःख. ४ राग. तिटकारा. ५ आज्ञा. ६ घर. ७ आठ प्रहर.

देइ निज पदीं थार ॥ तार बुडतां शोक जळिं या ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु रामा ॥ नको दूर करुं अह्मां ॥ बा तूं येइ निज धामा ॥ क्षामा येइल कोण वद बा ॥ ४ ॥

धांवा. ( भरतानें केला तो. )

( विडा घ्याहो नारायण. )

भेटि दे राम राया, कशि त्यजिली माया ॥ अन्याय काय माझा, देवा वाटला तुजसी ॥ धृ० ॥ असेल तव पोटीं, जशि जननी खोटी, कुपुत्र हा तैसा, तरि दोष काय मजशीं ॥ १ ॥ हिरण्य कशपूचा, पुत्र प्रल्हाद साचा, तुवांचि रक्षिला कीं, नाहिं दुषिलें त्यासी ॥ २ ॥ अनंत अपराधी, तरि शरणाचि आधीं, नकोचि मोकलूं बा, येइ त्वरें गृहासी ॥ ३ ॥ गिरिवासी सदय तूंचि, अशि गति कां याची, नसेचि मज थारा, दावि दावी पदासी ॥ ४ ॥

पद ( सकल प्रजा ह्मणतात. )

( माझा भरत देखिला काय )

चालिला भरतहि वनवासा करावें काय अतां ॥ धृ० ॥ टाकिला राज्य भार सारा ॥ मानिली साकेतां[३]कारा ॥ दिसेना अह्मां कुठें थारा ॥ पुत्र दारा रडतिलकीं ॥ १ ॥ वेष्टिल्या शिरीं जटाहि तशा ॥ बांधिल्या रामानीं जैशा ॥ राहतील प्रजा तरी कैशा ॥ नसे आशा जिवनाची ॥ २ ॥ वल्कलें तसींच कीं [४]माजीं ॥ वेष्टिलीं अशा वया [५]माजीं ॥ आमुच्या हेंचि मनीं डाजी ॥ नसे राजी कैकयिला ॥ ३ ॥ असो हा समय कठिण भारी ॥ प्रभुविण कोण दुजा वारी ॥ चला दर्शना जाउं सारीं ॥ राम हरील [६]आपदाही ॥४ ॥ प्रभु गिरिवासी राम राजा ॥ प्रार्थुनि बंधु सह [७]भाजा ॥ आणूं आह्मि अपुल्या काजा ॥ त्वरें जाउं सिद्ध असा ॥ ५ ॥

---

१ थारा; आश्रय. २ सोडूं. ३ बंदीखाना. ४ कंबरेस. ५ मध्यें. ६ दुःख. ७ स्त्री.

दिंडी.

चला जाऊं कैकयी विना सारे ॥ नसें मजला गुरुचाहि भरंवसा रे ॥ राम पायीं वाहीन शीर आतां ॥ नको कर्णी सहसाहि विभवं वार्ता ॥ १ ॥

श्लोक.

च शिष्टासि घेऊनि सर्वत्र माया ॥ त्वरें चालिल्या शोक चित्तीं निमाया ॥ प्रजा त्याच मार्गीं प्रभुसि नमाया ॥ निघाल्या अशा पाश सोडूनि माया ॥ १ ॥

दिंडी.

भरत गेला कानना त्यासि वाटे ॥ अतां भेटेल रघुराज यावि वाटें ॥ शोक चित्तीं नावरे असा जाला ॥ तरी वदनीं श्रीराम नाम ज्याला ॥ १ ॥

आर्या.

धुंडित वनासि गेला, गेला प्रभु राम ज्या वनामाजीं ।
पाहिन पदद्वयातें, आहे जरि शुद्ध भावना माजी ॥ १ ॥
भेटे गुहक तशांतचि, सांगे वृत्तांत रामरायाचा ।
कांहीं स्थिरावला मनिं, होता संकल्प जरि मरायाचा ॥ २ ॥
पाहुनि तृणशय्येतें, चित्तीं अत्यंत घाबरा जाला ।
केला शोक स्वधिःकृत, धरवे ना धीर मम जरा ज्याला ॥ ३ ॥
पद चिन्हित भूमींचे, रज घेउनि मस्तकीं भरत टाकी ।
गुहकें उतरूनि नेला, सैन्यासह भरत तो पर तटाकीं ॥ ४ ॥

दिंडी.

भरत पाहे दृष्टिनें राम राया ॥ करी धांउनि तत्काल नमन पायां ॥ क्षेम देउनि बैसवी प्रभु हातें ॥ बहु झाले संतुष्ट उभय भ्राते ॥ १ ॥

---

१ मोठेपणा, ऐश्वर्य. २ माता. ३ नाहींसा होण्याकरितां. ४ झाला, ५ पैल तिरीं.

श्लोक.

तों देखिले गुरु वशिष्ठ तशाचि माया ॥
धांवे प्रभु त्वरित त्यां सकळां नमाया ॥
त्या उपरी पुसत क्षेम असे पित्याला ॥
त्या सांगती रडुनि वृत्त समस्त त्याला ॥ १ ॥

---



## श्रीराम सन्यास घेतात असें समजून हनुमान सीताशुद्धीस न जातां परत आला तें आख्यान.

आर्या. ( राम लक्ष्मणास म्हणतात.

होतां समदुःख ह्मणुनि परस्परें नेमही तसा केला ।
झाला कृतकार्य तरी मर्कट चित्तीं नसेचि धाकेला ॥ १ ॥
सरले मास चतुष्टय वर्षाकालहि समग्र तो सरला ।
झालें निरभ्र नभही बा, पाहे घनसमूह वोसरला ॥ २ ॥
शिखिसाक्ष[1] सख्य केलें परंतु मर्कट कशास आठवितो ।
सीताशुद्धि कशाची वानरसमुदाय काय पाठवितो ॥ ३ ॥
चुकलों मीच प्रथम हें नर वानर सख्य काय हो होतें ।
तरि सत्य मानिलें कीं कीशाचें बोल व्यर्थ हो हो, ते ॥ ४ ॥

साकी.

यासाठीं तूं जाई वत्सा शरधनु घेउनिया हातीं ।
वधुनी येई, कळलें मजला कृतघ्न कीशाची जाती ॥ १ ॥

श्लोक.

धनू घेऊनी धांवला शीघ्रकोपें ॥ ह्मणें मर्कटा वाटलें कर्म सोपें । आतां मारितों, वारितो कोण मातें ॥ ह्मणुनी धनुष्या करि सज्य हातें ॥ १ ॥ टणत्कार तो ऐकुनी कीश भ्याला ॥ करावें कसें हें सुचेनाचि ज्याला ॥ ह्मणें हें दिसें पातलें विघ्न मोठें ॥ अला मृत्यु आतां कसा काळ लोटे ॥ २ ॥

---

१ सुग्रीव व रामचंद्र यांचे अग्निसाक्ष सख्य झाले कीं रामानें वालीला मारून सुग्रीवाला राज्य व बायको तारा द्यावी. व सुग्रीवानें सीतेचा शोध लाऊन तिला परत मिळविण्याविषयीं रामाला साह्य करावें. त्याप्रमाणें रामानें आपलें काम केलें! पण सुग्रीव आपल्या नगरांत ४ महिने स्वस्थ राहिला ह्मणून राम लक्ष्मणाला ह्मणतात. २ अग्नि.

दिंडी.

ह्मणे तारा भ्यावें न लक्ष्मणातें ॥ त्वरें अणितें वाहूनि वायुजातें ॥ करिल त्याचें तो समाधान आतां ॥ व्यर्थ वहतां कासया मनीं चिंता ॥ १ ॥

साकी.

कहत अंजनापोत[1] सुगलसे[2] धीर धरो मत घबरावो ।
मै समझाऊं लछमनजीको सबही वानर बुलवावो ॥ १ ॥

आर्या.

वायुज[3] कीशांसि[4] ह्मणें, जा सत्वर राम ज्या स्थळीं असती ।
पुसतील हेंचि कळवा, आह्मां अद्यापि भेटली न, सती ॥ १ ॥

दिंडी.

मास जाला संपूर्ण अह्मां लागीं ॥ शोध करितों ग्रामांत इतर जागीं ॥ परी नाढळली सती जानकी ती ॥ पुढें नकळे लागती मास कीती ॥ १ ॥

आर्या.

लक्ष्मणही मग तेथें, आला कोपें करूनियां सुगळा[5] ।
पाहे, घाबरला बहु, आले त्याचे समग्र आसु[6] गळा ॥ १ ॥

झुलना.

क्यंवरे भूल गया बोल ॥ मारुं थपड और धवल ॥ तबही याद अवे कौल[7] ॥ मुफत डौल दिखाया ॥ १ ॥

साकी,

सुनो सुनो लछमन महाराजा सुग्रिव गाफिल मत जानो ।
भेज दिया है कपिगण कितने मास भया सच कर मानो ॥ १ ॥

---

१ मारुतीला. अंजनीचा मुलगा मारुती. २ सुग्रीव. ३ मारुती. ४ वानरास. ५ सुग्रीव. ६ प्राण कंठीं आले. ७ वचन.

दिंडी.

ह्मणें लक्ष्मण कासया वधूं यातें । कपी पाठविले शोध करायातें । कथिन रामासी वृत्त सकळ आतां ॥ सवें नेइन सुग्रीव हनूमंता ॥ १ ॥

आर्या.

आले कपिगण पुष्कळ, तत्कालचि राम ज्या वनीं होते ।
मोडिति तरु शाखांतें, पाडिति हसडूनि भूतळीं हो ते ॥ १ ॥
करिती मर्कट चेष्टा, दाविति रामासि वांकुल्याहि तशा ।
फिरती वनांत निर्भय, करिती कोल्हाळ एकदां शतशा ॥ २ ॥
राम पुसे कोणाचे, आलां कोठूनि कार्य कळवा हो ।
विध्वंसिलें सकल वन, किमर्थ संशय समूळ पळवा हो ॥ ३ ॥

अंजनीगीत.

सीताशुद्धी करायासी ॥ सुगलें पाठविलें आह्मासी ॥ वानर गेले देशोदेशीं ॥ मासावधि क्रमली[1] ॥ १ ॥ आहे रामाची ती जाया ॥ ह्मणउनि झटतों बहु काजा या ॥ सुग्रिव तोही सिद्धचि जाया ॥ सीतेच्या शोधा ॥ २ ॥ अणखी वानर पुष्कळ तेही ॥ जातिल शोधाया ववकाही ॥ त्यांची निष्ठा रामपायीं ॥ दृढतर हें जाणा ॥ ३ ॥ परि तो रामचि न दिसे वनीं ॥ पुष्कळ शोधिली अवनी ॥ बसला जाऊनि कवण्या भुवनीं[3] ॥ नकळे आह्मासी ॥ ४ ॥

दिंडी.

राम ह्मणती तो हाचि पहा डोळा ॥ सिता विरहें जाहले प्राण गोळा । ह्मणुनि रोषें धाडिलें लक्ष्मणासी ॥ हीच चिंता तो वधिल सुग्रिवासी ॥ १ ॥

---

१ पुष्कळ. २ पृथ्वी. ३ घरीं, ठिकाणीं.

### आर्या.

लक्ष्मण पुढेंचि होता मागें सुग्रीव वायुचा तनय ।
आला कपिगण घेउनि, अंगद ह्मणतात ज्यासि मूर्त नय[१] ॥ १॥
वंदुनि लक्ष्मण सांगे, झाला वृत्तांत जो समुळ सारा ।
सुग्रिव तत्पर चरणीं, चिंता मग कासया समुळ सारा[२] ॥ २ ॥
सुगलें कपि पाठविले, मासावधिच्या करूनि नेमातें ।
प्राच्योत्तरपश्चिमदिक्[३], शोधुनि वृत्तांत जाणवा मातें ॥ ३ ॥
दक्षिण दिशेसि हनुमान्, प्रेषाया[४] सिद्ध सुग्रिवें केला ।
गेला मुद्रा घेउनि, चित्तीं तिळमात्र जो न धाकेला ॥ ४ ॥
कपिनें मुद्रा स्वमुखीं, घालुनि गिळिली क्षणांत, रामा ती ।
पुनरपि प्राप्त कशाची, वाटे होइल अतां तिची माती ॥ ५ ॥

### पद (लक्ष्मण ह्मणतो.)

मुद्रिका दिधली हनुमंता ॥ ह्मणावें काय तुह्मां आतां ॥धृ०॥ सोडुनि राज्यपदालाही ॥ अलों या वनांत लवलाही ॥ नाहीं द्रव्य इतर कांहीं ॥ होती एकचि मुद्राही ॥ दवडिली कशि पहातां पहातां ॥ १ ॥ त्यांतही असता मानव तो ॥ तरि मग मी ही मानवेंतों[६] ॥ त्यावरि विश्वासही धरितों ॥ असा हा निषेध[७] नच करितो ॥ परि ती गिळिली करीं येतां ॥ २ ॥ सुचेना उपाय मज कांहीं ॥ जाहलों दंगचि निज ठायीं ॥ केला विचार कां नाहीं ॥ करितिल बहुजन कुत्सा[८]ही ॥ लागली मजला ही चिंता ॥ ३ ॥ बोले राम गिरीवासी ॥ चुकलों बहु या समयासी ॥ करावें काय अतां यासी ॥ सुचविलें कां नाहीं मजसी ॥ येइल मुद्रा कशि हाता ॥ ४ ॥

---

१ मूर्तिमंत नीति. २ नाहींशी करा. ३ प्राच्य (पूर्व) +उत्तर-प्राच्योत्तर ४ दिशा. ५ पाठविण्याकरितां. ६ मान्य केलें असतें. ७ मनाई. ८ निंदा.

आर्या.

यापरि लक्ष्मण वदला, तरि रामाच्या मनीं नसे रोष ।
वरि वरि ह्मणती चुकलों, हा सारा मजकडेचि बा दोष ॥ १ ॥
यास्तव चित्तीं अणिलें, घ्यावा संन्यास हें बरें दिस तें ।
जातिल सुखांत बहुधा, मानावे कां न बा बरे दिस ते ॥ २ ॥
साहित्य मेळउनियां, पूर्ण करी तूर्ण कामना मांजी ।
गमतें हेंचि उचित मज, तुझिया न रुचेचि कां मनामाजी ॥३॥
रामा विहित नसें हें, सोडावा यत्न काय धीरांनीं ।
होइल गति मग कैशी, जरि दृढतर राहिली न धीं रानीं ॥४॥
सहसा आग्रह न धरी, वत्सा पूर्वींच मीं बहुत चुकलों ।
यास्तव राज्यपदाला, स्त्रीला संपत्तिलाही बा मुकलों ॥ ५ ॥
दंडकमंडलु वस्त्रें, घेउनि परिधान राम जों करिती ।
कळलें हनुमंतातें, ध्यानीं पाहे जरी अनेक रिती ॥ ६ ॥

दिंडी.

खिन्न झाला अंतरीं वायुतनय । ह्मणें केला रघुविरें फार अनेय । सिताशुद्धी कासया करूं आतां । राम झाले यतिवर्य हीच चिंता ॥ १ ॥

आर्या.

श्रीरामाच्या मतिला, केला कोणीं विशंक विभ्रम हा ।
निर्मलहृदयाकाशीं, कैसें येइल उगेंचि अभ्र महा ॥ १ ॥

साकी.

सोंच किया तब दिलमें, अपने फिसाद लछमनजुका है ।
नहिं अंदेसा करलेउंगा इलाज मेरे करका है ॥ १ ॥

---

१ दिवस. २ सत्वर. ३ माझी. ४ बुद्धि. ५ अन्याय. ६ निःसंशय. ७ भ्रम. ८ गडबड.

घनाक्षरी.

नजर तेढी अखें लाल ॥ खडे अंगपर सबबाल ॥ पिछे फडकत हैं वांल[1] ॥ जानों काल खडा है ॥ १ ॥

आर्या.

लक्ष्मणही बहु भ्याला, वाटे आतांचि हा करील गट[2] ।
ह्मणउनि श्रीरामाच्या, संनिध जायासि तो करी लगट ॥ १ ॥
राम ह्मणें जा वत्सा, आणी बाहूनि वायुतनयासी ।
दिसतो रागांत बहु, कारण तरि कोण तें नुतन यासी ॥ २ ॥

श्लोक.

प्रार्थीतसे लक्ष्मण रामराया ॥ कां धाडितां हो मजला मराया ॥
भीती मनीं फारचि वानराची ॥ तैसी नसे हो सुर वा नरांची[3]॥१॥

दिंडी.

जरी आला हनुमंत त्याच ठायीं ॥ करी वंदन दूरूनि रामपायीं ॥ मुखीं मुद्रा अंतरीं कोप वाहे ॥ क्रूरदृष्टी लक्ष्मणालागिं पाहे ॥ १ ॥

साकी.

दंड कमंडलु वस्त्रें भगवीं होतीं संनिध जीं पडलीं ।
अच्छादुनियां बोले न करी गोष्ट प्रगट जी घडली ॥ १ ॥

आर्या.

श्रीरामें पालविता[4], आला धाऊनि वानरेश तदां ।
कोठें दंड कमंडलु, वस्त्रें ह्मणऊनि न्याहळी शतदा ॥ १ ॥

दिंडी.

राम ह्मणती आलासि कासयातें ॥ मनीं धरिलें कोणत्या संशयातें ॥ सांग मजला तें वृत्त सकळ बारे ॥ क्रोधपूरित हे नयन तुझे कां रे ॥ १ ॥

---

१ पुच्छ, २ खाऊन टाकील, ३ देव अथवा मनुष्य यांची. ४ ह्मणेतें बोलाविलें तेव्हां

ओंवी

बोले हनुमत रामासी ॥ आह्मां पाठविलें शोधासी ॥ होउनि बसता तुह्मि संन्यासी ॥ अयुक्त हें सारें ॥ १ ॥ जरी न सुचती युक्ती असी ॥ तरि मीं पडतचि होतों फसीं ॥ जाउनि आणितों मी सीतेसी ॥ गति कैसी रामा ॥ २ ॥ झाला संन्यासी निजपती ॥ हें जरि कळतें सीतेप्रती ॥ जाळुनि भस्मचि करिती सती ॥ मुकतों मी प्राणां ॥ ३ ॥ कारण दुसरें तेंही तसें ॥ मुद्रेचें या मोलचि नसें ॥ मर्कट हरवीता तरि कैसें ॥ करितां तुह्मि रामा ॥४॥

पद—( राम ह्मणतात. )

( माझा भरत देखिला काय )

ह्मणसी कां मज सन्यासी, नसतां चिन्ह तसें ॥ धृ० ॥ कथिलें कोणीं तुज विपरीत ॥ नाहीं विदित कशी जनरीत ॥ अपुलें करिल कोण अनहित ॥ कष्ट अमीत भोगुनिया ॥ १ ॥ पाहिजे संमत स्त्रीचें यास ॥ घेणें उचीत मग संन्यास ॥ असतां ठावें कोण कशास ॥ व्यर्थचि त्रास सोशिल हा ॥ २ ॥ असावीं वस्त्रें भगवीलाल ॥ हातीं दंड कमंडलु माळ ॥ त्यजावें शिखासूत्र तत्काल ॥ सर्व काळ निस्पृहता ॥ ३ ॥ बोले गिरिबासी प्रभु राम ॥ जाउनि तुजला झाला याम ॥ होईल तरि हें कैसें काम ॥ व्यर्थ दुर्नाम कां करिशी ॥ ४ ॥

दिंडी.

तयीं लक्ष्मण घाबरा फार झाला ॥ ह्मणे कळला वृत्तांत कसा याला ॥ अतां होईल यावरी गती कैसी ॥ करी चिंता अंतरी फार ऐशी ॥ १ ॥ ह्मणे आतां वाचवा रामराया ॥ फार चुकलों निंदिलें कपीवर्या ॥ पुन्हां ऐसें न करीन सर्वथाही ॥ ह्मणुनि सत्वर घातली मिठी पायीं ॥ २ ॥

---

१ अनुमोदन, २ प्रहर.

पद—दादरा.

रामा दे अभयदान रक्षी प्राणासी—॥ धृ० ॥ गेला जंव नमुनि पाय, ॥ वानर, हा करिल काय ॥ हाचि धरुनि अभिप्राय ॥ निंदियलें त्यासी ॥ १ ॥ भासतसे काळसाच[1] ॥ ग्रासिल कीं काय साचं[2] ॥ प्रसंगही हा तसाच ॥ नमितों पायांसीं ॥ २ ॥ पडला हा विचार ॥ मुद्रेचें मोल फार ॥ केल्या कपिनेंचि पार ॥ होईल गति कैशी ॥ ३ ॥ बोले गिरिवासि राम ॥ करि यासी तुं प्रणाम ॥ तरि होईल सकल काम ॥ वेळ न करि यासी ॥ ४ ॥

आर्या.

नमन करुनि सांष्टागें, अपुला अपराध हा क्षमा करवी ।
यांताचि कल्याण पहां, नसतां न दिसेचि वा गती बरवी ॥१॥
केलें वंदन कपिला, तोही आंलिगनें तया सुखवी ।
दुखवील काय धीमान्[3], श्रेष्ठाचि तो वर्णितात ज्या सुकवी[4]॥२॥
मुद्रा स्वमुखीं घालुनि, तत्कालचि वानरेश गेला हो ।
गिरीवासीप्रभुस्मरणें, मार्गीं जातां अखंड घे लाहो[5] ॥ ३ ॥

---

१ काळासारखा. २ खरोखर. ३ बुद्धिमान. ४ सु=चांगले कवी. ५ लाभ.

# नळाख्यान.

पद—( द्वापर कलीस ह्मणतो. )

( गड्यानो कृष्णगडी )

द्वापर ह्मणे कलीराया ॥ करिसी कां तूं श्रम वायां ॥ घृ०॥ जाणत मूढ कसा तूं ही ॥ कळेना गोष्ट तुला कां ही ॥ राजा पुण्य[1]—कीर्ति पाही ॥ विदित हें जग[2]त्रयालाही ॥ पडाया योग्यचि हा-पायां ॥ १ ॥ चाल रे पुरें करीं आतां ॥ होइल सौख्यगृहा जातां ॥ इच्छिसी कां तूं परघाता ॥ दोष न परपीडेपरता ॥ अजवरि कष्टविली काया ॥ २ ॥ वदे कलि कां बरें घाबरसी ॥ व्यर्थ भय मनांत वागविसी ॥ थांबरे तूंचि यश वरिसी[3] ॥ होइल गोष्ट तुझी सरशी ॥ घेसी उगाचि कांघांया[4] ॥ ३ ॥ नको बहु वेळ यासि आतां ॥ पाहसिल वनासि हा जातां ॥ रडेलचि ह्मणत तात माता ॥ चुकेना आला जरी धाता ॥ आठविल गिरीवासी पायां ॥ ४ ॥

पद ( पुष्कर नळास ह्मणतो. ) चालः—गड्यानो कृष्णगडी

पुष्कर ह्मणे नळा आजी ॥ खेळूं द्यूत अणुनि *बाजी ॥धृ०॥ हरविलें त्वां जरि आपणासी ॥ द्यावें त्वरितचि स्वपणासी[6] ॥ असतो लोभ कृपणासी ॥ सांडिसिल कां तूं स्व पणासी ॥ द्यावी वस्तु जशी बाजी ॥ १ ॥ हरलों मी जरि भाकेला ॥ आहे हा जसा उभा केला ॥ देऊं कोठुनि पण केला ॥ होइन दासची

---

१ नळ, धर्मराज, जनक व परमेश्वर जनार्दन. ( पुण्यश्लोका नलो राजा, पुण्यश्लोको युधिःष्ठि पुण्यश्लोको विदेहश्च, पुण्यश्लोको जनार्दनः ॥ ) हे पुण्यश्लोक ( पुण्यकीर्ति ) आहेत. २ तिन्ही जगांला स्वर्ग, मृत्यु, पाताळ. ३ तूंच यश मिळविसील. ४ कागाळया. ५ ब्रह्मदेव. ६ स्व=पणासी राजेपणास. ७ आपण केलेल्या पणास. ८ पुष्कर ह्मणतो मी जर हरलो तर माझा देह हजर आहे दुसरें मजजवळ कांहीं नाहीं. परंतु राजा तूं पण हरलास तर त्वां मात्र सर्वस्व दिलें पाहिजे. * चौसर.



अंकियला ॥ जरि तूं होसिल या राजी ॥ २ ॥ वदे नळ याहुनि काय बरें ॥ असे मनरंजन बा दुसरें ॥ अणवितों खेळहि तूं बस रे ॥ पुरवूं अपअपुली अस रे ॥ सुचविली गोष्ट बरी आजी ॥ ३ ॥ अणउनी पाशे बळें नळ तो ॥ पेटवी सभेंत आनळें तो ॥ ह्मणे कां मंत्रि उगा जळतो ॥ काय हा विचार या कळतो ॥ नसो गिरीवासी या काजीं ॥ ४ ॥

---

९ द्यूत खेळण्याचे फासे. १० उनल=अग्नि. येथें वृत्त सुखार्थ "आ" अक्षर योजिलें आहे.

पद ( दमयंती खेद करिते ) दीपचंद काफी.

पहा किं हो गती कशी दैवाची ॥ ध्रु० ॥ पुष्कर आला कोठुनि बाई ॥ मोहिली मती नळाची ॥ १ ॥ हरिला त्यानें कोशही सारा ॥ गेलि कळाचि राज्याची ॥ २ ॥ या वरि भूमी दिधली अवघी ॥ केलि धुळधाणी प्रजाची ॥ ३ ॥ हय गज यानादिक ते ही ॥ नेली हिरुनीया साची ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु रुष्टचि झाला ॥ तरि मग आशा नसे जिवनाची ॥ ५ ॥

पद ( मुलें दमयंतीस ह्मणतात. )

माते कां गे ऐसी दंग ॥ कां तूं सोडिसि आमुचा संग ॥ आज आला काय प्रसंग ॥ सांगे झडकरि, आहे काय तरी, ॥ कळुं दे आह्मा अंतरंग ॥ २ ॥ नको लावूं पळ दिरंग ॥ केला कोणी मनोभंग ॥ झालें काय कसें, वेळ कठीण दिसे, आहे राज्याचा कांहीं भंग ॥ २ ॥ पिता बैसला निःसंग ॥ त्यजिला प्रजांनीं हि संग ॥ कोठें धाडिसि आह्मा, काय केला गे प्रेमा, कां बरें काढुनि घेसी अंग ॥ ३ ॥

दिंडी.-( माता मुलांस ह्मणते. )

ह्मणे माता बाळांसि काय सांगूं ॥ तुह्मां घेउनि मी वनीं कशी वागूं ॥ आजि पतिनें विपरीत कर्म केलें ॥ द्यूत खेळुनियां राज्य घालवीलें ॥ १ ॥ ह्मणुनि पाठवितें तुह्मां माहेराशीं ॥ रहा तेथें सुखरूप आजिपाशीं ॥ बहु बोलुनियां अर्थ नसे एव्हां ॥ कृपा हरिची होईल भेट तेव्हां ॥ २ ॥

---

१ खजाना. २ वाहनादिक. वाचण्याची आस, इच्छा.

पद. ( पुरवासी जन रडतात. ) जोगी-गझला वरिल.

रडती पुरवासी जन ते, पाहुनि भूपतिला ॥ धृ० ॥ कसा हा राजा पुण्यश्लोक ॥ प्रजाजन पाळी जैसे तोक[1] ॥ होते राजी सारे लोक ॥ दिधला शोक सकळांसी ॥ १ ॥ होता राज्याचा किती शौक ॥ दाविता रिपुला किंचित नोक[2] ॥ यावा करभारहि एक[3] ठोक ॥ पिडितिल लोक ते आतां ॥ २ ॥ वाटे माय जनां ही कीं ॥ उघडें पडतां ही झाकी ॥ करिल तें कर्म कशी काकी ॥ नच टाकील दुर कशी ॥ ३ ॥ ह्मणती गिरिवासी प्रभु नाथ ॥ झालों आजि आह्मीं अनाथ ॥ घडला प्रपंच ना परमार्थ ॥ करि तूं सनाथ या भूपे ॥ ४ ॥

पद.-( दमयंती नळास ह्मणते. ) जलद त्रिताल.

अतां मजला हो चालवेना ॥ धृ० ॥ पायीं रुतति खडे ॥ पुढें दिसंति कडे ॥ कशी जाउं तिकडे ॥ पद जिकडे घालवेना ॥ १ ॥ झाडी दिसे घनदाट ॥ मज सुचेनाचि वाट ॥ कसे डोंगर अचाट ॥ पाट वाहती लंघवेना ॥ २ ॥ कसें करूं वाटे भय ॥ व्याघ्र फिरती निर्भय ॥ कोणीं देईना अभय ॥ भयभीता मी हालवेना ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु धांव ॥ करुं कोणता उपाव ॥ आह्मां धरणि[4] न दे ठांव ॥ स्तुत भंगलें सांगवेना ॥ ४ ॥

पृथ्वीछंद-( दमयंती बोलते. )

कडे दिसती चौंकडें[5] ह्मणुनि सांकडें[6] वाटतें ॥ सुचेल कशि जावया पलिकडे कडे वाट ते ॥ पहा फिरति माकडें कशि वनांकडें धांवती ॥ अशांत भलतीकडे विफळ[7] घेतली धांव ती ॥ १ ॥

पद—[ दमयंती शोक करिते. ]

बहु शोक करी दमयंती, पति विरहें विपिनामाजीं[8] ॥ धृ० ॥ कां प्राणनाथ मज त्यजिलें, कसें निष्ठुर जाहला पोटीं ॥ काय चुकि तरि सांगा पडली, मजपासुनियां अशि मोठी ॥ दापिलें

---

१ मूळ. २ इशारत, सुचना. ३ पुरा, सर्व. ४ पृथ्वी. ५ चहुंकडे. ६ कठीण. ७ व्यर्थ. ८ अरण्य.

मला कधीं नव्हतें, प्रभुवर्या आपुल्या होंठी[1] ॥ चाल ॥ मी धुंडुनि कोठें पाहूं ॥ एकटी वनीं कशि राहूं ॥ हें दुःख कसें हो साहूं ॥ पू० चाल ॥ पाहूनि झांकिले कैसे, तुह्मी नेत्र मनीं हें डाजी ॥ १॥ कां मोकलिलें[2] मज येथें, दिधलें कीं भाष्य[3] विवाहीं ॥ कसें विसरलांत तें आजी, नसें अंतर पडलें कांहीं ॥ काय म्यां मरावें ऐसें, अलें तुमच्या चित्ताला ही ॥ चाल ॥ कसें बरें तुह्मां हें दिसलें ॥ नाहीं मजला कां हो पुसलें ॥ कधिं होते सांगा रुसले ॥पू०चा०॥ घुसलेंचि मनीं हें कैसें, मज सांडुनि जाणें आजी ॥२ ॥ आक्रोश करूनि अशि कांता[4], कांता ते धुंडित फिरली ॥ सकुमार पाऊलें सतिचीं, कांतारीं[5] फिरतां चिरलीं ॥ नसे भेट पतिची झाली, मनिं आपुल्या बहुतचि विरली ॥ चाल॥ ते कष्ट काय सांगवती ॥ उपवास कसे वर्णवती ॥ करि फेरे शाळें[7] भवतीं ॥ स्रवतीच लोचनीं[8] बाष्पें[9] गिरिवासी नसल्या राजी[10] ॥ ३ ॥

पद.–[ दमयंती संकटीं पडल्या वेळीं म्हणते. ]

माधवा ! कशि व्यसनीं पडलें ॥ तव पदीं चित्त किं रे जडलें ॥ धृ० ॥ अजगरें ग्रासिलें आज, विदित हें काय तुला सारें ॥ कशि करुणा त्यजिली हरी, पाव लवकरी करीसा[12] रे ॥ वाटे नभचि आज कडकडलें ॥१॥ जाहले वनीं बहु कष्ट, लागला नष्ट कली मागें ॥ नसे दृष्टा[13]हि जगतांमधीं, असा दुष्टधी[14], कधीं

---

१ ओठानें. २ सोडून दिलें. ३ वचन. [ अर्थे च कामे नातिचरामि ] ४ स्त्री. ५ पतिला. ६ अरण्य. ७ गळतात. ८ डाळ्यांतून. ९ आसू. १० अनुकूल. ११ प्रभु व्यंकटेश. देव होतां पाठिमोरा, नसतीं विघ्नें येती घरा. तुकाराम. १२ गजेंद्राकरितां जसा धांवला होतास तसा. १३ पाहिला. १४ दुष्टबुद्धि.

मागें ॥ कोणतें पाप वडवडलें ॥ २ ॥ लाविला तुवां किति वेळ, प्रार्थुं किति वेळ, सांग मजला ॥ दे प्रभुवर्या जिवदान, नको अनुमान कंठ सुकला ॥ नसे व्यर्थ कधीं बडबडलें ॥ ३ ॥ ह्मणे गिरिवासी प्रभुराय न आन उपाय तूज परता ॥ यासाठीं नमितें पाय करी दुर अपाय हा आतां आज फाराचि मी गडबडलें ॥ ४ ॥

कटिबंध—( ऋषि आश्रमाचा. )

पुण्याश्रम पद बहुत चांगलें ॥ भंवतालीं घनें वृक्ष लागले फळभारानें असती वांकले ॥ आम्र फणस दाळिंब शोभले ॥ नारिकेळ पोफळी जांभळें ॥ मातुलिंग जंबिर आवळे ॥ द्राक्षांचे बहु गुच्छ लोंबले पहातां सतिचें चित्त लोभलें ॥ जाई जुई पुंनाग सेवती ॥ बकुळ मोगरा सुगंध देती ॥ गुलाब फुलले बहुत शोभती ॥ अन्य किती पुष्पांच्या जाती ॥ इंद्रोद्यानां माजीं नसती ॥ मंजुरवें कोकिला बोलती ॥ हंस पारवे वृक्षीं डोलती ॥ मधुर हर्षें कितिक नाचती ॥ भ्रमर सुमीं गुंजारव करिती ॥ पुष्पा वळितुनि पाट वाहती ॥ वत्सें धेनूलागीं बाहति ॥ बघत बघत ती तसीच ठेली ॥ चिंता सर्व लयासचि गेली ॥ केली मानुनि करित विहारा ॥ कुसमें तोडुनि गुंफित हारा ॥ जावें येथुनि जरि परभारा ॥ थारा न दिसे ह्मणवुनि वारा ॥ घेत, पावली आश्रमद्वारा ॥ शयें जोडुनि या नमन-द्वारा ॥ पुसे, मुनीला वृत्तांत सारा ॥ ऐकवि त्यास आपुला दुबारा ॥ आशिर्वाद ते देउनि ह्मणती ॥ कशास करिशी दीन भणती ॥ कालेंन कष्ट दिले हे सारे ॥ गेलें त्याचें येथुनि वारें ॥ दुष्ट जनाचे असेचि धारे ॥ किंचित काळ असे गे उरला ॥ सरला जाण हरी अनुसरला ॥ पतिसह त्वरितचि निजपदा पावसी ॥ ॥ कां व्यर्थ करुनियां चिंता माते तूं गहनीं फिरसी ॥ १ ॥

---

१ अन्य, दुसरा. २ दाट. ३ इंद्र—उद्यान. इंद्राचा बाग. नंदन वन. ४ मंजूळ स्वरानें. ५ फुलांत. ६ क्रीडा. ७ फुलें. ८ हार. ९ आश्रमाच्या ओगाशें. १० क्षमस. ११ अनुकूल झाला. १२ वनांत.

पद—( मावशी दमयंतीस बोलते. )

बाई, कां गे झालिस दंग ॥ तुजवरि आहे काय प्रसंग ॥ झालें मलिन सारें अंग ॥ नाहूं घालिन आतां ॥ देई सोडुनि चिंता ॥ करिना कधीं मनोभंग[1] ॥ १ ॥ आहे सुनंदेचा संग ॥ नको दुखवुं अंतरंग[2] ॥ सुखी राहा दोघी, नित्य स्नेह ओघी, चित्त न द्या होवुं दुभंग ॥ २ ॥ अक्षइ प्रिती जडो अभंग ॥ देश शोधूं अंगवंग[3] ॥ पति भेटल तुजला, काळ अल्पचि उरला, कृपा करिल रमारंग[4] ॥ ७ ॥

पद—( भीमक आपल्या जागीं विलाप करितो. )

आतां कोठें मी पाहुं तुजला ॥ धृ० ॥ झालि कशि काय गती ॥ केवडा सार्वभौम पती ॥ गेली कशी ती संपत्ती ॥ मती-लाही भ्रंश घडला ॥ १ ॥ गेलें राज्य कसें सारें ॥ अंगि शूर-त्वाचें वारें ॥ कोणी केले काय मारे ॥ हरे कैसा क्षीण जाहला ॥ २ ॥ गेला नळ कोणीकडे ॥ केला शोध चहूं कडे ॥ कोठें शुद्धि न सांपडे ॥ घडे कैशी भेटी मजला ॥ ३ ॥ गिरिवासी आतां पाव ॥ मज सुचेना उपाव ॥ धुंडुं कोणता मी ठाव ॥ गांव न दिसे मज वहिला ॥ ४ ॥

पद—राग जोगी. ( मावशी बोलते ).

बाई अजवरि कां नाहीं, कळविलें मजलागीं ॥ धृ० ॥ सु-देवें सांगितलें महिमान ॥ होशी भीमक कन्या जाण ॥ अतां तूं झालिस गे सज्ञान ॥ नाहीं मान मज कळलें ॥ १ ॥ कन्या भगि-नीचि नसे आन ॥ होतिस फार तंइ अज्ञान ॥ स्वयंवरा नाहीं आले जाण ॥ नसें मज भान या साठीं ॥ २ ॥ पाठविन माहे-रासि तुला ॥ भोगिले कष्ट असे न तुला[6] ॥ भेट गे जाउनियां तुं मुलां ॥ शत्रु[7] तुला काय करी ॥ ३ ॥ ह्मणें गिरिवासी तूं प्रभुराय ॥ शोधी नळराजाचा ठाय ॥ होऊं देउं नको आपाय ॥ वंदितें पाय मीं आतां ॥ ४ ॥

---

१ मनाचा भंग. २ अंतःकरण. ३ भंग न पावणारी. ४ भगवान. विष्णु शोभा=लक्ष्मी ज्याच्यावर अनुरक्त आहे तो. ५ पत्ता. ६ साम्य. ७ शत्रु=कली.

अंजनागीत ( मावशी बोलते ).

माझा ह्मणें गे सुंदरी ॥ होतिस अमुच्या तूं मंदिरीं ॥ वाटे मजला गिरिकंदरीं[2] ॥ पडलें मी आतां ॥ १ ॥ कैसें करमावें या घरीं ॥ चित्तीं भरली गे हुरहुरी ॥ केलें आह्मासी त्वां दूरी ॥ बहु वाटे चिंता ॥२॥ परि तूं जातीस माहेरा ॥ पुढें पाठविलें हेरा ॥ देउनि चुकलें मी आहेरा ॥ कशि राहउं आतां ॥ ३ ॥ असो भेटे आइ बापासी ॥ आहे चित्त गे तुजपाशीं ॥ नको विसरुं तूं आ-ह्मांसी ॥ दे देणें इतुकें ॥ ४ ॥

पद—( नळ कर्कोटकास बोलतो ).

कां रे झालासि तु दीन ॥ गमसि केवळ पराधीन[3] ॥ दिसतें शरीर तुझें पीन[4] ॥ कां रे उगा असशी, प्राण न रक्षिसी, कां तुज झाला एवढा शीण ॥ १ ॥ काय झाल्या शक्ती क्षीण ॥ सर्प सारे पदविहीन ॥ परी गति त्यांची भारी, जाती पळुनि दूरी, होसी कोण्या गुणें हीन[5] ॥ २ ॥ कां रे झा० ॥

पद—जोगी. ( कर्कोटक नळास ह्मणतो ).

दयाळा संकट हें भारी जाहलों दीनच कीं ॥ धृ० ॥ अला हा वणवा मज भवतीं ॥ लागली होती बहु चिंता ॥ रक्षिल कोण मला आतां ॥ परि त्राता तूं दिससी ॥ १ ॥ व्याकुळ झाले माझे प्राण ॥ राहिल्या शक्ती अवघ्या जाण ॥ हरानें केलें तुज निर्माण ॥ दे जीवदान मजलागीं ॥ २ ॥ तुजविण बाहू कवणासी । पावेल अकांतासी[6] ॥ वाटे तूंचि दया करिशी ॥ नमन तुजसी मी करितों ॥ ३ ॥ आणिलें मनीं असें देवा ॥ करीन मी कांहीं तव सेवा ॥ चित्तिं दृढ निश्चय ठेवा ॥ नसे केवां जार[7] माझा ॥ ४ ॥ होसी मद[8] भला गाजी ॥ रक्षी या दीना आजी ॥ होइल गिरिवासी राजी ॥ विनंती माझी मान्य करा ॥ ५ ॥

---

१ दाहाणी बाई. दमयंतीची मावसी. २ पर्वताचे गुहेंत. ३ पर—आधीन. परतंत्र. ४ स्थूल. ५ उणा. ६ संकटास. ७ मेहरबानी, दरजा, ८ शूर योद्धा.

धनाश्री.–( बाहुक ऋतुपर्णास ह्मणतो. )

अलों मनीं धरुनि काम ॥ असे बाहुक मम नाम ॥ होसि राया गुणधाम ॥ पुरवि काम एवढा ॥ १ ॥ असे सारथि मी जाण ॥ नसे अन्य मज समान ॥ असे अश्व-हृदय-ज्ञान ॥ कळे मन हयांचें ॥ २ ॥ तुझी करावया जोड ॥ अलों पुरवी हें कोड ॥ करिन पाक बहू गोड ॥ अशी होड बांधितों ॥ ३ ॥ जाणें कविता आणि गीत ॥ नित्य बसेन रंजवीत ॥ तुला कळतें इंगीत ॥ नको नीत सांगणें ॥ ४ ॥ स्वगुण बोलूं नये जाण ॥ असे गोष्ट ही प्रमाण ॥ कळेल तुजला महिमान ॥ नको आन बोलणें ॥५॥

अंजनीगीत —( ऋतुपर्ण बाहुकास म्हणतो. )

बोले भूपाळ बाहुका ॥ वाटे भेटावें भीमका ॥ परि मन गमते ही बहु शंका ॥ आहे दूर जाणें ॥ १ ॥ विदर्भदेशांमाजीं दूरी ॥ आहे कुंडीननगरी ॥ जाणें होइल कैशापरी ॥ मज वाटे चिंता ॥ २ ॥ आहे भैमीचें स्वयंवर ॥ आले ह्मणती बहु नृपवर ॥ पाहूं जाऊनी सत्वर ॥ मनिं धरिली आशा ॥ ३ ॥ परि तें स्वयंवर आहे उद्यां ॥ मार्गी असती बहुतचि नद्या ॥ जाणें उल्लंघोनी सद्यां ॥ होईल कैसें ॥ ४ ॥ पडिलों विचारीं या मुळें ॥ हंसतिल राजांचीं मज कुळें ॥ इतरां सांगूं तरि मज खुळें ॥ लागलें ह्मणती ॥ ५ ॥ धरिला तुझाचि भरंवसा ॥ सांगे विचार करुं कसा ॥ नेशिल उद्यां जरी दिवसां ॥ उपकार तूझा ॥ ६ ॥ नाहीं तुजपरता या गुणें ॥ पडो देऊं नको गुणें ॥ आहे इतुकेंचि मागणें ॥ दे मजला आतां ॥ ७ ॥

पद–( बाहुक रायास बोलतो ) गड्यांनो कृष्ण०

बाहुक ह्मणे ऐक राया ॥ नेइन उद्यांचि त्या ठायां ॥धृ०॥ लागली चिंता कां एवढी ॥ नसे या गोष्टीची प्रौढी, सिद्धता असो

---

१ गुण=धाम, गुणांचें घर. २ नीति. ३ दुसरें. ४ वेड. ५ महत्व.

असो तुझी तेवढी ॥ येइन रात्र ह्मणसी जेवढी ॥ सांगणें नकोचि मज राया ॥ १ ॥ वाटेल तुला प्रशंसा[1] ही ॥ कथितों वचन मात्र साही ॥ असो तो मार्ग कठिणसा ही ॥ तुटेना मद्रथ सहसा ही ॥ नसो मज वेळ किं, हे जाया ॥ २ ॥ घटित रथ शत गावें नेतों ॥ सांग मज कोण असा ने तो ॥ जरी या कार्या मी भीतों ॥ तुला मग अभय कसा देतों ॥ जुंपू काय आतांचि हया[2] ॥ ३ ॥ प्रभू गिरिवासी दक्ष कसा ॥ उगवूं देइल कां दिवसा ॥ धरिसिल मनिं तूं हेतु जसा ॥ पुरविल निःसंशयचि तसा ॥ वाहसी चिंता कां वाया ॥ ४ ॥

पद–( भामक दमयंतीस बोलतो. ) जलद घनाक्षरी.

कथितों तुला खरें जाण । कंठिं ठेवुनि होतों प्राण ॥ होतें लागलें तुझें ध्यान ॥ काय सांगु बाई, वाटे करूं काइ, गेलें होतें सारें भान ॥ १ ॥ दिलें तुवां हें जीवदान ॥ नसे अन्यथा खरें मान ॥ बरें झालें आतां, करित होतो चिंता, झालें पाहुनि समाधान ॥ २ ॥

दिंडी—( नळाचे शोधास ब्राम्हण पाठविले त्या वेळेस. )

भिमें शोधाया विप्र धाडियेले ॥ तयांलागीं हें वचन शीकवीलें ॥ ह्मणे दमयंती त्वरित आतां जारे ॥ वदा वदतें मी वचन तसें सारें ॥ १ ॥ दिली सोडुनि निजल्याच ठायीं कांता[3] ॥ कसें गमलें हें विहित तिच्या कांता[4] ॥ कोण देइल प्रतिशब्द[5] याचि बोला ॥ तरी मजपाशीं त्वरित तसें बोला ॥ २ ॥

पद—( नळ विलाप करतो. व अन्योक्तिनें बोलतो. ) उद्धवा शांतवन कर०

तो विलाप नळ मनिं करितां, अन्योक्ती दावी ऐसी॥धृ०॥ दचकला भूप मनिं अपुल्या, ऐकुनिया वचन द्विजांचें ॥ ह्मणे कोण असा हो पापी, किति निर्दय हृदय तयाचें ॥ दुष्टानें त्यजिली कैसी, नाहीं द्रवलें चित्त जयाचें ॥ चाल ॥ वनीं निजली असतां

---

१ स्तुति. २ घोडयांस. ३ स्त्री. ४ पतीस. ५ उत्तर.

कांता ॥ नाहीं दया कशी त्या कांता ॥ पावेल कोण आकांता ॥ ॥ पू. चाल ॥ कांतारीं टाकुनि गेला, पाहिली नसे रित ऐसी ॥ १ ॥ कापिलें वस्त्र तुह्मि ह्मणतां, नाहिं जागृत केलें तिजला ॥ विपिनांत त्यागिलें मंदें, नसे अंतरीं कांहो खिजला ॥ वागतो जनामधिं कैसा, नाहिं दुःखें तिळ ही झिजला ॥ चाल ॥ मुखिं घेतां नाम तयाचें ॥ अघ यावें निश्चय वाचें ॥ तो अजुनि कसा हो वाचे ॥ पू. चाल ॥ साचेंच कथा मजपाशीं, आशि लज्जा त्यजिली कैशी ॥ २ ॥ निरविली व्याघ्र सिंहासी, कशि त्यानें अपुली दारा ॥ काय वदला नव्हता लग्नीं, चालवीन मी संसारा ॥ विसरला कसा मूढ न कळे, नाहीं दाखविला तिस थारा ॥ चा.॥ अदयता किती हो त्याची ॥ जाहली सिमा वचनांची ॥ नसे प्रतिमा त्रिजगीं याची ॥ पू. चाल ॥ त्याचीच गोष्ट मनिं आणितां, कोपेलचि तो गिरिवासी ॥ ३ ॥

पद–(दमयंती बोलते.)

सुदेवा सांगें ऋतुपर्णासी ॥ धृ० ॥ नळ तुमचे या भावें करितें, भैमी स्वयंवरासी ॥ १ ॥ आले राजे राजकुमर बहु, जाणें योग्य तुह्मांसी ॥ २ ॥ परि तो आहे उद्यांचि कीं हो, पाहा निज शक्ती बळासी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु भेटि करिल मग, आणुनि येथें नळासी ॥ ४ ॥

लावणी.—(नळ ह्मणतो.)

दमयंतीची वार्त्ता ऐकुनि हर्ष वाटला नळा ॥ स्वयंवरें खेद गमे आगळा ॥ धृ० ॥ अजवरिं नव्हती शुद्धी आणिली विप्रें बहुतां दिशीं ॥ जावें काय कसें भेटिसी ॥ प्राप्त किती यत्नानें झटले इंद्रादिक ही जिशीं ॥ केली सिमा तिनें मजविशीं ॥ विवाहकाळीं वदलों वचनें काय काय हो तिशीं ॥ न दे मी अंतर तुज दिनानिशीं ॥ त्याचें फळ हें म्यांचि दीधलें वनीं कापिला गळा ॥

---

१ स्त्री. २ पति. ३ अरण्यांत. ४ पाप. ५ झांडिली, सोडिली. ६ बायको. ७ सांगवत नाहीं.

॥ १ ॥ यथार्थ पदती निजल्याठाईं काय त्यजावें मला ॥ मंदधी क्षणहि न हा थांबला ॥ प्रयत्न केला परंतु, तिजला शोध नसे लागला ॥ ह्मणुनियां स्वयंवरविधि योजिला ॥ यांत तिचा अपराध काय हो खेद मनीं वागला ॥ खरा हा निर्दय तिस भासला ॥ धिग धिग माझें जिणें सतीचा नाहीं पाळिला लळा ॥ २ ॥ मी जरि गेलों कुंडिन नगरा, अपमानचि अखिला ॥ परि मज कोण ह्मणे वळखिला ॥ चमत्कार तरि पाहुं जाऊनि कोण परिणतो तिला ॥ वांछित होते सुरनर जिला ॥ जन्म जाहला वृथा सतिचा नाहीं काम पुरविला ॥ हरीनें प्रसंग आज दाविला ॥ गिरिवासी प्रभु आतां कुणाच्या तीस बांधितो गळा ॥ ३ ॥

लावणी–( दमयंती बोलते. )

दमयंती ह्मणें तुह्मीं ऐकिलें वृत्त असावें अर्धी ॥ त्यजिली कांता विपिना मधीं ॥ धृ० ॥ यांत नसे विपरीत जाहलें युक्तचि मज भासतें ॥ उगें कां नळासि जग हांसतें ॥ स्त्रीच्या संगें जरी तयाला सौख्य वनीं आसतें ॥ चिरिता कां हो तिचें वांस तें ॥ नसतें तरि मग कां ते योगी जन त्रासते ॥ करिते विजनीं कां वास ते ॥ कामिनि संगें शर्म पावले कोण असे ते कधीं ॥ १ ॥ कांता त्यजिली वनीं ह्मणुनियां शब्द नळा लाविती ॥ स्त्रियेचे गुण दोष न दाविती ॥ केरसुनीचा सदनीं अणितां पायगुण भाविती ॥ चिन्हें हिचीं न कां पाहावि तीं ॥ रूप चांगलें ह्मणुनि सुरनरीं मुखीं मात्र गावि ती ॥ कशि संपत्ति उगी जावि ती ॥ विवाह काळीं घटित तियेचें नाहीं पाहिलें अधीं ॥ २ ॥ इतकें मात्र ह्मणावें असो कशी ती सती ॥ रक्षणें योग्य स्त्रीच्या पतिस ती ॥ पदरीं पडल्या पवित्र ह्मणणें रीत जगीं दीसती ॥ नळें ती रक्षावी आसती ॥ परंतु दिधले कष्ट बहुतले पतिस कसे सोसती ॥ त्यागणें युक्तचि मग त्यास ती ॥ गिरिवासी ह्मणे भाग्य तुझें हें वधिलें नाहीं तधीं ॥ ३ ॥

---

१ मंद आहे बुद्धि ज्याची असा. २ वस्त्र. ३ अरण्यांत. ४ सुख. ५ पाहातात. ६ सुर=देव, नर=मनुष्य.

# भाग चवथा.

## स्फुट पदें.

पद १ ईशस्तवन नरहरी.

नरहरिराया ॥ दे स्फूर्ती निजगुण गाया । ध्रु० ॥ शिणले वेद वर्णितां चारी ॥ पडला शेषहि त्याचि विचारी ॥ तेथें मन्मति काय बिचारी ॥ गुणांसि गणाया ॥ १ ॥ ऐकिला बोल असा व्यांसाचा ॥ देसी मूकासहि तूं वाचा ॥ धरिला निश्चय तो मनिं साचा ॥ (नमितों) पाया ॥ २ ॥ करिशिल तूंचि दया जरि कांहीं ॥ तरि मग कांहिंच अघटित नाहीं ॥ शिकले ध्रुव प्रल्हाद न पाहीं ॥ कृपेची छाया ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी तूंचि दयाळा ॥ सहसा देउं नको मज टाळा ॥ लावीं निज भजनाचा चाळा ॥ यश वर्णाया ॥ ४ ॥

पद २ ईशस्तवन शंकर.

गिरिजापति शंभो त्रिपुरारी ॥ भवदुरितें नीवारी ॥ ध्रु० ॥ त्रिशूलडमरूधर मदनारी गजचर्मांबरधारी॥ गरलदाहशमना शिरिं धरिसी उडुपति[1] गंगावारी ॥ १ ॥ भुजंगांचीं भूषणें शरीरीं लेपन भस्मचि भारी ॥ नरकपाल परशांकुश धरिसी खट्वांगादिक[2] सारीं ॥ २ ॥ कर्पुरगौरा भाललोचना झडकरि पतिता तारीं ॥ पंचवदन करुणाकर शंकर स्मशानभूम्यधिकारी ॥ ३ ॥ प्रदोषकाळीं नित्य देवता पूजिति बहु उपचारीं ॥ कैलासीं स्तव करुनि नाचती गिरिवासी पदधारी ॥ ४ ॥

पद ३ उपदेश.

हरिचें नाम मुखीं नित गा रे ॥ झडकरि सुजनपथीं लागा रे ॥ ध्रु० ॥ बांधुनि करितां काय अगारें[3] ॥ देतिल दारासुत

---

१ चंद्र. २ शिवाचें एक अयुध. ३ घरें.

गुंगा रे ॥ गा रे गुण हरिला उमगा रे ॥ यमहि कुणाचा काय सगा रे ॥ १ ॥ भीतां कां तरि व्यर्थ जगा रे ॥ सोडा मंदिल पेंच झगा रे ॥ गारेपरि मानूनि नगां रे ॥ भगवद्भजनें सतत जगा रे ॥२॥ पहातां गगनीं तुझिच ढगां रे ॥ क्षणिकचि तैसी तनु उमगा रे ॥ गारेसम विघराळ बघा रे ॥ यापरि गाजति निगम नगारे ॥ ३ ॥ शीतल मानुं नका भुजंगा रे ॥ डंखितसे तो काळ जगा रे ॥ गारेंतचि लोटिलया भुगा रे ॥ होइल, संशय काय उगा रे ॥ ४॥ गिरिवासी प्रभुला बिलगा रे ॥ होउनियां नत चरणिं तगा रे ॥ गा रे यश अनुदिनिं गुंगा रे ॥ देइल कां मग तोहि दगा रे ॥ ५॥

पद ४ उपदेश.

राम दयाघन कां हो भजाना ॥ गेलें आयु मनीं उमजाना ॥ धृ० ॥ दाराधनाचा लोभ मुलांचा ॥ कां विषयाचा संग त्यजाना ॥ १ ॥ लक्ष चौऱ्यांशीं सांडुनि येथें ॥ देह नराचा प्राप्त न जाणा ॥ २ ॥ ब्रह्मसनातन मूर्ति प्रभूची ॥ नित्य निरंतर त्यासि पुजाना ॥ ३ ॥ लौकिक लज्जा टाकुनि दूरी ॥ भक्तिरसामधिं कां हो भिजाना ॥ ४ ॥ वासि गिरीचा करिल कृपा मग ॥ मुक्तिसुखासह स्वस्थ निजाना ॥ ५ ॥

पद ५ उपदेश.

हरि तुझी जेउनि सेवा गोड ॥ धृ० ॥ क्षुद्भिकळानें काय करावी तव चरणाची जोड ॥ १ ॥ अन्नमय प्रभु कोश असे हा न सुटे याची खोड ॥ २ ॥ या उदराची करितां चिंता जाहले जन बहु रोड ॥ ३ ॥ अभ्यासेंही साध्य दिसेना ह्मणतें मन हें सोड ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु काढिं अतां तूं कांहीं याची तोड ॥ ५ ॥

पद ६ ( राधेचा धांवा. कथा कृष्ण च०

यदुकुलभूषण वारिजलोचन कां रे न येसी अजूनि हरी ॥ विरहानळें तनु तापतसे करिं शांत दयाघन वर्षें वरी ॥ धृ० ॥

---

१ अलंकार. २ वितळाल. ३ वेदरूप नगारे. ४ खड्यांत, खांचेंत. ५ शरीर.

माळ गळ्यांतिल व्याल गमे गमे शीतल चंदन तापद हा ॥ मंद अमंद सुगंधित ये सुमनानिल देताचि ताप महा ॥ सुखकर प्रिय-कर ह्मणति सुधाकर तोहि करी शरिरासि दाहा ॥ जाचितसे मक-रध्वज तूं गरुडध्वज ध्वंसन शीघ्र करीं ॥ १ ॥ आंतरभाव निरंतर जाणसि कां मग अंतर आजिच रे ॥ मंचक सिद्ध असे मी अवं-चक पंचप्राण पदीं विचरे ॥ भाव असा तरि धांव न घेसि तूं हाहि स्वभाव नवीनच रे ॥ प्रार्थितसें तुजला यदुराज पदांबुज दावुनि धन्य करीं ॥ २ ॥ काय करूं घडि जाय युगासम पाय तुझे मनिं आठवितें ॥ दिनरजनीं मज नीज न ये निजदुःख मनां-तचि सांठवितें ॥ तुजविण कोणि नसे मजला मन दूतचि मी अजि पाठवितें ॥ अंकज दे सुख पंकजलोचन संकटमोचन तूर्ण करीं ॥ ३ ॥ यापरि आळवितां व्रजपाळ ये धांवुनि आळ तिची पुरवी ॥ सुखशयनीं हरिचें मुख पाहुनि दुःख समूळ मनीं तुरवी ॥ वांछित दे भजकास हरी जनमानस प्रेमरसीं मुरवी ॥ गिरिवासी प्रभु दे मति सुंदर किंकर चिंतन हेंचि करी ॥ ४ ॥

पद ७ उपदेश.

कशी मग राम करील दया ॥ धृ० ॥ जन्मापासुनि पाप आचरलों धरिलें नाहिं भया ॥ १ ॥ विषयसुखांताचि लंपट झालों नेलें वय विलया ॥ २ ॥ द्रव्यासाठीं भूपति यजिले जोडुनि नित्य श्रेया ॥ गिरिवासी प्रभु राम दयाघन स्मरलें नाहिं तया ॥ ४ ॥

पद ८ ईशस्तवन राम.

रामा मज दाखावें तूं निजपाय ॥ धृ० ॥ भवदवतापें ताप-तसें बहु न सुचे आन उपाय ॥ १ ॥ प्रणतजनावन ह्मणति तुला जागिं सुजनांचे समुदाय ॥ २ ॥ निज बिरुदातें रक्षिसि जरि तुं होइल तरणोपाय ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु तूंचि दयाघन चातक हा नतकाय ॥ ४ ॥

---

१ मदन. २ कर. ३ संसाराग्नीच्या तापानें. ४ शरणागतांचें रक्षण करणारा.

पद ९ ईश्वरस्तवन हरी.

सख्याहरी शेवट गोड करी ॥ धृ० ॥ भवजल भारी नाहिंच नौका बुडतों हातें धरीं ॥ १ ॥ धनसुतदारा आप्त सहोदर पडलों यांचे भरीं ॥ २ ॥ पतित मी पापी शरण आलों तुज दे गति मजसि बरी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु होसि- कृपाधन स्मरलों नाहिं तरी ॥ ४ ॥

पद १० उपदेश.

धरि मना साधुजनांचा संग ॥ धृ० ॥ सुतदारादिक वंचक सारे काढीं यांतुनि अंग ॥ १ ॥ विषयसुखाची धरिसि स्पृहा तरि होय कसा भवभंग ॥ २ ॥ भजन पुजन करिं चिंतन हरिचें दाविल तो निजरंग ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु आत्मा जलसा जग भासेल तरंग ॥ ४ ॥

[1]लावणी ११ उपदेश.

सोय धरुनि, जनिं विजनिं वसा परि, भवनदि पार तरा ॥ हरिगुणकीर्तनश्रवणमनन—सत्संगति तुम्ही नाव करा ॥धृ०॥ अघसलिलें परिपूर्ण दाटली, चलन-वलन मिटलें ॥ विषयवासना उसळति लाटा विवेकतट फुटले ॥ मीन अहंकृतिचे जलि शिरुनी धष्ट पुष्ट थाटले ॥ मोह लव्हाळे संसृतिजीवानिं पोसुनियां उठले ॥ चाल ॥ किति आशामगरी फिरती सैराट ॥ कितिकांसि बुडविति दाउनि अडवाट ॥ कितिएक सुटुनियां करिती बोभाट ॥ यत्न सुचेना मार्ग फुटेना जाहलें मन वारा ॥ मोघें आवर्तांमाजि फसे तो न पवे पैल तिरा ॥ १ ॥ कामिक होउनि साधनलोभें भवडोहीं बुडती ॥ कर्म घडेना सांग, पडेना पदरीं मग रडती ॥ योग याग किति भाग अर्पिती आग्रहजळिं दडती ॥ आत्मसाधनाविण सुज्ञांनी ह्मणुनि उगे उडती ॥ चाल ॥ परि देव राहिला दूर तया न कळे ॥ जरि भावरहित तरि देव कसा आकळे ॥ या

---

१ हें पद फार सुंदर असून यांतलि उपमा फार पूर्ण आहे. २ संसाररूपी जगांत. ३ वाऱ्यासारखें. ४ अनंत.

शुद्धसाधनें केंवि भवासि टळे ॥ कलियुगिं हरिचें नाम, दिसेना यात्रांचुनि थारा ॥ तरले किति तरतिल यावरि, व्रतनेमा विसरा ॥ २ ॥ गुरुपद नौका करुनि भवनदीमाजिं किती तरले ॥ भक्तिरसामधिं चित्तशुद्धीच्या योगें मन मुरलें ॥ वस्तुविचारें[1] देहिं विरक्ती होतां मन विरलें ॥ आत्मा ईश्वर समान सर्वांठायिं असें स्फुरलें ॥ चाल ॥ सर्वगतीं[2] समरूप चित्त पुरलें ॥ राहिला बोल कर्तव्य सर्व हरलें ॥ नासला भास परिपूर्ण भरलें ॥ गिरिवासी गुरुनाथपदीं अद्वैतभाव सारा ॥ जलभिन्ना त्या नसोनि दिसती जेवीं जनिं गारा ॥ ३ ॥

पद १२ उपदेश.

भ्रमरसम हरिपदकमलीं बसा ॥ ध्रु० ॥ नरतनुचा या लाभ सुदुर्मिळ प्राप्त बहू दिवसां ॥ १ ॥ गृहसुतधनकामिनिच्या योगें शेवट होय कसा ॥ २ ॥ सत्संगाची नाव करुनियां भवजल हें निरसा ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु पावतसे बहु भजकाच्या नवसा ४

पद १३ उपदेश.

प्राण्या राम भजावा रे ॥ अवघा लोभ त्यजावा रे ॥ ध्रु०॥ सुतदारादिक मायिक सारे ॥ सारे क्षणिकचि मोहपसारे ॥ अनुदिनिं करितां माझें माझें तरसिल हा भवसिंधु कसा रे ॥ १ ॥ वय घालविसी व्यर्थचि कां रे ॥ कां रे न करिसी निजसुटका रे ॥ पळ पळ पळ आयु सरल्यावरि मग प्राप्त न ही घटका रे ॥ २ ॥ क्षणिक सुखाची काय कथा रे ॥ लागे झडकरिं सुजनपथा रे ॥ थारे मन हरिचरणीं बा रे चुकती जन्ममरणवळथा[3] रे ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु करिल कृपा रे ॥ पावसि तूंही निजस्वरुपा रे ॥ पा रे ब्रह्मसुखाची खुण मग नाठविसी तूं दिवसक्षपा[4] रे ॥ ४ ॥

---

१ निरंत वस्तूचें ज्ञान. २ सर्वव्यापी–सर्वभूतांतर्गत–असा जो परमात्मा त्याचे ठायीं. ३ राशी. ४ रात्र.

पद १४ उपदेश.

मनुजा नाम हरीचें गोड ॥ धृ० ॥ न कळत ये जरि नाम मुखासी उपडी किल्मिषमोड ॥ १ ॥ हरिनामें प्रतिमेस हरीपण; संशय मनिंचा सोड ॥ २ ॥ जन्म जराभय मरण निवारुनि पुरविल वांछित कोड ॥ ३ ॥ मी देही हा भास नुरावा सकल उपाधी तोड ॥ ४ ॥ विश्वासें भज भक्तिरसानें देव दयाघन जोड ॥ ५ ॥ गिरिवासी प्रभु कां न करी मग उद्धरणाची होड ॥ ६ ॥

पद १५ उपदेश.

हरिचें पद वंदा ॥ पद वंदा ॥ सांडुनि सकलहि धंदा ॥ धृ० ॥ जन्मा येउनि तिंदा ॥ करणें काय जनाची निंदा ॥१॥ धनसुतदाराबंदा ॥ पडलां काय तुह्मी या छंदा ॥ २ ॥ अठवुनि परमानंदा ॥ उपडा कुवासनेच्या कंदा ॥ ३ ॥ गिरिवासी यम खंदा ॥ करितो पापिजनाचा चेंदा ॥ ४ ॥

लावणी १६ ( गोपींचीं गाऱ्हाणीं ) कथा कृष्णा०

या कृष्णाच्या संगतिनेंग बाई ठकलों साऱ्याजणी ॥ निवेदुं काय तुला साजणी ॥ धृ० ॥ अशा गुणाचा हा जरि कळता प्रथमाचि सरतों दुरी ॥ वाहिल दुःख कोण गे शिरीं ॥ अति ठगडा बाइ सुत नंदाचा नकळे याची परी ॥ ह्मणुनियां भुललों आह्मि लौकरी ॥ बाळपणींच्या लीला हरिच्या सांगूं मी किति तरी ॥ शिरला मोहचि अभ्यंतरीं ॥ भ्याला पाहुनि कृष्ण एकदां जल भरले रांझणीं ॥ १ ॥ यशोदेसि आह्मि वदलों याचीं गाऱ्हाणीं जसजसीं ॥ नविच एक गोष्ट करी भलतिसी ॥ मोहक वचनें हरिचीं श्रवणीं ऐकुनियां मग कसीं ॥ त्यजावीं अमृताहुनि गोडसीं ॥ यासाठीं भ्रम पडला जाहली तदाधीनता असी ॥ नसेग बाई

---

१ तीनवेळ=अनेकवेळ.

ठाउक याची दसी ॥ नित्य राहिलों पाशीं हरिच्या सोसुनियां गांजणी ॥ २ ॥ त्यानें आह्मां सुख दाखविलें रासमंडळीं अधीं ॥ क्रीडला सकल गोपिकांमधीं ॥ देहधर्म या अबलांचा जरि गर्व दाटला तधीं ॥ ह्मणुनि काय सोडावी आत्मधी ॥ अदयपणानें गुप्त जाहला नित जो प्याला दधी ॥ जणुंग बाइ वळखचि नव्हती कधीं ॥ त्यावरि हरिनें केली होती अमृताची पाजणी ॥ ३ ॥ अक्रुर मेला घेउनि गेला निमित्य झालें जरी ॥ हरीच्या मनींच व्हावें दुरी ॥ विश्वासानें बसलों त्याचें फळ दिधलें यापरी ॥ ह्मणावें काय कुणाला तरी ॥ प्राक्तन आपुलें उलटें हरिला कुब्जा दासी खरी ॥ आवडली तसीच मथुरापुरी ॥ गिरिवासीच्या नामें करितों सुकृताची मोजणी ॥ ४ ॥

पद १७ ईशस्तवन–हरी.

हरि मज देई आतां पदिं थार ॥ धृ० ॥ ताप त्रिविध हे मी किति सोसुं जड वाटे संसार ॥ १ ॥ भजन पुजन हें कांहिं न घडलें विषयस्पृहा मनिं फार ॥ २ ॥ आप्तसहोदर जरठपणीं या मानिति बहु जोजार ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु होसि दयाघन करिं यांतुनि मज पार ॥ ४ ॥

पद १८ कथा कृष्ण०

हरीला कशि तरि मी आवरूं ॥ खोडी करितो राहिचना घरिं किति तरि मागें फिरूं ॥ १ ॥ नवनीताची करितो चोरी कुठवर रागें भरूं ॥ २ ॥ गोपमुलींला अडवितो वाटें, कसें बाइ हुड लेंकरूं ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु दे गुण यासी सांग कसें काय करूं ॥ ४ ॥

---

१ रीत. २ आपलीं बुद्धि. ३ रासमंडळांत गुप्त झाल्यानंतर प्रकट झाल्यावर अमृतसुख दिलें असा याचा अर्थ आहे. ४ ओझें.



पद १९ उपदेश.

घ्या कथामृताचा घुटका हो ॥ काय भवाचा खटका हो ॥ धृ० ॥ तनुधनदारा क्षणिक पसारा प्रपंच अवघा लटका हो ॥ १ ॥ उपार्जनाचा हेतु धरुनियां देशोदेशिं न भटका हो ॥ २ ॥ लौकिक लज्जा सांडुनि सकळा नित्य हरीला हटका हो ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु तोचि करिल मग भवबंधातुनि सुटका हो ॥ ४ ॥

पद २० उपदेश.

कां नाम हरीचें गाना हो ॥ सुजनपथीं लागाना हो ॥धृ०॥ हरिल हरी हा ताप भवाचा विषयस्पृहा त्यागाना हो ॥ १ ॥ हरिप्रतिमेसी नामें हरीपण कां हें मनिं उमगाना हो ॥ २ ॥ हरि हरि ह्मणतां हरिमय होतो हरिस्मरणीं जागाना हो ॥ ३ ॥ हरि-मूर्तीचें ध्यान धरुनियां हरिचरणीं लागाना हो ॥ ४॥ हरि गिरि-वासी करिल कृपा मग अक्षय सुख भोगाना हो ॥ ५ ॥

पद २१ ( द्रौपदीचा धांवा. ) कथा पांडव०

ये सत्वर यदुनंदना दुष्टदंडना दयाधामा ॥ धृ० ॥ ओ-ढितो दुष्ट पदरास धरी न दरास मनीं कांहीं ॥ कुरुवृद्ध बैसले स्तब्ध निघेना शब्द मुखीं पाहीं ॥ पाहतें केव्हांची वाट पुराविली पाठ दुर्जनांहीं ॥ विनवितें तुला मी हरी पाव लवकरी करीं घाई ॥ आज समय दिसेना हाय प्राण घाबरा[1] पुरविं कामा ॥ १ ॥ पांडवीं हरविलें राज्य ह्मणुनि हें प्राज्य[2] दुःख मजला ॥ जाहलें प्रभो अति दीन जळाविण मीन अशा गतिला ॥ पावलें; करूं तरि काय सुचे न उपायचि मन्मतिला ॥ नको वेळ करूं यावरि प्रार्थितें हरी करुनि नतिला ॥ करीं ब्रीद आपुलें साच निवारीं

---

१ भीतीस. २ मोठें.

जाच घनःशामा ॥ २ ॥ ऐकतां अशी विनवणी यदुप निजमनीं बहु द्रवला ॥ लोटिलें ताट तत्क्षणीं, क्षणहि भक्षणीं न तो रमला ॥ धांवला अती लगबगां नावरे खगाचिया गतिला ॥ खळसभें पातला हरी अभय वैखरी अशी वदला ॥ हा आलों पाहें द्रौपदी लागली पदीं पुरितकामा ॥ ३ ॥ ओटिलें वसन तत्क्षणीं त्यांत पैठणी असे हिरवी ॥ दिसे क्षीरोदक त्यांतुनी दिव्य कांचनी प्रभा मिरवी ॥ दे वसनें अशिं दुर्जना शेवटीं सुदर्शना फिरवी ॥ झांकिली तनू पितपटीं त्यावरी दिठी कवण पुरवी ॥ प्रभु गिरिवासी महाराज राखिली लाज करुनि सीमा ॥ ४ ॥

पद २२ उपदेश.

वद वद वद मनुजा हरिनामसुरसमाला ॥ जनन मरण हरुनि करिल दूर अघतमाला ॥ ध्रु० ॥ करिसिल जरि चित्त अमल ॥ प्रभुचरणीं तेंचिं रमल ॥ मग न कधीं विषयिं भ्रमल ॥ भिवविसी यमाला ॥ १ ॥ हरिभजनीं काल क्रमल ॥ दृश्य सकल क्षणिक गमल ॥ तरिच ऐक्य स्वरुपिं जमल ॥ सांडिसी भ्रमाला ॥ २ ॥ संचित–क्रियमाण–यमळ[2] ॥ पाप पुण्य तेंहि शमल ॥ इंद्रियगण विषय वमल ॥ न गणिसी श्रमाला ॥ ३ ॥ गिरिवासी–पादकमल–॥ स्मरणीं रत स्पृहा दमल ॥ अन्य नको चित्त श्रमल ॥ साधि या क्रमाला ॥ ४ ॥

लावणी २३—रासक्रीडेची. कथा कृष्णा०

करि निशा अयनसदृशा, गोपिंची आशा पुरवि रतिदानें ॥ तें अनुपम सुख वोपिलें जगद्रतिदानें ॥ ध्रु० ॥ श्रीरंग गोपिकोत्संग वांछि, निज रंग वेणुच्या ध्वानें[3] ॥ करि प्रगट, लगट याव-

१ दृष्टी. २ जोडी. ३ ध्यान=शब्द. ( शब्दे, निनाद, निनदध्वनि, ध्वान, रवः स्वनः ॥ अमरकोश.

यासिं तीव्र जवानें ॥ तो राव भवाची वाव करी, दृढभाव ऐकतां कानें ॥ प्रभुलागिं शरण जाहल्या शुद्ध भावानें ॥ टाकिती मुलें त्या, किती सधन गृहपती, मुरलिच्या पानें ॥ अति विकळ सकळ मोहिल्या पुष्पचापानें ॥ चाल । राहिले देहाशा दुरि हो ॥ मग पती चरणा कोण चुरि हो ॥ दृढ भक्ति तयांची खरि हो ॥ पातल्या युवति रातल्या गोकुळांतल्या हरिसि, वरदानें ॥ त्या उद्धरिल्या कामिनी पतितकरदानें ॥ १ ॥ करि रास नदीतीरास, हरीशरिरा सभोंवत्या बाला ॥ जशि पुनवेच्या चंद्रासि उडुगणी माळा ॥ रंगल्या, पाहुनी दंगल्या, वृत्ति भंगल्या विसरल्या तनुला ॥ परि अभिमानें गांठिल्या पुन्हां त्या अबला ॥ राधिका जि शरारीधिका गुणाबाधिका ह्मणुनियां तिजला ॥ हरि घेउनियां जाहला गुप्त तिशीं रिझला ॥ चाल ॥ ती गर्व धरी कामिनि हो ॥ सांडिलें तिलाही वनिं हो ॥ हरि विटला बहुधा मनिं हो ॥ पाहिजे भाव राहिजे शांत, लाहिजे भक्ति सुरसानें ॥ त्यावांचुनि न घडे प्राप्ति लक्ष वर्षानें ॥ २ ॥ पाहती उभ्या राहती पादसंहती उमटल्या ठायां ॥ बहु यत्न करिति कामिनी हरिसि गाठाया ॥ कष्टल्या कितिक रुष्टल्या हरिसि, भ्रष्टल्या सुखा लाहुनियां ॥ त्या रडती वारंवार स्मरुनि हरिपायां ॥ धुंडुनी देह दंडुनी गर्व खंडुनी सकलही जाया ॥ शरणागत होउनि सिद्ध वपुसि निवटाया ॥ ॥ चाल ॥ करि रोष मनींचा दुरि हो ॥ धरि अनुकंपा त्यांवरि हो ॥ धिर देउनियां सावरि हो ॥ धांवला त्वरित पावला मेघ सांवळा बहुत नवसानें ॥ मिरवावी कांती काय पुष्पजवानें ॥ ३ ॥ प्रति प्रति गोपिकाप्रती कृष्ण-आकृती धरूनियां रमला ॥ त्या सौख्यानंदें स्वल्पकाळसा गमला ॥ श्रीहरी काम संहरी गोपिकांवरी दयाघन वळला ॥ करि शांत, प्रभु चिद्रूप तयांसीं कळला ॥

---

१ वेगानें. २ मदनानें. ३ अभिमानानें गांठिलेली नाहीं अशी, गर्वरहित. ४ पाऊलें.

कामिनी हंसगामिनी जगत्स्वामिनीपरिस त्या हरिला ॥ अप्रियकर, त्याच्या कोण दुजी मग सरिला ॥ चाल ॥ झालि प्रभात मग त्वरित हो ॥ जाति आप अपुलाल्या घरिं हो ॥ पति चुंबिति नानापरि हो ॥ परि शोक नावडे तोक त्यजुनि जनलोक सांडिलीं भानें ॥ गिरिवासि प्रभूचरणांसि शरण भावानें ॥ ४ ॥

पद २४ ( रतरे रत सख । गवक ।-ों ४। चा. ) उपदेश.

भजरे भज मनुजा हरिच्या नामा ॥ कां भ्रमसि रिकामा ॥ जोड जोड ही खोड, सोड जरि गोड विषय तुज दिवसत्रियामा[1] ॥ धृ० ॥ बहुता जन्मींचीं पापें सरलीं ॥ या नरतनु धरिलीं ॥ कारे भ्रमलासी मति कां हरली ॥ कशि दृष्टि न पुरली ॥ धाम धरुनि करि काम निरंतर नाम मुखीं घे न धरुनि कामा ॥ १ ॥ गेलें वय पळ पळ पळसिल कोठें ॥ यम मारिल सोटे ॥ खोट्या कर्मीं फळ दुर्घट मोठें ॥ कां कानीं बोटें ॥ धांव धांव धरिं भाव हरिपदीं ठांव न देतिल काका मामा ॥ २ ॥ वारे ह्मणसिल तूं निजसुत दारा ॥ तरि क्षणिक पसारा ॥ थारा स्वसुखाचा तोंवरि थारा ॥ धरितिल हा धारा ॥ तोड तोड हे पाश तुला बिनतोड बुडवितिल श्यामा[2] रामा[3] ॥ ३ ॥ नामें हरिच्या या बहुजन तरले ॥ भवसिंधु उतरले ॥ सरले देहत्रापासुनि उरले ॥ निज स्वरुपीं मुरले ॥ वासि गिरिचा नाशिल हा भव पावसि तूंही निज-सुख धामा ॥ ४ ॥

पद २५ उपदेश.

राघवनाम जपा । सतत तुह्मी राघवनाम जपा ॥ धृ० ॥ पळ पळ पळ आयु व्यर्थचि गेलें हरिगुणश्रवणिं टपा ॥ १ ॥ सुत

---

१ दिवस रात्र. २ शीतेसुखोष्णसर्वांगी ग्रीष्मे तु सुखशीतला । तप्तकांचनवर्णाभा सा स्त्री श्यामेतिकथ्यते. ३ रूपवती स्त्री.

दा।ादिक परमार्थाची करितिल हानि जपा ॥ २ ॥ दूत यमाचे येतिल जेव्हां ह्मणतिल कोण लपा ॥ गिरिवासी प्रभु रामचि तारिल ल‍क्या अन्य गपा ॥ ४ ॥

पद २६ ( गोपी यशोदेस कृष्णाचें गाऱ्हाणें सांगतात. ) कथा कृष्ण च०.

यशोदे कृष्ण तुझा ठगडा ॥ करितो नित्य व्रजीं झगडा ॥ धृ० ॥ करणी काय वदों याची ॥ भलतें भलतीला याची ॥ धरुनियां वाटचि तोयाची ॥ मागतो जकात द्या याची ॥ पडला किति याचा पगडा ॥ १ ॥ न मिळे गोरस ज्या सदनीं ॥ मारितो मुलांसि त्या वदनीं ॥ निघतें रुधिर ह्मणुनि रदनीं ॥ करितो सीमा ते रुदनीं ॥ येइल घामहि गे दगडा ॥ २ ॥ एकल्या पाहुनियां मुलिला ॥ ओढुनी अणितो गल्लीला ॥ सांगे कंदुक उचलीला ॥ धरुनियां करि कंचुकी लीला ॥ गोपिंचा मग होतो रगडा ॥ ३ ॥ अशा जरि गोष्टि परोपरिच्या ॥ कथाया कोण तुझ्या सरिच्या ॥ जातिल गोपी घरोघरिंच्या ॥ भणें गिरिवासी हरिच्या ॥ कथिला अर्थ करुनि उघडा ॥ ४ ॥

लावणी २७ नारदाची. इतिहास कृ०

श्रीहरी द्वारकापुरीं नवल बहु करी नारदा ठकवी ॥ तें चरितामृत अनुपम्य, भवगदा[2] हटवी ॥ धृ० ॥ सुरमुनी विचारी मनीं, कृष्णकामिनी बहुतशा असती ॥ जरि देइल एकचि करिन गृहामधिं वसती ॥ श्रीकांत बैसला शांत, बघुनि एकांत करितसे विनती ॥ द्या यांतुनि मजला एक सुलक्षण युवती ॥ कष्टलों, कधिंन तुष्टलों, सुखा भ्रष्टलों नको ही वृत्ती[1] ॥ गृहधर्माचीं कौतुकें मला प्रिय गमती ॥ चाल ॥ नसे कठिण तुह्मां तिळभरी ॥ कां

---

१ मागतो. २ संसाररूप रोग.

वेळ करितसा तरी ॥ द्या रुकार मज लौकरी ॥ सुकृता नसे न्यूनता सकल धन्यता बराबर पदवी ॥ हें चित्तापासुनि मन माझें मज वदवी ॥ १ ॥ श्रीरंग जाहला दंग ह्मणे निःसंग असुनि, हा चळला ॥ लय ब्रह्मानंदीं, क्षणिक सुखा कां वळला ॥ यामधीं कोण अशि सुधी त्यजुनि सुखनिधी वरिल जंठाला ॥ जा ह्मणतां, येइल कोप न कां मग तिजला ॥ नाहिं असें ह्मणावें कसें स्त्रियांचा दिसे संघ भेंवताला ॥ बहु संकट गमतें काय करूं मीं याला ॥ चाल ॥ नारदें स्मरावें मनीं ॥ बहु निंद्य कर्म हें जनीं ॥ कां अकीर्ति करूं जाणुनी ॥ परि लोभ करितसे क्षोभ, उगवतां कोंभ सुमतिचा सुकवी ॥ तें काय अलिक[1] वर्णिती निरंतर सुकवी ॥ २ ॥ यदुराज ह्मणे जरि आज पाहिजे भाज तुह्मां गुणराशी ॥ तरि कथितों इतुके मात्र श्रम करायासी ॥ जा त्वरें सकल मंदिरें पहा एकसरें अणा लक्षासी ॥ ज्या सदनिं नसे मी तीच तूमची दासी ॥ निजक्षेम गणुनि, सप्रेम वरिल हा नेम येइल सदनासी ॥ त्या वांचुनि न दिसे यत्न दुजा मग यासी ॥ चाल ॥ त्या चिंतातुर सुंदरी ॥ जाति अपुलाल्या मंदिरीं ॥ हरि करिल कुणा आज दुरी ॥ हा घोर लागला थोर, कसा शिरजोर स्वामिच्या करवीं ॥ स्त्रीदान इच्छितो, रीत काय ही बरवी ॥ ३ ॥ मुनिवरें बहुतशीं घरें धुंडिलीं त्वरें परी सहसाही ॥ हरिवांचुनि दिसला ठाव रिता ज्या नाहीं ॥ करि स्नान कुठें जपध्यान कुठें व्रतदान नित्य नेमांही ॥ कुठें जेववितो ब्राह्मणां आदरमानांहीं ॥ सुतसुता खेळवी स्वतां चालवी हातां धरुनि सुपथाही ॥ कुठें आणवितो निजसुना स्वकिय दुहिताही ॥ चाल ॥ व्रतबंध मुलाचा करी ॥ दे विवाहमंडप घरीं ॥ कुठें गृहकृत्याच्या भरीं ॥ यापरी नारदा हरी वंचना करी चरित्रें दावी ॥ गिरिवासि प्रभूची कीर्ति सतत ही गावी ॥ ४ ॥

---

१ असत्य.

लावणी २८ उपदेश.

पंचभुतात्मक देह प्राणिया आणिलासी उसणा ॥ होय वायदा पूर्ण अर्पणें स्मशानभूमि तुह्मां ॥ धृ० ॥ आप अग्नि भू तेज वायु आकाश आकाशीं ॥ मिळतां राहे सांग तदुपरि काय तुज पासी ॥ कर्मविपाकीं दंड तसे यमदंड करिल तुजसी ॥ सावध होई यास्तव जोंवरि पाशबद्ध नससी ॥ चाल ॥ देव वसे सन्निध पाहि उगला ॥ जें कर्म करिसि त्या साक्षि असे पहिला ॥ मग चित्रगुप्त ते घेति हातीं वहिला ॥ पू० चाल ॥ सूचक सर्वांठायिं असे-परि अव्हेरुनि वचना ॥ पूर्व-शुभाशुभ कर्म प्रसंगें वर्तसि स्वैर-मना ॥ १ ॥ तूं ह्मणासिल जरि देव निकट तरि गोचर कां नाहीं ॥ देइल दर्शन नित्य तसा तूं अधिकारी होई ॥ निजल्या उठवी सुप्त पुनः करि कोण असा देहीं ॥ चलन वलन दे स्फूर्ति निरंतर वागवितो पाही ॥ चाल ॥ दे स्वप्नि सूचना कर्म जसें पहिलें ॥ तें येत प्रत्यया तुवांचि अनुभविलें । कां विस्मृति माजीं शयन तुझें घडलें ॥ पू० चाल ॥ अधिकारी जरि होसि अवस्था त्रयिं तुज सुज्ञाना ॥ होय गती ती तूर्यावस्था ऐक्य मिळाग जाणा ॥ २ ॥ यालागीं तुज कथितों होई शरण सद्गुरूसी ॥ सत्सहवासें दोष—खंडणीं साधी सन्मतिसी ॥ मग ती नुपजे दुष्ट वासना, शिक्षक गुरुसंदसी ॥ करुनि अवज्ञा कोण तरे या दुस्तर-भवनदिसी ॥ चाल ॥ मग सहजचि लाभे चित्त शुद्धिवापा ॥ त्या भक्तिबळें भवमार्ग होय सोपा ॥ अद्रोह तितिक्षा येतिल तव समिपा ॥ पू०

---

१ हें पद फारच अप्रतिम आहे. पंचदशी, योगवासिष्ठ इत्यादि ग्रंथांतून जें आत्मज्ञान सांगितलें आहे तें या पदांत फार थोडक्यांत व सुलभ रीतीनें सांगितलें आहे. आत्मसाक्षात्कार झाल्यावांचून अशारीतीनें उपदेश करतां येणें शक्यच नाहीं. २ कर्मविपाक नांवाच्या ग्रंथांत सांगतल्याप्रमाणें. ३ निद्रेनें. ४ जागृत, स्वप्न व सुषुप्त या तीन अवस्था. ५ तीन अवस्थेच्या पलीकडील अवस्था. ६ गुरु हाच एक उत्तम खड्ग असतांना. ७ द्रोहरहित स्थिती. ८ क्षमा.

चाल ॥ सर्वांभूतीं समतां योगें पूर्णब्रह्मभुवना ॥ पावुनियां गिरिवासी प्रभुपदिं ठेवि एक भाना ॥ ३ ॥

२९ लावणी – उपदेश.

लक्ष चौऱ्यांशी फेर फिरुनिया शिणलासी भारी ॥ या नरदेहीं साधन करितां सरेल भववारी[1] ॥ धृ० ॥ जल बुद्बुदवत् देह अशाश्वत मानुनि हेंचि करी[2] ॥ सुत-दारा-धन-गेह-दुराशा सांडुनि होइ दुरी ॥ याच उपाधीसाठिं वासना पुनरपि देहधरी ॥ सत्संगीं मन योजि निरंतर भगवद्भजन वरी ॥ चाल ॥ किति वेळ करावी यातायात असी ॥ बा कां रे नुमजसि यम दंडिल तुजसी ॥ कां कष्टसि दाटुनि भारवाह होसी ॥ पू० चाल ॥ उत्पत्तिस्थल, कोण अलों कोठूनि, असें विवरी ॥ व्यर्थ अहंकृतिमाजि गुंतल्या भ्रमासिल कलवरी ॥ १ ॥ काम क्रोध मद दंभ अहंकृति मत्सर हे साही ॥ निवटुनियां धरि शांति दया समबुद्धि सर्व ठायीं ॥ बंध मोक्षणा हेतु असे मन शोधुनियां पाही ॥ देहिं विरक्ती होतां होइल साध्य सर्व कांहीं ॥ चाल ॥ जरि भावें गुरुपदिं शरण होसि आधीं ॥ तरि सुटतिल सहजचि संसृतिच्या[3] आंधी[4] ॥ मग होइल दर्शन तोचि योग साधी ॥ पू० चाल ॥ जनन मरण किति वार भोगिसी अपदा या वारी[6] ॥ अल्पायासीं लक्ष पुरविल्या तुटेल भव दोरी ॥ २ ॥ शोध मुळाचा करुनि पाहिल्या सुजाण तूं होसी ॥ येइल प्रत्यय सगुण रुपाला निर्गुण गुण पोशी ॥ त्वं पद नाशें तत्पद प्राप्ती होतां सुख घेसी ॥ पुंन-

---

१ संसार हेंच पाणी. २ विचार कर. ३ ससाराचें. ४ दुःखें. ५ आसक्ती. ६ निवारण कर. ७ पुनर्जन्म. अथवा वृत्तींचें पुनः उत्थान.

टीप—सगुण ध्यानानेंच निर्गुणप्राप्ती कसी होते व नंतर वृत्तींचें उत्थान नाहींसें झाल्यावर तत्त्वमसि या महावाक्याचा अनुभव निर्गुणप्राप्ती कसी होते हें या पदांत फार थोडक्यांत व सुलभपणें सांगितलें. अशा रीतीनें सांगणें हें आत्मानुभवावांचून शक्य नाहीं.

रावृत्ती मावळल्या वरि " असि " पदीं राहसी ॥ चाल ॥ हे बंधमोक्ष तूं अनुभविशिल सारे ॥ अनुपम्य तृप्तिचा लाभ घडे बारे ॥ अनिर्वाच्य सुखामधिं शब्द समुळ हारे ॥ पू० चाल ॥ गिरिवासी गुरुनाथ पदीं ठेवूनि वृत्ति सारी ॥ नित्य-तृप्तिच्या योगें भोगी अखंड सुख लहरी ॥ ३ ॥

३० लावणी—उपदेश.

नरदेहाची प्राप्ति सुदुर्मिळ अवचट तुज लाभली ॥ तरिच ही भवतरणाला भली ॥ धृ० ॥ बा[३] माळेचा मेरु तसा नर-देह हतां लागला ॥ अतां तरि हो सावध चांगला ॥ लक्ष चौऱ्यांशी मणि फेराया कष्ट जाहले तुला ॥ पाहतां नाहिंच कीं ज्या[४] तुला ॥ आरंभ येथुनि शेवटही मग होतो त्याचा भला ॥ सदोदित हरिभजनीं जागला ॥ नव[५] रंध्रेंहीं मात्र रोधुनि करि दृढतर चांगली ॥ १ ॥ विषयोदक परिपूर्ण त्यांत ही घालुनि फुटकी तरी ॥ उतराशिल कसा भवांबुधि तरी ॥ तूं नावाडी खरा तथापी सावध नसल्यावरी ॥ बुडेलचि विशंक मग लौकरी ॥ काम क्रोध मद लोभ त्यजुनिया दूर वासना करी ॥ पावशिल अन यास त्या

१ दरपतो, नाहींसा होतो. २ नाव, नौका. ३ या कडव्यांत फार उत्तम तत्व सोप्या रीतीनें सांगितलें आहे. जपाच्या माळेची उपमा फार समर्पक व समजण्याला सोपी आहे. माळेला मेरू ह्मणून मणि असतो व त्याचें उल्लंघन करूं नये असें शास्त्र आहे. मेरूपासून माळ फिरवावी व मेरूपर्यंत आले ह्मणजे पुनः उलट जाऊन मेरुपर्यंत जावें असा नियम आहे. कवीनें नरदेहाला मेरूची उपमा दिली आहे. पंचदशींत सांगितल्याप्रमाणें चैतन्य हें मायेमध्यें प्रतिबिंबित झालें ह्मणजे ईश्वर होतो व तेथून सार्वभौतिक सृष्टीला प्रारंभ होतो व शेवटीं नरदेह उत्पन्न होतो. नरदेह उत्पन्न झाला ह्मणजे ज्ञानप्राप्तीचे साधनांचा त्याला उपयोग करतां येतो व तो तसा उपयोग करूं लागला ह्मणजे मग अखेरीस जन्ममरणाची माळा सुटून तो मुक्त होतो. त्या मार्गाला न लागतां व कवीनें सांगितल्याप्रमाणें 'नवरंध्र' ह्मणजे हीं ज्ञानकर्मेंद्रियें जर सोडिलीं नाहींत तर पुनः उलट माळ जपावी लागते ह्मणजे पुनः अधःपतन पावतो. ४ साम्यता, तुलना. ५ नेत्र, कर्णादि नवरंध्र ह्मणजे यांच्याठिकाणीं असलेलीं इंद्रियें.

तिरीं ॥ हरि भक्तीचे नवविध[1] बोळे घालुनि मग हांकली ॥ २ ॥ विमळ[2] मनाचें शीड उभारुनि घालि जला भीतरीं ॥ हरीचें नाम समिर[3] हितकरी ॥ वेळ काय भव तरावया असि युक्ति साधिल्यावरी ॥ दिसेलचि मृगजळ भानूकरीं[4] ॥ अल्पायासें महल्लाभ हा टाकुनि देशिल जरी ॥ पुन्हा ही प्राप्त कशाची तरी ॥ भवभीतांनीं प्रथम पाहिजे सत्संगति[5] जोडिली ॥ ३ ॥ धेनू पासुनि दुग्ध असे हें पुष्कळ ठावें जरी ॥ क्रियेविण तेंहि न ये निजकरीं ॥ जग-व्यापक हरि तसा असें हें ज्ञान जांहलें तरी ॥ पाहिजे उपासना दृढ बरी ॥ सर्वांभूतीं समता, तरि मग हरीच सर्वांतरीं ॥ स्वात्मता अनुभव घे त्यावरी ॥ गिरिवासी प्रभु दयाळ वरती करिल कृपा माउली ॥ ४ ॥

पद ३१. ईशस्तवन—परमेश.

हरि-हर-विधि देव सकल तूंचि जगपसारा ॥ मायामय दृश्यपणें करिसि खेळ सारा ॥ धृ० ॥ वासनादि-रूप कर्म ॥ करिति तेचि चुकति वर्म[6] ॥ प्राप्त तयां केंधि शर्म[7] ॥ कवळिती[8] असारा[9] ॥ १ ॥ करिति कर्म जसें जसें ॥ देसी त्यां फलहि तसें ॥ मूर्तित्रय याचि मिसें ॥ तूंचि अरुप सारा[10] ॥ २ ॥ नेणुनि तुजलागि हरी ॥ विवश कर्म फलावरी ॥ स्पृहा धरुनि घेति शिरीं ॥ जन्म-मरण-भारा ॥ ३ ॥ निर्निमित्तें[11] भजन धरी ॥ धरिसी त्या अभय करीं ॥ बिरुदातें सत्य करी ॥ दाखवि निज-थारा ॥ ४ ॥ गिरिवासी तूंचि हरी ॥ करिसी कां वेळ तरी ॥ भवजलांत होय तरी[12] ॥ उतरवि परपारा ॥ ५ ॥

---

१ श्रवण कीर्तनादि भक्तीचे नवप्रकार. २ शुद्ध, मल ह्मणजे रज व तम यांच्यापासून उत्पन्न होणारे दोष. ३ वारा. ४ सूर्यकिरणाच्या योगानें. ५ सत्संगतीचें महात्म्य या कडव्यांत सांगितलें आहे ६ बीज, मुद्दा. ७ सुख. ८ चिकटून राहतात. ९ ज्यांत अर्थ नाहीं अशाला. १० सर्व. ११ निष्काम. १२ नांव, नौका.

### पद ३२ उपदेश.

रमानाथ-पदीं भाव तुह्मी कां हो धराना ॥ धृ० ॥ हेमीं नगं भिन्न नसे ॥ हरिस्वरुपीं जगहि तसें ॥ होयं तसी सोय धरुनी ॥ अनुदिनिं हरि-स्मरण कराना ॥ १ ॥ चाळक विश्वासि हरी ॥ निज सूत्रें खेळ करी ॥ भजन करुनि विजन धरा ॥ सुजन पथा नित्य वराना ॥ २ ॥ सर्वांतर्यामिं वसे ॥ परि सहसा लिप्त नसे ॥ जाणुनि हरिलागि असे ॥ त्वरितचि भवसिंधु तराना ॥३॥ करिती जे कर्म जसें ॥ देतो हरि फळहि तसें ॥ सदाचरण वृत्ति धरुनि, जगतीवरि सतत फिराना ॥ ४ ॥ प्रभु गिरिवासीच हरी ॥ पावन पतितासि करी ॥ ध्यानिं धरुनि मूर्ति सगुण, पूजन करुनि हृदयिं धराना ॥ ५ ॥

### पद ३३. उपदेश—आत्मानुभव.

मजला हें कळलें, हें कळलें ॥ ब्रह्म जगीं या भरलें ॥धृ०॥ प्रळयिं सुषुप्तीं काळीं ॥ न उरे जीवदशा नीराळी ॥ १ ॥ तमोलीनता चित्तीं ॥ यास्तव नाहिंच आत्मप्रचीती ॥ २ ॥ तूर्या समाधि जेव्हां ॥ अनुभव पूर्ण असे मग तेव्हां ॥ ३ ॥ गिरिवासी-प्रभु-भक्ति ॥ करितां कळुनि सहजचि मुक्ति ॥ ४ ॥

---

१ दागीने व सोनें भिन्न नाहीं. २ होईल तसी सोय करून दररोज हरिस्मरण करावें. ३ एकांत सेवन करा. ४ प्रलयकाळीं, सुषुप्ती ह्मणजे गाढ झोपेंत जीवाचा निराळेपणा नाहींसा होतो पण त्यावेळेस तमोगुणप्रधान असल्यामुळें जीव हा आत्म्यांहून निराळा नाहीं असा अनुभव येत नाहीं. पण तूर्यावस्थेंत समाधिकाळीं तमोगुण नसल्यामुळें आत्मा व जीव यांचें ऐक्य परिपूर्ण अनुभवाला येतें. आणि याला सुलभ मार्ग कोणता, तर कवी चौथे कडव्यांत सांगतात गिरिवासी प्रभूची भक्ती केली ह्मणजे सहजच मुक्ता ह्मणजे जीव व आत्मा यांचें ऐक्य अनुभवाला येतें. या पदावरून कवीला जीवात्मैक्यानुभव आलेला दिसतो.

पद ३४. उपदेश.

भजसि कां न मानवा ॥ शरण, तरिच तरण भवीं ॥ सोडि व्यर्थ वानवा ॥ ध्रु० ॥ सगुण अगुण तोचि हरी ॥ लक्षुनिया भजन करी ॥ विषयांच्या पडुनि भरी ॥ जन्म घेसि कां नवा ॥ १ ॥ स्थिरचरांत तोचि हरी ॥ व्यापुनिया खेळ करी ॥ सहसा शंका न धरी ॥ तेंचि तेज भानवा ॥ २ ॥ विधि-हरि-हर तोचि हरी ॥ सृष्टिस्थिति विलय करी ॥ उद्धरिला पशुहि करी ॥ मर्दि दुष्ट दानवा ॥ ३ ॥ गिरिवासी तोचि हरी ॥ चिंतुनिया ध्यान करी ॥ होइल तुजलाहि तरी ॥ प्रभु अनादि आनवा ॥४॥

पद ३५. उपदेश.

अवघा हरि भरला, हरि भरला ॥ त्याविण ठाव दिसेना उरला ॥ ध्रु० ॥ प्रल्हादें हट धरिला ॥ नरहरि स्तंभांतचि अवतरला ॥ १ ॥ विधिचा संशय हरला ॥ वत्सप वत्सरूप जंव ठरला ॥ २ ॥ ज्याचा निश्चय पुरला ॥ त्याला स्थिरचर-व्यापी स्फुरला ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु वरिला ॥ ज्यानें, तोचि भवांबुधि तरला ॥ ४ ॥

पद ( अभंग ) ३६. प्रार्थना-ईशस्तवन.

धारिला संसार देवासी ॥ नाहीं कारण तयासी ॥ ध्रु० ॥
कन्या पुत्र आणखी दारा ॥ अवघा त्याचाचि पसारा ॥ १ ॥
नलगे धन दौलतही कांहीं ॥ हरिचें नाम पुरें मज पाही ॥ २ ॥
गाईन गुण मी हरिचे वाचें ॥ देइ नित्य प्रेम भजनाचें ॥ ३ ॥
इतुकें करि गिरिवासी राया ॥ वंदिन नित्य तुझ्या पायां ॥ ४ ॥

---

१ शंका २ सूर्यामध्यें. ३ हत्ती. गजेंद्र मोक्ष केला. ४ नाव. ५ पुरातन, अनघ. ६ हट. ७ गोपाळकृष्ण.

### लावणी ३७—उपदेश.

देखत भुल ही कशी कळेना वय घालविलें वृथा ॥ अतां तरीं अवलंबी सत्पथा ॥ धृ० ॥ काका गेला मामा मेला बाप अजाही तसा ॥ तथापि तुमजसि बारे कसा ॥ माय मावशी काकी मामी होती तुजला स्वसा ॥ पडावा भ्रम तरि कां मग असा ॥ इष्टमित्र किति अमित्र मेले रात्रिं तसें बहु दिसां ॥ मानिसी तुंचि कसा भरंवसा ॥ गात्रें झालीं शिथिल, कोणती[1] काय राहिली तथा ॥ १ ॥ पुत्र कलत्रासाठि जोडिसी कनक[2]-नगा जोंवरि ॥ ह्मणतिल बसा पलंगावरी ॥ जर्जर झाल्या कोणि पुसेना काय कसें क्षणभरी ॥ पडावें काय अशांच्या भरी ॥ पाश यमाचे कंठी पडल्या[3] कोण सोडविल तरी ॥ हरीचें नाम भवांबुधिं तरी[4] ॥ आजवरि नाहीं तुवां सेविली हरि-चरितामृतकथा ॥ २ ॥ क्षण-भंगुर ही काया विलया जाईल बा लवकरी ॥ करीरे साधन नि-जहित करी ॥ क्षणिक सुखाच्या स्पृहा धरुनियां जन्म घेसी कां तरी ॥ जिवाला होतील या कातरी[5] ॥ "मी माझें" हें घातक तुजला कळवावें किती-तरी ॥ नको हा भार शिरीं उतरी ॥ गिरि-वासी-प्रभुलागिं न भजतां जाहली तुज भवव्यथा[6] ॥ ३ ॥

### पद ३८. उपदेश.

#### कालंगडा—भारी संकट हरी रामाजींचें.

वद रे वद मनुजा नाम भवाचें[7] ॥ भय न धरि भवाचें[8] ॥ क्षणभंगुर तनु जाइल विलया मिरविसि भूषण कां विभवोचे[9] ॥ बारे, अभिमानें बुडसिल वाया ॥ दे सोडुनि बा, या ॥ काया काळाची इस अटकाया ॥ जागें कोण असा या ॥ चाल ॥ "मी माझें"

---

१ अर्थ. सार, तत्व. २ सोनें, दागिने. ३ पडल्यावर. ४ नाव, नौका. ५ कातर, कापणाऱ्या कैच्या. ६ संसाराचा रोग. ७ शंकराचें. ८ संसाराचें ९ वैभवाचें, संपत्तीचें.

हें घातक सोडुनि नाम सतत घे या शुभ वाचें ॥ १ ॥ कांरे भु-ललासी या विषयाला ॥ मानी विष याला ॥ झाला बहुतांचिरे नाश वयाला ॥ यम घालिल घाला ॥ चाल ॥ हो सावध, धरि-सुजन-समागम, कथितों गुज हें स्वानुभवाचें ॥ २ ॥ गर्भी बहु झाले कष्ट तुलाही ॥ नाठवती कांहीं ॥ ठायीं मूत्राच्या वास स-दाही ॥ दुर्गंधच पाही ॥ चाल ॥ या नरदेहीं साधन केल्या हो-इल खंडन पुनर्भवाचें[1] ॥ ३ ॥ सांगूं, किति हित हें मी तुज आतां ॥ सोडी ही ममता ॥ भ्रमतां संसारीं दुःखचि पाहतां ॥ कां धरिसि अहंता ॥ चाल ॥ गिरिवासी प्रभु चरणीं लोळे ध्यान धरी त्या असंभवाचे[2] ॥ ४ ॥

पद ३९. उपदेश.

रसने[3], नाम हरीचें गाई गे ॥ धृ० ॥ लौकिक-वार्ता सांडुनि सकला, हेंचि करी तूं बाई गे ॥ १ ॥ घडि घडि नाश वयाचा जाणुनि करित असे तुज घाई गे ॥ २ ॥ भव-जल भारी नाहिंच नौका शरण प्रभूला जाई गे ॥ ३ ॥ प्रार्थितसें मी याचि निमित्तें हरिपदीं सुस्थिर राहीगे ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु भेटविसी जरि देइन पेढा मिठाई गे[4] ॥ ५ ॥

पद ४०. उपदेश.

कलियुगीं नाम हरीचें सार ॥ धृ० ॥ जपतप साधन कांहिंच न घडे, मन चंचल अनिवार ॥ १ ॥ उदराची बहु चिंता वाटे, व्यवसायी जन फार ॥ २ ॥ जातां येतां उठतां बसतां, गावें वारंवार ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु करिल कृपा मग, देइल चरणीं थार ॥ ४ ॥

---

१ पुनर्जन्माचें. २ अजन्मा जो ईश्वर त्याचें. ३ हे जिव्हे. ४ लहान मुलाप्रमाणें जिभेला गोड खाण्याची चटक लागली आहे ह्मणून तिला लालूच दाखवून कवी ह्मणतात.

पद ४१. उपदेश.

धरि मना हरिचरणीं विश्वास ॥ धृ० ॥ नरतनुचा या लाभ सुदुर्मिळ, विष मानी विषयास ॥ १ ॥ तरले बहु जन नामें हरिच्या, नलगे योगाभ्यास ॥ २ ॥ भजन पुजन करि ध्यान निरंतर, सोडि इतर हव्यास ॥ ३ ॥ गिरिवासी-प्रभु-देव दयाघन, देतो गति भजकांस[1] ॥ ४ ॥

पद ४२ उपदेश.

हरिचें नाम मुखीं गरजारे ॥ झडकरि विषय सुखा वरंजारे[2] ॥ धृ० ॥ गेला पहातां बाप अजारे ॥ पडली भ्रांति कसी तुम-जारे ॥ जारे हरिला सतत भजारे ॥ सोडविना जागिं कोणि तुजा रे ॥ १ ॥ त्यागुनि दारा सुत अनुजारे[3] ॥ सत्संगीं मन योजित जारे ॥ जारे हरिस अकाम[4] पुजारे ॥ चित्तीं आणुनि चारि-भुजारे ॥ २ ॥ उद्धरिलें पशुमाजि गजारे ॥ भ्रष्ट अजामिळ नाम द्विजारे ॥ जारे भक्तिरसांत भिजारे ॥ अन्य साधनें समुळ त्यजारे ॥ ३ ॥ करणें गोष्पद भवाब्धि ज्यारे ॥ कथिलें सारचि हें समजारे ॥ जारे प्रभु गिरिवासि येजारे[5] ॥ भीतो फारचि रविसुतें[6] ज्यारे ॥४॥

४३ उपदेश.

प्रीति धरी हरि पायिं मना ॥ धृ० ॥ गृहसुतधन कामि-निच्या योगें भीसी काय जना ॥ १ ॥ क्षणिक सुखाच्या धरिसि स्पृहा बहु सांडुनियां भजना ॥ २ ॥ हरि मूर्तीचें ध्यान धरित जा नित्य करी पुजना ॥ ३ ॥ भवभयहरणासाठीं निरंतर प्रार्थित जा सुजनां ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु करिल कृपा मग जाणें नच विजना[7] ॥ ५ ॥

---

१ भजणारास. २ सोडा. ३ भाऊ. ४ निष्काम, स्वार्थरहित. ५ यजन करा ६ यम. ७ अरण्यांत, एकांतांत.

पद ४४. उपदेश.

होइ मना सावध यासाठीं ॥ धृ० ॥ नरतनुचा लाभचि दुर्मिळ, बहु दिवसा गांठी ॥ १ ॥ पळ पळ पळ आयु जाइल वाया काळ असे पाठी ॥ २ ॥ सुतदारादिक काय मिळविली भंवताली दाटी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम दयाघन आळवि परिपाठीं ॥ ४ ॥

पद ४५ उपदेश.

मनुजा प्रीति धरी हरिपायीं ॥ धृ०॥ पळ पळ पळ आयु जात असें हें अनुदिनि हरिगुण गाई ॥ १ ॥ तनु-धन गृह सुत दार सकळही राहिल ठायिंचे ठायीं ॥ २ ॥ क्षणिक सुखाच्या याचि वासना प्रति भविं पडती डाई ॥ ३ ॥ जनन मरण कितिवार भोगिसी सांडिसि कां न धिटाई ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभुलागिं करित जा उद्धरणाची घाई ॥ ५ ॥

पद ४६. उपदेश.

अब मुझे रामबिना नाहिं काज ॥ धृ० ॥ जोरू लडके आप्त सहोदर मानत जरसे[1] आज ॥ १ ॥ इस जर[2] खातर उमर गमाई भूप किये सरताज[3] ॥ २ ॥ भजन पुजन नहिं ध्यान प्रभुको मारेगो जमराज ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम दयाघन राखे वोही लाज ४

पद ४७ उपदेश.

मना क्षणिक सुखालागिं कसा होसि बावरा ॥ धृ० ॥ सुजन संग नित्य धरी ॥ हरि चरणिं भाव धरी ॥ कथिलें बहुधाहि

---

१ खेळांत २ पैशामुळें. ३ डोक्यावर बसविले.

तरी ॥ कां रे हावरा ॥ १ ॥ नरतनुचा लाभ किती ॥ कष्टें त्या नाहिं मिती ॥ तरि धरिसी कां न भीति ॥ भज रमावरा ॥ २ ॥ शिकवूं तुज काय कसें ॥ क्षणभंगुर कां न दिसे ॥ गुणश्रवणीं वदसि असें ॥ "[1] त्वरित आवरा ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभुसि 'नमी' ॥ ह्मणतां ह्मणतोसि न मी ॥ यम सदनीं नरक तमीं ॥ पचसी पामरा ॥ ४ ॥

पद ४८. उपदेश.

करि मना राम पदाची जोड ॥ धृ० ॥ "मी माझें" हें घातक पाही, सोडि अतां ही खोड ॥ १ ॥ क्षणिक सुखाची त्यागि वासना, जरि वाटे तुज गोड ॥ २ ॥ जन्मुनिया किति वार मरावें भवबंधन हें तोड ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम दयाघन भजनें पुरविल कोड ॥ ४ ॥

पद ४९. उपदेश.

हरी-भजन धरुनि सुजनपथीं घुसाना, रे ॥ काम क्रोध लोभ रिपू त्यजुनि असाना, रे ॥ धृ० ॥ वाल्हा कोळि वाल्मिक झाला ॥ उलट्या नामें प्रताप केला ॥ उक्त जपुनि नाम-माला ॥ भावें कसानारे ॥ १ ॥ अजामेळ पापी भला ॥ पुत्रस्नेहें झळंबला ॥ अंतकाळीं मुक्त केला ॥ हरितें पुसानारे ॥ २ ॥ व्रजनारींचें सां-कडें ॥ निवारिलें हो रोकडें ॥ भक्तिबळें हरी पुढें ॥ तुह्मिही रुसानारे ॥ ३ ॥ पुत्र दारा धन गेहें ॥ शरिर तेंहि क्षणिक आहे ॥ ध्यास दूर करुनिया हे ॥ प्रचितिं धसाना रे ॥ ४ ॥ मग सुखा

---

१ प्रभुचें गुणवर्णन ऐकलेंस ह्मणजे हावऱ्यासारखा 'माझें संकट दूर करा' ह्मणून ह्मणतोस, पण पुढच्या कडव्यांत म्हटल्या मागें, जोंपर्यंत गिरिवासी प्रभुला 'नमी' (नमस्कार कर) असें ह्मटलें ह्मणजे 'न मी' (मी नाहीं नमस्कार करणार) असें ह्मणतोस. तोंपर्यंत नरकांत पडावें लागेल.

काय उणें ॥ अपणीया आप जाणें ॥ अनुभवुनी याचि गुणें ॥ स्वरुपीं वसानारे ॥ ५ ॥ गिरिवासीं तोचि हरी ॥ आटवील भव वारी ॥ गुरूपद सेवा शिरीं ॥ तरिच फसानारे ॥ ६ ॥

पद ५०. उपदेश.

अब मोहे रामचरनकी आस ॥ धृ० ॥ कांता बोले नाथ हमारो, जबलग पैसा पास ॥ १ ॥ कौन किसीका भाई बेटा, सबही माने त्रास ॥ २ ॥ जोहि मुझें कोइ राम दिखावे, पकडूं उसकी कास ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम जगतका, वाळी मैं हूं दास ॥ ४ ॥

पद ५१. उपदेश.

हा रे, पंढरिनाथ पहारे ॥ या भीमेंत नहारे[1] ॥ पुंडलिकासि बहारे ॥ पुलिनीं[2] याचि रहारे ॥ द्रव्य बहुतसें गाठीं नलगे तुलसी अबिर वहारे ॥ १ ॥ कां रे, संसारीं भटकारे ॥ देहाचि हा लटकारे ॥ यम देइल झटकारे ॥ उमजाना झट कां रे ॥ "मी माझें हें घातक प्रभुविण कोण करिल सुटकारे ॥ २ ॥ जा रे, विषय सुखा वरजारे ॥ करितां कां गमजारे ॥ हित अपुलें समजारे ॥ तारक नाहिं दुजारे ॥ संत समागम धरुनि विठूचें नाम मुखीं गरजारे ॥ ३ ॥ या रे होतो नाश वयारे ॥ कां धरितां निलयारे[3] ॥ काशी हींच गया रे ॥ दर्शन होय जयारे ॥ गिरिवासी प्रभु विठल त्यावरि करितो पूर्ण दयारे ॥ ४ ॥

पद ५२. ईशस्तवन–राम.

अब मोहे राम भजनसे काम ॥ धृ० ॥ धन दौलत मुझे कछु नहि होना, कांता सुंदर धाम ॥ १ ॥ येहि अपेछा जनम

१ स्नान करा. २ वाळवंटांत. ३ घर.

लेत है, मुख नहि प्रभुको नाम ॥ २ ॥ धुंडत हुं मै विमल साधको, बतलावे घनःशाम ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु रामचरनपर, नमन करूं अटजाम[1] ॥ ४ ॥

पद ५३. ईशस्तवन-हरि.

अतां मज भेटेल केविं हरी ॥ धृ० ॥ जन्मापासुनि हित नच केलें, कळलें होतें जरी ॥ १ ॥ विषयसुखात्मक भोग वासना, धरिली नित्य खरी ॥ २ ॥ हरि-भजनीं विश्वास न धरिला, सरलें आयु तरी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु करिल कृपा कशि, आहे सदय परी ॥ ४ ॥

पद ५४. उपदेश.

निशिदिनी हरिला भजा भजा हो ॥ जप तप साधन कांहिंच नलगे यांतचि हरिलाभ जा भजा हो ॥ धृ० ॥ पहातां नाहींच सुख संसारीं ॥ देहसंबंधीं, मायिक सारीं ॥ चित्तीं आठवा प्रभु कंसारी ॥ विषयसुखा द्या रजा रजा हो ॥ १ ॥ पुनरपि नरदेह प्राप्त कशाचा ॥ व्यर्थचि कांहो नाश अशाचा ॥ यम सदनीं बहु मार कशांचा ॥ मार्ग सुलभ जा भजा भजा हो ॥ २ ॥ सत्संगाची प्रीति असावी ॥ गोडी हरिच्या गुणीं वसावी ॥ शुद्ध मती हरिचरणीं ठसावी ॥ मूर्ती हरीची पुजा पुजा हो ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु धरिल करी तो ॥ निज भक्तावरि प्रेम करितो ॥ पहा उद्धरिला पशुहि करी तो ॥ भक्तिरसांत भिजा भिजा हो ॥ ४ ॥

पद ५५ ईशस्तवन-विठ्ठल.

विठ्ठल निज नयनीं पाहूं जाउनि पंढरिला ॥ धृ० ॥ राउळीं भक्त मिळोनि फार ॥ करिती एकचि जयजयकार ॥ वाहुनि

---

1 आठ प्रहर.

पुष्पांचे संभार ॥ जगदाधार तोषविती ॥ १ ॥ करिती भजनाचा बहु थाट ॥ गाती गुण प्रभुचे आचाट ॥ बहुतचि नामाचा बोभाट ॥ धरिती हाट हरिपायीं ॥ २ ॥ भक्ताधिनता प्रभुची खरी ॥ पुनरपि आला पंढरपुरी ॥ दुरितें भजकांचीं संहारी ॥ दावी वरी निज लीला ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी विठ्ठल पाय ॥ वंदू दाविल तरणोपाय ॥ सहजाचि होतिल दूर अपाय ॥ पंढरिराय सदय बहु ॥ ४ ॥

पद ५६. उपदेश.

काफी–भोलानाथ दिगंबर या चालीवर.

मनारे कसि गति होइल स्मरसी न हरिच्या पदा ॥ धृ० ॥ क्षणभंगुर तनु जाइल विलया पुनरपि न मिळे कदा ॥ १ ॥ क्षणिक सुखाची धरिसी स्पृहा तरी भोगिसि भव आपदा ॥ २ ॥ संतसमागम करिसि न यावरी ताडिल यम शतदा ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम भजाना नेइल तो सुपदा ॥ ४ ॥

पद ५७. उपदेश.

[ भोलानाथ दिगंबर. ]

अतां मज भेटेल राम कसा ॥ धृ० ॥ जन्मापासुनि त्यासि न स्मरलों पापी कोण असा ॥ १ ॥ विषय सुखाची आशा यास्तव झालों फार पिसा ॥ २ ॥ स्वार्थ नसुनि परमार्थ दवडिला नागवलों दिवसा ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु नाहिंच यजिला पावेल कां नवसा ॥ ४ ॥

पद ५८ ईशस्तवन–नरहरी.

त्राहि पाहि बा नरहरि राया ॥ मी नमितों पायां ॥ शांत शांत हो प्रांत गोड करि दांत तुझ्यासम कोण जगीं या ॥ धृ० ॥

कथिलें गुरुचें मज नाहीं रुचलें ॥ तव नामचि सुचलें ॥ कुचलें बहुताचि परिवपु नच खचलें ॥ मग विषही पचलें ॥ पाय तुझे मनिं, काय यमाची माय प्रसवली नाश कराया ॥ १ ॥ बा ही वंदितसे पाय रमा ही ॥ धरि शांतिस कांहीं ॥ नाहीं विबुधामधिं शक्तिच पाही ॥ तव नयना पाही ॥ पाव पाव, दे ठाव निजपदीं भाव तुझी नकळे कवणा या ॥ २ ॥ ताता, गति दिधली पाहातां पाहातां ॥ जरि होति अहंता ॥ समता तुझि सत्यचि लक्ष्मी-कांता ॥ तूं सत्पद दाता ॥ रोष कशास्तव दोष मुक्त रिपु झाला तोष जगीं सुजनाया ॥ ३ ॥ वासी, गिरिचा प्रभु शांतचि झाला ॥ सुख दे सकळाला ॥ बाळा पाहुनिया बहुताचि द्रवला ॥ सुरसंघहि ळवलां ॥ जयजयकारें विजय वर्णुनी सुरवर वर्षति सुमस-मुदाया ॥ ४ ॥

पद ५९. ईशस्तवन–देवी.

धांव पाव दे ठाव निजपदीं भाव धरुनिया नत निर्धारी ॥ धृ० ॥ माया तूं त्रिजगाची आदिमाया ॥ नकळे महिमा या ॥ माया मति कैंची तव गुण गाया ॥ न पुरे महिमा या ॥ खेळ करिसि बहु वेळ निवटिसि ब्रह्मांडें द्रुत सारीं ॥ १ ॥ झाला त्रि-जगासहि तापद मोठा ॥ महिषासुर खोटा ॥ तोटा, विप्रांचा करि बहु मोठा ॥ बांधुनि करी धोटा ॥ प्राशी निशीदिनी बहु रुधि-रासी रासी कुणपाच्या भारी ॥२॥ स्तविलें, देवांनीं तुज त्यासाठीं ॥ जाहली बहु दाटी ॥ आटी असुरासी पाडुनि गाठी ॥ अंबे बहु हाठी ॥ क्रुद्ध होउनि अति शुद्ध यशास्तव रुद्ध करुनि वधिला देवारी ॥ ३ ॥ हर्षें सुमवर्षें तुज अमरांनीं ॥ तोषविलें रानीं ॥ कानीं सैन्याचा नाद भवानी ॥ जातां असुरांनीं ॥ त्यजती पडती किती अडखळती ॥ गिरिवासी प्रिय जय पुतनारी ॥ ४ ॥

पद ६०. ईशस्तवन कृष्ण.

गोकुळवासी प्रभु कंसारी ॥ तारी बुडतों भवसंसारी ॥धृ०॥ संचित जें का जन्मांतरिचें ॥ प्राप्त भोगणें त्या त्या परिचें ॥ सुख नसतां अनुभवलीं भारी ॥ नित्य निरंतर दुःखें सारीं ॥ १ ॥ यातायातीं कष्ट भोगिलें ॥ जन्ममरण हें कवच जोडिलें ॥ अभेद्य वाटे मज पुतनारी ॥ या नरदेहीं लावी थारी ॥ २ ॥ गुण गावे हें पडलें कर्णीं ॥ परि दैवाची अघटित करणी ॥ विषयमदें मद भरला अंगीं ॥ भंगि कोण तुजवीण मुरारी ॥ ३ ॥ वय गेलें संपूर्ण श्रीपती ॥ पाश यमाचे जवळिच दिसती ॥ प्रणतजनावन वचन रक्षुनि ॥ लावि दिनासी भवपरपारी ॥ ४ ॥ गिरिवासी हा चरणीं लोळे ॥ पाहि कृपेचे उघडुनि डोळे ॥ जगिं उद्धरिलें बहु जन पापी ॥ त्यांत नसे मी तुजला भारी ॥ ५ ॥

पद ६१. ईशस्तवन राम.

रामा मज देशील भेट कधीं ॥ धृ० ॥ संसाराची करितां चिंता सरली कीं अवधी ॥ १ ॥ भजन पूजन मज कांहीं न घडलें दुस्तर भवजलधी ॥ २ ॥ संतसमागम कोठुनियां मग मुळचा हा खळधी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु शरण अतां मी तारी यास अधीं ॥ ४ ॥

पद ६२. ईशस्तवन.

दीनदयाळा पूर्ण कृपाळा दावी पद युगलासी रे ॥ पडलों मी भव पाशीं रे ॥ केल्या पातक राशी रे ॥ धृ० ॥ बाळपणीं अतिकोमल काया सेज सदा वमनाची रे ॥ होय क्षुधा तरि देति भेषजें त्वरित व्यथा शमनाची रे ॥ नाहीं सिमा रुदनासी रे ॥ केलें त्वां अवनासी रे ॥ १ ॥ प्राप्त दशा पौगंड त्यावरी

यौवन भरलें अंगीं रे ॥ विवेकत्यागें नित्य निरंतर रतलों प्रमदा संगी रे ॥ नाम नये वदनासी रे ॥ झालों वश मदनासी रे ॥ २ ॥ वृद्धपणीं सुत दार धनाची मोघ अशा सदनाची रे ॥ वय गेलें संपूर्ण ॥ विस्मृती झालि असे निधनाची रे ॥ नाहीं केली काशी रे ॥ नेइल यम नरकासी रे ॥ ३ ॥ अठऊनिया अपराध आपुले शरण तुला गिरिवासीरे ॥ नाशी भवदुस्तरतर भारी पावसी तूं भजकांसी रे ॥ विदित असे जगतासी रे ॥ पावन करि पतितासी रे ॥ ४ ॥

पद ६३. ईशस्तवन–राम.

रामा मज तारि मज तारि भवजल हें भारी ॥ धृ० ॥ क्षणभंगुर असुनि काय ॥ स्मरलों नाहींच उपाय ॥ क्षमा करुनि मदन्याय ॥ लावी परपारी ॥ १ ॥ विषयांची धरुनि कास ॥ झालों मी धनिकदास ॥ केला तव भजनिं त्रास ॥ श्रमलों संसारी ॥ २ ॥ कन्या सुत आप्तदार ॥ होतें गणगोत फार ॥ वृद्धपणीं तेचि थार ॥ देति न अवधारी ॥ ३ ॥ रामा गिरिवासि धांव ॥ सत्वर मजलागिं पाव ॥ निजचरणीं देईं ठाव ॥ जन्म मरण वारी ॥ ४ ॥

पद ६४. ईशस्तवन–राम.

रामा मज तारी मज तारी ॥ पडलें संकट भारी ॥ धृ० ॥ होऊनि नरतनु धारी ॥ भजलों नाहीं तुज निर्धारी ॥ १ ॥ सौख्य न या संसारीं ॥ वंचक रांडा पोरें सारी ॥ २ ॥ या भव पारा वारीं ॥ लाविल कोण दुजा परपारी ॥ ३ ॥ क्षणिक सुखास्तव भागी ॥ पडलों दुष्ट दशे माझारीं ॥ प्रभु गिरिवासि तवद्वारीं ॥ तिष्ठें दूर न येथुनि सारीं ॥ ५ ॥

पद ६५. ईशस्तवन—राम.

क्षितिजापति रामा मज तारी ॥ भवभय दुःख निवारी ॥ ॥ धृ० ॥ लक्षचौऱ्यांशीं फेर फिरुनिया झालों नरतनुधारी ॥ पुत्र कलत्रामाजि गुंतलों लावी त्वरें परपारी ॥ १ ॥ भजनपुजन मज नाहिंच घडलें वय गेलें संसारीं ॥ स्नानपान गंगाजालिं कैंचें ॥ चित्तसदा व्याभिचारी ॥ २ ॥ सत्संगाची वाट मोडिली दंभाचि लोकाचारीं ॥ उपरातिची तरी वार्ता नेणें निरयाचा अधिकारी ॥ ३ ॥ गिरिवासी तुझी आस धरितसे दावी पद-रज थोरी ॥ उद्धरिलें बहु पापि तुवां परि त्यांहुनि हा अवि-चारी ॥ ४ ॥

पद ६६. ईशस्तवन—कृष्ण.

कधिं भेटसि मंगल धामारे ॥ धृ० ॥ देवाध्यक्षा ॥ कमल-दलाक्षा ॥ रुक्मिणीरमणा ॥ भवभयहरणा ॥ पुरविसी निजजन कामा ॥ १ ॥ आह्मी हीन यातीं ॥ धरिलेंसी हातीं ॥ दुष्ट मर्दुनी तुष्ट द्रौपदी केली जगविश्रामा ॥ २ ॥ जा ह्मणवेना ॥ स्थिर करवेना ॥ कल्पपादपा करि अनुकंपा सत्वर ये घनश्यामा ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी रक्षिसी आह्मां ॥ दीनदयाळा पूर्ण कृ-पाळा दावी निजपद पद्मा ॥ ४ ॥

पद ६७. ईशस्तवन—शंकर.

धांवे पावे बा त्रिपुरारी पन्नग भूषणारे ॥ धृ० ॥ भवसा-गरीं या बुडतों पाही ॥ तारूं तुजवीण दुसरा नाहीं ॥ यास्तव नमितों अनुदिनी सन्मन तोषणारे ॥ १ ॥ ह्मणती देवाचा तुज देव ॥ निजस्वरूपाची दाखवि ठेव ॥ सृष्टिस्थितीलय कारण हल-हल शोषणारे ॥ २ ॥ त्रैमूर्तींचा तूं निज ठांव ॥ जाणसि सर्वां-

तरिचा भाव ।। पूर्ण शुभाशुभ कर्म फळातें देसी मन्मथदुषणारे ।। ३ ।। गिरिवासी प्रभु हा नत काय ।। होऊनि वंदितसे तव पाय ।। जन्म जरा भय मरण नाशुनि वारी लौकिक इषणारे ।।४।।

पद ६८. ईशस्तवन-दत्त.

पाव अतां त्वरित मला अत्रिनंदना ।। धृ० ।। विधिहरिहर त्रिदशवरा ।। त्रिगुणमूर्ति त्रिशुलधरा ।। भक्तजनानंदकरा पाप मोचना ।। १ ।। करिं धरिसी चक्र वगा ।। डमरू भस्मांग भरा । मौनि जटी दिगंबरा पातित पावना ।। २ ।। कमंडलूधर चतुरा ।। उद्धारिसी जनातुरा ।। दे दर्शन परात्परा ।। भवाधि नाशना ।। ३ ।। योगियांत होसि शिरा ।। माला दर चर्मधरा ।। नमितों जोडूनि करा ।। विश्वभावना ।। ४ ।। गिरिवासी तूंचि खरा ।। वोपी शिरीं अभय करा ।। करि तरणोपाय बरा ।। जगद्वंदना ।। ५ ।।

पद ६९ ईशस्तवन—राम.

राम कधिं भेटल तो मजला ।। धृ० ।। बाळपणातचि मख रक्षुनियां तोषविलें मुनिला ।। १ ।। चरण रजानें पाषाणाची केलि असे अबळा ।। २ ।। भवधनु भंगुनि सीता वरिली सुखवी जनकाला ।। ३ ।। प्रस्तर उदकीं तारुनि नेले कपिगण लंकेला ।। ४ ।। गिरिवासी प्रभु राम दयाळ ह्मणती जन ज्याला ।। ५ ।।

पद ७० ईशस्तवन—राम.

रामा मज दावी तूंचि उपाय ।। धृ० ।। धनसुत दारा यांतचि रमलों बहु केलें अन्याय ।। १ ।। या संसारीं दुःखाचि सारे सांगू कुठवर काय ।। २ ।। असें जरि मजला प्रथमचि कळतें आठवितों तव पाय ।। ३ ।। गिरिवासी प्रभु अपराधी मी, झालों असे नतकाय ।। ४ ।।

पद ७१. ईशस्तवन-राम.

माझी आस पुरवि रघुराया ॥ धृ० ॥ शिणलों बहु मी या संसारीं दाखवि तूं निज पायां ॥ १ ॥ भवजलभारीं नाव दिसेना येइं त्वरें उतराया ॥ २ ॥ दे भजनीं मज प्रेम निरंतर घालविलें वय वायां ॥ ३ ॥ वाटे मनिं गुण गाइन आवडि सन्माति दे गुण गाया ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु तूंचि दयाघन घालि कृपेची छाया ॥ ५ ॥

पद ७२. ईशस्तवन-देवी.

अंबे जगदंबे विश्वकदंबे जगदांकुरस्तंभे ॥ पाहि मला मी दास तुझा या चरण दावि अविलंबित अंबे ॥ धृ० ॥ राही अमराही धाक अशाही, असुरांतें पाही ॥ त्वरा करुनियां बरा मर्दिला भीषणरूप कचलंबित अंबे ॥ १ ॥ रामा गुणधामा जगविश्रामा दाउनि रूप रामा ॥ वरदानें बहु तोषविले त्वां सुंदररुप अवलंबित अंबे ॥ २ ॥ नाशी जननासी करि अवनासी दुःखद भव नाशी ॥ शरण तुला संसरणा वारी व्योम केश परंभित अंबे ॥३॥ माते आपदांतें वारी पदातें, दावी सुखदाते ॥ गिरिवासी प्रभु ध्याय निरंतर विमल चरित जगलंघित अंबे ॥ ४ ॥

पद ७३. कथा-द्रौपदीचा धांवा.

करुणाकर श्रीकृष्ण मुरारी॥ पावे संकट पडलें भारी ॥धृ०॥ कुरुवंशोद्भव दुष्ट अंधसुत ॥ ओढिती वसनें करिती अनुचित ॥ लज्जा गेल्या कज्जा करुनी ॥ अर्थसाध्य तरि काय श्रीहरी ॥१॥ सभेंत आणुनि छळिती मजला ॥ परि वृद्धांतुनि कोणि न भजला ॥ व्यर्थ प्रार्थना कां करूं त्यांची ॥ तूंचि पदरजें त्वरित उद्धरी ॥२॥ पांडव आपण हरलों ह्मणुनी ॥ असनिं बैसले दीन होउनी ॥

नच रे कांहीं युक्ति राहिली ॥ मुक्ति शक्तिची सहजाचि दूरी ॥३॥ करितां अंतर या समयासी ॥ भगिनी जाइल अजि विलयासी ॥ ब्रीद तुझें तूं हरि सांभाळी ॥ करुणा येऊंदे प्रभु कंसारी ॥ ४ ॥ मूर्ति आविर्भुत झालि तेथें ॥ सुदर्शन चक्र फिरवि भोंवतें ॥ वस्त्रें वोपी अमित साजिरीं ॥ गिरिवासी धरि चरण या वरी ॥ ५ ॥

पद ७४.कटिबंध- द्रौपदीचा धांवा.

गोविंदा वेगीं धांव धांव धांव ॥ गोपाळा वेगीं धांव धांव धांव ॥ धृ० ॥ अंध तनय वश असन्मदासी ॥ बोले गर्जुनि सभासदांसी ॥ मुकले पांडव राज्यपदासी ॥ झाली द्रौपदि अमुची दासी ॥ अपथ्यकारी रुग्ण गदासी ॥ न गणी त्यापरि तो विदुरासी ॥ निर्भय वदला निजानुजासी ॥ जा जा सत्वर आण तियेसी ॥ दावी नग्न करूनि सभेसी ॥ चाल ह्मणावें कां तूं भिसी ॥ दासी झाल्या लाज कायसी ॥ हट करितां ओढावी केशीं ॥ सहसा मानुं नको वृद्धासी ॥ ऐसी आज्ञा होतां त्यासी ॥ धांवत आला द्रौपदिपाशीं ॥ अधींच दुर्जन दुर्मद राशी ॥ चित्तीं न धरी पापदरासी ॥ झोंबे सतिच्या तो पदरासी ॥ कळवूं जातां वृद्ध स्त्रियांसी ॥ जाऊं न दे अडवुनियां तिजसी ॥ ओढी निकरें कच-भारासी ॥ पाडी असडुनि भूमितळासी ॥ वदली मंजुळ शब्दें ऐसी ॥ एकांबर मी येऊं कैसी ॥ त्यांत असें स्त्रीधर्में दुरसी ॥ गांधारीसम पूज्य तुह्मांसी ॥ या वचनें चढला कोपासी ॥ चाल ह्मणे कां गे बडबडसी ॥ रडसी पडसी जरि तूं अडसी ॥ नेइन ओढुनि कोठें दडसी ॥ टाक पाऊलें गे पडदडसी ॥ नसतां पाठ असो दे धडसी ॥ ऐसें बोलुनि सभेसी हंसी ॥ आणितां कौरव करिती काव काव काव ॥ १ ॥ कौरव सभेसी पांडवजाया ॥ छळितां कोणि नये वरजाया ॥ भीष्मादिक ते आहे पुजाया ॥ भीती अंधसुता वर्जाया ॥ होते भीमार्जुन तर्जाया ॥ परि ते धर्माज्ञेसि त्यजाया ॥ अक्षम शक्ति नसे

गर्जाया ॥ आंतुनि बाहेर करिति जाया ॥ दुसरा कोण धजे काजा या ॥ नाहीं हरिविण ठाव भजाया ॥ तरि मी सांगूं कवणा जाया ॥ अवधी तिळहि नसे मोजाया ॥ हरिला वृत्त अखिल समजाया ॥ कोण मनासम दूत दुजा या ॥ ऐसें बोलुनियां हरिपाया ॥ स्मरली हृदयांतरि प्रभुराया ॥ येई सत्वर विघ्न हराया ॥ पायां पडतें दावि उपाया ॥ दुर्जन करितिल उघडी काया ॥ करणें वेळ बरा मग कां या ॥ लज्जा गेल्यावरि या ठायां ॥ येऊनि कज्जा करासिल वायां ॥ व्यसनीं मजला रक्षीं बा या ॥ नसतां भगिनि जाइल विलया । तुजविण कोणि नसे विनवाया ॥ पावे सत्वर मज या समया ॥ येऊं दे हरी तुजला माया ॥ उभीच आहें मी यदुराया ॥ दुर्जन सिद्ध वसन फेडाया ॥ बुडवूं पाहाति हरि नांव नांव नांव ॥ २ ॥ ऐसी करुणा ऐकुनि कानीं ॥ घाबरला हरि, मन न ठिकाणीं ॥ केलें चंचल चित्त हांकांनीं ॥ हरिणी धरिली दुष्ट वृकांनीं ॥ केली हळहळ बहु लोकांनीं ॥ मजविण सोडविता जिस नाहीं ॥ सहजचि शून्य दिशा मग दाही ॥ देतें मन माझें ग्वाही ॥ नलगे उशिर अतां हो कांहीं ॥ पाहणें वेळ नको घटकाही ॥ ऐसें बोलुनि त्वरित धांवला ॥ गेला सांडुनि मन-पवनाला ॥ सभेंत ह्मणती बुध जन आला ॥ आनंद झाला याज्ञसेनिला ॥ ना भी ना भी ऐसें वदला ॥ असुडी दुःशासन वसनाला ॥ त्यांत देखिलें क्षिरोदकाला ॥ तोहि ओढितां दिसे मिराणी ॥ चंद्रकळा पैठणी फुटाणी ॥ शालू भरजरी अनारदाणी ॥ लाल गुलाली सुवर्णवर्णी ॥ खंबाइत दोरिया दुखाणी ॥ साडी हिरवी लाल पोंवळीं ॥ रंग आंजरी शुद्ध सोवळी ॥ काळी गुजरी भडक जांभळी ॥ बऱ्हाणपुरची पदर नारळी ॥ हुमनाबादी तडप चारुळी ॥ देशदेशिचीं प्रसाद वसनें बहु गोलांचीं ॥ अनेक रंगी वहु मोलाची ॥ कुजना प्राप्त न त्या तोलाचीं ॥ दिसलीं साच परी झोलाचीं ॥ दिधलीं हरि गिरिवासी प्रभूचीं ॥ नकळे कवणासी मात्र भाव मात्र ॥ ३ ॥

लावणी ७५. कथा-द्रौपदीचा धांवा.

एकटी परम संकटीं बहिण धाकटी तुझी मी सखया ॥ ये सत्वर माझी लाज तुला यदुराया ॥ धृ० ॥ हा दुष्ट दांडगा पुष्ट फुटेना कु : कसा मेल्याला ॥ ओढितो पहा दुःशासनकर वसनाला ॥ कुरुवृद्ध तिहीं तरि शुद्ध वदावें क्रुद्ध होउनि कुजनाला ॥ परि भीती घालूं भीड कशास्तव त्याला ॥ पतिराज रक्षिते लाज परी ते आज स्वकिय वचनाला ॥ गुंतले ह्मणुनि बहु कष्ट जाहले मजला ॥ चाल ॥ प्रार्थितें जोडिल्या करीं ॥ ये धांवन बा लौकरी ॥ हें व्यसन अतां दुर करी ॥ करूं काय पंकीं जशि गाय वंदूं मी पाय कुणाचे सखया ॥ नसे इतरालागीं शक्ति शत्रु दंडाया ॥ १ ॥ कुरूकुळीं जन्मला कली भक्तजनछळीं उदित मन याचें ॥ अति निंद्य वचन बोलिला अमंगल वाचे ॥ निज अंक दावी निःशंक ह्मणे पति रंक तुझे हे साचे ॥ कां व्यर्थ श्रमसी घे भोग अखंड सुखाचे ॥ हा कर्ण पहा हिनवर्ण असुनि हिन वर्ण ऐकिल त्याचे ॥ ह्मणे असति, असति वर पांच हिला नित्याचे ॥ चाल ॥ गेलें हृदय सख्या हें फुटून ॥ नये जातां मजला उठून ॥ कसें नभ पडलें आज हें तुटून ॥ कुठें थार नसे आधार कष्टलें फार आजि या समया ॥ मज दीनाची येऊंदे तुला हरि माया ॥ २ ॥ किति वेळ प्रार्थुं किति वेळ जाहला खेळ दुर्जना पाही ॥ हरि लज्जा गेल्या येइल काय पुन्हा ही ॥ जरि अंत पहासि निभ्रांत होइळ देहांत अन्यथा नाहीं ॥ कासि माता लाविल बाळ अन्य थानाही ॥ यदुवरा करावी त्वरा प्राण घाबरा सुचेना कांहीं ॥ यासाठीं दिधले कष्ट तुला हांकांहीं ॥ चाल ॥ ओढितो दुष्ट हा निरी ॥ काय अवधि राहिली तरी ॥ तूं स्वस्थ कसा अंतरीं ॥ घे धांव हरी मज पाव बुडतसे नांव येइ लवलाया ॥ या कौरव डोहीं कोण दुजा ताराया ॥ ३ ॥ विनवणी ऐकतां क्षणीं त्यजुनि खगमणी मनासम धावे ॥ करि लगबग मनिं भगिनिचें कार्य

साधावें ॥ करि सभा सुगंधित उभा पाठिसी प्रभा चरण वंदावे ॥ ह्मणे ना भी आलों दीन तुज न वाटावें ॥ बुधजनीं वळखिलें मनीं जया त्रिभुवनीं ह्मणति मुनि गावें ॥ त्या हरिपद्पद्मा करिति नमन सद्भावें ॥ चाल ॥ असुडिली निरी त्या खळें ॥ दिसे आंत वसन वेगळें ॥ गमे चरित तया आगळे ॥ धरि हांव ओढि पाटाव कळेना भाव हरीची माया ॥ ह्मणे कुटिल बहू अजि नग्न करिन ही जाया ॥ ४ ॥ पोंवळी शुद्ध सोंवळी त्यांत जांभळी पैठणी हिरवी ॥ अति सुंदर शालू हेमकांतीला मिरवी ॥ असि किती वसनसंहती जयाची मिती होईना वरवी ॥ नेसवी हरी किति भगिनिस प्रमुदित करवी ॥ शेवटीं तनू पितपटीं झांकिली दिठी सुदर्शन फिरवी ॥ प्रभु दीनाचा कैवारि दुर्जना विरवी ॥ चाल ॥ दुःशासन बसला तळीं ॥ गडबडालि कुजनमंडळी ॥ तव कुरुपासन डळमळी ॥ द्रुपदजा वंदि पदरजा उभविली ध्वजा शत्रु निवटाया ॥ गिरिवासी प्रभुची तप्त जनांवरि छाया ॥ ५ ॥

पद ७६ कथा-द्रौपदीचा धांवा.

दुर्घट हें व्यसन आजि रक्षि पूतनारी ॥ ध्रु० ॥ दुःशासन दुष्ट फार ॥ ओढितसे कबरि-भार ॥ श्रम देतो मज अपार संकट हें वारी ॥ १ ॥ आणिलें मजसी सभेंत ॥ केला तें बहु अकांत ॥ भीष्मादिक तेहि अंत ॥ पहाति निर्धारीं ॥ २ ॥ फाडिल हा वसन पाहि ॥ क्षणभर अवकाश नाहिं ॥ न करी तूं वेळ कांहिं ॥ पावे अवधारी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु पदास ॥ नमितें मीं पुरवि आस ॥ कवणाची धरुं मि कांस ॥ होसी कैवारी ॥ ४ ॥

पद ७७. कथा ब्रह्मदेवानें वत्स नेले.

भोंवतिं गोपमुलें सारीं ॥ पुलिनीं खेळे कंसारी ॥ ध्रु० ॥ करुनिया भात दहीकाला ॥ कवल दे वदनीं गोपाला ॥ लोणचीं

शाक इतर पाला ॥ शिदोऱ्या वाटी सकळांला ॥ वासुरें दुगावलीं भारी ॥ १ ॥ विधिला ब्रह्म असुनि ठावें ॥ अविद्येलागिं धरूं धांवे ॥ गमलें गोपवत्स न्यावे ॥ प्रभूचें चरित विलोकावें ॥ हरी जो जगत्रया तारी ॥ २ ॥ विनटला रुपें अवघ्यांचीं ॥ उपानहशिंकिंशिदोऱ्यांचीं ॥ लोटलीं अयनें द्वय साचीं ॥ करणी विश्वशरण्याची ॥ वाजवी मुरलि पूतनारी ॥ ३ ॥ धाता पाहुनियां चरिता ॥ निघाला शरण रमानाथा ॥ प्रभु गिरिवासि असें पहातां ॥ वर दे झाला तोषविता ॥ अंतरिं ध्यातो मदनारी ॥ ४ ॥

पद ७८ कथा--जगन्नाथ.

हरि तो दासरूप झाला ॥ वंदिती सुरवर मुनी ज्याला ॥ धृ० ॥ वसतो चराचरीं भगवान् ॥ बोलिला पित्यासि हे महिमान ॥ स्तंभीं होऊनिया निर्माण ॥ भक्त प्रल्हाद रक्षियेला ॥१॥ जाहलें जनन काष्ठ उदरीं ॥ ह्मणुनि त्या दिधली मातृसरी ॥ वाहे उपकृतीस शिरीं ॥ बुडविल उदक कसें त्याला ॥ २ ॥ वामनें धरिला दंड करीं ॥ दंडिलें बळीस त्या अवसरीं ॥ वागवी परशुराम स्वकरीं ॥ आवडे धनु त्या रामाला ॥ ३ ॥ कृष्णे मुरली निज अधरीं ॥ धरिली मधुर ध्वान करी ॥ फिरवुनि निजांगुलीस वरी ॥ सुखवित अनुदिनिं हरि तिजला ॥ ४ ॥ फिटेना उपकाराच हारेला ॥ शेवटीं तद्रूपाच झाला ॥ पहा त्या जगन्नाथाला ॥ प्रभु गिरिवासी नमुं त्याला ॥ ५ ॥

पद ७९. कथा—कृष्ण रडत असतां त्याची समजुन.

तान्हुल्या रडूं नको व्रजनाथा ॥ धृ० ॥ मारुद साकर साय दुधाची देतें काढुनि आतां ॥ १ ॥ दुधभाताचा करितें काला, झोंपचि येईल खातां ॥ २ ॥ आज गजानन येतिल सदनीं

मोदक देइन हाता ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु खोडी नको करुं गातिल बहु जन गाथा ॥ ४ ॥

लावणी ८०. कथा--कृष्णाची

या हरिनेंग ग बाई सारें गोकुळ चेवढाळिलें ॥ काय सांगु मात तरि माततात भुलविले ॥ धृ० ॥ दह्या दुधाचि करिनाका चोरी त्याला कोण पाहुं गेलें ॥ आहे देवाचि दया त्यानें काय बेरें आह्मां उणें केलें ॥ नाहिं गोरसाचि खंति त्यानें किति जरी चोरुनि नेलें ॥ वाटतें दुःख हें फार नांव बुडविलें ॥ १ ॥ यानें गवळ्याच्या पोरिसाठीं घर ना घर चाळिलें ॥ काय याच्याखुळें याला आईबापानिंग पाळिलें ॥ निरुपाय झाला यानें घाण्यांतचि गाळिलें ॥ सांगावें कवणा अह्मा फार जाचिलें ॥ २ ॥ पहा बळीराम कसें लेंकरूं आहे गुणिजन ॥ कोणि पाहिनाच त्याकडे कसे हे जन ॥ कोणी पुसेनाचि त्यास उपवासि केलें भोजन ॥ आहे मर्यादशील फार म्यांहि पाहिलें ॥ ३ ॥ किति उघडुनि सांगूं काय लपले याचे गुण ॥ होतो ल्हानाचा थोर याची उठली असी गुणगुण ॥ कशि अघटित करणी नवलचि वाटे ऐकुन ॥ गिरिवासी प्रभुनें कांहो नयन झांकिले ॥ ४ ॥

पद. ८१ कथा--कृष्णाची गान्हाणीं

कृष्णा थांब थांब थांब ॥ सांगतें मातेला तुझ्या थांब ॥ धृ० ॥ निजलीं बाळें उठविसी हातें ॥ नाहिं कोणि कथिलें मीच पहातें ॥ वाईट हरी हें तुझें काम काम काम ॥ १ ॥ अडविसी मुलिला यमुनेच्या वाटे ॥ हरि तुझी लीला तुज गोड वाटे ॥ शिरिं घागर अंगिं घाम घाम घाम ॥ २ ॥ चेंडू नेला ह्मणसी हिरुनि ॥ ओढिसी मुलिला कंचुकि धरुनि ॥ नाठवे तयांसी निज धाम धाम धाम ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु कां रे न भीसी ॥

नाहिं दिन तुजला नाहिं हरि निशी ॥ छाळिसी सकळां अष्ट याम याम याम ॥ ४ ॥

पद ८२. कथा–राधेचा धांवा.

घेउनि ये यदुवीर अतां सये ॥ धृ० ॥ हरिविण वाटे पळहि युगापरी ॥ धीर कसा धरुं होतसें घाबरी ॥ १ ॥ भोग सकलही रोगचि भासति ॥ काय करुं गडे न दिसे बरी गती ॥२॥ अन्नपाणि मज विषचि गमे सये ॥ सुखशयनीं क्षण नीज मला नये ॥ ३ ॥ गिरिवासी हरि भेटविसी जरी ॥ वाहिन नित्य मी उपकृतिला शिरीं ॥ ४ ॥

पद ८३. कथा–कृष्ण मथुरेस जातात तेव्हां गौळणींचें दुःख.

हरीगमन केंवि सहन होय अह्मां बाई ॥ एकाएकिं दुःख भागि झालों कशापाही ॥ धृ० ॥ हरिवीणें काय जिणें ॥ व्रज आजी झालें सुनें ॥ अक्रुरानें क्रूरपणें ॥ घात केला गाई ॥ १ ॥ बाळपणीं खेळ खेळे ॥ नवनीताचे चोरी गोळे ॥ गोप मुलिस दापी बळें ॥ नवल वदों काई ॥ २ ॥ विषनीर प्राशियलें ॥ गाई आणि गोप मेले ॥ त्यांसी त्वरें जीवविलें ॥ घालविला आह्मी ॥ ३ ॥ सप्त अहोरात्रवरी ॥ वज्रपाणि वृष्टि करी ॥ नखाग्रींच गिरी धरी ॥ राखि गोपगाई ॥ ४ ॥ षण्मासाचि क्षपा करी ॥ तोषविल्या व्रजनारी ॥ तोचि स्मर अभ्यंतरीं ॥ दुःख कोण साही ॥ ५ ॥ गिरिवासी प्रभु हरी ॥ कृपा करिल निर्धारीं ॥ तरींच दुःख होय दुरी ॥ भेटे लवलाही ॥ ६ ॥

पद ८४. कथा–उद्धवाला गौळणी सगुण कृष्ण दाखीव ह्मणतात.

उद्धवा तें सगुण ब्रह्म दावी लवलाही ॥ धृ० ॥ नित्य वर्ते गोकुळांत ॥ दिसे सर्वांठायिं पळांत ॥ मर्दि कालिया जलांत ॥

तेंचि ब्रह्म पाहीं ॥ १ ॥ क्षणें दावी बाळलीला ॥ क्षणें राधिकेचा लळा ॥ पुरवी ठायीं ठायीं ॥ २ ॥ उद्धवा ती सुखगोडी ॥ जरी वर्णी शेष थोडी ॥ तरी ब्रह्मानंद जोडी ॥ पावे सर्वदाही॥३॥ ऐसें ब्रह्म सोडुनियां ॥ केंवी आठवावें तया ॥ दृश्य जाइना का लया ॥ भास मात्र जोही ॥ ४ ॥ असे कर्मातीत अकर्ता ॥ कोण जाणें त्याची सत्ता ॥ मूर्तीविणे विश्वासतां ॥ अह्मां नाहीं नाहीं ॥ ५ ॥ गिरिवासी तोचि असे ॥ सर्व रूपीं नटलासे ॥ ह्मणती सदा जवळी वसे ॥ न गमे सत्य तेंही ॥ ६ ॥

८५. कथा.

( गौळणी कृष्णाला उद्धवाच्या हातीं निरोप पाठवितात. )

उधोजी सांगा यदुवीरा ॥ धृ० ॥ गोपि मराया उदिताचि ऐसें, जाउनि विदित करा ॥ १ ॥ घडि पळ लव ज्यां युगसम भासे, दर्शन दे चतुरा ॥ २ ॥ कुब्जा दासी कंसगृहींची. जोडा काय बरा ॥ ३ ॥ अह्मि अपराधी काय अशा हरि, केला निकुर खरा ॥ ४ ॥ यावरि अमुचें प्राक्तन जैसें, तुह्मी तरि कान भरा ॥ ५ ॥ गिरिवासी प्रभु भेटे अह्मां, तरि गणुं उपकारा ॥ ६ ॥

लावणी

कथा–सुभद्राहरण प्रसंगीं रुक्मीणीस सुभद्रेचे उत्तर.

ह्मणे सुभद्रा रुक्मिणि वहिनी काय त्रपा सांडिली ॥ पत्रिका कोठें म्यां धाडिली ॥ धृ० ॥ वडिलपणाचें वारें अंगीं ह्मणाल तें साजतें ॥ असें मी वदलें तरि काय तें ॥ शोध करा हें एकांतींचें ह्मणणेंही जाचतें ॥ तरी कां न वदावें साच तें ॥ विवाहकाळीं बाई अपुल्या फारच मी ऐकतें ॥ कळवा पुसतें मज एक तें ॥ शिशुपाळासी निश्चय होतां कांहो धृति त्यागिली ॥ १ ॥ ब्रह्मसूत्र जरि प्रमाण ह्मणतां कां न राहिला तसें ॥ धाडिलें त्वरित सुदेवा कसें ॥ वृत्त मुखोद्गत कथुनि भरंवसा कांहो मानिला नसे ॥ लिहिले पत्र प्रखर कां असें ॥ कीं प्रभुजी मज धीर न धरवे या

लवकर फारसे ॥ तुह्मांविण जिव व्याकुळ होतसे ॥ देउं पाहती त्याचालागीं असे हळद लाविला ॥ २ ॥ दादाला तुह्मि दा दा ठरवुनि केली निंदा तधीं ॥ दिधल्या मनास त्याच्या अधीं ॥ कांहींतरि मी वदलें सांगा बळिदादाची कधीं ॥ निंदा अपुल्या आली मधीं ॥ गिरिवासी प्रभुनेंचि विनोदें कथिलि कथा मागिली ॥ ३ ॥

## लावणी ८७.

( लक्ष्मीचं स्वयंवर. )

धन्वंतरि वर दाउनि सांगे नामें त्यांचीं बरीं ॥ बाइगे हा याची नोवरी ॥ धृ० ॥ ब्रह्मा ह्मणसी समर्थ परि तो वृद्ध जरठ फारसा ॥ अशाचा काय तरी भरंवसा ॥ सद्गुण बहु सांगसी परंतु कन्येवरि लालसा ॥ वरूं मी काय वर असा ॥ रुद्र ह्मणावा योग्य तरी तो स्मशानवासी तसा ॥ दरिद्री पंचानन विरूपसा ॥ भिक्षा मागे नित्य घरोघरिं पसरी तो करपसा ॥ योजिसी सवती वर मज कसा ॥ दुर्वासामुनि फार चांगला दिसतो सर्वोपरी ॥ १ ॥ अतितर कोपी काय करावा क्षुधा यास फारसी ॥ वाटतें भय माझ्या मानसीं ॥ मिळेल खाया तोंवरि बरवा नाहींतर तामसी ॥ भक्षिल मजही एका दिसीं ॥ इंद्र असे परदारागमनी पराधीनता तसी ॥ घालूं माळ अशाला कसी ॥ परशुराम हा धर्मपरायण ज्ञानवान बहु तरि ॥ २ ॥ भूतदया अंतरीं असेना काय अशाला करूं ॥ कांता होउनिं कां मी मरूं ॥ वधिली माता क्षणांत ज्यानें असें तिखट लेकरूं ॥ भरंवसा याचा कैसा धरूं ॥ सनकादिक हे निरापेक्ष तरी चित्त कसें आवरूं ॥ घडल्या पातक कोठें भरूं ॥ मार्कंडेया ऋषी असे हा दिर्घायू पति करी ॥ ३ ॥ युवती सोशिल इतर सर्वही सोसेना तिजप्रती ॥ मिळाला षंढचि दैवें पती ॥ इंद्रियदमनी असा तापसी करिल काय ती सती ॥ सहजाचि होइल कुंठित मती ॥ इंद्रियलालन परि दैत्यांचा काळ फिरे भोंवतीं ॥

अशांची कैची बरवी गती ॥ सुरगुरु शुक्रादिक हे ज्ञानी थांत पहा कुणितरी ॥ ४ ॥ शोधुनि पाहतां तिला वाटला पुरुषोत्तम हरि बरा ॥ असेना याहुनि वर दूसरा ॥ आत्मरत प्रभु असो तयाच्या पदिं वाहिन मी शिरा ॥ द्रवेलचि आहे दयालु खरा ॥ माळ गळा घातली प्रभूच्या भ्याली नाहिं जरा ॥ ह्मणे मी नवरी हा नोवरा ॥ गिरिवासी प्रभु वरिला श्रीनें मंगलरूपी हरी ॥ ५ ॥

### लावणी ८८.

( कथा—स्वर्गपुष्प रुक्मिणीस दिलें ह्मणून सत्यभामेचा कोप. )

कुसुम दिलें रुक्मिणिला ह्मणउनि कोपाकुळ बहु भामा ॥ शांत नव्हे सर्वथा सूचवी आत्मघात परिणामा ॥ धृ० ॥ स्वर्ग पुष्प नारदें सुगंधिक अणुनि द्वारके मधीं ॥ समर्पिलें श्रीभगवंतातें रुक्मिणीला दे तधीं ॥ सांगति वार्ता सत्यभामेला दासि तिच्या त्या अधीं ॥ ह्मणुनि कोप संचरे असा तिज अळाच नव्हता कधीं ॥ अक्षमसारे, प्रभुविण तिजला कोण शांतवी सुधी ॥ धांव घेतली दयाघनें ज्या वंदिती सुरवर विधी ॥ चाल ॥ धरणीवरि लोळते गडबडा कोण तिला सांवरी ॥ अधोवदन बैसली करीना मस्तक सहसा वरी ॥ रत्नहार तोडिलें घातली धूळ स्वकेशावरी ॥ चाल ॥ अति चढली कोपा अधर चाविते रदनीं ॥ ती ह्मणे हरिला येउं न द्यागे सदनीं ॥ बाइ करा असें तुह्मि शब्द न बोला वदनीं ॥ चाल ॥ राहुं द्या सदनिं सवतीच्या प्रियकर हरिला तुह्मि सहसा अपुल्या मनिं संशय धरुं नका ॥ वाटलें गोड कसें कुसुम द्यावया तिजला पाहवेना मुख अशाचें रागे भरुं नका ॥ सवतिच्या सख्याची भिड कायसी मजला जरि येइल सदनीं तरि त्याला भिउं नका ॥ चाल ॥ घडि घडि मूर्च्छित होतां सांवरूनि सख्या धरिती ॥ व्यजनानील घालुनि वर त्या सिंचनही करिती ॥ मंचकीं निजविली भामा करि नकार बहु जरि ती ॥ अशांत सदनीं हरि येउनिं जरि पुरवि सतीच्या कामा ॥ शांत नव्हे सर्वथा सूचवी आत्मघात परिणामा ॥ कुसुमदिलें ॥ १ ॥

## गुरुअष्टक—८९

( ईशस्तवन )

शोधिती जडाजडें उदंड या धरातळीं ॥ आत्मभ्रांति श्रुति प्रोक्त ह्मणति तनुसि वेगळी ॥ परंतु दाखवील सकळ स्वात्मि विश्व तें तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ १ ॥ उपादान मृत्तिका घटासि काय वेगळी ॥ ब्रह्म जगीं तेविं असे तरंग भासतो जळीं ॥ ह्मणति सर्व असे परी प्रत्यया नये तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ २ ॥ प्रपंच हा न वेगळा असोंचि ब्रह्मकार्य तें ॥ ताम्र खरें मात्र त्यांत पात्ररूप भासतें ॥ परंतु याहि विविध गोष्टि कळति काय अज्ञ मुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ अकार होय नष्ट तरी ब्रह्मता असेचि तसी ॥ नश्वराजडासी तें वियोग्यता घडे कसी ॥ चित्सुवर्ण नगीं खरें ह्मणुनि दाखविल तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ ४ ॥ ब्रह्मपाद विलोकिती न दिवांध सर्व ज्यापरी ॥ उघड दृष्टि आसतां न ब्रह्मता कळे खरी ॥ दाखवील हाचि पहा ब्रह्म तें दुर तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ ५ ॥ भास हा दिसे खरा उपाधिच्या मुळें जरी ॥ जागविता बुद्धि तीच सुविद्यता असे खरी ॥ भजन पुजन नित्य करी देवगुरुचि तो तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ ६ ॥ स्वप्न सर्व मिथ्य तरी असत्य भास नये जसा ॥ प्रपंच हा खरा तरी असत्य मानि तूं तसा ॥ रामनाम जपे सदा चित्तशुद्धि घडे तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ ७ ॥ फार काय वदों अतां अनन्यभाव जरी खरा ॥ वदेल हा सुनिश्चयेंच या भवांबुधी तरा ॥ सतत पाठ अष्टकास करुनि धरी समाधिला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ ८ ॥

पद ९२.

( ईशस्तवन—विठोबा. )

पंढरिराया ॥ करि तूर्ण कृपेची छाया ॥ धृ० ॥ वाटलें सुख होइल संसारीं ॥ परि मज भवलीं दुःखें सारीं ॥ तुजविण कोण दुजा दुर सारी ॥ ताप शमाया ॥ १ ॥ मानिलें शाश्वत तनुचें पाहीं ॥ मिळविले आप्त सोयरे व्याही ॥ परि परिणामीं कोणिच नाहीं ॥ कास धराया ॥ २ ॥ स्मरलों नाहिंच कीं तव चरणा ॥ कोठुनि साधन मग भवतरणा ॥ अवधी स्वल्प राहिली मरणा ॥ वंदितों पाया ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी हा नत पायीं ॥ झाला आश्रय दुसरा नाहीं ॥ गमती शून्य दिशा मज दाही ॥ ने निजठाया ॥ ४ ॥

